# माझ्या साहित्यसेवेतील स्मृती

भाग तिसरा

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १०८६
१३६९

☆

REFBK-0017308

—ना. सी. फडके

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना

# माझ्या साहित्यसेवेतील स्मृती

## भाग तिसरा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वखस
क्रमांक ८४३७८ दि: निवीच
अनुक्र ९०८६ औ: दि ११८३।८१

ना. सी. फडके

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९६३०८
संग्रह शाखा (स्वतः प्रत)

मूल्य रु. ८·००

REFBK-0017308
REFBK-0017308

व्हीनस प्रकाशन : पुणे

आवृत्ती पहिली : जूलाय १९६९

© ना. सी. फडके

प्रकाशक :

सदाशिव कृष्ण पाध्ये
व्हीनस प्रकाशन
‘ तपश्चर्या ’
३८१ क, शनिवार पेठ : पुणे २

मुद्रक :

रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ : पुणे २

## खुलासा

'माझ्या साहित्यसेवेतील स्मृती' ही लेखमाला 'झंकार' साप्ताहिकात १९४१ साली सुरू करताना तिचा प्रारंभ प्रो. ना. सी. फडके यांनी पुढीलप्रमाणे केला होता :—

> "माझ्या साहित्यिक जीवनाच्या दृष्टीनं सन १९१२ च्या फेब्रुवारी महिन्यात माझा जन्म झाला. माझी पहिली लघुकथा लिहिली गेली, प्रसिद्ध झाली, आणि मी लिहिलेला मजकूर संपादकांनी मोबदला देऊन घ्यावा इतक्या योग्यतेचा असतो असा शोध मला लागला! आपण अधिक लिहावं अशी इच्छा माझ्या मनात उत्पन्न झाली!"

अशा प्रकारे सुरुवात करून प्रो. फडके यांनी 'झंकार'मध्ये आपल्या स्मृतींची एकूण ८३ प्रकरणे

लिहिली. त्यांपैकी पहिली १८ 'माझ्या साहित्यसेवेतील स्मृती : भाग १ ला' या नावाच्या पुस्तकात प्रसिद्ध झाली. १९२६ च्या जूलाय महिन्याच्या पहिल्या तारखेस प्रो. फडके कोल्हापुरास आले आणि 'राजाराम कॉलेजातील' नोकरीवर रुजू झाले, तेथपर्यंतची हकीगत या पहिल्या भागात येऊन गेली.

प्रो. फडके यांच्या साहित्यिक जीवनातील १९२६ ते १९३२ अशा सात वर्षांचा कालखंड 'माझ्या साहित्यसेवेतील स्मृती : भाग २ रा' या पुस्तकातील १९ ते ४६ स्मृतींनी व्यापलेला आहे.

'माझ्या साहित्यसेवेतील स्मृती : भाग ३ रा' या प्रस्तुत ग्रंथात ४७ ते ८३ अशा एकूण ३६ स्मृतींची प्रकरणं दिलेली आहेत. १९३३ साली पुण्याच्या 'ज्ञानप्रकाश' नावाच्या त्या काळातील सुप्रसिद्ध दैनिकात 'वाङ्मयविहार' नावाची लेखमाला प्रो. फडके यांनी लिहिली, तेव्हापासून पुढे १९४२ साली गांधींच्या 'छोडो भारत' चळवळीच्या निमित्तानं कोल्हापुरात मोठा प्रक्षोभ झाला, आणि प्रो. फडके यांची धरपकड झाली तेथपर्यंतच्या नऊ वर्षांतील अनेक चित्तवेधक स्मृती प्रो. फडके यांनी स्मृतींच्या या तिसऱ्या भागात ग्रथित केलेल्या आहेत.

—प्रकाशक

# माझ्या साहित्यसेवेतील स्मृती

## भाग तिसरा

दा. क्र. १५३०८

: : ४७ : :

१९३३ सालीं 'ज्ञानप्रकाश'मध्यें माझी लेखमाला क्रमशः प्रसिद्ध होऊं लागलेली पाहून माझ्या चाहत्यांना व निंदकांना दोघांनाहि सारखंच आश्चर्य वाटलं असेल. मी ज्ञानप्रकाशांत लिहावयास तयार कसा झालों म्हणून चाहत्यांना, व ज्ञानप्रकाशनं माझी लेखमाला कशी स्वीकारली म्हणून माझ्या विरोधकांना. कारण 'प्रतिभासाधन'-वादाच्या वेळीं उलट सुलट दोन्ही प्रकारच्या पत्रव्यवहाराला व लेखांना ज्ञानप्रकाशांत जागा मिळाली होती हें जरी खरं, तरी एकंदरींत त्या वेळची ज्ञानप्रकाशची भूमिका मला हाणून पाडण्याची होती हें सर्वांनीं ओळखलं होतं. माझ्या कानावर तर यापलीकडच्या गोष्टी आल्या होत्या. साहित्याच्या क्षेत्रांतून फडक्यांना कायमचं उठविण्याची भाषा ज्ञानप्रकाश-कंपूंत झाल्याचं मला समजलं होतं. सारांश, ज्ञानप्रकाश व मी यांच्यांतला विरोध जाहीर झाला होता; आणि माझी एक लेखमाला ज्ञानप्रकाशमध्यें क्रमशः येऊं लागावी याचं कुणालाहि फार मोठं आश्चर्य वाटण्यासारखं होतं.

पण त्याचं असं झालं—

'प्रतिभासाधन' लिहिण्यासाठीं साहित्यविषयक प्रमुख ढोबळ प्रश्न मीं निवडले व त्यांवर विस्तृत वाचन व स्वतंत्र विचार केला. परंतु हें करीत असतां व 'प्रतिभासाधनां'तील निरनिराळीं प्रकरणं प्रत्यक्ष लिहीत असतां

माझ्या मनांत साहित्यविषयक अनेक मनोरंजक प्रश्न उभे राहत. 'प्रतिभा-साधन 'मधील त्या त्या प्रश्नाची चर्चा अगदीं मुद्देसूद व प्रमाणबद्ध ठेवण्याचा माझा कटाक्ष असल्यामुळें, माझ्या मनांत उभ्या राहणाऱ्या या छोट्या छोट्या प्रश्नांचा अंतर्भाव मी तिच्यांत करूं शकत नव्हतों; पण साहित्यशास्त्राच्या दृष्टीनं अथवा मराठी साहित्याच्या प्रगतीच्या दृष्टीनं हे छोटे छोटे प्रश्न फार मनोरंजक ठरतील, व त्यांची चर्चा झाली पाहिजे असं मला वाटे. 'प्रतिभासाधन ' प्रसिद्ध झाल्यावरहि साहित्यविषयक लहान लहान मुद्दे शोधण्याचा माझ्या मनाचा चाळा चालूच राहिला व त्याबद्दलचीं टिपणंहि मी करीत राहिलों. यामुळें १९३२ सालच्या अखेरीस मला असं आढळून आलं, कीं साहित्यविषयक विचारसरणीनं एकाच सूत्रांत बांधलेल्या, परंतु वर वर पाहतां सुट्या व स्वतंत्र दिसतील अशा किती तरी स्फुट लेखांचं साहित्य माझ्याजवळ तयार झालं होतं.

या स्फुट लेखांचा संग्रह केला तर साहित्यशास्त्राच्या अभ्यासकास 'प्रतिभासाधन ' हे मुख्य पुस्तक व हा संग्रह पुरवणी पुस्तक वाटेल अशी माझी खात्री होती. मात्र या स्फुट लेखांची निवेदनशैली एखाद्या प्रबंध-पुस्तकाप्रमाणें गंभीर न ठेवतां हलकी, खेळकर, एखाद्या लहानशा बैठकींत विषय समजून सांगितल्याप्रमाणें वाचकांना वाटावी अशी ठेवण्याचं मीं योजलं होतं. अशा पद्धतीनं लिहिलेले स्फुट लेख एकदम पुस्तकरूपानं प्रसिद्ध करण्यापेक्षां क्रमशः प्रसिद्ध झाल्यास त्यांकडे वाचकांचं लक्ष अधिक वेधेल असं मला वाटलं. त्या वेळीं वाङ्मयीन साप्ताहिक ज्याला म्हणतां येईल असं एकही साप्ताहिक मराठींत नव्हतं. परंतु ज्ञानप्रकाशमध्यें आठवड्यांतून एकदां 'काव्यशास्त्रविनोद ' हें सदर देण्यांत येत असे व तें बरंच लोकप्रिय झालेलं होतं. त्यावरून एक दिवस माझ्या मनांत आलं, कीं मीं मनाशीं योजलेल्या स्फुट. लेखांची माला ज्ञानप्रकाशमध्यें प्रसिद्ध होते का पहावं. ज्या वृत्तपत्रानं माझ्या प्रतिभासाधनाच्या स्वतंत्रपणाबद्दल प्रथम शंका प्रदर्शित केली त्यांतच ती प्रसिद्ध झाली तर माझा पर्यायानं विजय होणार होता. ज्ञानप्रकाश या गोष्टीस कबूल होईल अशी माझी खात्री नव्हती, परंतु विचारून तर पहावं असं मीं ठरविलं. ज्ञानप्रकाशचे त्या वेळचे संपादक श्री. काकासाहेब लिमये यांना मीं पत्र लिहिलं, कीं अशा

अशा स्वरूपाची एक लेखमाला माझ्या मनांत तयार आहे, व ती ज्ञानप्रकाश-मध्यें प्रसिद्ध करण्याची त्यांची इच्छा असेल तर मी अमुक मोबदला घेईन. काकासाहेब लिमये यांनीं पूर्वीच्या वादाच्या वेळचा विरोध यत्किंचित्हि न दाखवितां लेखमाला हवी असं मला कळविलं, व माझ्या मोबदल्याच्या अटीसुद्धां कबूल केल्या. मला नक्की तारीख आठवत नाहीं, पण बहुधा १९३३ च्या फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत ‘ वाङ्मय-विहार ’ ही माझी लेखमाला ज्ञानप्रकाशांत सुरू झाली. ही लेखमाला अत्यंत लोकप्रिय झाली. पुढें ती पुस्तकरूपानं प्रसिद्ध झाली. त्या पुस्तकांतील उतारे अनेक क्रमिक मराठी पुस्तकांत घातले गेले व युनिव्हर्सिटींत त्याचा पाठ्य पुस्तक म्हणूनही अंतर्भाव झाला. आतां त्याची पहिली आवृत्ति संपून दुसरी निघाली आहे.

‘ वाङ्मय–विहार ’ ज्ञानप्रकाशमध्यें प्रसिद्ध होत असतांनाच १९३३ च्या एप्रिल महिन्यांत ‘ किर्लोस्कर ’ मासिकासाठी दुसरी एक महत्त्वाची लेखमाला मीं लिहावयास घेतली. या लेखमालेचा विषय साहित्यविषयक नव्हता. आधुनिक मानसशास्त्राचीं मूलभूत तत्त्वं, आणि मानसशास्त्रविषयक जें मुख्य मुख्य पाश्चात्त्य संप्रदाय आहेत त्यांचे सिद्धान्त यांचं सुबोध विवेचन ‘ किर्लोस्कर ’च्या वाचकांना सादर करण्याची श्री. शंकरराव किर्लोस्कर यांची कल्पना होती, व ही लेखमाला मींच लिहावी अशी इच्छा त्यांनीं व्यक्त केली. मीं त्यांच्या इच्छेला मान्यता दिली व बारा लेखांचा आराखडा तयार केला. या लेखमालेला ‘ मानस-मंदिर ’ असं नांव मीं दिलं. ही देखील पुढें पुस्तकरूपांत प्रसिद्ध झाली, व त्या पुस्तकाची दुसरी आवृत्ति संपत आली आहे.

त्या दोन लेखमालांच्या भरीला ‘ किर्लोस्कर ’मध्यें लघुकथा लिहिण्याचं माझं काम चालूच होतं. लघुकथांच्या बाबतींत माझ्या मनांत एक नवीन उपक्रम घोळत होता. इंग्रजींत प्रसिद्ध होणाऱ्या लघुकथांचे संग्रह वाचून मला वाटे, कीं आमच्या मराठी भाषेंतल्या गोष्टी तितक्या सरस आहेत खास. इंग्रजी वाचकांपुढें त्या ठेवल्या तर त्यांना त्या कांहीं निकृष्ट म्हणतां येणार नाहींत. अडचण एकच होती ती मराठींतल्या गोष्टींचं उत्तम इंग्रजींत

भाषान्तर करण्याची. या बाबतींत माझ्यापुरतं मला नेहमीं वाटे व अजूनहि वाटतं, कीं गोष्टीचं काय किंवा कादंबरीचं काय, इंग्रजी वाचकांस सफाईचं वाटेल असं भाषान्तर करणं सोपं नाहीं. मी स्वत: इंग्रजी भाषेंत चांगल्यापैकीं बोलतों व लिहितों असं असूनदेखील मला हें वाटे आणि वाटतं, कारण असं, कीं एखाद्या प्रबंधाच्या स्वरूपाचा इंग्रजी ग्रंथ मी चांगल्या प्रकारें लिहीन असा मला आत्मविश्वास असला, तरी ललितवाङ्मयाला साजेशी इंग्रजी भाषा मला लिहितां येणार नाहीं, त्यासाठीं इंग्रज समाजांतच कित्येक वर्षं वावरलेलं असलं पाहिजे, अशी माझी समजूत आहे. म्हणून एकीकडे फार ईर्षा वाटे, कीं मराठी लघुकथा-वाङ्मयाचा परिचय इंग्रजी वाचकांना करून देण्यासारखा आहे, पण दुसरीकडे शंका मनांत येई कीं भाषांतराचं काम मोठं कठीण.

शेवटीं मनाशीं ठरविलं, कीं आपण आपल्याच एका गोष्टीचं इंग्रजी भाषांतर करावं, व इंग्लंडमधील अगर अमेरिकेंतील एखाद्या मासिकाला धाडून पाहावं. मात्र हा उद्योग अगदींच हास्यास्पद होऊं नये यासाठीं विचार केला, कीं आपलं भाषांतर कोणा तरी तज्ञ व्यक्तीला आधीं दाखवावं. हॉलिवुड येथील ज्या संस्थेचा चित्रपटविषयक शिक्षणक्रम मीं पूर्ण केला होता त्या ' पामर इन्स्टिटयूट 'ची मला या संबंधांत मदत होईल असं मला वाटलं. त्या संस्थेचे अध्यक्ष विल्यम डेव्हिड बॉल यांच्याशीं माझा पत्रव्यवहार होता. ' न्याय ' या माझ्या लघुकथेचं मीं इंग्रजी भाषान्तर तयार केलं, आणि बॉल यांच्याकडे धाडून दिलं. पत्रांत मीं त्यांना लिहिलं, कीं माझं इंग्रजी निर्दोष आहे असं मला वाटत नाहीं. तेव्हां ही गोष्ट एखाद्या अमेरिकन मासिकाकडे धाडण्याच्या योग्यतेची तुम्हांला वाटल्यास तिची भाषा तुम्हीं दुरुस्त करावी. त्याबद्दल हवे तेवढे पैसे मी तुम्हांला देईन.

बॉल यांच्याकडून मला जें उत्तर आलं तें सबंद पुढें देत आहे:—

"I have read your short story 'Justice' with a great deal of interest. The atmosphere, the local color, characterization, and the action—all are lifelike and convinsing. Also there is considerable emotional intensity

in your handling of small Shreepati's death, and the mother's terrible grief. Technically this is good work.

But I am afraid that the nature of the story is not such as would appeal to the American editors. The tragedy of little Shreepati's death is too harrowing for the readers of American magazines. And the solution of the plot problem (the assuaging of Mukta's grief, and her interpretation of "justice" in the birth of her new baby) does not give the dramatic or story values demanded in American fiction.

For these reasons I do not advise the: speding of any money for the revision of the story. But I am much interested in your work. I am confident that you have a great deal of material for stories, both in the novel and the short story lengths.

Thank you for your good wishes. All of us here at the Palmer Institute unite in sending you our sincere wishes for success and a happy New Year."

[ " तुमची ' न्याय ' गोष्ट मी खूपच गोडीनें वाचली. गोष्टीचें वातावरण ज्या स्थळीं ती घडते तेथील विशेषांचें सूचक वर्णन, स्वभावरेखाटन आणि प्रसंगाची घटना– इत्यादि सारें अगदीं हुबेहूब आणि खात्री पटण्यासारखें झालें आहे. त्याचप्रमाणें छोट्या श्रीपतीचा मृत्यु, व त्याची आई मुक्ता हिचा भयंकर शोक या गोष्टी सांगतांना तुमच्या वर्णनात अवश्य ती भावनोत्कटता दिसून येते. तंतदृष्ट्या सर्व कांहीं चोख आहे.

परंतु अमेरिकन संपादकांना पसंत पडेल अशी तुमची ही गोष्ट नाहीं असें मला वाटतें. श्रीपतीच्या मृत्यूचें तुमचें जें वर्णन आहे तसलीं अंगावर काटा उभा करणारीं शोकरसपूर्ण वर्णनें वाचनाची अमेरिकन मासिकांच्या वाचकांना सामान्यतः संवय नाहीं. अखेर श्रीपतीच्या दुःखाचें तुम्हीं ज्या

तऱ्हेनें परिमार्जन केलें आहे ती तऱ्हा, व आपल्या पोटीं नवें अपत्य आलें यांतच ईश्वरानें खरा न्याय दिला अशी त्याच्या आईच्या मनाची समजूत म्हणजे तुमच्या गोष्टींत अनुस्यूत असलेल्या प्रश्नाचें उत्तर होय, परंतु ज्या प्रकारचें नाट्य आणि चित्तवेधकता अमेरिकन वाचकांना हवी असते ती तुमच्या या समस्यापूर्तींत नाहीं.

या कारणासाठीं तुमच्या गोष्टीवर भाषेच्या दृष्टीनें साफसफाई करून घेण्यात तुम्हीं पैसे खर्च करावे असें मी तुम्हांला सांगत नाहीं, पण तुमचें लेखन वाचावयास मिळावें असें मला वाटतें. पुष्कळच कादंबऱ्या आणि लघुकथांचें साहित्य तुमच्याजवळ असेल अशी माझी खात्री आहे.

तुम्हीं शुभेच्छा पाठविल्या याबद्दल आभार मानतों. येथील ' पामर इन्स्टिट्यूट ' मधील आम्हां सर्वांच्या तर्फे नवसंवत्सरानिमित्त मी तुम्हांला शुभेच्छा पाठवीत आहे त्यांचा स्वीकार करा. " ]

आय्. सी. एस्. सारख्या बड्या हुद्द्याच्या जागेवर असलेल्या, टागोरां-प्रमाणें मोठ्या खानदान कुळांत जन्मलेल्या किंवा अभ्यासानिमित्त अगर इतर कारणानं इंग्लंडमध्यें कांहीं वर्षे राहून तिथल्या बड्या समाजांत मिसळलेल्या हिंदी लोकांच्या लिखाणाला, तें विशेष सरस नसलं तरी इंग्रजींत चटकन भाव येतो. पण उपरिनिर्दिष्ट तीन वशिल्यांपैकीं कोणताच ज्यांच्या जवळ नाहीं अशा मराठी अगर इतर देशभाषेंतील लोकांना इंग्लंडमध्यें अगर अमेरिकेंत मासिकांच्या अगर पुस्तकांच्या बाजारांत स्थान मिळणं किती कठीण आहे व तें मिळवायसाठीं कोणत्या गोष्टी लक्षांत ठेवल्या पाहिजेत तें बॉल यांच्या वरील पत्रावरून चांगलं ध्यानांत येण्यासारखं आहे.

' वसुंधरा ' साप्ताहिकांत सुरू असलेली माझी कादंबरी ' कलंकशोभा ' एप्रिलअखेर पूर्ण झाली. नंतर लगोलग नवीन कादंबरी लिहिण्याचा माझा विचार नव्हता. वर उल्लेखिलेल्या दोन लेखमाला आणि इतर किरकोळ लेखन मी करीत होतों आणि त्याच्या भरीला आणखी एक कादंबरी लिहिण्यास घेण्याऐवजीं विश्रांतीच घ्यावी असं मला वाटत होतं. चालू वर्षांत यापलीकडे आणखी कांहीं लिहिण्याची जबाबदारी मला नको होती. परंतु त्याच सुमारास अशा कांहीं गोष्टी घडल्या, कीं कादंबरी नव्हे पण

एका निराळ्याच तऱ्हेच्या लेखनाची जबाबदारी मला पत्करावी लागली. माझे स्नेही श्रीयुत नारायणराव देव्हारे यांनीं ' दिग्वीर सिनेटोन ' नांवाची नवी कंपनी काढली व त्यांच्या पहिल्या चित्रपटासाठीं मींच कथानक लिहावं अशी आग्रहाची इच्छा त्यांनीं प्रदर्शित केली.

श्रीयुत नारायणराव देव्हारे मूकचित्रपटाच्या जमान्यांतील एक वाखाणलेले दिग्दर्शक व पोड्यूसर होते. सुलोचना, गोहर इत्यादी नामांकित नटींना व अनेक प्रसिद्ध नटांना रुपेरी पडद्यावर प्रथम आणण्याचं श्रेय त्यांनाच दिलं जातं. एके काळीं त्यांच्या कंपनीचा व्याप फार मोठा होता व वर्षाकाठीं लाखो रुपयांची उलाढाल ते करीत असत. त्यांची कंपनी का बुडाली तें मला माहीत नाहीं. कारण माझा त्यांचा स्नेह जमला तो ती बुडाल्यानंतर. परंतु दृढ स्नेह उत्पन्न होण्यास लागणारे अनेक गुण त्यांच्या ठिकाणीं मला आढळले होते व त्यांची नवी कंपनी अनेक अडचणींतून मार्ग काढणार आहे हें मला माहीत असूनही केवळ एक मित्रकर्तव्य म्हणून त्यांना मदत केली पाहिजे असं मला वाटलं.

' केवळ मित्रकर्तव्य ' असं मुद्दामच म्हटलं आहे, कारण एक तर जें कथानक त्यांनीं आपल्या पहिल्या चित्रपटासाठीं निवडलं होतं तें लिहिण्याची मला विशेष हौस वाटावी अशा स्वरूपाचं नव्हतं. ' संत तुलसीदास ' या विषयावर चित्रपट काढायचा होता. इतर कोणी हें कथानक मला लिहावयास सांगितलं असतं तर मीं मुळींच कबूल केलं नसतं. परंतु कांहीं काल विपत्तींत आणि अज्ञातवासांत काढल्यानंतर सिनेमाच्या जगांत पुन्हां मानाचं स्थान मिळविण्यासाठीं नारायणराव देव्हारे हालचाल करीत होते, आणि पहिला चित्रपट अशा स्वरूपाचा असावा हा त्यांचा हिशोब सरळ होता. अशा वेळीं माझ्या आवडी-निवडी बाजूस ठेवून माझं साहाय्य त्यांना हवं असेल तर तें मीं दिलं पाहिजे असं मला वाटलं. केवळ मित्रकर्तव्य असं लिहिण्यांत आणखी एक अर्थ आहे तो असा, कीं देव्हारे यांच्याजवळ एक पैच्या देखील मोबदल्याचा करार न करतां त्यांचं काम मीं हातीं घेतलं. अत्रे यांनीं दोन-अडीच वर्षांपूर्वीं माझ्यावर दुष्ट खोडसाळ लिहिण्याचा जेव्हां सपाटा ठेवला होता, तेव्हां ' फडक्यांच्यामुळे हिराबाईची कंपनी बुडाली

आणि नारायणराव देव्हारे देशोधडीस लागले ' असं एक अत्यंत निर्लज्ज विधान केलं होतं. ' फडक्यांच्या ' युगांतर ' नाटकाला चांगले पैसे मिळाले व कंपनी बुडाली ती फार निराळ्या कारणानं ' असं उत्तर हिराबाईंनीं प्रसिद्धहि केलं होतं. देव्हाऱ्यांना तर अत्र्यांवर फिर्यादच ठोकतां आली असती; पण फिर्यादी, आरोपी, आणि ' माफी मागणारा ' इत्यादि भूमिका करण्यांत निढावलेल्या माणसाच्या नादीं लागण्यांत अर्थ नाहीं हा विचार उत्रड होता. आतां ' स्मृतीं 'च्या ओघांत विषय निघाला म्हणून मी स्वच्छ सांगतों, कीं ' तुलसीदास 'चं कथानक लिहिण्याबद्दल मीं दिडकी देखील मोबदला देव्हाऱ्यांना मागितला नव्हता व पुढें घेतलाहि नाहीं; आणि ' युगांतर ' नाटकाला चागले पैसे मिळाले अशी ज्या हिराबाईंनीं स्वदस्तुरची लेखी कबुली जाहीरपणें दिली व ज्यांनीं वरेरकर, टिपणीस इत्यादि नाटककारांनीं फिर्यादीचा राजमार्ग पत्करल्यावर नाटकांचे मोबदले भरमापानं त्यांच्या पदरांत घातले, त्यांनीं ' युगांतर ' नाटकाबद्दल मला पैचा देखील मोबदला दिलेला नाहीं !

पण तें जाऊं द्या. ' तुलसीदास ' चित्रपटाचं कथानक लिहावयास मीं कां घेतलं तें सांगत होतों, व त्या चित्रपटाच्या निमित्तानं मला जे अनुभव आले त्यांतले कांहीं मी यापुढें सांगणार आहें.

## : : ४८ : :

' सन्त तुलसीदास ' चित्रपटाचं कथानक लिहिण्यांत आर्थिक फायद्याचा हेतु मीं मनाशीं मुळींच धरला नव्हता हें जरी खरं, तरी पर्यायानं होणाऱ्या दुसऱ्या एका फायद्याची आशा मीं मनाशीं ठेवली होती. बोलक्या चित्रपटांचं युग नुकतंच सुरू झालं होतं, पूर्वीं चित्रपटांत भाषेचा कांहीं संबंध नव्हता तर आतां ती चित्रपटाचं एक प्रमुख अंग बनली होती. चांगल्या लेखकांचं सहकार्य आवश्यक मानल्यावांचून दिग्दर्शकांना गत्यंतर नव्हतं, आणि उलट पक्षीं लेखकांनींहि चित्रपटकलेच्या वैशिष्ट्यांचा नीट अभ्यास करण्याचे दिवस आले होते. मलाहि साहजिकपणेंच हा अनुभव मिळेल तर हवा होता. देव्हाऱ्यांशीं सहकार्य करतांना तो मला मुबलक मिळेल अशी मला आशा होती.

मात्र माझी ही अपेक्षा मुळींच सफल झाली नाहीं.

याचा दोष देव्हाऱ्यांच्याकडे बिलकुल नव्हता; त्यांच्या दुर्दैवाकडे होता असं म्हटलं पाहिजे. चित्रपटाच्या ' शूटिंग ' चं काम पुण्यास करायचं त्यांनीं ठरविलं. शंकरशेट रोडवरील ' सरस्वति सिनेटोन ' च्या आवारालगतचे बंगले त्यांनीं भाड्यानं घेतले व नटनटी, कॅमेरामन, रेकॉर्डिस्ट, इत्यादि सर्व मंडळी मुंबईहून आणून त्यांनीं पुण्यास तळ दिला. अवघ्या दीड दोन महिन्यांत एक एक चित्रपट हातावेगळा करावा, अशा प्रकारें देव्हाऱ्यांनीं पूर्वीं काम

केलेलं होतं, व त्या वेगानंच हा चित्रपट पुरा करण्याची त्यांची मनीषा होती. पण आधीं मुळीं प्राथमिक तयारींत आलेल्या अडचणी दूर करतां करतां दोन महिने वाया गेले, आणि ' शूटिंग 'चं काम मे महिन्यांत सुरू वरण्याचा पहिला बेत कुठल्या कुठें राहून त्याचा मुहूर्त ता. ३ जुलै रोजीं झाला. पुढें शूटिंग सुरू झालं पण पावसाळा जोरांत सुरू झाला, आणि त्याच्या भरीला पुण्याचा सुप्रसिद्ध मलेरिया सर्वांना चांगलाच लागला. शूटिंगचं काम बंद, परंतु कंपनीचे इतर सारे खर्च मात्र चालू, असा प्रकार होऊन बसला. बोलून चालून मर्यादित भांडवलावर उभी केलेली इमारत सावरणं कठीण होऊं लागलं. मूळ संकल्पापेक्षां किती तरी अधिक पैसे उभे करणं देव्हाऱ्यांना भाग पडलं, आणि चित्रपटाच्या दर्जापेक्षां कोणत्या युक्त्यांनीं सामान्य प्रेक्षकांना तो आवडेल या एकाच विचारानं कथानकाची मांडणीहि बदलण्यापर्यंत वेळ आली. मला हा प्रकार बिलकुल सहन होण्यासारखा नव्हता. शेवटीं मीं देव्हाऱ्यांना सांगितलं, " तुम्ही जाणे आणि ते कथानक जाणे. मला त्याबद्दल आतां कांहीं विचारूंच नका. माझं नांवदेखील चित्रपटावर घालूं नका." यांपैकीं शेवटची गोष्ट देव्हाऱ्यांनीं मानली नाहीं. परंतु अखेर चित्रपट लागल्यावर मीं तो पाहिलासुद्धां नाहीं. माझ्या मूळ लिहिण्याचा फारच थोडा मागमूस शिल्लक राहिला असेल याबद्दल माझी खात्री होती. मी अनुभव घ्यायला गेलों एक आणि मिळाला निराळाच !

परंतु इतकं असूनहि ' दिग्दर्शकानं माझा गळा कापला ' असे वरेरकर-छापाचे शब्द देव्हाऱ्यांच्याबद्दल माझ्या तोंडून निघणार नाहींत. कारण त्यांच्या चित्रपटाची जी ट्रॅजेडी झाली तिच्यांत त्यांनीं बुद्धिपुरःसर केलेला कोणताच गुन्हा मला दिसला नाहीं. विरोधी परिस्थितीचीं चक्रंच अकल्पित-पणें अशीं फिरत गेलीं, कीं देव्हाऱ्यांच्या ठिकाणच्या कलावंताला सारखी माघार घ्यावी लागली. चित्रपटाच्या निर्मितीला केवळ व्यापाराचं स्वरूप आलं आणि अखेर तो व्यापारी व्यवहारहि सपशेल फसला ! परंतु दिलदार, भावनाप्रधान, आणि प्रामाणिक स्नेही या नात्यानें देव्हाऱ्यांच्याविषयीं जो जिव्हाळा मला वाटत होता तो ढळण्यासारखं त्यांच्या हातून कांहीं एक घडलं नाहीं ! त्यांचे माझे उत्कट स्नेहसंबंध अजूनहि कायम आहेत. इतकंच काय, ' तुलसीदास 'च्या निर्मितींत भाग घेणाऱ्या ज्या कलावंतांना काम-

गारांना हाल सोसावे लागले ते देखील त्याबद्दल सांगतांना अखेर असंच म्हणतील, कीं “ नारायणराव देव्हारे मोठा कर्तबगार आणि दिलदार माणूस, पण वेळच मुळीं अशी आली कीं...”

देव्हाऱ्यांच्या पहिल्या बेताप्रमाणें ‘ तुलसीदास ’चं काम सुरळीत झालं असतं तर त्यांत उन्हाळ्याची सबंद सुटी मी खर्च करणार होतों. इतकंच नव्हे तर जून महिन्यांत कॉलेज सुरू झाल्यानंतरहि शक्य तेवढी रजा घेऊन प्रत्यक्ष चित्रणाच्या वेळीं हजर राहण्यासाठीं पुण्यास जाण्याचा माझ्या मनांतला बेत होता, परंतु तो पार पडला नाहीं. म्हणजे पार पाडण्याची इच्छाच मुळीं मला उरली नाहीं. सुटी संपून कॉलेज सुरू झाल्यावर कॉलेजांतले तास, संध्याकाळीं क्रिकेटचं प्रॅक्टिस आणि लेखन असा माझा कार्यक्रम सुरू झाला, तो ऑगस्ट महिन्याच्या मध्यापर्यंत तसाच चालू राहिला. मग मात्र त्यांत एक सुखकारक व्यत्यय आला. कॉलेजचं वार्षिक संमेलन नेहमींचा प्रघात बदलून पहिल्या टर्ममध्येंच करायचं ठरलं, आणि नाट्य-प्रयोगाची जबाबदारी डॉ. बाळकृष्ण यांनीं नेहमींप्रमाणें माझ्यावर टाकली. आधींच रंगभूमीवर येऊन गेलेलीं जुन्या थाटाचीं मोठीं नाटकं करण्यापेक्षां नव्या धर्तीचं एखादं सुटसुटीत नाटक करावं अशी कल्पना माझ्या मनांत आली. माझ्या सहकारी विद्यार्थ्यांना ती एकदम पटली, परंतु तसलं नाटक लिहिण्याची अगर दुसऱ्या कोणी लिहिलं असेल तर तें मिळविण्याची जबाबदारी त्यांनीं माझ्यावर टाकली. माझ्याजवळ तयार नाटक नव्हतं, आठ दिवसांत नवं नाटक लिहिण्याचा चमत्कार करून दाखविण्याचं सामर्थ्यहि नव्हतं. परंतु एका बऱ्यापैकीं नाटकाचं हस्तालिखित मात्र माझ्या पाहण्यांत आलं होतं. ‘ किर्लोस्कर ’चे उपसंपादक श्रीयुत ताम्हनकर यांनीं तें लिहिलेलं होतं, व मध्यंतरीं मी किर्लोस्करवाडीस गेलों असतांना त्यांनीं तें मला वाचायला दिलं होतं. त्या नाटकाचं नांव ‘ उसना नवरा ’. ताम्हनकरांकडून तें हस्त-लिखित मीं ताबडतोब मागविलं व सहकारी विद्यार्थ्यांना वाचून दाखविलं. ज्या स्वरूपांत नाटक तयार होतं त्यांत कांहीं महत्त्वाचे फरक केल्यावांचून प्रयोग रंगणार नाहीं असं आम्हांला वाटलं. मीं सुचविलेले फरक ताम्हन-करांनीं मान्य केले, व आमच्या तालमी सुरू झाल्या. या नाटकांत मुख्य भूमिका मी करणार होतों, व अगदीं नवीन धर्तीचं शंभर टक्के विनोदी नाटक

यंदा बसविण्यांत येत आहे, ही बातमी विद्यार्थिवर्गातच नव्हे, तर सामान्य नागरिकांतही खूप पसरली होती. त्यामुळें नाटकाचा प्रयोग पॅलेस थिएटरमध्यें झाला तेव्हां अतोनात गर्दी लोटली होती. ' उसना नवरा ' हें नाटक मोठं विशेष होतं असं मुळींच म्हणतां येणार नाहीं. परंतु त्याची तऱ्हा एकदम नवी होती यांत संशय नाहीं. नाटकाच्या तालमीच्या वेळीं आम्हां सर्वांना त्या नाटकाच्या नवीन तऱ्हेमुळेंच विशेष मजा वाटे; आणि त्याप्रमाणेंच प्रयोगाच्या वेळीं प्रेक्षकांनाहि विशेष आनंद झाला तो अशा विचारानं, कीं खरं पाहतां जुन्या थाटाच्या नाटकांना आपण अंतर्यामीं विटलेले आहोंत, जें आपण आज पाहात आहोंत तें नवीन आहे खास, आणि अशींच नाटकं आतां पाहायला मिळालीं पाहिजेत. प्रेक्षकांच्या या वृत्तीमुळें आमचा प्रयोग खूपच रंगला, आणि ३० तारखेस आम्ही मुद्दाम किर्लोस्करवाडीस जाऊन दुसरा प्रयोग केला तोहि असाच बहारीचा वठला.

आमच्या या प्रयोगांतून नाटककार ना. धों. ताम्हनकर यांचा जन्म झाला ! हें मी वावग्या अभिमानानं म्हणत नाहीं, तर इतक्याच अभिप्रायानं कीं ' उसना नवरा ' नाटकाचे आम्हीं प्रयोग केले त्यामुळें तें खूपच गाजलं, पुस्तकरूपानं प्रसिद्ध झालं, त्याचे ठिकठिकाणीं प्रयोग झाले, व तशाच तऱ्हेचीं नाटकं लिहिण्याचा ताम्हनकरांना हुरूप आला. इतक्या मर्यादित अर्थाचं श्रेय मला व माझ्या सहकारी विद्यार्थ्यांना स्वतः ताम्हनकरही खुशीनं देतील. या नाटकाच्या प्रयोगांना मध्यंतरीं इतका ऊत आला होता, कीं मीं एकदां थट्टेनं शंकरराव किर्लोस्कर यांना म्हटलं, " कुठून आम्हीं झक मारली आणि ताम्हनकरांचं हें नाटक केलं असं मला पुष्कळदां वाटतं. "

' उसना नवरा ' नाटकाच्या आमच्या प्रयोगाचा बोलबाला किती झाला होता त्याची साक्ष पटण्यासारखी एक गोष्ट लवकर घडली. ती अशी कीं नाटकांचीं व जलशांचीं कॉंट्रॅक्ट्स घेण्याचा धंदा करणाऱ्या मुंबईच्या एका गृहस्थांनीं मला पत्र लिहून विचारलं, कीं तुम्ही ' उसना नवरा ' नाटकाचे चार जाहीर प्रयोग करण्यासाठीं मुंबईस याल काय ? तुमचा सर्व खर्च भागवून उत्पन्नाचा अमुक हिस्सा तुम्हांला देऊं. तरी तारेनें संमति कळवा.

माझा सहकारी विद्यार्थ्यांना ही गोष्ट कळतांच अतिशय आनंद व्हावा हें साहजिकच होतं. मुंबईच्या या गृहस्थांची ती चार खेळांची मागणी म्हणजे आमच्या प्रयोगाच्या उत्कृष्टपणाबद्दल पर्यायानं मिळालेलं तें एक मोटं शिफारसपत्र होतं. मुंबईसारख्या शहरी रंगभूमीवर आपलं अभिनयकौशल्य दाखविण्याची ती फार नामी संधि आली आहे असं त्यांना वाटलं व मुंबईच्या त्या काँट्रॅक्टरना मी तारेनं संमति कळवावी असा त्यांनीं फार आग्रह धरला. परंतु मुंबईस जाऊन जाहीर प्रयोग करणं मला पसंत नव्हतं. हौसेखातर एखादा दुसरा नाट्यप्रयोग करणं निराळं, आणि काँट्रॅक्ट देऊन जाहीर नाटकं करणं निराळं. या दुसऱ्या गोष्टीला सरळ धंद्याचं स्वरूप होतं. म्हणून माझ्या निर्णयानं विद्यार्थी नाराज होतील हें स्पष्ट दिसत असूनहि मी मुंबईच्या त्या गृहस्थांना तार केली, कीं, तुमची सूचना मला मान्य करतां येत नाहीं, माफ करा. त्यांनीं पुन्हा तार केली, कीं 'तुम्ही नकार कां देतां कळत नाहीं; निदान माझ्याशीं खुलासेवार बोलण्यासाठीं मुंबईस या.'

मी मुंबईस गेलों.

परंतु त्या गृहस्थांशीं नाटकांबद्दल बोलणं करण्यासाठीं नव्हे, तर माझं दुसरंच एक महत्त्वाचं काम मुंबईस होतं म्हणून. जार्डिन यांच्या नेतृत्वाखालीं इंग्लंडची क्रिकेट टीम हिंदुस्थानांत आली होती व हिंदुस्थान विरुद्ध इंग्लंड असा पहिला अधिकृत अटीतटीचा सामना (Official Test) मुंबईस व्हावयाचा होता. तो पाहण्यासाठीं मुंबईला गेल्याशिवाय राहवणं मला शक्य नव्हतं.

हिंदी क्रिकेटच्या इतिहासांत या सामन्याचं विशेष महत्त्व होतं. यापूर्वी हिंदुस्थानांत खेळण्यासाठीं इंग्लंडहून क्रिकेटचे संघ आले होते व त्यांच्याशीं इकडल्या संघांचे सामनेहि अनेक वेळां झाले होते. परंतु त्या संघांना अगर सामन्यांना अधिकृत स्वरूप नव्हतं. इंग्लंडचं क्रिकेट ज्या संस्थेच्या अमलाखालीं चालतं तिनं आपला शिक्कामोर्तब करून पाठविलेला संघ हिंदुस्थानांत खेळण्यासाठीं प्रथमच येत होता, व या सामन्यांच्या निकालावरून हिंदी क्रिकेटचा दर्जा अधिकृत रीत्या ठरायचा होता. क्रिकेटच्या बाबतींत मुंबई म्हणजे साऱ्या हिंदुस्थानची राजधानी होय. अर्थात् मुंबईस होणाऱ्या

Test Match कडे सगळ्यांचं लक्ष विशेष लागलं होतं. सामना बघावयास प्रेक्षकांची अलोट गर्दी जमली होती, आणि एकंदर खेळ झाला तो प्रेक्षकांच्या डोळ्यांचं पारणं फेडण्यासारखाच झाला.

डिसेंबरच्या १५ तारखेस खेळाला सुरवात झाली. हिंदु संघाचे कप्तान सी. के. नायडू होते. त्यांनीं ओली सुकी जिंकली आणि पहिली खेळी पत्करली. त्या डावांत हिंदी संघाच्या २१९ धांवा झाल्या. इंग्लंडच्या संघानं ४३८ म्हणजे बरोबर दुप्पट धांवा केल्या. प्रेक्षकांची निराशा करण्यासारख्या गोष्टी घडल्या. रविवार तारीख १७ डिसेंबर रोजीं दुपारीं दोन वाजून दहा मिनिटांनीं हिंदी संघाचा दुसरा डाव सुरू झाला तो बऱ्याचशा निराशाजनक परिस्थितींत. कारण इंग्लंडचा संघ पहिल्याच डावांत २१९ धांवांनीं पुढें जाऊन बसला होता, व तें अंतर तोडून इंग्लंडच्या संघाला भारी वाटेल एवढा धांवांचा आंकडा हिंदी संघ चढवून ठेवील अशी शक्यता बिलकुल नव्हती. सामना बघायला आलोंच आहोंत तर आतां दुसऱ्या डावांत आपले खेळाडू कसे खेळतात ते बघूं या इतक्याच भावनेनं प्रेक्षक खेळाकडे पहात होते.

परंतु अमरनाथ खेळायला आले, आणि पहिल्यापासूनच त्यांनीं अशा कांहीं तडफेची टोलेबाजी सुरू केली, कीं प्रेक्षकांचं औदासिन्य पार नाहींसं होऊन त्यांच्या वृत्ती एकदम प्रफुल्लित झाल्या. पहिल्या डावांत अवघ्या ३८ धांवा काढून अमरनाथ बाद झाले होते, त्यामुळें त्यांचा जोरदार खेळ सुरू झाला तरी प्रथम कांहीं वेळ लोकांना मनांतून असंच वाटत होतं, कीं त्यांचा खेळ कितीहि तडफेचा झाला तरी फार तर ३०–४० धांवा भरारा काढून ते बाद होतील. पण त्यांच्या ३० धांवा झाल्या, ४० झाल्या, आणि ५० चा आंकडाहि त्यांनीं ओलांडला तेव्हां मात्र प्रेक्षकांची खात्री पटली, कीं स्वारीचा आजचा रंग कांहीं न्यारा दिसतो, व त्यांच्या प्रत्येक टोल्यास टाळ्यांचा गजर होऊं लागला. इंग्लिश टीमचा कप्तान जार्डिन यालाहि अमरनाथचं प्रकरण जड जाणार असं वाटूं लागलं व प्रत्येक चेंडूच्या वेळीं क्षेत्ररक्षकांची रचना तो मोठ्या कसोशीनं करूं लागला. परंतु कसलीच क्षिति नसल्याप्रमाणें अमरनाथ खेळत होते. व्हेरिटी व निकॉल्स या दोघा बोलर्सनीं पहिल्या डावांत हिंदी संघाचे रथी-

महारथी बळी घेऊन आपल्या सामर्थ्याविषयीं केवढा दरारा निर्माण केला होता ! परंतु आतां त्यांनीं जंग जंग पछाडले तरी अमरनाथाची बॅट त्यांना आवरतां येईना. व्हेरिटी आणि निकॉल्स म्हणजे कुठल्या तरी शाळकरी पोरांच्या संघांतले बोलर्स अशा तुच्छतेच्या भावनेनं अमरनाथ खेळूं लागले होते. समोर कोणीहि बोलर असो व क्षेत्ररक्षकांची रचना कशीहि झालेली असो, त्याची त्यांना मुळीं तमाच नव्हती. इथें क्षेत्ररक्षक, तिथें क्षेत्ररक्षक, अशी अभेद्य रचना करण्यासाठीं जार्डिननं मारे दोन दोन तीन तीन मिनिटं खर्चावीं, त्याचा तो विधि आटपेपर्यंत अमरनाथानं खुशाल विश्रांति घ्यावी, आणि चेंडू आला, कीं काडकन् असा टोला मारावा, कीं डोळ्याचं पातं लवतं न लवतं तो त्यानं सीमा गांठावी व जार्डिनचे क्षेत्ररक्षक हतबुद्ध होऊन जागच्या जागीं पुतळ्यासारखे उभे राहिलेले दिसावेत ! अमरनाथच्या जोडीला नायडू खेळत होते, त्यांनीं पुनःपुन्हां अमरनाथांच्या जवळ येऊन त्यांना ' जरा जपून खेळ ' असा इशारा द्यावा, अमरनाथांनीं हास्य करून मान हालवावी, आणि पुन्हा चेंडू आला, कीं टोलेबाजी सुरूच ठेवावी असा प्रकार सुरू झाला ! त्यांच्या धांवांचा आंकडा दशकाचं एकेक घर ओलांडून सारखा चढतच होता. जार्डिनच्या टीमची अक्षरशः त्रेधा तिरपीट उडाली ती पाहून पेक्षकांची हंसतां हसतां पोटं दुखूं लागलीं, आणि अमरनाथांच्या प्रत्येक फटकाऱ्याला टाळ्या वाजवून ओरडतां ओरडतां घसे कोरडे झाले. अखेर अमरनाथांच्या शंभर धांवा पुऱ्या झाल्या त्या वेळचा क्रीडांगणावरील गजर आणि ओरडा कितीहि वर्णन केला तरी शब्दांनीं सांगतां येणार नाहीं. अवघ्या अर्ध्या दिवसांत शतक पूर्ण करणं म्हणजे क्रिकेटमधील एक अद्‌भुत पराक्रम समजला जातो. ज्या आत्म-विश्वासानं आणि विलक्षण बेफिकीरीनं खेळून अमरनाथांनीं हा पराक्रम केला होता ती तऱ्हा पाहून जार्डिन आणि त्याचे खेळाडू स्तिमितच झाले ! नऊ विकेट्सनीं हा सामना अखेर इंग्लंडनं जिंकला खरा, परंतु अमरनाथांचा त्या दिवशींचा तो डोळे दिपविणारा खेळ ज्यांनीं पाहिला त्यांना हिंदी संघाचा पराभव झाला असं मुळीं वाटलंच नाहीं !

: : ४९ : :

क्रिकेटचा सामना पाहण्यासाठीं मी मुंबईस गेलों त्याच्या कांहीं दिवस अगोदर मीं लेखनाची एक नवी जबाबदारी पत्करली होती, व परत आल्याबरोबर ती पूर्ण करण्याच्या मार्गाला लागणं मला भाग होतं. ही जबाबदारी म्हणजे एका नाटक कंपनीसाठीं नाटक लिहिण्याची.

वास्तविक 'युगांतर' नाटकाबद्दलचा माझा एकंदर अनुभव नाट्य-लेखनाबद्दलचा माझा उत्साह वाढविणारा नव्हता. कादंबरी व नाटक यांमध्यें लेखनतंत्राच्या दृष्टीनं भिन्नता आहे हें तर झालंच, परंतु लेखन-कृतीच्या अखेरच्या यशाच्या दृष्टीनं जो मोठा फरक आहे तो लेखकाच्या मानसिक आनंदावर अधिक परिणाम करणारा म्हणावा लागेल. कादंबरीचं यशापयश बहुतांशीं लेखकानं तिच्यांत जें कसब प्रगट केलं असेल त्यावरून ठरत असतं, तिचा सत्कार अगर धिक्कार झाला तर त्याचा तो एकटाच धनी असतो. पण नाटकाची गोष्ट अगदींच निराळी असते. नाटक म्हणजे समाईक भांडवलावर उभा केलेला एक धंदा! या भांडवलांत सगळ्यांत महत्त्वाची वस्तु नाटककारानं लिहिलेली नाट्यकथा हें जरी खरं, तरी ती नाट्यकथा उठावदार स्वरूपांत लोकांपुढें आणण्याच्या कामीं तो सर्वस्वीं परावलंबी असतो. ही झाली लेखनापासून मिळविण्याच्या कीर्तीची गोष्ट. कीर्तीखेरीज ज्या दुसऱ्या हेतूसाठीं नाटक लिहायचं तो हेतु म्हणजे द्रव्य-

संपादन. या बाबतींतहि कादंबरीकारापेक्षां नाटककाराची अवस्था अधिक अडचणीची व अनिश्चित असते. दोघेहि द्रव्यप्राप्तीच्या बाबतींत दुसऱ्यावर अवलंबून असतात हें खरं, पण नाटककाराचं परावलंबित्व अधिक धोक्याचं आणि अपमानकारक ठरावं अशी नाटकाच्या धंद्याची परिस्थिति होती अन् आहे. प्रकाशकानं कादंबरीचा मोबदला कबूल केल्याप्रमाणें दिला तरच तो लेखकाला मिळणार. नाटककार आणि नाटक कंपनी यांच्या बाबतींतहि हाच न्याय लागू. तथापि, प्रकाशकांना अब्रूची पुष्कळशी चाड असते, धंदा प्रतिष्ठितपणें करावा अशी हौस असते. नाटक कंपन्यांच्या बाबतींत या वृत्तीचा नियम समजण्याऐवजीं अपवाद समजावा लागेल. लेखकाच्या लेखनांतील गुण समजण्यापुरत्या अकलेचा अभाव आणि नाटकाचा कबूल केलेला मोबदला खुशाल बुडविला तरी तो आपला एक जन्मसिद्ध हक्कच आहे असं समजण्याचा माजोरीपणा, या दोन गुणांचा संयोग नाटक कंपनीच्या मालकांत बहुतेक झालेला असावयाचाच. त्यामुळें कीर्ति व पैसा दोन्हींचीहि केवळ स्वतःच्या लेखनसामर्थ्याच्या विश्वासावर नाटककर्त्याला खात्री बाळगतां येत नाहीं.

याचा अनुभव ' युगांतर ' नाटकानं मला चांगला लक्षांत राहण्यासारखा आला. ' युगांतर ' नाटकावर हिराबाईच्या कंपनीनं हजारों रुपये मिळविले, परंतु नाटकाचा मोबदला देण्याची बुद्धि त्यांना कधीं झाली नाहीं. त्यांच्यावर फिर्याद करण्यासारखे त्यांचे माझे संबंध नव्हते व त्याचा भरपूर फायदा घेऊन त्यांनीं आपली मूळची दानत व संस्कृति सिद्ध केली !

या कारणानं ' युगांतर ' नाटक रंगभूमीवर आणल्यानंतर दुसऱ्या एका नाटकाची माझ्याकडून हिराबाईनीं जरी मागणी केली होती व ' नंदनवन ' या माझ्या संकल्पित नाटकाची जाहिरातहि जरी त्यांनीं आपल्या कॅलेंडर्सवर केली होती, तरी तें नाटक लिहिण्याचं माझ्या मनांत कधीं जोरानं आलं नव्हतं. नाटकाच्या भानगडीपासून शक्य तितकं अलिप्त राहणंच आपल्याला सुखाचं होईल असं मीं ठरविलं होतं.

परंतु १९३३ च्या डिसेंबर महिन्यांत सुलोचना पालकर व पंडितराव नगरकर हीं दोघं मला भेटायला आलीं व आम्हीं नाटक कंपनी काढलेली आहे आणि पहिलं नाटक तुमच्याकडून लिहून घेऊन करण्याचं ठरविलेलं

आहे असं बोलणं त्यांनीं काढलं. ‘ युगांतर ’ नाटकाच्या वेळीं सुलोचना पालकर हिराबाईच्या घरीं वारंवार येत असे. त्यामुळें तिला मी थोडीशी ओळखत होतों. तिनं हौसेनं पुण्या-मुंबईच्या रंगभूमीवर नाट्यप्रयोगांत काम केल्यामुळें लोकांपुढें तिचं नांव बरंचसं आलं होतं हें मला ऐकून माहीत होतं. मीं तिचं काम प्रत्यक्ष मात्र पाहिलेलं नव्हतं. पंडितराव नगरकर हें नांव मीं प्रथम ऐकलं तें गोविंदराव टेंब्यांच्या तोंडून. त्यांच्या गळ्यावर गोविंदराव फार खूष होते. पुढें पुण्याचा ‘ भारत गायन समाज ’ इमारत-फंडासाठीं नाट्यप्रयोग करूं लागला तेव्हां पंडितराव नगरकरांनीं कांहीं प्रयोगांत काम केलं तें मीं पाहिलं होतं. मला त्यांचा आवाज आणि गाण्याचा ढंग आवडला होता. त्यांच्या तानेची जात हुबेहूब बालगंधर्वांच्या तानेची, सुरेल दाणेदार अशी होती. नाट्यसंगीताला सर्वस्वीं अनुकूल. असा त्यांच्या गायनाचा ढंग होता. परंतु दुर्दैवानं अभिनयाचा गुण त्यांच्या ठिकाणीं शून्य होता; आणि त्यांच्या चेहऱ्याची ठेवण आणि चेहऱ्यावरील भाव या गोष्टी इतक्या जनानी होत्या कीं ते जर दहा वर्षं आधीं जन्माला आले असते तर कोणत्या तरी संगीत नाटक मंडळीच्या चालकानं त्यांना लुगडं खचित नेसवलं असतं, आणि स्त्री-पार्टी नट म्हणून त्यांचं नांव गाजलं असतं.

सारांश, सुलोचना पालकर आणि पंडितराव नगरकर या दोघांविषयीं माझं मत विशेष अनुकूल नव्हतं. यामुळें त्या दोघांनीं केलेल्या नाटकाच्या मागणीला नकार देण्याच्या धोरणानंच मीं उत्तरं देऊं लागलों. परंतु त्यांनीं पुनः पुन्हा गाठ घेऊन अगदीं धरणं धरल्यासारखं केलं. ‘ आम्हांला तुमचंच नाटक पाहिजे, तुमच्याखेरीज दुसऱ्या कुणाचं नाटक आम्हांला व्यायचंच नाहीं, आम्हांला चांगलीं चांगलीं माणसं येऊन मिळालीं आहेत, तुम्ही आम्हांला नाटक द्यालच अशा हिशेबांत तुम्हांला सोईचं पडावं म्हणून आम्ही कंपनी पुण्या-मुंबईस न काढतां इथं कोल्हापुरास मुक्काम ठेवला आहे ’ अशी भाषा त्यांनी सारखी सुरू केली. या भाषेत सत्यापेक्षां तोंडदेखली साखरपेरणीच अधिक होती, ही गोष्ट मला कळत नव्हती असं नव्हे. परंतु शेवटीं मी मनाशीं म्हटलं, ‘ पाहूं या नाटकाचा आणखी एक प्रयोग करून. ’ त्यांच्यासाठीं एक नवीन नाटक लिहिण्याचं कबूल केलं. त्या नाटकाचं नाव ‘ संजीवन ’.

' संजीवन ' नाटकाचं कथानक मला प्रथम सुचलं तेच मुळीं सबंद पहिल्या अंकाच्या स्वरूपांत. मुख्य पात्रांचा परिचय, त्यांचे स्वभावविशेष त्यांच्या इच्छा-आकांक्षांत कुठं तरी निर्माण झालेल्या संघर्षाची व त्यांतून उद्भवणाऱ्या नाट्यपूर्ण पेचप्रसंगांची सूचना, एवढ्या गोष्टी नाटककारानं नाटकाच्या पहिल्या अंकांत साधावयाच्या असतात. या दंडकाप्रमाणे ' संजीवन ' नाटकाच्या पहिल्या अंकाची संपूर्ण रूपरेषा माझ्या डोळ्यांपुढे, मनाशीं कथानक जुळविण्याच्या वेळींच, उभी राहिली. तशी ती उभी राहिल्यामुळें मी पहिला अंक चार दिवसांत लिहूनहि टाकला. हा अंक जेव्हां मी कंपनींत वाचून दाखविला तेव्हां तो अंक रंगभूमीवर चांगलाच वठेल याबद्दल सर्वांची खात्री झाली. बांधेसूदपणा, परिणामकारकता इत्यादि सर्व दृष्टींनीं सुंदर असा हा पहिला अंक मी फक्त चार दिवसांत लिहूं शकलों याबद्दल मला साहजिकच फार अभिमान वाटला, आणि आपण हें नवं नाटक लिहावयास घेतलं हें बरं झालं असं वाटलं.

परंतु हा आनंद आणि उत्साह फार वेळ टिकला नाहीं. पहिल्या अंकाच्या पुढें घोडं अडल्यासारखं जें झालं तें कांहीं केल्या पुढें जाईना.

पहिल्या अंकाच्या अखेरीस मी प्रेक्षकांची उत्कंठा वाढविण्याजोगा कांहीं एक पेचप्रसंग सूचित केला होता. या सूचित पेचप्रसंगाचं पूर्ण स्वरूप विस्तारानं दाखविण्याचं काम मला दुसऱ्या अंकांत करायचं होतं. आणि अखेरच्या तिसऱ्या अंकांत प्रेक्षकांना असंभाव्य वाटणार नाहीं अशा प्रकारचं खलपात्राच्या स्वभावाचं परिवर्तन दाखवून नाटकाची अखेरी मला साधावयाची होती. परंतु या गोष्टी नाट्यपूर्ण रीतीनं कशा पुढें मांडाव्या याचा मी जों जों विचार करूं लागलों तों तों तें काम मला बिकटच वाटूं लागलं.

सॉमरसेट मॉम या सुविख्यात इंग्रज नाटककारानं आपल्या एका नाटकाच्या प्रस्तावनेत काढलेल्या कांहीं मार्मिक उद्गारांचा मला पूर्ण प्रत्यय येऊं लागला.

ते उद्गार असे, की " एखाद्या विलक्षण चमत्कृतिपूर्ण पेचप्रसंगाची कल्पना करणं अवघड तर खरंच, व त्या दृष्टीनं पहातां नाटकाचा पहिला

अंक उत्तम लिहून झाला कीं अर्धा डाव जिंकला असं लेखकानं मानायला हरकत नाहीं हेंहि खरंच. तथापि, विस्मय आणि जिज्ञासा दोन्ही चेतविणारा प्रसंग कल्पनेनं निर्माण करणं ज्याच्या तुलनेनं एक वेळ सोपं म्हणतां येईल, असं एक अवघड काम नाटककाराला करायचं असतं. तें म्हणजे नाटकाच्या पहिल्या अंकांत सूचित केलेला पेचप्रसंग विस्तारपूर्वक मांडून पूर्णतेला पोंचविणं, आणि मग त्या पेचप्रसंगाची तर्कशुद्ध सुसंगत सोडवणूक करणं. या कामापुढें लेखकाची कल्पनाशक्ति कधीं कधीं असा कांहीं मार खाते कीं पुसून सोय नाहीं."... सॉमरसेट मॉम पुढें असं म्हणतात, की "हल्लीं इंग्रजी रंगभूमीवर मोठ्या संख्येनं आलेल्या तीन अंकी नाटकांची नीट छाननी केली तर असं दिसेल की बहुतेक नाटकांत पहिले अंक तेवढे चांगले साधले असून नंतरच्या अंकांत मात्र नाटककारानं पळ काढला आहे. पहिला अंक म्हणजे अर्धा डाव खरा; परंतु पुढें हा डाव नाटककारावर उलटून तो स्वतःच चांगलाच खोड्यांत सांपडल्याचं दृश्य पुष्कळ वेळा दिसतं !"

मॉमच्या या उद्‌गारांचा मला चांगलाच प्रत्यय येऊं लागला. 'संजीवन' नाटकाचे पुढचे अंक लिहून पुरे करण्याचा कंपनीकडून मला जोराचा तगादा होऊं लागला. कारण पहिल्या अंकाच्या तालमी केव्हांच सुरू झाल्या होत्या. मनांतल्या मनांत मी चांगलाच चटपटलों.

परंतु कादंबरी-लेखनांत जो अनुभव पूर्वीं अनेक वेळां मला आला होता, तोच आतां नाट्यलेखनांतहि मला आला. तो असा की, कल्पनाशक्तीचं घोडं ज्याप्रमाणें लेखनाच्या कुठल्या तरी टप्प्यावर अडून बसतं त्याप्रमाणेंच तें केव्हां तरी उठून पुढेंहि जाऊं लागतं, लेखनाचा ओघ पुढें चालू रहावा यासाठीं ज्या योजनेची आवश्यकता असते ती योजना कांहीं केल्या सुचूं नये असा अवधी जातो खरा, आणि त्या अवधींत आतां या कथानकाचं होणार तरी काय अशी चिंता लेखकाला अस्वस्थ करते खरी, परंतु मग केव्हां तरी एकाएकीं त्या अडचणींतून सोडवणूक करणारी कल्पना मनाला सुचते, आणि ती सुचल्याबरोबर कथानकाचा ओघ पुढें सरकतो. 'प्रतिभासाधन' या ग्रंथांत माणसाचं अप्रगट मन या बाबतींत कसं साहाय्य करतं तें मी विस्तारानं वर्णिलेलं आहे. कादंबरी-लेखनांत हा अनुभव ज्या ज्या प्रसंगीं

मला आला, ते ते प्रसंग त्या त्या कादंबऱ्यांच्या स्मृती सांगतांना मी नोंदलेले आहेत.

अशाच स्वरूपाचा अनुभव ' संजीवन ' नाटक लिहितांना मला आला. या नाटकाचं संपूर्ण संविधानक देऊन कोणत्या टप्प्यावर मी अडलों होतों, आणि त्या अडचणींतून बाहेर पडण्यासाठीं कोणती कल्पना मला अचानक सुचली ते मला सांगतां येईल. परंतु त्या विवेचनाचा विस्तार या ठिकाणीं करण्याची गरज आहे असं मला वाटत नाहीं. एवढंच सांगतों कीं ' संजीवन ' नाटकाच्या पहिल्या अंकाच्या शेवटीं जो पेचप्रसंग सूचित केला होता, तो विस्तारानं दुसऱ्या अंकांत रंगवावयास हवा होता, आणि तिसऱ्या अंकांत प्रेक्षकांना पेलेल अशा रीतीनं त्याची सोडवणूक करावयास हवी होती. या दोन्ही गोष्टी सफाईदारपणानं कशा साधाव्या तें मला सुचत नव्हतं. तें जेव्हां अकस्मात रीतीनं सुचलं तेव्हां लेखनाचा पुढचा रस्ता मला एकदम स्वच्छ दिसूं लागला, आणि लेखनाची गाडी भरधाव सुटली. ' संजीवन ' नाटकाचे उरलेले दोन्ही अंक मी लिहून पूर्ण केले. नाटकाच्या तालमींत खंड पडला नाहीं. नाटक मार्गाला लागलं.

अडचणींतून सोडविणारी कल्पना जेव्हा लेखकाला सुचते, तेव्हां जो अनुभव येतो, तो सांगण्यासारखा आहे. लेखनाचं अडलेलं गाडं पुढें चालू करणारी कल्पना सुचली कीं वाटतं, अरे, ही कल्पना आधीं कां सुचली नाहीं. ही कल्पना अगदीं उघड आणि जो कथाभाग लिहून झाला त्यांतून सहज निघणारी, संविधानकांत चपखल बसणारी अशी असते. यामुळें ती सुचण्यासाठीं इतकी खळखळ कां व्हावी तें आपल्याला कळत नाहीं. ती सुचूं नये याचं आश्चर्य वाटतं. ही कल्पना सुचण्यास इतका अवधी का लागावा आणि त्या अवधीनंतर ही कल्पना एकाएकीं प्रगट कां व्हावी, याचे कांहीं नियम आहेत काय असा प्रश्न साहजिक सुचतो. तसे कांहीं नियम असल्यास ते शोधून काढावेत आणि निश्चित करावे असंहि मनांत येतं. परंतु ही गोष्ट आजपर्यंत कुणाला साधली नाहीं. पुढेंही कुणाला साधतां येईल असा संभव नाहीं. कारण या बाबतीत लेखकाला त्याच्या अप्रगट मनाचं साहाय्य होतं, एवढा जरी खुलासा करता आला तरी

अप्रगट मनाचे व्यापार अनाकलनीय व गूढ आहेत असाच सिद्धान्त शेवटीं सांगावा लागतो.

'संजीवन' हे रंगभूमीवर येणारं माझं दुसरं नाटक. पहिलं नाटक जें 'युगांतर' त्याबद्दलच्या आठवणी सांगतांना त्याकडे शक्य तितक्या वस्तुनिष्ठ तिऱ्हाईत नजरेनं बघून त्यांतले गुणदोष मी प्रामाणिकपणानं नमूद केले आहेत. त्याच रीतीनं 'संजीवन' बद्दल देखील कांहीं गोष्टी लिहिण्यासारख्या वाटतात. या नाटकाचं कथासूत्र थोडक्यांत असं होतं, कीं कांचनराव नावाच्या श्रीमंत गृहस्थांनीं आपल्या मित्राची मुलगी संजीवनी हिचा तिच्या बाळपणापासून प्रतिपाळ केलेला असतो. संजीवनीचा बाप मोठा सधन असतो. परंतु मरण्याच्या वेळेस तो दिवाळखोर आणि निष्कांचन झालेला असतो. त्याच्या मरणघटकेला कांचनरावांनीं त्याला वचन दिलेलं असतं कीं, तुमच्या मुलीची तुम्ही कांहीं चिंता करूं नका. मी तिला लहानाची मोठी करीन, तिला शिक्षण देईन, तिचं लग्न करून देईन. संजीवनीचा बाप सुखांत मरतो. कांचनराव मित्राला दिलेलं वचन पाळतात, मात्र तिचा बाप कर्जबाजारी अवस्थेंत मेला ही गोष्ट ते तिला सांगत नाहींत. आपण दरिद्री बापाच्या पोटीं आलों, आणि ऐष आरामांत, थाटामाटांत वाढत आहोंत तें आपल्या बापाचा एक मित्र आपल्यावर दया आणि उपकार करीत आहे म्हणून, हें सत्य जर संजीवनीला कळलं तर तिला दुःख होईल, आणि मानी स्वभावामुळें ती कदाचित् आपला आश्रय सोडूनहि जाईल असं कांचनरावांना वाटतं. त्यांनीं संजीवनीला सत्य कळू दिलेलं नसतं. कांचनरावांच्या घरीं ती वाढते अशाच समजुतींत कीं आपला बाप मरण पावला तो मोठी इस्टेट मागं ठेवून, आणि आपण मोठ्या झालों, वयांत आलों म्हणजे कांचनराव ही इस्टेट आपल्या हवालीं करतील...संजीवनीचं शाळेंतलं शिक्षण संपतं. ती कॉलेजांत जाऊं लागते. मोहन नांवाच्या एका प्राध्यापकावर तिचं प्रेम जडतं. तोहि तिच्या प्रेमांत सांपडतो. एका सुटींत ती घरीं येते ती मोहनला बरोबर घेऊनच येते. दोघांनीं असं ठरविलेलं असतं कीं, कांचनरावांना आपलं परस्परांवरचं प्रेम सांगून टाकायचं, आपल्या विवाहाला त्यांची संमति घ्यायची. ती सहज मिळेल असा दोघांचाहि हिशोब असतो...परंतु त्या दोघांनाहि ज्या

गोष्टीची कल्पनादेखील येण्याची शक्यता नव्हती अशी एक गोष्ट घडलेली असते. कांचनरावांचं स्वतःचं मन संजीवनीवर जडलेलं असतं, आणि तिच्याशीं विवाहबद्ध होण्याचा विचार त्यांच्या मनांत येऊं लागलेला असतो. ...' संजीवन ' नाटकाच्या पहिल्या अंकाच्या अखेरीस सूचित केलेला पेचप्रसंग हाच कीं मोहन कांचनरावांजवळ संजीवनीची मागणी करतो, आणि ती मागणी पूर्ण करण्याऐवजीं कांचनराव त्याला उत्तर देतात, की " तुमच्या आणि संजीवनीच्या विवाहाला मी संमति देऊं शकत नाहीं. " त्यांचं तें उत्तर ऐकून मोहन आणि संजीवनी दोघंहि चकित होतात. खुलाशाचा मागणी करतात, कांचनराव संजीवनीला म्हणतात, " माझ्या मनांत काय आहे तें मी तुला उद्यां सांगेन. " मोहनकडे वळून त्याला ते सांगतात, " तोंपर्यंत हिचा नाद सोडण्याची तुम्ही आपल्या मनाची तयारी करून ठेवा... " मोहन त्यांना सुनावतो, " तुमच्या रुकारावांचून संजीवनी अडणार नाहीं हें पहाण्याची तयारी तुम्हीच केलेली बरी. "...कांचनराव त्याला सांगतात, " उद्यां दिसेल काय तें. " आणि कामाला निघून जातात... या ठिकाणीं पहिल्या अंकाचा पडदा पडतो.

दुसऱ्या अंकांत कांचनराव आपलं मनोगत संजीवनीजवळ उघड करतात, आणि तिच्याशीं लग्न करण्याचा आपला बेत तिला सांगतात. ती अर्थातच चकित होते, क्रुद्ध होते, आणि कांचनरावांना सांगते कीं, मोहनशीं लग्न करण्याचं मीं ठरविलेलं आहे, तुमची संमति तुम्हांला द्यायची नसेल तर मी तुमचं घर सोडून जाईन. माझ्या बापाकडून मला मिळालेली इस्टेट द्या म्हणजे झालं......यावर कांचनराव तिला आजपर्यंत तिच्यापासून लपविलेलं सत्य सांगतात. तें ऐकून तिला आश्चर्याचा दुसरा धक्का बसतो. आणि हा दुसरा धक्का पहिल्या धक्क्यापेक्षांहि मोठा असतो. कारण मोहनला परदेशीं पाठविण्याचा बेत तिनं ठरविलेला असतो, आणि यासाठीं लागणारा पैसा आपल्या इस्टेटींतून सहज देतां येईल असा तिचा हिशोब असतो... परंतु आतां तिला कळतं कीं, आपल्या बापानं एक कपर्दिकदेखील मागें ठेवलेली नाहीं......कांचनरावांना नकार देऊन त्यांच्या घरांतून बाहेर पडणं आणि मोहनशीं लग्न करणं हा मार्ग तिला अजूनहि मोकळा असतो.

परंतु तसं केल्यास परदेशी जाण्याची मोहनची महत्त्वाकांक्षा विफलित होणार हें उघड असतं......

कांचनराव तिला सांगतात, कीं तिनं जर त्यांच्याशीं विवाह केला तर परदेशीं जाऊन रहाण्यासाठीं मोहनला हवे तेवढे पैसे आपण देऊ......

म्हणजे संजीवनीपुढें पेचप्रसंग उभा रहातो तो असा, कीं कांचनरावांचं घर सोडून बाहेर पडायचं, ज्याच्यावर प्रीति जडली आहे त्या मोहनशीं लग्न करायचं, परंतु परदेशीं जाण्याची मोहनची इच्छा अपूर्ण राहिलेली बघायची, किंवा मोहनची महत्त्वाकांक्षा पूर्ण व्हावी यासाठीं कांचनरावांकडून पैसे घेऊन त्याला द्यायचे आणि कांचनरावाशीं लग्न करून प्रेमशून्य आयुष्य कंठण्याचं दुःख आणि विटंबना पदरीं घ्यायची... मोहनसाठीं ती दुसरा मार्ग पत्करते आणि कांचनरावांच्या मागणीला रुकार देते......

परंतु या ठिकाणी कथानकाला निराळीच अनपेक्षित कलाटणी मिळते !

मोठ्या रकमेचा चेक मोहन फाडून टाकतो आणि संजीवनीला म्हणतो, " तुझ्याविषयींच्या प्रेमापुढें मला माझ्या महत्त्वाकांक्षेची किंमत नाही. आपण गरीबींत राहूं. पण प्रेमाचा संसार करूं. चल माझ्याबरोबर."

मोहनचा हा त्याग बघून खरं प्रेम किती उदात्त असतं त्याचं दर्शन कांचनरावांना घडतं. प्रेम आणि वासना यांतला फरक त्यांना कळतो. त्यांचं हृदयपरिवर्तन होतं. मोहन आणि संजीवनी हातांत हात घालून निघालेलीं असतात. त्यांना ते म्हणतात की, " माझे आशीर्वाद घेऊन जा... " ते ऐकून मोहन आणि संजीवनी या दोघांनाहि आश्चर्याचा धक्का बसतो. परंतु तो धक्का गोड असतो !

' संजीवन ' नाटकाचं कथानक कांहींशा विस्तारानं सांगितलं अशासाठीं कीं दोन गोष्टी उघड व्हाव्यात. एक ही की ' संजीवनी ' नाटक पूर्णपणें सामाजिक नाटकांच्या जातींतलं होतं; आणि दुसरी गोष्ट ही कीं, या नाटकांत एक अगदीं नवा विषय मी हाताळला होता. कांचनरावासारख्या माणसानं मित्रकर्तव्य म्हणून मित्राची मुलगी आपल्या घरीं आपल्या मुलीसारखी वाढवावी, केवळ मित्राच्या ऋणांतून मुक्त होण्यासाठीं वाढवावी, शुद्ध हेतूनं निर्मळ मनानं वाढवावी, परंतु तिची यौवनावस्था बघून त्यांच्या

मनांत तिच्याविषयीं कामुक अभिलाषा निर्माण व्हावी – हा जी कल्पना मला सुचली तो त्या काळच्या मराठी सामाजिक नाटकांच्या क्षेत्रांत अत्यंत नवीन अशी होती. कांचनरावांची संजीवनीविषयींची वासना आणि नाटकाच्या अखेरीस त्यांच्यांत घडलेलं परिवर्तन – म्हणजे एक चित्तवेधक मानसशास्त्रीय समस्या होती.

ही समस्या हाताळून तिला नाट्यकृतीचं स्वरूप देण्याचं काम मला बऱ्यापैकीं साधलं होतं असं वाटतं. हें एक उत्तम नाटक होतं असं मला म्हणतां येणार नाहीं. परंतु सुलोचना पालकर आणि पंडितराव नगरकर या जोडीच्या स्वाधीन तें नाटक करण्याऐवजीं एखाद्या नांवाजलेल्या कंपनीला तें मीं दिलं असतं तर या नाटकामुळें मला बऱ्यापैकीं लौकिक मिळालाहि असता. येवढ्या दर्जाचं तें नाटक खचितच होतं.

मात्र त्या काळांतल्या नाट्यतंत्राची बरीचशी छाप या माझ्या नाटकावर होती हें मला प्रामाणिकपणानं कबूल केलंच पाहिजे. नाटकांतल्या विनोदासाठीं म्हणून खास कांहीं पात्रं निर्माण करायचीं, त्यांचे आलटून-पालटून प्रवेश प्रत्येक अंकांत घालायचे, हा नाट्यतंत्राचा जुना जमाना त्या वेळेस रूढ होता. या रूढीला ‘ युगांतर ’ नाटकांत मी बळी पडलों होतों. ‘ संजीवनी ’ नाटकांतहि या रूढीची चाकोरी मला सोडतां आली नाहीं. या दृष्टीनं नवीन समस्येचं पण जुन्या वळणाचं असंच ‘ संजीवन ’ नाटकाचं वर्णन करावं लागेल!

♠ ♠

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७४३७८ दि: ...
क्रमांक ९८८६ नों दि. ११/३/७

: : ५० : :

'संजीवन' नाटकाचं कथानक सर्वस्वीं संजीवनी, आणि तिच्या वडिलांच्या मृत्यूपासून तिला आपल्या मुलीप्रमाणें वाढविणारे कांचनराव या दोनच पात्रांच्याभोंवतीं फिरतं. कांचनरावांच्या मनांत संजीवनीविषयीं प्रेम उत्पन्न होतं, तिच्याशीं लग्न लावण्याची आपली इच्छा पूर्ण करण्याचा ते हट्ट धरतात, व अखेर त्यांचा हृदयपालट होऊन ते तो हट्ट सोडून देतात, येवढ्याच त्या नाटकांतील मुख्य घटना आहेत. कांचनरावांची इच्छा व ती इच्छा पुरविण्याचा त्यांनी धरलेला हट्ट रूढ लौकिक व्यवहाराला सोडून होता; एवढ्या एकाच दृष्टीनं त्यांना 'खलपुरुष' ही संज्ञा द्यावी लागेल. एरवीं ते खलपुरुष नाहींत. कथानकांत उत्पन्न होणाऱ्या पेचप्रसंगाला त्यांची इच्छाच कारण होते. आणि अखेर नाटकाचा शेवट सुखाचा होतो तोसुद्धां त्यांच्याच कृतीनं होतो, हें लक्षांत घेतां त्यांना 'संजीवन' नाटकाचा 'नायक' म्हणणं सर्वस्वीं योग्य ठरेल. नायिकेचं ज्या पुरुषावर प्रेम असतं, त्याला नाटकाचा नायक समजण्याची जुन्या नाट्यशास्त्रांतली समजूत खरी मानली तरच संजीवनीचा प्रियकर मोहन नायक म्हणतां येईल. परंतु महत्त्वाच्या दृष्टीनं मोहन म्हणजे 'संजीवन' नाटकांतलं एक दुय्यम पात्रच म्हणावं लागेल.

कथानकाच्या एकसूत्रीपणाच्या दृष्टीनं मोहन या पात्राला 'संजीवन'

नाटकांत विशेष वाव न देणंच बरोबर होतं, आणि त्या धोरणानंच मी ते पात्र रंगविलं. तथापि, त्या पात्राला जितकं प्राधान्य मी दिलं, त्याहून थोडं अधिक दिलं असतं तरी चाललं असतं. तसं मीं केलं नाहीं. आणि याचं कारण इतकंच कीं हें काम ज्यांच्याकडे सोपविण्याचं ठरलं होतं, त्यांच्या अंगीं अभिनयाचा गुण बेताचाच होता हें लक्षांत ठेवणं मला भाग होतं. 'युगांतर' नाटक लिहितांना तें अमक्या कंपनीला द्यायचं अशी कल्पनाच माझ्यापुढें नव्हती. परंतु 'संजीवन' लिहितांना माझ्यापुढें विवक्षित मंडळींचा संच होता. अशा प्रकारें नाटक लिहिण्यांत जसा फायदा आहे तसाच तोटाहि आहे. 'संजीवन' नाटक ज्या कंपनीला मी देणार होतों तिचे सुलोचना पालकर व पंडितराव नगरकर हे दोघे मालक होते. नाटकाच्या तालमी मी देण्यास सुरुवात केल्याबरोबर माझ्या लक्षांत आलं, कीं 'युगांतर' नाटकाच्या वेळीं हिराबाईंचे बंधू सुरेशबाबू म्हणजे ज्याप्रमाणें एक मोठी निराशा माझ्या वांट्याला आली, त्याप्रमाणेंच पंडितराव नगरकर हेहि माझी निराशा करणार. या दोघांतलं साम्य मला आश्चर्यकारक वाटलं. एक गायनाचा गुण सोडला, तर या दोघांच्याहि अंगीं रंगभूमीवर पाय टाकण्याइतकी दुसरी कोणतीहि लायकी नव्हती. अशुद्ध वाणी, सर्वस्वीं निर्विकार चेहरा, जे भाषण बोलायचं त्याचा स्थूल अर्थदेखील लक्षांत न येण्याइतका बुद्धीचा मठ्ठपणा, आणि या सर्वांच्या भरीला आपण कांहीं तरी शिकावं व स्वतःची प्रगति करावी या इच्छेचा पूर्ण अभाव, या सर्व बाबतींत एकाला झाकावं आणि दुसऱ्याला काढावं अशीं हीं दोन तरुण माणसं एकासारखीं एक म्हणतां येतील. पंडितराव नगरकरांची ही कुवत लक्षांत घेऊनच 'संजीवन'-मधील मोहन या दिखाऊ नायकाला शक्य तितकं गौणत्व देऊन, आणि मुख्य भर कांचनराव आणि संजीवनी या दोन पत्रांवरच ठेवून मी नाटकाची मांडणी केली.

'संजीवन' चा पहिला प्रयोग कोल्हापुरास पॅलेस थिएटरमध्यें २८ जून १९३४ रोजीं झाला. त्या वेळचे दिवाण दादासाहेब सुर्वे यांच्या अध्यक्षतेखालीं हा प्रयोग झाला. श्री. वैद्य नांवाच्या नटानं कांचनरावाचं आणि सुलोचनाबाईंनीं संजीवनीचं काम पुष्कळच चांगलं केलं. आणि प्रयोग चांगला रंगला. जसजसे खेळ होतील तसतसा प्रयोग आणखी

चांगला बसेल, असं मला वाटलं. अर्थात् प्रयोग चांगले होत गेले तर करारांत ठरल्याप्रमाणें नाटकाचा मोबदला म्हणून सुमारें तीन हजार रुपये मिळतील असा मी अदमास केला. ' युगांतर ' नाटकाची दिडकीदेखील मला मिळाली नाहीं. परंतु हें नाटक तरी पैशाच्या दृष्टीनं मला लाभदायक होईल अशी माझी खात्री त्याच्या पहिल्या प्रयोगावरून झाली.

परंतु नाटकी लोकांना मी अजून ओळखलं नव्हतं असं सिद्ध करण्यासारखेच प्रकार पुढे झाले.

सुलोचनाबाईची कंपनी कोल्हापूरचा मुक्काम हलवून बेळगांवला गेली. कोल्हापूर, बेळगांव, सोलापूर, पुणें, मुंबई इत्यादि सहा ठिकाणच्या सगळ्यांत अधिक उत्पन्नाच्या दोन दोन खेळांच्या म्हणजे एकंदर बारा खेळांच्या उत्पन्नाचा एक-तृतीयांश हिस्सा मला मिळावा असा सुलोचनाबाईनीं माझ्याशीं करार केला होता. कराराप्रमाणें कोल्हापूरचा मुक्काम हलवितांच त्यांनीं मला चारशें रुपये द्यावयास हवे होते. परंतु सध्यां फारच खर्च झाला आहे, बेळगांवचा पहिला खेळ झाल्याबरोबर तुमची रक्कम पाठवितें, अशी केविलवाणी भाषा करून त्यांनीं तेथून पाय काढला ! आणि एकदां तेथून निसटल्यावर त्यांनीं आज पाठवितें, उद्या पाठवितें अशा मजकुराच्या पत्रांपलीकडे कांहीं एक धाडलं नाहीं. प्रत्येक मुक्कामावरून त्यांचं पत्र येई, कीं खेळ उत्तम चालला आहे, परंतु त्यांत मोबदल्याचे नुसते वायदे असत. पुण्याचा, मुंबईचा, असे मोठाले मुक्कामहि त्यांनीं केले आणि प्रत्येक ठिकाणीं ' संजीवन 'च्या खेळास चांगलं उत्पन्न झालं. पण माझे पैसे देण्याची बुद्धि त्या बाईला सुचली नाहीं ! अखेर हिराबाईच्या कंपनीप्रमाणेंच तिचीहि कंपनी बुडाली ! अर्थात् माझे पैसे बुडाल्यासारखेच झाले. या वेळेस मात्र फिर्याद करून पैसे वसूल करून घ्यावयाचं मीं ठरविलं व त्याप्रमाणें बेळगांवच्या कोर्टांत फिर्याद दाखल केली. इतकं केल्यावर पंडितराव नगरकर वठणीवर आले. त्यांनीं बेळगांवास तडजोडीची भाषा काढली, मी ती मान्य केली. आम्हांपैकीं दोघांच्याहि वकिलांच्या तडजोडीच्या कागदावर सह्या झाल्या, मला वाटलं दीड हजार रुपये तरी मला आतां बिनबोभाट मिळतील, परंतु उघड उघड द्यायलाच पाहिजेत असे पैसे सरळ बुडविण्याचं ठरवून वागणारीं माणसं काय काय युक्त्या करूं

शकतात व त्यांच्यापुढें माझ्यासारख्या माणसाचा कसा नाइलाज होतो याबद्दल मी अजूनहि अज्ञानांत होतों, असं पुढें दिसून आलं.

तडजोडींत ठरल्याप्रमाणें पहिला हप्ता मुळीं नगरकरांनीं चुकविला. यानंतरचा उपाय म्हणजे त्यांच्या उत्पन्नावर जप्ती आणण्याचा. तोहि करण्याचं या वेळीं मी ठरविलं. परंतु कोर्टाकडून जप्तीचं वॉरंट घेऊन तें बजावणं वाटतं तितकं सोपं नाहीं. त्यांतल्या अडचणी पाहिल्या कीं वाटूं लागतं, कीं जणूं कांहीं पैसे बुडविणाऱ्या लबाड लोकांच्या सोयीसाठींच कायदे केले आहेत. त्या कटकटीचा मला कंटाळा येऊं लागला. आणि अखेर तर पंडितरावांनीं नादारीच जाहीर केली.

म्हणजे कराराच्या वेळीं आगाऊ म्हणून सुलोचनाबाईकडून जे दीडशें रुपये घेतले तेवढाच 'संजीवन' नाटकाचा मोबदला ! नाटकाचीं दीडशें पुस्तकं कंपनीनं विक्रीसाठीं बरोबर नेलीं त्याचे पैसे बुडाले ती गोष्ट निराळीच !

या सर्व गोष्ट सांगण्यांतला हेतू इतकाच की, नाटकं लिहिण्याचा धंदा मोठा किफायतशीर अशा भ्रमानं लेखकांनीं त्या धंद्याच्या नादीं लागू नये. तो धंदा किफायतशीर होतो, पण केव्हा ? नाटक कंपनीचे मालक प्रतिष्ठित, सचोटीचे, आणि प्रामाणिक बुद्धी ठेवणारे असतील तर; किंवा नाटककारांच्या अंगीं लेखनकलेच्या जोडीला– खरं म्हणजे ती नसली तरी चालेल पण– कंपनीच्या मालकांची खुशामत करणं, त्यांच्याभोंवतीं हिंडणें, प्रसंगीं अपमान सहन करून आपला कार्यभाग साधणं इत्यादि कला असावयास हव्यात. या दोन्ही अटींपैकीं एकहि पूर्ण झालेली नसतांना नाटकावर ज्याला पैसे मिळवितां आले अशा नाटककाराचं उदाहरण फार क्वचित् सांपडेल.

'संजीवन' नाटक लिहितांना 'मानसमंदिर' ही माझी लेखमाला 'किर्लोस्कर' मासिकांत चालूच होती. ती मार्चमधें पूर्ण झाली. तिच्यानंतर मधें खंड पडूं न देतां लगेच दुसरी एखादी तशीच चित्तवेधक आणि उद्बोधक लेखमाला मी 'किर्लोस्कर' मधून सुरू करावी असा शंकरराव किर्लोस्कर यांचा माझ्यामागें तगादा होता. 'आजचे तरुण स्त्री-पुरुष व

त्यांजपुढील प्रश्न ' आणि ' मानसमंदिर ' या माझ्या दोन्ही लेखमाला अतिशय लोकप्रिय झाल्या होत्या, आणि माझी आणखी एखादी लेखमाला ' किर्लोस्कर ' मधून सुरू झाली पाहिजे अशी इच्छा मासिकाचं ध्येय आणि व्यवहार या दोन्ही दृष्टींनीं त्यांना झाली असल्यास नवल नाहीं. मीं त्यांचं म्हणणं मान्य केलं आणि नव्या लेखमालेसाठीं विषय शोधूं लागलों. या सुमारास विल ड्यूरंट या लेखकाचं ' ऑन दि मीनिंग ऑफ लाइफ ' हें पुस्तक माझ्या वाचण्यांत आलं होतं. विल ड्यूरंट यांनीं जगांतील सर्व नामांकित पंडितांना आणि पुढाऱ्यांना प्रश्न केला होता, कीं " या मानवी जीविताच्या पसाऱ्याची संगति आपण कशी लावता ? त्याच्या बुडाशीं कोणतं अंतिम तत्त्व आहे असं आपणास वाटतं ? आपणास कार्य करण्याची स्फूर्ति कुठून मिळते ? आपली श्रद्धा कशावर आहे ? आपल्याला धर्माचा आधार वाटतो काय ? आपली शांति, समाधान आणि विसावा कशांत आहे ? सारांश, आपल्याला काय मिळवायचं आहे म्हणून आपण खटाटोप करता ? " या प्रश्नपत्रिकेला जीं उत्तरं आलीं त्यांचा संग्रह ड्यूरंट यांनीं आपल्या पुस्तकांत केला आहे. या संग्रहांत महात्मा गांधी-पासून तो न्यूयॉर्क येथील तुरुंगांत जन्मठेप शिक्षा भोगीत पडलेल्या तरुणा-पर्यंत अनेक मनोवृत्तीच्या लोकांचीं उत्तरं आहेत.

मराठी वाचकांना यांतील निवडक पत्रं सादर केल्यास जगातील मोठ-मोठ्या विद्वानांच्या विचारांशीं त्यांचा परिचय होईल आणि मानवी जीविताकडे पाहण्याची तर्कशुद्ध, धीट व प्रामाणिक दृष्टि त्यांना प्राप्त होईल असं मला वाटलं; आणि हीच लेखमाला ' किर्लोस्कर 'मध्यें सुरू करण्याचं मी ठरविलं. या लेखमालेंत अर्थात् माझं लेखन मुळींच येणार नव्हतं. परंतु लेखमालेच्या पहिल्या लेखांकांत विषयाचा प्रस्ताव मी केला, तो स्वतंत्र होता. आणि लेखमालेकडे सामान्य वाचकाचं लक्ष जोरानं वेधलं जावं अशा हेतूनं तो लिहिला होता. या प्रस्तावांत भारतीय युद्धाच्या प्रारंभीं अर्जुनाची जी भ्रान्त अवस्था झाली होती, तिचं वर्णन मी केलं होतं आणि आज भौतिक शास्त्रांची कल्पनातीत प्रगति झाली असूनहि– नव्हे झाली असल्यामुळेंच मनुष्याची मनःस्थिति भांबावल्यासारखी कशी झाली आहे तें दाखविलं होतं. या विवेचनाच्या शेवटीं मीं लिहिलं—

“ अर्जुनासारखीच साऱ्या माणसांची आज मनःस्थिति झाली असली तर तें साहजिकच होय. त्यांना श्रद्धा उरली नाहीं, कर्तव्य निश्चित करतां येत नाहीं. सारीं माणसं भांबावून गेलीं आहेत. श्रीकृष्णाच्या गीतेसारखि गीता कुणी सांगितली तरच त्यांच्या जीवितात उत्साह आणि पराक्रम येण्याचा संभव आहे.

पण या आधुनिक काळांत गीता कुठून कानीं पडणार ?

कां नाहीं ?

आज घटकेला विविध कार्यक्षेत्रांत ज्या व्यक्ती सर्व जगाच्या अग्रपूजेस पात्र ठरल्या आहेत त्यांना आपल्या मनाचा संभ्रम निवेदन केला आणि मार्ग विचारला तर त्यांच्याकडून जो संदेश मिळेल त्याला ‘ आधुनिक गीता ’ असं नांव द्यावयास काय हरकत आहे ? ”

प्रस्तावना लिहितां लिहितां ‘ आधुनिक गीता ’ हा जो शब्दप्रयोग मला सुचला तोच एकंदर कथामालेचं नांव म्हणून अतिशय अन्वर्थक ठरेल असं मला वाटलं. आणि त्याप्रमाणें मी केलं. लेखमालेचं नांव याप्रमाणें ठरल्यावर प्रस्तावनेला ‘ सूतो ऽ वाच ’ असा मथळा मी दिला. ही लेखमाला अतिशय प्रिय ठरली. पुढें ती पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाली आणि आतां त्या पुस्तकाची तिसरी आवृत्ति निघत आहे. या पुस्तकांतल्या उद्बोधक विचारांचं श्रेय ड्यूरंटलासुद्धां देतां येणार नाहीं, मग तें माझ्याकडे घ्यावंसं मला कोठून वाटणार ? तें श्रेय ड्यूरंटच्या पत्राला ज्यांनीं विवेचक आणि अतिशय मार्मिक उत्तरं दिलीं त्यांचंच म्हटलं पाहिजे. फक्त पुस्तकाची चित्तवेधक सुरुवात आणि पुस्तकाचं ‘ आधुनिक गीता ’ हें अतिशय समर्पक नांव एवढ्याच गोष्टींचा वांटा माझ्याकडे येतो.

याच सुमारास ‘ प्रतिभा ’ हें पाक्षिक श्री. मोटे यांनीं चालवायला घेतलं होतं. हें पाक्षिक प्रथम खांडेकर, माडखोलकर इत्यादि मंडळींनीं काढलं होतं. परंतु तें त्यांना यशस्वी रीतीनं चालवितां आलं नव्हतं. दैनिक, साप्ताहिक अगर मासिक त्याच्यामागें कुणा तरी असामान्य लेखकाचं व्यक्तिमत्त्व असल्याखेरोज, अगर व्यापारी दृष्टीनं तें यशस्वी करण्याची धमक अंगांत असल्याखेरीज दीर्घ काल चालूं शकत नाहीं, हा सिद्धान्त पुन्हां सिद्ध झाला होता. ‘ वीस वर्षांचा नवरा मुलगा मिळत नसेल तर

दहा-दहा वर्षांचे दोन नवरे मुलगे आणून भागत नाहीं ' या टिळकांच्या प्रसिद्ध कोटीचा पुन्हा एकदा अनुभव आला होता. ' प्रतिभे 'चे संपादक थोडे थोडके नव्हे सहा होते. परंतु या संख्येचा कांहीं उपयोग झाला नव्हता. शेवटीं या दमलेल्या लोकांनीं आपली ' प्रतिभा ' श्री. मोटे यांच्या स्वाधीन केली होती. खांडेकर-माडखोलकर यांच्या कारकीर्दींत मी ' प्रतिभें 'त कांहीं लिहिलं नव्हतं. किंबहुना माझ्याविरुद्धच प्रचार करण्याचं या पाक्षिकाचं धोरण होतं. परंतु श्री. मोटे यांनीं ' प्रतिभा ' हातीं घेतल्या-वर लेखनसाहाय्य करण्याबद्दल त्यांनीं मला विनंति केली व मीहि त्यांना एक लेख दिला. त्यामुळें योग्य प्रकारें विनंति केल्यास मी ' प्रतिभे 'स नियमितपणें लेख देईन असा संभव वाटल्यावरून श्री. मोटे यांनीं मला पुन्हा एक विस्तृत पत्र धाडलं. तें पत्र येथें देण्यासारखं आहे.

" प्रतिभेकरितां आपलें लेखनसाहाय्य मिळवावें याबद्दलचा विचार मी ' प्रतिभा ' घेतल्यापासून करीत आहें; परंतु माझ्या इतर व्यवसा-याच्या भानगडींमुळें मला ' प्रतिभे 'कडे पुरेसें लक्ष आतापर्यंत देतां आलें नाहीं, व याबाबतींत आपल्याला विनंति करण्याचें तसेंच राहून गेलें.

' प्रतिभे 'ला वाङ्मय-विषयाप्रमाणेंच इतर ललित कलांबद्दलसुद्धां चांगल्या दर्जाच्या लेखांची अत्यंत गरज आहे. तसले लेख व लेखक आम्हांला मिळवितां येत नाहींत ही आमच्यांतील उणीव आहे, असें मी समजतों. चित्रकला, संगीत व सिनेमा या व असल्याच कलात्मक विषयांवर चटकदार, माहितीपूर्ण व कलाकुसरीचें लिखाण मिळवायचें असल्यास माझ्यासमोर तरी महाराष्ट्रांत आपल्याशिवाय दुसरें नांव येत नाहीं.

आपण ' प्रतिभे 'करितां महिन्यांतून एक तरी असल्या विषयांवर लेख लिहून पाठविल्यास ' प्रतिभा ' व मी आपलें अत्यंत ऋणी होऊं. श्री. बाबूराव पेंटर व श्री. गोविंदराव टेंबे यांचा ' प्रतिभें 'तून महा-राष्ट्राला विस्तृतपणें परिचय करून द्यावा अशी माझी फार इच्छा आहे. तो आपण करून देऊं शकाल का ? आपल्याला तें शक्य नसल्यास किंवा योग्य वाटत नसल्यास त्या बाबतींत मला कोण उपयोगी पडूं

शकेल याबद्दल आपण कांहीं सूचना करू शकत असल्यास फार बरें होईल.

तसेंच सवडीनें पुढें मागें रसेलच्या ' कॉंक्वेस्ट ऑफ हॅपिनेस ' या धर्तीवर किंवा आपल्याला आवडेल त्या तऱ्हेची एखादी चटकदार लेखमाला आपण ' प्रतिभे 'करितां लिहावी याबद्दलची विनंति मी याच पत्रांत करीत आहें.

मार्चअखेरच्या सुमाराला माझ्या इतर कामानिमित्त मी सांगलीला जाणार आहें तेव्हां कोल्हापूरला आपल्या भेटीस अवश्य येईन असें म्हणतों. त्या वेळीं या सर्व बाबतींत आपणाशीं खुलासेवार बोलणें होईलच. तरी पण त्या दरम्यान आपण ' प्रतिभे 'करितां एखादा सुंदर लेख लिहून पाठवावा अशी माझी आपल्याला आग्रहाची विनंति आहे.

लेखकांना द्यावयाच्या मोबदल्यांच्या संबंधांत ' प्रतिभे 'चें निश्चित असें कोणतेंहि धोरण ठरलेलें नाहीं; व तसें तें ठरविण्यास परिस्थिती-मुळें आणखी एक वर्ष तरी लागेल असें वाटतें. आपल्या लिखाणाचें मोल म्हणून आम्हांला आपल्याला कांहीं देतां येईल असें मी म्हणूं धजत नाहीं. तरी पण अल्प मोबदला म्हणून ' प्रतिभे 'च्या एका पेजला रुपये तीनप्रमाणें मी आपणास अगदीं नियमितपणें मोबदला पाठवू शकेन.

यापूर्वी ' प्रतिभे 'कडून कळत न कळत आपणांस कांहीं अन्याय झाला असल्यास त्याबद्दल मी दिलगिरी प्रदर्शित करतों, व आपल्या नेहमींच्या खेळाडू वृत्तीनुसार आपण तो मनावर घेणार नाहीं अशी अपेक्षा करतों. पुढें असें न होऊं देण्याबद्दल ' प्रतिभा ' काळजी घेईल हेंहि आपणांस स्पष्ट लिहावयास नकोच. "

असं पत्र आल्यावर मोटे यांच्या विनंतीचा अव्हेर करण्याचं मला कांहींच कारण नव्हतं. ' किर्लोस्कर 'मधील लेखनाच्या भरीला ' प्रतिभा ' पाक्षिकांतहि मी बऱ्याच नियमितपणें लिहूं लागलों.

: : ५१ : :

'आधुनिक गीता' ही लेखमाला किर्लोस्करमध्यें सुरू असतांनाच उन्हाळ्याच्या सुटींत 'संजीवन' नाटकाच्या तालमी घेण्याच्या कामानिमित्त मी बरेच दिवस बेळगांवला राहिलों होतों. कंपनीच्या बिऱ्हाडासाठीं एक मोठा प्रशस्त बंगला भाड्यानं घेतलेला होता, त्यांतली एक उत्तम खोली मला देण्यात आली होती. बेळगांव शहरीं यापूर्वी मी दोन-चार वेळां गेलों असेन, परंतु तो एखाददुसऱ्या दिवसापुरताच. त्या शहरांत बऱ्याच दिवसांसाठीं माझा मुक्काम या वेळीं प्रथमच होत होता. नाटकाच्या तालमी घेण्यांत रोज माझे तीन-चार तास जात. 'आधुनिक गीता' या मालेंतील लेखांक तयार करण्याचं काम मी बराच वेळ करीत असे. वाचायसाठीं पुष्कळशीं नवीं पुस्तकंहि बरोबर नेलीं होतीं. परंतु या कार्यक्रमापेक्षांहि मला अधिक आनंद देणारा आणखी एक रोजचा ठराविक उद्योग मी ठेविला होता, तो म्हणजे संध्याकाळच्या वेळेस खूप लांब फिरावयास जाण्याचा. श्री. शंकरराव किर्लोस्कर यांना माझे खास पाहुणे म्हणून कंपनींत रहावयास मी कांहीं दिवसांसाठीं बोलावून घेतलं. ते आल्यावर तर संध्याकाळच्या या कार्यक्रमाला फारच मजा येऊं लागली. आम्ही दोघं रोज संध्याकाळ झाल्याबरोबर बाहेर पडत असूं, व चांगली अडीच-तीन तासांची रपेट करून परत येत असूं. शंकरराव सामान्य उंच माणसापेक्षांहि

अधिक उंच, व शरीरानं भरलेले व मजबूत; उलट मी अगदींच ठेंगणा नसलों तरी उंचहि नाहीं, आणि किरकोळ नसलों तरी लठ्ठहि नाहीं. तथापि त्यांच्याइतक्याच वेगानं आणि लष्करी पद्धतीनं उजवीं डावीं पावलं बरोबर टाकीत मी जात असे. आमची ही जोडी पाहून लोकांना हंसू आल्यावांचून राहत नसे, याची जाणीव आम्हांला होती. हास्यास्पद रीतीनं वागणं वाईट; परंतु आपण लोकांच्या नर्मविनोदाचे विषय होण्याचा संभव आहे याची जाणीव झाली कीं लोकांना हंसविण्यांत जो एक शुद्ध आनंद असतो तो व्यावासा वाटतो. रस्त्यानं झपाझप पावलं टाकून जाणाऱ्या आम्हां दोघांकडे पाहून लोक आपआपसांत काय कुजबुजत असतील त्याचा तर्क आम्हांला करतां येत असे; आणि चालण्याच्या वेगामुळें होणाऱ्या समाधानात या मिष्किल आनंदाची भर पडत असे. शंकरराव एवढे उंच आणि धिप्पाड, परंतु ते कधीं हातांत काठी घेत नाहींत; उलट काठी हातांत घेऊन चालण्याची संवय मला पक्कीच जडलेली. आम्हां दोघांच्या एकंदर विनोदी दृश्याला माझ्या हातांतली ती काठी म्हणजे एक अखेरीचा बहारीचा ( टच ) होता.

शंकरराव आणि मी नुसते शेजारीं शेजारीं उभे राहिलों तरी विनोद निर्माण होईल असं शंकरराव नेहमीं म्हणत. “ आपणा दोघांचं एकत्र चित्र म्हणजे एक फर्स्ट क्लास कार्टून आहे, ” हा त्यांचा ठराविक उद्गार होता. कोणत्या तरी पुस्तकावर तें कार्टून घालतां आलं पाहिजे अशी त्यांची इच्छा होती. ही इच्छा पुढें पूर्ण झाली. ‘ टाकाच्या फेकी ’ या पुस्तकांत शंकररावांनीं चित्रं काढलीं आहेत, आणि मी टीका लिहिलेली आहे. या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर आम्हां दोघांचं एक मोठं गमतीदार व्यंगचित्र शंकररावांनीं काढलेलं आहे. अजूनहि पुष्कळदां शंकरराव म्हणतात, कीं “ आप्पासाहेब, आपण एक विनोदी चित्रपट काढूं या. त्यांत तुमची आमचींच मुख्य कामं ! तुम्ही आम्ही नुसते जवळ जवळ उभे राहिलेले लोकांना दिसलों तरी तेवढ्यानंच लोक हंसू लागतील. ” ते असं म्हणाले कीं, मी उत्तर देतों, “ कल्पना छान आहे. माझी तयारी आहे काम करायला. भांडवलाची बाजू तुम्ही संभाळा म्हणजे झालं. ” या माझ्या उत्तरानंतर संभाषण पूर्णविरामानं थांबतं हें उघडच आहे.

मी व शंकरराव यांनीं मिळून लांब लांब पायीं फिरावयास जाण्याचा आनंद पुष्कळदा घेतलेला आहे. परंतु तो आनंद प्रथम आम्हांला समजला तो १९३४ सालच्या उन्हाळ्यातल्या माझ्या बेळगांव येथील मुक्कामात. बेळगांव शहर मला नेहमीं चमत्कारिक वाटतं. या गांवीं अरुंद गल्ल्या आहेत, खोल विहिरी आहेत, अंधारानं भरलेलीं घरं आहेत, रोगराई पसरविणारं पाणी आहे. ( फार वर्षांपूर्वीची हकीगत मी लिहीत आहे. त्या वेळेस ठळकवाडीची वसाहत झालेली नव्हती. ) परंतु फिरायला जाण्याच्या बाबतीत हें शहर भारी सुंदर आहे. गांवाची पश्चिम सीमा ओलांडल्याबरोबर आसमंतात जिकडे तिकडे मैल न् मैल उंच सखल मोकळा प्रदेश दिसूं लागतो. या ठिकाणीं ऐन उन्हाळ्याच्या दिवसांतहि संध्याकाळच्या वेळेस थंड वारे सुटलेले असतात. अशा या प्रदेशांतून वेगानं जातां जातां माझ्या आणि शंकररावांच्या गप्पा रंगांत येत असत. गेल्या दहा-बारा वर्षांत त्यांची आणि माझीं मतं कित्येक बाबतींत बदलून भिन्न झालीं आहेत. परंतु १९३४ सालीं ही भिन्नता अगदीं नव्हती. सामाजिक आणि राजकीय दोन्ही बाबतींत आमचा बुद्धिवाद जुळत असे. एकमेकांचीं खाजगी सुखदुःखंहि आम्ही एकमेकांजवळ उघड करीत असूं. शंकररावांनीं ‘ स्त्री ’ मासिक थोड्याच वर्षांपूर्वीं सुरू केलं होतं. त्यामुळें स्त्रीवर्गाच्या जीवनाबद्दलचे प्रश्न साहजिकच त्यांच्या मनांत घोळत असत व त्याबद्दलचीं बोलणीं ते वारंवार काढीत. आर्थिक दृष्ट्या स्त्री स्वतंत्र झाली म्हणजेच तिला खरं स्वातंत्र्य प्राप्त होईल, या मताचा पुरस्कार त्या वेळीं देखील पुष्कळ मंडळी लिहिण्यांत व बोलण्यांत करीत असत. मी शंकररावांना म्हणत असे, “ या मतांत अर्धसत्य आहे, पूर्ण सत्य नाही. ” शंकरराव विचारीत, “ तें कसं ? ” मग माझी विचारसरणी मी विस्तारानं त्यांना सांगत असे. त्यांच्यापुढें ती विचारसरणी मांडावयाची असल्यामुळें बोलतांना मी ती शक्यतितकी घासून पुसून मांडूं लागे, आणि उलट सुलट मुद्दे मला सुचत असत. कोणतंहि मत आपल्या मनांत ठेवण्याऐवजीं दुसऱ्याला सांगण्याचा प्रयत्न केला कीं त्याची तर्कशुद्धता आपणांला अधिक तपासावयास मिळते. स्त्रिया मिळवित्या झाल्या कीं लगेच पूर्णतः स्वतंत्र होतील हा विचार मला चुकीचा कां वाटतो, आणि स्त्री-स्वातंत्र्याच्या बाबतींत आर्थिक प्रश्नापेक्षां अधिक गहन आणि गुंतागुंतीचे

प्रश्न आहेत असं मला कां वाटतं, तें मी शंकररावांना सांगण्याचा प्रयत्न करी. आमची ही चर्चा त्या वेळीं जी चाले ती केवळ वादविवादाच्या हौसेखातर, परंतु या चर्चेंतूनच पुढें माझ्या एका नव्या कादंबरीचा जन्म झाला !

त्या कादंबरीचं नांव ‘ उद्धार ! ’

कारण बेळगांवाहून मी व शंकरराव आपआपल्या ठिकाणीं परत गेल्यानंतर शंकररावांनीं मला धाडलेल्या एका पत्रांत लिहिलं—

‘ ... Your present serial ( आधुनिक गीता ) would be finished in a few months. They won't take a long time to slip out. May I, therefore, propose that you cast about even from now for a serial novel theme ? I don't wish to let any gap appear between your present serial and the coming novel. Hundreds of our readers have written to say that they would feel very glad if I could obtain from you a charming novel. I hope I shall be able to satisfy them. As you have so thoroughly grasped the motive and aim of our magazine, I need not suggest you anything as regards the theme of novel; but would prefer to wait until one is formed in your mind and you let me hear about it..’

म्हणजे ‘ किर्लोस्कर ’मध्यें माझी एखादी कादंबरी देण्यांत यावी अशी सूचना शेंकडों वाचकांकडून आल्यावर ‘ आधुनिक गीता ’ संपल्यावर मी एक कादंबरी सुरू करावी अशी विनंति शंकररावांनीं केली होती !

मी ‘ किर्लोस्कर ’मध्यें प्रथम लिहूं लागलों तेव्हां गोविंदराव टेंब्यांशीं माझं जें संभाषण झालं होतं तें शंकररावांचं पत्र वाचतांच मला आठवलं. “ आप्पासाहेब, तुम्ही या लोखंडी मासिकांत कां लिहावं ! ” अशी गोविंदरावांनीं माझी थट्टा केली होती; व मी त्यांना उलट म्हटलं होतं, “ मी या मासिकांत लिहूं लागलों कीं तें सोनेरी होईल ! ”

१९२९ चा ' किर्लोस्कर ' व १९३४ चा ' किर्लोस्कर ' यांतील तफावत जुन्या फायली पाहिल्या तर कुणाच्याहि सहज लक्षांत येण्यासारखी आहे. या पांच वर्षांत ' किर्लोस्कर 'चं स्वरूप अजिबात बदलून गेलं होतं; आणि आतां माझी कादंबरी सुरू करण्याची सूचना शेंकडों वाचकांनीं शंकररावांना करावी यावरून माझ्या लिहिण्याची छाप मी ' किर्लोस्कर 'वर किती बसविली होती व बंद पडलेल्या ' रत्नाकर 'ची जागा हळूहळू भरून निघत आहे असं वाचकांना कसं वाटायला लावलं होतं तें उघड होत होतं.

नवी कादंबरी लिहिण्याबद्दल शंकररावांचं पत्र आल्यावर कोणत्या विषयावर कादंबरी लिहावी याचा जेव्हां मी विचार करूं लागलों, तेव्हां उन्हाळ्याच्या सुटींत बेळगांव येथें संध्याकाळीं फिरायला गेल्यावर ज्या एका प्रश्नावर माझं आणि शंकररावांचं वारंवार संभाषण झालं होतं तो माझ्या मनापुढें एकदम आला. स्त्रिया आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र झाल्या, कीं त्यांची गुलामगिरी चुटकीसरशी संपेल ही समजूत मला भ्रामक वाटत होती. स्त्रीभोंवतीं केवळ आर्थिक परावलंबित्वाचेच पाश नाहींत, परंपरा, रूढी, नितिनियमांचे विधिनिषेध इत्यादि जीं बंधनं पुरुषापेक्षां स्त्रीवर अधिक आहेत त्यांमुळें तिचं स्वातंत्र्य हरपलेलं आहे; इतकंच नव्हे तर गर्भधारणा आणि प्रसूति या गोष्टी !निसर्गानं स्त्रीकडे सोपविलेल्या असल्या-मुळें स्त्रीला एकप्रकारें निसर्गानंच गुलाम बनाविलेलं आहे– असं माझं मत होतं. माझ्या मनांत आलं, हें मत पुढें मांडण्यासाठींच माझ्या नव्या कादंबरीचा उपयोग मी कां करूं नये ?' स्त्री पैसे मिळवूं लागली,। कीं तिचं दास्य संपून तिचा उद्धार होण्यासारखा नाहीं, त्या उद्धारासाठीं समाजाच्या नीतीच्या कल्पना आमूलाग्र बदलल्या पाहिजेत, असं मला या नव्या कादंबरींत सांगतां येईल. म्हणून माझ्या कादंबरीचं ' उद्धार ' असं नांव मी ठरविलं, आणि तें शंकररावांना कळविलं. त्यांनीं तें नांव ' किर्लोस्कर 'मध्यें जाहीर केलं !

## : : ५२ : :

श्रीयुत विनायक भडभडे नांवाच्या एका गृहस्थांनीं ' प्रतिभा आणि प्रचार ' या मथळ्याखालीं माझं बडोद्याच्या साहित्यसंमेलनांतील अध्यक्षीय भाषण ' झंकार ' मध्यें वाचल्यावर मला लिहिलेलं एक बरंच मोठं पत्र माझ्या फायलींत आहे. १९३४ सालीं ' उद्धार ' नांवाची जी नवी कादंबरी मी लिहावयास घेतली तिच्याबद्दलच्या आठवणी आतां सांगण्याचं योजिल्यावर मला या पत्राची एका विवक्षित कारणासाठीं आठवण होत आहे. श्री. भडभडे यांचं सबंध पत्र या ठिकाणीं देण्याचं कारण नाहीं. परंतु त्यांतला एक मुख्य विचार सांगतों. या गृहस्थांनीं लिहिलं होतं, " प्रतिभा आणि प्रचार यांच्या अन्योन्य संबंधाबद्दल तुम्ही आपली जी भूमिका भाषणांत व लेखनांत पुनः पुन्हा स्पष्ट केली आहे ती इतकी बिनतोड आहे, की ती पाहिल्यावर तुमचीं मतं खोडूं पाहणारे लोक वाद कसा घालूं शकतात तेंच कळत नाहीं. मत-प्रचार हें ललित साहित्याचं मुख्य ध्येय आणि ललित लेखकाचा मुख्य धंदा होऊं शकत नाहीं. असं तुमचं स्वच्छ प्रतिपादन; आणि त्याला जोडलेली तुमची पुस्तीही तितकीच स्वच्छ कीं मतप्रचार कादंबरीकार करू शकणार नाहीं किंवा त्यानें तो करतां कामा नये असा आग्रह नाहीं ...मला वारंवार आश्चर्य वाटतें तें हें कीं ' कलेसाठीं कला ' हें तुमचें तत्त्व असूनहि तुम्ही स्वतःच आपल्या कित्येक कादंबऱ्यांतून मत-प्रचार केलेला आहे.

लघुकथांतूनहि ! ' किर्लोस्कर ' मासिकांत प्रसिद्ध झालेल्या ' चंद्रा ', ' दादा पुरते डोळे उघड ', ' द्रोह ' या गोष्टी, आणि इतरत्र प्रसिद्ध झालेला ' माझा देश, माझा देश ', ' पार्वती ', ' वेडं कोकरू ' इत्यादि गोष्टी या संबंधात चटकन् नजरेसमोर येण्यासारख्या आहेत. तुमच्या बहुतेक कादंबऱ्यांची अशीच गोष्ट आहे. कादंबरी मनोरंजक करण्याचें अवधान तुम्ही कधींहि सुटूं दिलेलें नाहीं. परंतु बहुतेक प्रत्येक कादंबरीत तुम्ही कोणत्या तरी मताचा प्रचार केलेला आहे ! तुमच्या पहिल्या सात कादंबऱ्यांत असा मतप्रचार नव्हता. परंतु ' उद्धार ' कादंबरीपासून तुमच्या लेखनाचें ' वळण ' बदललें असें तुमच्या कादंबरीवाङ्मयाचा अभ्यास करणारा कोणीहि इसम म्हणेल. तुमच्या कादंबरी-साहित्यावर टीकाग्रंथ लिहिणाराला तुमची ' उद्धार ' कादंबरी हा एक महत्त्वाचा टप्पा समजावा लागेल ..."

या पत्रांत ' उद्धार ' कादंबरीबद्दल व्यक्त केलेला विचार खरा आहे. ' उद्धार ' कादंबरीचं कथानक मी मनाशीं जुळवूं लागलों तेव्हां एक नवा प्रयोग मी करून पहाणार आहे. याची जाणीव मला होती. या पूर्वीच्या सात कादंबऱ्यांत ' विषय ' खचित होता; परंतु या विषयाला सिद्धान्ताचं स्वरूप फारसं नव्हतं; उलट आतां " उद्धार " कादंबरींत मला एक सिद्धान्त पुढें मांडावयाचा होता. स्त्री खरोखर स्वतंत्र व्हावी यासाठीं ती केवळ मिळवती होऊन आर्थिक दृष्टया स्वतंत्र झाल्यानं भागणार नाहीं. तर तिच्याकडे निसर्गानें सोपविलेल्या मातृपदाभोंवतीं कृत्रिम नीतिविषयक कल्पनांचीं जीं बंधनं आहेत तीं नाहींशीं झालीं पाहिजेत, हा मला पटलेला सिद्धान्त वाचकांना पटविण्याचं काम मला करायचं होतं. याचाच अर्थ असा की या कादंबरीच्या साहाय्यानं मला मतप्रचार करायचा होता.

परंतु मतप्रचाराच्या आहारी जाऊन कादंबरीचा कादंबरीपणा मला घालवायचा नव्हता. या कादंबरींत मतप्रचार साधला तर साधावा अशी माझी इच्छा होती खरी, परंतु माझा मुख्य हेतु एक शक्य तितकी सुंदर आणि चटकदार कादंबरी लिहिण्याचा होता. अर्थात चित्तवेधक कादंबरी निर्माण करतांना ज्या प्रकारचा विचार मी नेहमीं करीत असे त्याच तऱ्हेचा विचार मी आतांहि करूं लागलों.

मी मनाशीं म्हटलं, ज्या स्त्रीला प्रथम असं वाटत होतं कीं, आर्थिक स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर स्त्री स्वतंत्र होईल, परंतु जिला पुढें उमज पडला– तिला स्वतःला आलेल्या प्रत्यक्ष अनुभवांच्या योगानं पडला– कीं आपलं हें मत चुकीचं आहे आणि मातृपदाविषयींच्या कृत्रिम संकुचित नीतिकल्पना जोंपर्यंत नाहींशा झाल्या नाहींत तोंपर्यंत स्त्री मिळवती झाली तरी स्वतंत्र होणार नाहीं, अशा स्त्रीची गोष्ट मला या कादंबरींत लिहिली पाहिजे ! अर्थातच ही कादंबरी नायिकाप्रधान कादंबरी असावयास हवी.

कोणतीहि कादंबरी घेतली तर त्यांत नायक असतो आणि नायिका असते हें तर खरंच, परंतु या दोघांपैकीं कुणाला प्रमुखपणें नजरेसमोर ठेवायचं हा प्रश्न त्या त्या कादंबरीच्या स्वरूपावर अवलंबून असतो. ‘ अटकेपार ’ या माझ्या स्वतःच्याच कादंबरीचं उदाहरण घ्या. या कादंबरींत नायक आहे नायिका आहे; परंतु कादंबरींतली एकंदर गोष्ट मीनाक्षीबद्दल नसून नायक सुधीर याच्याबद्दल आहे. ‘ निरंजन ’ कादंबरी म्हणजे देखील तिच्यांतील नायिकेची गोष्ट नसून मुख्यतः निरंजनची गोष्ट आहे. ‘ जादुगार ’, ‘ दौलत ’, ‘ कलंकशोभा ’ या कादंबऱ्यांत नायक आणि या दोघांनाहि मी सारखंच महत्त्व दिलेलं होतं. परंतु आतां जी कादंबरी मी लिहिणार होतों, ती अगदीं ढळढळीतपणें एका स्त्रीचीच गोष्ट असावयास हवी होती. या स्त्रींची स्वातंत्र्याबद्दलचीं पहिलीं मतं, तिच्यावर आलेले विविध प्रसंग, आणि त्या प्रसंगांनीं तिच्या मनांत घडून आलेलं परिवर्तन– याबद्दलची ही कादंबरी झाली पाहिजे हें मला उघड दिसलं. ही स्त्री विचारशील, बरीचशी गंभीर प्रकृतीची, आणि वाचन - मननाची आवड बाळगणारी असावयास हवी. या दृष्टीनं अर्थपूर्ण नांव मी शोधूं लागलों. अखेर जें एक नांव मला सुचलं तें आपल्या महाराष्ट्रीय समाजांत फारसं रूढ नाहीं; परंतु गुजराथी समाजांत आहे. त्या नांवांत नावीन्य आणि काव्य दोन्ही आहेत असं मला वाटलं, म्हणून मी तें नांव कायम केलं. तें नांव ‘ विद्या ’.

इतर लेखकांचा अनुभव काय आहे कोण जाणें, परंतु माझा मी सांगतों तो असा, कीं कादंबरींतील प्रमुख पात्रांचीं नांवं कायम केल्याखेरीज कथानकाचा आराखडा जुळविणं मला जरा जड जातं. तीं एकदां ठरलीं

कीं माझी कल्पनाशक्ति मला सहज चालवितां येते. ‘ उद्धार ’ कादंबरीची नायिका विद्या नांवाची एक तरुण स्त्री एवढं ठरलं. मग कथानकाची गुंफण मी तिच्याभोंवतीं करूं लागलों. कथानकाची स्थूल रूपरेखा मी ठरविली ती अशी—

वीणाबाई आणि नर्मदाबाई या दोन बहिणी. वीणाबाईंना रामराव काळे नांवाच्या एका गृहस्थानं लग्नाचं वचन देऊन फसविलेलं होतं. परंतु त्यांच्यापासून तिला एक मुलगी झाली. वीणाबाई पुष्कळ श्रीमंत होत्या. परंतु आपल्या पोटीं आलेली अनौरस कन्या आपली मुलगी म्हणून वाढविली तर समाजाच्या दृष्टीनं आपण भ्रष्ट ठरूं, आणि आपल्या कन्येचं आयुष्यहि दुःखाचं होईल, या भीतीनं त्यांनीं आपल्या पोटीं आलेली मुलगी आपल्या बहिणीच्या ओटींत घातली. ती मुलगी नर्मदाबाईची म्हणून लहानाची मोठी झाली. ती वीस वर्षांची झाली तरी तिला तिचं जन्मरहस्य माहीत नव्हतं. विद्या म्हणजे हीच मुलगी.

नर्मदाबाई मरण पावल्या तेव्हा वीणाबाईंकडून विद्येला जन्म-रहस्य कळलं. आणि आर्थिक स्वातंत्र्य म्हणजेच स्त्रीचं स्वातंत्र्य त्या तिच्या मताला पहिला धक्का बसला. तिची खरी आई वीणाबाई श्रीमंत होती, सुविद्य होती. परंतु मी अमक्या अमक्या माणसावर प्रेम केलं, त्यानं मला फसविलं अशा स्थितींत त्याच्यापासून मला मुलगी झाली असली तर माझा काय अपराध, मी तिला राजरोसपणानं माझी मुलगी समजणार, आणि माझी म्हणून वाढविणार, असं ती म्हणूं शकत नव्हती. आर्थिक दृष्ट्या भरपूर स्वातंत्र्य ती उपभोगीत असूनहि आपल्या मुलीला आपली म्हणण्याचं स्वातंत्र्य तिला नव्हतं !

ज्या वेळीं विद्येला तिच्या जन्माचा इतिहास कळला त्या सुमारास चारुदत्त नांवाच्या एका तरुण डॉक्टराचं व तिचं प्रेम जमलेलं होतं. त्या दोघांचं लग्न होणार हें सगळ्यांनाच स्पष्ट दिसत होतं, परंतु अनौरसपणाचा कलंक आपल्याला लागलेला आहे हें विद्येला कळल्यावर तिनं चारुदत्ताशीं लग्न न करण्याचं ठरविलं, आणि खरं कारण त्याच्यापासून गुप्त ठेवून त्याचे संबंध तोडून टाकले.

पुढें कांहीं दिवसांनीं विनयकुमार नांवाच्या एका तरुणाचा व तिचा परिचय वाढत गेला आणि तिच्याशीं विवाह करण्याची गोष्ट त्यानं तिच्याजवळ काढली. तिनं त्याला नकार दिला. तथापि त्यांची मैत्री संपली नाहीं. एकदां त्याच्या खोलीवर ती संध्याकाळीं गेली असतांना त्या भागांत हिंदु-मुसलमानांचा दंगा एकदम उसळल्यामुळें तिला त्याच्या खोलींतच रात्र काढणं भाग पडलं. या रात्रींत विनयकुमारानं आपल्यावर बलात्कार केला असं तिला आढळून आलं. अर्थात् त्याची निर्भर्त्सना करून त्याचा एक शब्दहि ऐकून न घेतां ती सकाळीं घरीं निघून गेली.

थोड्याच दिवसांनीं तिला वाटूं लागलं, आपल्याला दिवस गेले आहेत ! आणि ही शंका आल्यावर ती घाबरून गेली. तिचीं पूर्वींचीं सारीं मतं गडगडलीं. विवाह झालेला नसतांना आपल्याला जर मातृपद आलं तर आपल्या सबंध आयुष्याचा नाश होणार हें तिला स्पष्ट दिसूं लागलं. मातृपदावांचून स्त्रीच्या जीविताचं साफल्य अशक्य, लग्नावांचून मातृपद अशक्य, आणि कुणा तरी पुरुषाच्या ताब्यांत गेल्यावांचून लग्न अशक्य, अशा तीनपदरी फासांत स्त्री अडकलेली होती. आकर्षण, प्रेम, भोग ( आणि संतति ) असा निसर्गाचा क्रम होता. या क्रमांतल्या अखेरच्या गोष्टीवर नीति-अनीतीचीं कृत्रिम वेष्टणं गुंडाळलीं होतीं, आणि तीं जोंपर्यंत कायम राहतील तोंपर्यंत स्त्रियांना आर्थिक स्वतंत्रता आली तरी त्यांचा खरा उद्धार होणार नव्हता !...

विद्येची आई वीणाबाई नेहमीं हे विचार बोलून दाखवी, परंतु विद्येला ते पटत नसत. आतां मात्र तिच्या आईवर आलेलं संकटच तिच्यावर आलं तेव्हां तिला तें पटलं.

तिनं निश्चय केला कीं विनयकुमाराची गांठ घ्यावयाची आणि त्याला सांगावयाचं, मी तुझ्याशीं लग्न करायला तयार आहे.

या ठिकाणीं मला ' उद्धार ' कादंबरी संपविता आली असती. परंतु तशी ती मला संपवायची नव्हती. कथानक या ठिकाणीं पूर्ण होऊं देण्याची माझी इच्छा नव्हती. कारण विद्येचं खरं प्रेम चारुदत्तावर होतं, आणि त्याच्याशींच तिचा विवाह होणं ' पोएटिक जसटिक ' च्या दृष्टीनं — म्हणजे

काव्यांत ज्या न्यायाचा संकेत मानला जातो त्या न्यायाच्या दृष्टीनं— आवश्यक होता.

म्हणून ‘ मी तुझ्याशीं लग्न करायला तयार आहे. ’ असं सांगण्यासाठीं विनयकुमाराची भेट घ्यायला विद्या निघाली असं दाखवून लगेच वाचकांना आश्चर्याचा एक अकल्पित धक्का देण्याचं, आणि कथानकाला एकदम नवीन कलाटणी देण्याचं मी ठरविलं. कथानक पेचदार करण्याच्या माझ्या चातुर्याची या ठिकाणीं कसोटी होती !

: : ५३ : :

विनयकुमाराला भेटून 'मीं तुझ्याशीं लग्न करायला तयार आहे ' असं सांगायला निघण्याइतकी विद्या अगतिक झाली, परंतु तो तिला भेटला असतां तर तिची अगतिकता आणि कादंबरीचं कथानक, दोन्ही संपलीं असतीं. तसं होऊं नये म्हणून विद्येची आणि विनयकुमाराची भेट मला अशक्य करायची होती. यासाठीं मी असं दाखविलं, कीं विनयकुमार अकस्मात पकडला गेला. गैरकायदा शस्त्र बाळगण्याच्या आरोपाखालीं त्याच्यावर खटला सुरू झाला.

असं केल्यानं विद्येवरचं संकट कायम राहिलं आणि तिची यांतून सुटका होते कीं नाहीं अशी हुरहूर वाचकांना वाटत राहील अशी योजना झाली.

परंतु विनयकुमारला विशेष मोठी शिक्षा झाली नाहीं. कडक इशारा ( सिव्हियर वॉर्निंग ) आणि पन्नास रुपये दंड एवढ्या शिक्षेवर त्याची मुक्तता झाली.

आतां विद्येचं आणि विनयकुमाराचं लग्न होण्याचा मार्ग पुन्हां मोकळा झाला असं वाचकांना वाटूं लागणार हें उघड होतं आणि या ठिकाणीं वाचकांना मला पुन्हां चकवायचं होतं.

यासाठीं मी असं दाखविलं, कीं विनयकुमार आणि विद्या एकमेकाला भेटलीं, त्यांनीं लग्नाचा निश्चय केला, परंतु तीं दोघं जेव्हां वीणाबाईची

संमति घ्यावयास गेलीं, तेव्हां दोघांच्या ध्यानींमनींहि नसलेलं एक रहस्य त्यांना कळलं. तें रहस्य हें कीं ज्या रामराव काळ्यांनीं वीणाबाईंना फसविलं होतं त्यांचा विनयकुमार हा पहिल्या बायकोपासून झालेला मुलगा होता.

हें कळल्यावर विद्येनं विनयकुमाराशीं लग्न करण्याचा विचार सोडून दिला! म्हणजे तिच्यावरचं संकट पुन्हां कायम राहिलं! ती आपल्या आईला सांगूं शकत नव्हती, परंतु आपल्याला दिवस गेले आहेत याबद्दल तिची खात्री होती!

मग तिनं अखेरचा उपाय योजला. तिनं गृहत्याग केला! डॉक्टर चारुदत्त विद्येच्या बाबतींत निराश झाल्यावर दूरच्या प्रांतांत जाऊन एका हॉस्पिटलचा मुख्य अधिकारी म्हणून राहिला होता. विद्या जी घर सोडून प्रवासाला निघाली ती चारुदत्त ज्या गांवीं होता त्याच गांवीं योगायोगानं गेली. चारुदत्त तिथें असेल अशी विद्येला यत्किंचितहि कल्पना नव्हती; परंतु त्याची तिची भेट झाली. चारुदत्ताचं तिच्यावरील प्रेम अजूनहि अढळ होतं. विद्येनं आपल्या जन्माचा इतिहास आणि आपल्याला दिवस गेलेले आहेत ही गोष्टहि त्याच्याजवळ स्पष्ट सांगितली. मग त्या दोघांचं लग्न झालं.

'उद्धार' कादंबरीचं कथानक या ठिकाणीं संपलं. परंतु हा शेवट जरा साधा आणि मिळमिळीत झाला असता. मला तो तसा होऊं द्यायचा नव्हता. विद्या विनयकुमारापासून गर्भवती होती हें कळलं तरीदेखील तिच्याशीं लग्न करण्यास चारुदत्त तयार झाला असं दाखविल्यानं चारुदत्ताच्या प्रेमाची निष्ठा आणि उदात्तता मी साधली. परंतु इंग्रजींत ज्याला 'ट्वीस्ट' म्हणतात तसला ट्वीस्ट म्हणजे चमत्कृति उत्पन्न करणारा तिढा मला कादंबरीच्या अखेरीस ठेवायचा होता.

यासाठीं मी असं दाखविलं, कीं विनयकुमारापासून आपल्याला गर्भ राहिला आहे अशी जी समजूत विद्येनं करून घेतलेली होती ती सर्वस्वीं खोटी होती. तिला गर्भ राहिलेला नव्हता. इतकंच नव्हे तर ज्या रात्रीं ती त्याच्या खोलीवर राहिली त्या रात्रीं विनयकुमारानं आपल्यावर बलात्कार केला असं जें तिला वाटलं तें देखील तिला पडलेलं केवळ एक स्वप्न होतं. वास्तविक प्रकार घडला तो असा, कीं तिला खोलींत निजविल्यानंतर विनय-

कुमार रात्रभर बाहेरच्या गॅलरींत निजला होता व त्यानं खोलींत प्रवेश-देखील केला नव्हता; आणि रात्रीच्या वेळेस तो खोलींत आला, त्याचीं पावलं आपण ऐकलीं तो आपल्या जवळ आला, आणि आपला प्रतिकार न जुमानतां त्यानं आपली इच्छा पुरी करून घेतली, हें सारं विद्येला पडलेलं एक स्वप्न होतं. त्या स्वप्नालाच ती सत्य मानून चालली होती आणि गरोदर-पणाचीं कांहीं चिन्हं स्वतःच्या ठिकाणीं दिसूं लागतांच आपल्याला दिवस गेले आहेत असा तिनं स्वतःचा पक्का ग्रह करून घेतलेला होता.

म्हणजे कादंबरीच्या अखेरीस विद्या गर्भवती असल्याचं समजलं तरी-देखील चारुदत्तानं तिच्याशीं लग्न करायचं ठरविलं खरं; परंतु वास्तविक विद्येची अवस्था तिला वाटलेली होती त्याप्रमाणें कलंकित नव्हती. विद्या शुद्धच होती, हें दाखविल्यानं चारुदत्ताच्या प्रेमाची उदात्तताहि सिद्ध झाली, आणि विद्येकडे वैगुण्यहि उरलं नाहीं!

असा चमत्कृतिपूर्ण शेवट करावयाचा ठरविल्यावर दोन मोठीं अवधानं पाळणं मला आवश्यक होतं. एक अवधान असं, कीं "विद्येचं गर्भारपण खरं नव्हतंच तर?" असा आश्चर्याचा धक्का विद्येला आणि त्याबरोबरच वाचकांनाहि शेवटीं बसेल, आणि तो धक्का बसेपर्यंत विद्येवर आलेलं संकट तिला स्वतःला आणि वाचकांनाहि खरं आणि म्हणून भयंकर वाटेल अशा युक्तीनं अखेरीपर्यंतचं कथानक रंगविणं आवश्यक होतं. तें मी कसं रंगविलं आहे तें 'उद्धार' कादंबरी प्रत्यक्ष वाचणाऱ्यांना कळेल. इथें एवढंच सांगतों, कीं या बाबतींत वाचकांची जिज्ञासा (सस्पेन्स) आणि हुरहूर अखेरपर्यंत कायम रहावी यासाठीं मी अशी युक्ति केली, कीं त्या रात्रीं विनयकुमार आपल्या खोलींत आला व त्यानं आपला उपभोग घेतला असं जें विद्येला वाटलं तें केवळ स्वप्न होतं, ही गोष्ट कादंबरीच्या अगदीं अखेरीस विनयकुमाराचं एक पत्र विद्येच्या हातीं आणून मी उघड केलेलं आहे. हें पत्र पूर्वींच आलेलं असून तें तिच्या हातीं मात्र पडलं नव्हतं, आणि अखेर तिच्या एका पुस्तकात तिला तें सांपडलं असं दाखवून ही एकंदर घटना मी पेचदार केली.

हें झालं एक अवधान. दुसरं अवधान मला ठेवायचं होतं तें त्याच्या इतकंच कदाचित् जास्त महत्त्वाचं होतं. तें म्हणजे विद्येला वास्तविक स्वप्न

पडलेलं असून तिला तें प्रत्यक्ष घडलेल्या प्रकाराप्रमाणें वाटलं, व विनयकुमाराचा आणि तिचा समागम झालेला नसूनही गर्भधारणेचीं कांहीं चिन्हं तिला स्वतःच्या ठिकाणीं दिसूं लागलीं, या दोन्ही गोष्टी संभाव्य ठरतील अशी काळजी घ्यायची म्हणजे पहिल्या गोष्टीस मानसशास्त्राचा व दुसऱ्या गोष्टीस वैद्यकशास्त्राचा आधार असल्याचं दाखविणं मला भाग होतं. अधारासाठीं या दोन्ही शास्त्रांवरील ग्रंथांतील उतारे मी कादंबरींत दिलेले आहेत. त्याची पुनरुक्ति येथें करीत नाहीं. परंतु या बाबतींत निवेदनाचं कोणतं कौशल्य मी योजिलं तेवढं मात्र थोडक्यांत सांगतों.

विनयकुमारानं आपल्यावर बलात्कार केला हें विद्येला पडलेलं एक स्वप्न होतं, आणि त्या स्वप्नालाच अगदीं खरा घडलेला प्रकार मानून ती चालली, हें तिच्या बाबतींत वाचकांना संभाव्य वाटवं यासाठीं तिचं एकंदर स्वभावचित्र त्या धोरणानं रंगवायला हवं होतं. स्वप्न आणि प्रत्यक्ष घटना यांची गल्लत विद्येनं केवळ या एकाच प्रसंगापुरती केलेली मी दाखविली असती तर वाचकांना म्हणतां आलं आसतं, छे, असं होणं शक्य वाटत नाहीं. म्हणून अशी गल्लत तिच्याकडून वरचेवर होत असे असं दाखविणारे लहान लहान प्रसंग मी 'उद्धार' कादंबरीच्या सुरुवातीपासून पेरलेले आहेत. कादंबरींत अगर नाटकांत वाचकांना जेव्हां विस्मयाचा मोठा धक्का द्यावयाचा असतो तेव्हा त्याबद्दलचं एक विशिष्ट तंत्र संभाळण्यांत लेखकाचं खरं कसब असतं असं मी मानतों. तें तंत्र हें कीं वाचकाला आश्चर्याचा मोठा धक्का तर बसला पाहिजे, परंतु कथानकावर मागें दृष्टि टाकून त्यानं पाहिलं तर त्याला कबूल करावं लागलं पाहिजे कीं, अरे, या विस्मयकारक घटनेचीं बीजं लेखकानं ठिकठिकाणीं पेरलेलीं आहेत कीं! तेव्हां जें आपल्याला अतिविस्मयकारक वाटत आहे त्याचा खुलासा आहे आणि म्हणून तें संभाव्य समजलं पाहिजे.

हें तंत्र मी 'उद्धार' कादंबरींत अगदीं कटाक्षानं पाळलेलं त्या कादंबरीच्या वाचकांना आढळेल, कांहीं माणसांची कल्पनाशक्ति अशी तीव्र आणि चमत्कारिक असते, कीं त्यांना स्वप्नांत येणारा अनुभव प्रत्यक्ष आलेल्या अनुभवासारखा वाटतो, त्या दोहोंत त्यांना फरक करतां येत नाहीं. या एका मानसशास्त्रीय सिद्धान्ताचा आधार घेऊन विद्येचं चित्र मी

रेखाटलं आहे; आणि तिच्या स्वभावांतील या भागावर लहान लहान प्रसंगांच्या साहाय्यानं वरचेवर प्रकाश टाकलेला आहे !

जिची कन्या म्हणून विद्या वाढली ती नर्मदाबाई वास्तविक तिची आई नव्हती, आणि जिला ती आपली मावशी समजत होती ती वीणाबाई तिची खरी आई होती, या रहस्याचा स्फोट मी कादंबरींत जरा लवकरच केलेला आहे. परंतु त्या बाबतींतहि वर सांगितलेल्या तंत्राचं अवधान मी कसं ठेवलेलं आहे तेंहि ही कादंबरी वाचणाराच्या सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

'उद्धार' कादंबरीच्या कथानकाचा सारांश, त्या कथानकांतील मुख्य मुख्य पेंच, त्यांतील चमत्कृतीच्या जागा, इत्यादीविषयीं आतांपर्यंत मीं जें इतकं सांगितलं तें अशा आविर्भावानं कीं जणूं या साऱ्या गोष्टींचा संपूर्णपणें एका बैठकींत मी व्यवस्थित विचार आणि निश्चय केला, आणि नंतर कादंबरी झराझरा लिहिली. परंतु तसं मुळींच घडलं नाहीं. १९३४ सालीं जुलै महिन्याच्या २५ तारखेस मी ही कादंबरी लिहूं लागलों तेव्हां कथानकांतील कांहीं मुख्य टप्पेच तेवढे मला दिसत होते. ही कादंबरी 'किर्लोस्कर' मासिकांत सुरू झाली तेव्हां एकीकडे तिचीं प्रकरणं प्रसिद्ध होत होतीं व एकीकडे माझं पुढचं लिहिणं चालू होतं. अशा प्रकारें कादंबरी-लेखन करतांना कुठेंहि चुकीचं पाऊल पडतां कामा नये, आणि पुढचा वाट जसजशी अधिकाधिक दिसेल तसतशी कादंबरी पुढें लिहावयाची ही कसरत, मला वाटतं, अभ्यासानं लेखकाला येऊं लागते. गवई ज्याप्रमाणें आस्ते आस्ते रागिणी भरीत जातो, त्याप्रमाणेंच कादंबरी लिहिण्याचं कामहि आहे किंवा याहूनहि समर्पक दाखला असा, कीं वक्ता ज्याप्रमाणें आपलं दीड-दोन तासांचं भाषण करतांना शब्दांची, वाक्यांची अथवा विचारसंगतीची कोठेंसुद्धां गलती होऊं न देण्याचं अभ्यासानं शिकतो त्याप्रमाणेंच कादंबरी-लेखकाचं आहे.

यामुळेंच कादंबरी लिहिणं ही एक मनस्वी आनंदाची गोष्ट असते. विशेषतः एकीकडे ती क्रमशः प्रसिद्ध होत असतांना दुसरीकडे ती लिहीत असणं ही क्रिया अवघड खरी, पण तिचा आनंद फार मोठा आहे किंवा आपण असं म्हणूं कीं ती अवघड आहे म्हणूनच तिच्यांत फार आनंद

आहे. क्रिकेटच्या खेळांत आपल्या संघाचे पांच-सहा गडी पटापट बाद झाले आहेत. धांवा तर फार माफक झाल्या आहेत, अशा वेळेस बॅटिंग करावयास जाणारा खेळाडू आपली विकेट जाणार नाहीं अशी दक्षता घेऊन, आस्ते आस्ते प्रतिपक्षाचं बोलिंग दमांत उखडून, क्षेत्ररक्षणाची फळी फोडून, प्रथम धिम्या लयींत नंतर द्रुत लयींत धांवांचं शतक गांठतो, ती केवढी अवघड गोष्ट असते ! पण म्हणूनच ती करून दाखविण्यांत मस्त आनंद असतो ! सारं अवधानं व्यवस्थित राखून एकीकडे मासिकांत सुरू देखील झालेली कादंबरी पुढें लिहीत जाऊन मनाजोगी संपविणं या गोष्टीं-तला अवघडपणा आणि आनंद यांचं स्वरूप दर्शविणारा सर्वांत चांगला दाखला मला सुचतो तो हा क्रिकेटमधलाच !

अर्थात् ' उद्धार ' कादंबरी लिहून मी जेव्हां हातावेगळी केली तेव्हां कादंबरीबरोबर माझा आनंदहि संपला. पण त्याबरोबरच एका जबाब-दारींतून मी पार पडलों या विचारानं मी सुटकेचा निःश्वासही टाकला.

माझ्या एकंदर लेखन-व्यवसायाच्या इतिहासांत ' उद्धार ' कादंबरीला विशेष महत्त्व आहे. मी स्वतः हातानं लिहिलेली ही माझी शेवटची कादंबरी मला वाटतं, या कादंबरीचं हस्तलिखित शंकरराव किर्लोस्कर यांनीं मुद्दाम जपून ठेवलेलं आहे. या कादंबरीनंतर मी माझं सारं लेखन मजकूर तोंडानं सांगून लेखकाकडून लिहून घेऊं लागलों. गेल्या चौदा वर्षांत लेखकाला मजकूर सांगण्याची संवय मला आतां इतकी जडली आहे, कीं माझं लेखन मी स्वतः अगदी क्वचित करतों.

' उद्धार ' कादंबरी संपविल्यावर कोणतं नवं लेखन मी हातीं घेतलं तें सांगण्यापूर्वी माझी स्मृति थोडीशी मागं वळते, आणि १९३३–३४ सालांतील ज्या प्रसंगांचा माझ्या लेखनाशीं संबंध होता असे कांहीं दुसरे प्रसंग मला आठवूं लागतात. त्यांतील एक विशेष सांगण्यासारखा प्रसंग म्हणजे देवास संस्थानचे माजी महाराज यांची व माझी झालेली भेट !

दा. क्र. 96308
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थलप्रत
अनुक्रम ८४३८४ दि: १०८५
क्रमांक ९८८६ नों दि: ११।३।८५

## : : ५४ : :

'प्रतिभासाधन' ग्रंथावरील वाद चालू असतांना माझे पाय ओढण्यासाठीं अथवा 'तेवढेंच आपलें नांव ज्ञानप्रकाशांत येईल' अशा इच्छेच्या पूर्ततेसाठीं नव्या नव्या कल्पना काढण्यांत अनेक लोकांचीं कल्पक डोकीं गुंतलेलीं होतीं. माझ्या या ग्रंथाला 'भोजराज पारितोषिक' मिळालें होतें. ही गोष्ट विरोधकांच्या मनांत सलत होती. ज्यांनीं या वादाचं काहूर उठविलं होतं त्यांच्यापैकीं कांहींनीं असा सूर काढला कीं मला मिळालेलं भोजराज पारितोषिक रद्द करण्याची खटपट व्हावी. वादाच्या निमित्तानं पुण्यास भरलेल्या जाहीर सभेंत मी जें सविस्तर प्रदीर्घ भाषण केलं त्या भाषणामुळें त्या सभेचा डाव सर्वस्वीं त्यांच्या अंगाशीं आला होता. नंतर त्यांनींच नेमलेला लवादाचा निर्णयहि त्यांना हवा तसा झाला नाहीं. तेव्हां प्रो. फडक्यांना मिळालेलं भोजराज पारितोषिक आपल्याला रद्द करतां येतं का पाहूं या अशी कल्पना त्यांच्या डोक्यांत शिरली. त्याप्रमाणें त्यांनी खटपटीहि केल्या. परंतु त्या खटपटींतहि त्यांचे दांत त्यांच्या घशांत आले. त्यांना कळविण्यांत आलं, कीं " भोजराज पारितोषिकासाठीं महाराष्ट्रांतील तज्ञांची समिति नेमली जाते आणि तिच्या निर्णयानुसारच पारितोषिक दिलें जातें. ज्या तज्ञांनीं या वर्षीचें पारितोषिक 'प्रतिभासाधन' ग्रंथास एकमतानें दिलें त्यांनीं आपला निर्णय बदललेला नसतांना, केवळ वृत्तपत्रांत झालेल्या

वादाचा परिणाम म्हणून प्रो. फडके यांना देऊं केलेलं पारितोषिक परत घेण्याचें पारितोषिक समितीला कांहींच कारण नाहीं." असें रोखठोक उत्तर आल्यावर. माझ्याविरुद्ध हा अखेरचा उठाव करूं पाहणारी मंडळी हात चोळीत स्वस्थ बसली.

भोजराज पारितोषिक अवघं दोनशें रुपयांचं होतं. परंतु मराठी भाषेच्या क्षेत्रांत त्या वेळेस त्या स्वरूपाचं तें एकच पारितोषिक असल्यामुळें व राजा भोज यांच्या नांवानं तें दिलं जात असल्यामुळें एक विशेष सन्मान म्हणून पारितोषिकाला महत्त्व होतं. हें पारितोषिक देवास येथें मुद्दाम दरबार भरवून देण्याची प्रथा होती. त्या वेळचे देवासचे महाराज प्रतिवर्षी गोकुळाष्टमीचा उत्सव फार मोठ्या प्रमाणावर साजरा करीत असत, व या उत्सवाचा भाग म्हणून भोजराज पारितोषिक स्वतः महाराजांच्या हस्तें लेखकाला देण्याच्या समारंभासाठीं दरबार भरत असे. १९३३ च्या गोकुळाष्टमीच्या आधीं सुमारें तीन आठवडे देवास दरबारकडून मला आमंत्रण आलं, कीं "आपल्याला मिळालेलं पारितोषिक घेण्यासाठीं देवासला येऊन दरबारला हजर रहाण्याचें करावें." हें निमंत्रण आल्यावर मी थोडासा पंचाईतींत पडलों, कारण त्या वेळेस कोल्हापूर दरबार आणि देवास यांचे संबंध थोडेसे नाजूक होते. म्हणून मी कोल्हापूरच्या दिवाणसाहेबांस पत्र लिहून विचारलं कीं, "देवास दरबारकडून निमंत्रण आलें आहे. तें स्वीकारण्याची माझी इच्छा आहे. आपली हरकत नाहीं ना ?" 'हरकत नाही' असं त्यांनीं मला कळविलं. देवासचे विक्रमसिंह त्या वेळचे युवराज. (म्हणजे हल्लींचे श्री. छत्रपति शहाजी महाराज) त्या वेळीं इथें राजाराम कॉलेजांत पदवी परीक्षेचा अभ्यास करीत होते. त्यांनाहि मीं विचारलं, "आपल्या राजधानीस मी जाऊं काय ?" "आमची राजधानी एकदां अवश्य पाहून या," असं त्यांनीं उत्तर दिलं. मग मी देवासला गेलों.

देवासला जातांना आणि येतांना इंदूर शहरीं मुक्काम करावा लागतो. यापूर्वी मी इंदूरला कधीं गेलों नव्हतों. त्यामुळें माझ्या मुक्कामाचा फायदा घेऊन इंदूरच्या साहित्यसभेनं माझा सत्कार केला. साहित्य सभेतर्फे माझं जाहीर व्याख्यान झालं. कॉलेजांतहि माझीं व्याख्यानं झालीं. त्यांतलं ख्रिश्चन कॉलेजमधील इंग्रजी व्याख्यान एका लहानशा प्रसंगाच्या निमित्तानं मला आठवतं.

त्या वेळेस त्या कॉलेजचे युरोपियन प्रिन्सिपल कोण होते त्यांचं नांव मला आतां स्मरत नाहीं. परंतु व्याख्यान आटपल्यावर त्यांनीं मला विचारलं, "आपल्या निवासस्थानापर्यंत मी आपल्याला माझ्या मोटारींतून पोहोंचवूं काय?" मी म्हणलं, "माझी हरकत नाहीं, परंतु आपल्याला मोटारीचं भाडं देऊं शकणार नाहीं मी." ते हंसून म्हणाले, "ठीक आहे, मी आपल्याला फुकट नेईन; परंतु आपल्या मजेदार सहवासाबद्दल आपण कांहीं चार्ज करणार नाहीं अशी खात्री मी बाळगूं काय?" मी म्हटलं, "आपल्यासारख्यांना माझा सहवास मोफत देण्यांत मला आनंदच वाटेल. मात्र एक लक्षांत ठेवा, कीं तुम्ही ड्रायव्हिंग कसं काय करतां याची परीक्षा तुमच्या शेजारीं गाडींत बसल्या बसल्या मी कदाचित घेईन." "हरकत नाहीं, हरकत नाहीं." असं म्हणून त्यांनीं माझा हात धरून पायऱ्या उतरून मला आपल्या गाडीकडे नेलं. आमचीं हीं उत्तरं-प्रत्युत्तरं ऐकत घोळका करून उभ्या राहिलेल्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांत मोठा हंशा झाला.

ता. १३ ऑगस्ट रोजीं देवासला मी पोहोंचलों तेव्हां अगदीं संध्याकाळ झाली होती. तेथें राजवाड्यावर माझ्या निवासस्थानीं गेल्यावर महाराजांच्या भेटीसाठीं मी आतुरता दाखवीन अशी तिथल्या मंडळींची कल्पना होती, म्हणून त्याबद्दल ते माझ्याशीं बोलूं लागले. परंतु मी त्यांना सांगितलं कीं, महाराजांची खाजगी भेट हा कांहीं माझ्या येण्याचा हेतु नव्हे, फक्त एवढंच करा कीं मला दोन दिवसांच्या वर इथें राहतां येणार नाहीं एवढं लक्षांत ठेवून पारितोषिकाच्या दरबाराची तयारी करा. मग त्यापैकीं कांहीं निवडक मंडळी जेव्हां माझ्या भोंवतीं उरली तेव्हां त्यांनीं हळूच प्रश्न काढला कीं, "दरबारांत पारितोषिक घेतल्यावर आपण भाषण करणार कीं नाहीं?" मीं म्हटलं, "व्याख्यान या अर्थीं भाषण म्हणत असाल तर नाहीं. पण आभार मानण्यासाठीं चार शब्द मी अर्थातच बोलेन." ती मंडळी जरा पुढें सरकून आवाज हलका करून म्हणाली, "हां, आपण आभार मानणार आहांत ना? त्याबद्दलच आम्हांला कांहीं सूचना करावयाची आहे."

मीं म्हटलं, "सूचनांची कांहीं आवश्यकता नाहीं. आभार कसे मानावयाचे तें मला माहीत आहे."

"नाहीं, तसं नाहीं. पण आपण आभार कोणाकोणाचे मानणार?"

मी म्हटलं, " महाराजांचे. "

" आणखी कोणाचे ? "

पारितोषिक घेतल्यावर आभार मानतांना महाराजांखेरीज आणखी एका व्यक्तीचा निर्देश करण्याचं मी पहिल्यापासून मनाशीं ठरविलं होतं, परंतु तो निर्देश करण्यानं मी एक बॉंब गोळा त्या दरबारांत अकस्मात टाकणार होतों हेंहि मला माहीत होतं. तेव्हां त्याबद्दलची कल्पना या मंडळींना देऊन उपयोगी नव्हती. म्हणून या मंडळींना मी उत्तर दिलं,

" आणखी कुणाचेहि नाहींत. "

त्या सर्व मंडळींनीं मोठं आश्चर्य दाखविलं, व मग त्यांच्यापैकीं एकजण आणखीच माझ्याजवळ सरकून म्हणाला, " छे, छे, असं करून कसं भागेल ? "

मी विचारलं, " कां ? कां नाहीं भागणार ? "

यावर त्या गृहस्थानं मला त्या वेळच्या तेथील दरबारी राजकारणाची समजूत द्यावयास आरंभ केला. महाराजांच्या एक बाई होत्या. त्या बाईंना महाराज स्वतः महाराणीच्या दर्जानं वागवीत व त्यांना दरबारांतही ते स्थान देण्यांत येत असे. प्रजाजनांकडून त्या बाईचा उल्लेख महाराणी म्हणूनच झाला पाहिजे असा कटाक्ष असे. या बाईच्या एका मुलाचं नांव महाराजांनीं ' भोज ' असं ठेवलं होतं, ' भोजराज पारितोषिक ' असं नांव पारितोषिकाला देण्यांत आलं होतं तें अशा हेतूनंच कीं महाराष्ट्रांतल्या लोकांना वाटावं पुरातन कालांतील राजा भोज याच्या नांवानं तें पारितोषिक आहे आणि ज्याला म्हणायचं असेल त्याला हळूच असंहि म्हणतां यावं कीं त्या मुलाच्या नांवानं तें आहे. बाईंना महाराणी म्हटलं जावं असा ज्याप्रमाणं कटाक्ष होता, त्याप्रमाणं या मुलाला युवराज म्हणण्यांत यावं असाहि होता.

या साऱ्या हकीगती सांगून तो गृहस्थ म्हणाला, " आतां आपल्या लक्षांत आलं असेल कीं फक्त महाराजांचे आभार मानून चालणार नाहीं. महाराणीसाहेब व युवराजसाहेब यांचेहि आभार आपल्याला मानले पाहिजेत. "

ती सारी अगदीं मुरलेली दरबारी मंडळी होती. त्यांच्याशीं वाद घालण्यांत अर्थ नव्हता. स्वतःच्या मनाचा थांगहि त्यांना लागू देऊन उपयोगी नव्हता म्हणून मी त्यांना हो हो करून वाटेला लावलं.

दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं दरबार झाला, आणि स्वतः महाराजांनीं भाषण करून पारितोषिकाची थैली माझ्या हातांत दिली. उत्तरादाखल भाषण करतांना साऱ्या महाराष्ट्रांतील लोक या पारितोषिकाला पुरातन कालांतील अत्यंत थोर असा जो राजा भोज त्याच्या नांवाशीं तें निगडित असल्यामुळेंच किती महत्त्व देतात तें सांगून असं हें पारितोषिक मला मिळाल्याबद्दल मी महाराजांचे आभार मानले. पुढें मी काय बोलतो त्याकडे सभेचं विशेष लक्ष होतं. आदल्या दिवशीं ज्यांनीं मला सूचना दिल्या होत्या तीं मंडळी माना पुढें करून कान टवकारून तयार झालेली मला आढळली. मी म्हटलं,

"श्रीमंत महाराजांचे आभार मानल्यानंतर आणखी एका व्यक्तीचा उल्लेख केल्याखेरीज मला भाषण संपवितां येत नाहीं. ती व्यक्ति म्हणजे सध्यां आमच्या कोल्हापुरांत ज्यांचं वास्तव्य आहे ते आपल्या संस्थानचे युवराज विक्रमसिंह महाराज. युवराजमहाराजांचा आणि माझा परिचय आहे. मला हे पारितोषिक मिळालेलं पाहून त्यांना केवढा आनंद झालेला आहे हें मला माहीत आहे. मराठी साहित्याविषयीं जी अभिरुची या पारितोषिकाच्या निमित्तानं महराजांनीं दाखविली तिची परंपरा आपले युवराजमहाराज विक्रमसिंह पुढें चालवतील याबद्दल माझी खात्री आहे!"

हे उद्‌गार त्या वेळच्या देवासच्या दरबारांत एखाद्या आकस्मिक बाँब-प्रमाणें वाटण्यासारखे होते. ही गोष्ट माहीत असूनहि ते उद्‌गार मी काढले होते. कारण युवराज महाराज विक्रमसिंह यांच्याबद्दल माझ्या भावना खरो-खरच कौतुकास्पद होत्या.

अर्थात् ते उद्‌गार काढून मी आपल्या जागेवर बसलों, व सभोंवार दृष्टि टाकली. सभेंतल्या सगळ्या लोकांचीं तोंडं उतरलेलीं व भयभीत झालेलीं मला दिसलीं. विक्रमसिंह देवासच्या गादीवर न येतां त्या बाईचा तो मुलगा यावा अशी त्या वेळेस खटपट चालू होती; आणि मी तर विक्रमसिंहांचा उल्लेख देवासची परंपरा पुढें चालविणारे युवराज म्हणून

चक्क केला होता ! ‘ या गृहस्थानं ही काय भलतीच गोष्ट केली ? ’ अशा आविर्भावानं सभेंतला जो तो इसम माझ्याकडे पाहूं लागला. महाराज माझ्यावर फार रागावतील– कदाचित् मला गिरफदारहि करून टाकतील– असं त्यांना वाटलं असेल. सारी सभा अगदीं गुपचूप झाली होती. अशा त्या विलक्षण स्तब्धतेंत एक दोन मिनिटें गेलीं असतील. आणि नंतर त्या सर्व लोकांच्या दृष्टीनं एक मोठा चमत्कार घडला ! महाराज आपल्या आसनावरून उठले, माझ्याजवळ आले आणि माझं हस्तांदोलन करून मोठ्यांदा हंसून इंग्रजींत म्हणाले, “ फार सुंदर भाषण केलंत तुम्ही ! ”

दुसऱ्या दिवशीं मला निरोप आला कीं खास भेटीसाठीं महाराजांनीं आपल्याला बोलावलं आहे. महाराजांच्याबद्दल अनेक गोष्टी मीं ऐकल्या होत्या. त्यामुळें भेटींत काय काय संभाषण होणार याचे मनाशीं अनेक तर्क करीतच गेलों. फार वेळ संभाषण होईल किंवा तें मला सुखाचें होईल अशी माझी कल्पना नव्हती. परंतु अनुभव निराळा आला. मी त्यांच्यापुढें जाताच महाराजांनीं मला मिठी मारली. भेटीच्या या प्रकाराचा मला अनुभव नव्हता. नंतर महाराज इंग्रजींत बोलूं लागले, व आमच्या संभाषणांत अनेक विषय सहजासहजीं आले. माझ्या मनाशीं दोन गोष्टी मी ताबडतोब कबूल केल्या. एक ही, कीं महाराजांचे दोष कांहींहि असोत, पण त्यांच्या अंगीं संभाषणचातुर्य फार होतं; आणि दुसरी गोष्ट ही कीं ते बहुश्रुत होते व त्याचं इंग्रजी भाषेवर चांगलं प्रभुत्व होतं. मात्र एकीकडे या गुणांबद्दल मनांतून त्यांची तारीफ करीत असतांना व संभाषणाचा आनंद घेत असतांना मला भीति वाटत होती ती ही, कीं कोल्हापूरच्या राजकारणाचा विषय महाराज काढतात कीं काय. परंतु तसं कांहीं घडलं नाहीं. चहा वगैरे आटोपला. आणखीहि थोडं संभाषण झालं. आतां महाराजांचा निरोप घ्यायला कांहीं हरकत नाहीं असं मी मनाशीं म्हणूं लागलों आणि तितक्यांत—

महाराजांनीं मला हंसत विचारलं, “ आमचा बाळ कसा आहे ? ” ( युवराज विक्रमसिंह यांना ते बाळ म्हणत असत. )

तो प्रश्न ऐकतांच मी चमकलों. मनांत आलं, जें नको तें राजकारण शेवटीं आलंच म्हणायचं ! परंतु जें वाटतं तें बोलायचं हें ब्रीद मी सोडणार

नव्हतोंच. मी उत्तर दिलं, "फार चांगले आहेत. मला ते फार आवडतात."

महाराज हंसले व त्यांनीं मला विचारलं, "बाळला माझा एक निरोप सांगाल काय?"

आतां राजकारण स्पष्टच निघणार, मी मनाशीं म्हटलं. मी उघड उत्तर दिलं, "आनंदानं सांगेन."

महाराज म्हणाले, "त्याला सांगा, इकडे देवासला ये कीं! तिकडे कोल्हापूरला कशाला राहतोस? सांगाल काय?"

मी म्हटलं, "सांगेन ना" आणि त्यांना अखेरचा प्रणाम केला.

दारापर्यंत मला पोंचविल्यावर हस्तांदोलन करून त्यांनीं मला पुन्हां बजावलं, "बाळला आमचा निरोप सांगा, बरं काय!"

मला मनांतल्या मनांत हंसू आल्यावांचून राहिलं नाहीं. कारण युवराज विक्रमसिंह यांचं एकाएकीं देवास सोडून निघून येणं, त्यांचं इथें कोल्हापुरास रहाणं इत्यादि घटनांमागें राजकारणाचे केवढे मोठे डाव होते, आणि विक्रमसिंह देवासला महाराजांकडे सुखासुखी परत जाणं ही गोष्ट किती दुर्घट होती, याबद्दलच्या हकीगती मी ऐकल्या होत्या. आणि तरी महाराजांनीं 'बाळला म्हणावं देवासला परत ये' असा निरोप माझ्याजवळ दिला होता तो अशा आविर्भावानं कीं जणू ही गोष्ट अगदीं साधीसुधी आणि सोपी होती! आणि मीहि निरोप सांगण्याचं कबूल केलं होतं तें अशा आविर्भावानें कीं जणूं विक्रमसिंहांना मी आग्रह करण्याचा अवकाश कीं लगेच ते देवासला जातील! महाराज उघड उघड माझ्याशीं बोलण्याचा एक खेळ खेळले होते! आणि मीहि तो खेळ खेळण्यांत हार गेलों नव्हतों! मला सारखं मनाशीं हंसू येत होतं!

—आणि कोल्हापूरला परत आल्यावर युवराज विक्रमसिंह यांना मी सर्व हकीगत सांगितली तेव्हां तेहि मोठमोठ्यांदा हंसू लागले!

♠ ♠

: : ५५ : :

१९३२ सालच्या डिसेंबर महिन्यांत राजाराम कॉलेजच्या वार्षिक संमेलनानिमित्त झालेल्या ' मायेचा पूत ' या नाटकाच्या प्रयोगाबद्दल आठवणी सांगतांना मी असं लिहिलं होतं कीं, " कॉलेजच्या विद्यार्थ्यांबरोबर नाटकांतील मुख्य भूमिका मी केली तेव्हां त्या प्रयोगाची यशस्विता पाहून ज्यांत विद्यार्थी आणि प्रोफेसर मिळून काम करतील असे नाट्यप्रयोग वारंवार व्हावेत अशी इच्छा पुष्कळांनीं व्यक्त केली. ' मायेचा पूत ' नाटकाचा तो प्रयोग सर्वांना अतिशय आवडल्यामुळें पुढें माझ्या नेतृत्वाखालीं राजाराम कॉलेजांत अशी एक संस्था स्थापन झाली कीं जी त्या वेळी अभूतपूर्व समजली गेली, व जिचं अनुकरण इलाख्यांतल्या कित्येक कॉलेजांत करण्यात आलं. "

संगीत, नाट्य, अशा कलांना वाहिलेलं एक मंडळ असावं ही कल्पना जरी त्या वेळीं सर्वांना पसंत पडली तरी तिला मूर्त स्वरूप यायला दीड वर्ष लागलं. या बाबतींत लेखनाच्या व्यापांत आणि इतर उद्योगांत गुंतलों होतों. तथापि अशा प्रकारचं एक कला-मंडळ कॉलेजांत स्थापण्याचं माझ्या मनानं घेतलं असल्यामुळें त्याची पूर्वतयारी म्हणून कोणकोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत त्याबद्दलचा विचार मीं करीतच होतों. माझी कल्पना अशी होती, कीं या मंडळाची वार्षिक वर्गणी माफक असली पाहिजे. कारण कॉलेजांतील शक्य

तितक्या अधिक विद्यार्थ्यांची ही संस्था म्हणतां यावी अशी माझी इच्छा होती. आणि एवढ्या अल्प वर्गणींत सभासदांना वर्षांतून एक उत्तम नाट्य-प्रयोग, तीन अथवा चार पहिल्या दर्जाच्या कलावंतांचीं गाणीं आणि निदान दोन तरी उपयुक्त व्याख्यानं, असा भरगच्च कार्यक्रम दिला पाहिजे. ही कल्पना त्या वेळचे प्रिन्सिपल डॉ. बाळकृष्ण यांना अतिशय पसंत पडली व त्यांनीं मला सर्वतोपरी पाठिंबा दिला. माझे विद्यार्थी सर्व प्रकारची खटपट करावयास उत्सुक होतेच, आणि लागोपाठ तीन वर्षं त्यांनीं व मी मिळून कॉलेजच्या गॅदरिंगच्या वेळचे नाट्यप्रयोग केल्यामुळें त्यांना अभिनयाचं शिक्षण ज्याप्रमाणें मिळालं होतं त्याप्रमाणें नाट्यप्रयोगाची व्यवस्था कशी राखावी याच्या अनुभवांतहि त्यांपैकीं कांहींजण तरबेज झाले होते. अशा प्रकारचं मंडळ आम्ही काढणार ही बातमी पुष्कळ दिवस वातावरणांत होती, आणि तें प्रत्यक्ष केव्हां निघतं याकडे कॉलेजांतील विद्यार्थ्यांचं लक्ष लागलेलं होतं. माझा एक कटाक्ष असा होता की, निदान एका सबंध वर्षाचा कार्यक्रम स्थूलमाननं निश्चित झाल्याखेरीज मंडळाची स्थापना करावयाची नाहीं. कॉलेजांतलीं वाङ्मय-मंडळं किंवा त्यासारखींच दुसरीं मंडळं रडतकढत कशींबशीं चालतात याचं मुख्य कारण हें कीं त्या मंडळाच्या पाठीशीं एक कुणी तरी लायक व्यक्ति असावी लागते ती बहुधा नसते, आणि दूरदृष्टि ठेवून सबंध वर्षाचे कार्यक्रम योजनाबद्ध रीतीनं आगाऊ आंखण्याची खटपट होत नाहीं. यामुळें असल्या मंडळाचा प्रारंभींचा एखादा कार्यक्रम होतो आणि नंतर आतां पुढचा कार्यक्रम कोणता करावा या विवंचनेंत कार्यकर्ते पडून जिकडे तिकडे सामसूम होतं. आमच्या नव्या मंडळाची अशी स्थिति मला होऊं द्यायची नव्हती. मुख्यतः याच कारणानं अशा मंडळाची कल्पना जरी १९३२ च्या डिसेंबरमध्येंच पुढें आली होती तरी ती दीर्घकाल कल्पनाच राहिली होती.

परंतु अखेर मला हवी तशी आणि तितकी तयारी झाली आणि १९३४ च्या जुलै महिन्यांत 'दि राजाराम कॉलेज म्युझिकल अँड थिऑट्रिकल असोसिएशन' या नांवानं ही नवी संस्था स्थापन झाली; आणि संस्थेचा पहिला कार्यक्रम ता. ८ ऑगस्ट रोजीं रात्रीं झाला. कार्यक्रमासाठीं हिराबाई बडोदेकर यांना निमंत्रण केलं होतं, आणि कार्यक्रम

कल्पनेपलीकडे यशस्वी झाला. डॉ. बाळकृष्ण यांनीं लहानसं भाषण केलं यांत अशा संस्थेच्या आवश्यकतेविषयीं चार शब्द सांगून संस्थेचं स्वागत केलं, आणि हिराबाईंचे आभार मानले. त्यांच्या गायनावर ते विलक्षणच खूष झाले होते. त्या वेळी हिराबाई ऐन जोसांत होत्या, आणि ' राधेकृष्ण बोल मुखसे ' हें त्यांचं भजन त्यांच्या संग्रहांतल्या अगदीं रामबाण हत्यारां-पैकीं एक होतं. तें भजन चालूं असतांना डॉ. बाळकृष्ण यांचे डोळे आसवांनीं ओले झालेले मीं पाहिले होते; आणि हा जो परिणाम त्यांच्या अंतःकरणावर झालेला होता तोच त्यांनीं भाषणांत व्यक्त केल्यामुळें त्यांचं भाषण अतिशय समयोचित आणि हृदयस्पर्शी झालं.

आमच्या या नव्या संस्थेचा पहिला कार्यक्रम भरपूर यशस्वी झाल्यामुळें पुढचेहि कार्यक्रम तितकेच सुंदर वठविण्याची ईर्षा आमच्यांत निर्माण झाली, आणि अल्पावकाशांत आमची ही नवी संस्था कॉलेजच्या विद्यार्थ्यांतच नव्हे तर कोल्हापूरच्या नागरिकांतहि फार लोकप्रिय झाली. आमचा कोणचाहि कार्यक्रम असला कीं शहरांतले अनेक वकील, डॉक्टर्स, ऑफिसर्स मुद्दाम पाहुण्यांचीं तिकिटं काढून येत असत. नंतरच्या तीन वर्षांत विद्यार्थ्यांना व नागरिकांना आम्ही परिश्रमपूर्वक बसविलेले उत्तम नाट्यप्रयोग तर सादर केलेच, व्याख्यानंहि ऐकविलीं, पण शिवाय ज्यांचीं गाणीं एरवीं विद्यार्थ्यांना ऐकावयास मिळण्याची आशाच करतां आली नसती अशा अनेक नामांकित कलावंतांचे कार्यक्रम आम्ही अतिशय टापटिपीनं व व्यवस्थित रीतीनं पार पाडले. अबदुल करीम खांसाहेब, मास्तर कृष्णराव, सवाई गंधर्व, लक्ष्मीबाई बडोदेकर, पद्मावती शाळीग्राम, पटवर्धनबुवा, वझेबुवा, सुरेशबाबू, पंडितराव नगरकर अशा किती तरी नामांकित मंडळींची हजेरी आमच्या मंडळातर्फे कॉलेजांत लागली. प्रत्येक कार्यक्रम त्याला साजेशा थाटांत पण शिस्तींत आणि सुसूत्र रीतीनं पार पाडण्यांत माझे विद्यार्थी पटाईत झाले होते. या संस्थेइतकी दुसरी कोणतीहि संस्था त्या वेळेस लोकप्रिय नव्हती.

परंतु संस्थेची लोकप्रियता म्हणजे पर्यायानं माझी लोकप्रियता होती. आणि ही गोष्ट ज्यांना सहन होण्यासारखी नव्हती असे कांहीं आत्मे होतेच. त्यांनीं हलके हलके कोल्हेकुई करावयास आरंभ केला. आमच्या मंडळाच्या कार्यक्रमांची कीर्ति पुण्या–मुंबईपर्यंत पोंचली होती, आणि त्यासारखीं मंडळं

तिकडल्या कॉलेजांतहि निघूं लागलीं होतीं. १९३५ च्या ऑक्टोबर महिन्यांत ' प्रतिभा ' मासिकाचे संपादक श्रीयुत हरिभाऊ मोटे यांनीं एका पत्रांत मला लिहिलं होतं, " ... मी कोल्हापुरास येत आहे तो मुख्यतः तुम्ही राजाराम कॉलेजांत क्रिकेट—टेनिससारखे खेळ व संगीत नाट्य अशा-सारख्या कला या बाबतींत जो प्रचंड उत्साह निर्माण केला आहे आणि विद्यार्थ्यांत मिळूनमिसळून जे कौतुकास्पद उद्योग चालविले आहेत ते सारे डोळ्यांनीं पाहण्यासाठीं... " परंतु ज्या उद्योगाविषयीं लांबलांबच्या मंडळींना कुतूहल आणि कौतुक वाटत होतं त्यांचं कोल्हापूरच्या कांहीं लोकांना वैषम्य वाटत होतं; आणि आमच्या उपक्रमाचं स्वरूप विकृत करून दाखविणं कांहीं अवघड नव्हतं. प्रो. फडके विद्यार्थ्यांत नाटकीपणा आणि छचोरपणा पसरवीत आहेत, असा प्रचार त्यांनीं सुरू केला. विद्यार्थ्यांची नीति बिघडत आहे, अशीहि ओरड ते करूं लागले. या बाबतींत प्रो. फडके यांच्या उद्योगांना आळा घातला पाहिजे अशा तक्रारी प्रिन्सिपलकडे व वरिष्ठ अधिकाऱ्यांकडेहि नेणं त्यांना कांहीं अवघड नव्हतं. या लोकांना डॉ. बाळकृष्ण यांनीं उत्तर दिलं, " विद्यार्थ्यांची नीति सुरक्षित आहे कीं नाहीं हें तुमच्या-पेक्षां मला अधिक कळतं. विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं विद्येची लालसा उत्पन्न करण्याचं काम प्रो. फडके यांच्याइतक्या चोख रीतीनें दुसरा कोणता प्रोफेसर करीत आहे तें मला सांगा. मर्दानी खेळांची आवड विद्यार्थ्यांत वाढावी यासाठीं आणि या खेळांत कॉलेजचं नांव अग्रेसर रहावं यासाठीं प्रो. फडके यांनीं किती परिश्रम केले आहेत तें मला माहीत आहे. तेव्हा तुमच्या या तक्रारींत कांहीं अर्थ नाहीं. प्रो. फडके यांच्या संगीत नाट्य-मंडळामुळें विद्यार्थ्यांच्या मनावर कोणतेहि अहितकारक संस्कार होणार नाहींत अशी माझी खात्री आहे. " अशा प्रकारें डॉ. बाळकृष्णांनीं उत्तर दिल्यामुळें त्यांच्याकरवीं आमच्या संगीत-नाट्य-मंडळाला पायबंद घालण्याची या लोकांना आशा उरली नाहीं. मग अर्थातच त्यांनीं स्थानिक वृत्तपत्रांत माझ्यावर आणि डॉ. बाळकृष्ण यांच्यावर दोघांवरहि मूर्ख गलिच्छ टीका सुरू केली.

परंतु डॉ. बाळकृष्ण भक्कम होते ! त्यांनीं संगीत-नाट्य-मंडळाचा पाय मागं ओढण्याचं तर मनांत आणलं नाहींच, परंतु माझ्या प्रत्येक नवीन

कल्पनेचा तत्परतेनं पुरस्कार केला. त्यामुळें आमच्या हितशत्रूंना आणि तथाकथित संस्कृतिरक्षकांना भलताच धक्का बसावा असा एक कार्यक्रम मी ठरविला आणि यशस्वी करून दाखविला.

तो कार्यक्रम म्हणजे अझुरी या नर्तिकेचा नाच, आणि तिचं व्याख्यान !

हा कार्यक्रम जाहीर झाल्याबरोबर टीकाकार अर्थातच म्हणाले कीं, ' आतां राजाराम कॉलेजचं पॅलेस थिएटर झालं हं ! ' ही कुत्सित टीका करणाऱ्यांत माझे कांहीं सहकारी प्रोफेसरहि होते. ती मंडळी अजूनहि आहेत, व त्यांना ती आठवताहि असेल. त्यांना माझी वाढती लोकप्रियता बघवत नव्हती हेंच या टीकेचं खरं उगमस्थान होतं. परंतु ते बोटं मोडण्यापलीकडे काय करूं शकत होते ? डॉ. बाळकृष्ण यांना अझुरीसारख्या एका कलासंपन्न स्त्रीला कॉलेजांत निमंत्रण धाडून बोलवावं यांत कांहीं वावगं दिसत नव्हतं. त्यामुळें मी निर्धास्त होतों. अझुरीला निमंत्रण देतांच तिनें तें आनंदानं मान्य केलं व आमच्या कॉलेजांत तिचा कार्यक्रम झाला !

आणि मुद्दाम सांगण्यासारखी गोष्ट अशी कीं, या नर्तिकेनं इंग्रजी भाषेंत सुमारें दीड तास जें अत्यंत सप्रयोग व्याख्यान दिलं तें ऐकून सारेच लोक चकित झाले ! जन्मांत दिलेलं हें तिचं व्याख्यान होतं. तें इतकं सुंदर कसं वठलं ती एक मनोरंजक हकीगत आहे.

♠ ♠

## :: ५६ ::

सौंदर्याचीं ठरीव लक्षणं अंगीं नसतांना केवळ व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावानं एखादं माणूस आकर्षक कसं वाटतं त्याचं अझुरी एक नमुनेदार उदाहरण म्हणावं लागेल, असं तिला प्रथम मी भेटलों त्या वेळेस माझ्या मनांत आलं. ती मूळची मलबारकडील, आणि मला वाटतं धर्मानं ख्रिश्चन आहे. अंगीं लावण्य ज्याला म्हणायचं तें लेशभरसुद्धां नाहीं. मध्यम उंचीची, अगदीं काळी नव्हे पण उजळसुद्धां नाहीं अशा वर्णाची, साध्या बांध्याची, गोबऱ्या नाकाची अशा या स्त्रीला प्रथम पाहिल्याबरोबर मला वाटलं, जिचं नांव आज बरेच दिवस ऐकत होतों. तीच का ही अझुरी ! तिचा वेषहि अगदीं साधा होता. तिचे डोळे मात्र मला तेजस्वी आणि विशेष चांगले वाटले; आणि तिच्या जाडसर ओठांची ठेवण जरी सौंदर्याच्या सदरांत मुळींच पडण्यासारखी नव्हती तरी नृत्याच्या वेळच्या अभिनयाला ती पोषक होत असली पाहिजे असं माझ्या मनांत आलं. तिनं माझं स्वागत केलं आणि मोठ्या अदबीनं आणि अगत्यानं अस्खलित इंग्रजीमध्यें ती माझ्याशीं संभाषण करूं लागली, तेव्हां अल्पावकाशांतच माझी खात्री झाली कीं ती फार हुषार असली पाहिजे. नृत्यकलेविषयीं मी कांहीं प्रश्न विचारले तेव्हां त्यांचीं उत्तरं देतांना ती आवेशानं बोलत होती. मात्र त्यांत नाटकीपणा यत्किंचितहि नव्हता. त्या तिच्या बोलण्यावरून दोन गोष्टी

माझ्या लक्षांत आल्या. एक, तिला नृत्यकलेचं अगदीं जन्मजातं वेड असलं पाहिजे आणि दुसरी जें कांहीं ती करते त्याबद्दल तिनं आपल्या मनाशीं नीट विचार केला असला पाहिजे. ती म्हणाली,

" प्रोफेसर, तुमच्या कॉलेजांत येऊन सप्रयोग व्याख्यान द्यायचं मी कबूल केलं खरं, परंतु आजपर्यंत नृत्य या विषयावर मी कधींहि व्याख्यान दिलेलं नाहीं. तुम्ही मला पंचाइतींत टाकलं आहे. "

मी म्हटलं, " त्यांत कसली पंचाईत वाटते तुम्हांला ? आतां माझ्याशीं किती छान बोलतां आहांत तुम्ही. "

ती म्हणाली, " छे, छे, अस कसं ? व्याख्यान द्यायचं म्हणजे सारं कांहीं व्यवस्थित झालं पाहिजे. तुमचे प्रिन्सिपल येणार, प्रोफेसर मंडळी येणार. त्यांच्यापुढें मी काय मनाला वाटेल तें भरकटत सुटूं ? छे, छे, तशानं भागायचं नाहीं. मला माझं भाषण लिहून काढलं पाहिजे, माझ्या मॅनेजर-कडून तें मला नीट टाईप करून घेतलं पाहिजे, आणि तें बिनचूक वाचून दाखविलं पाहिजे ना. अन् आतां इतकं करायला वेळ कुठें आहे ? छे, छे, मी तुमचं आमंत्रण कोठून स्वीकारलं असं मला झालं आहे. हा कार्यक्रम रद्द नाहीं का करतां येणार तुम्हांला ? सांगा मी थोडीशी आजारी आहे म्हणून. "

मी म्हटलं, " छे छे, तें शक्य नाहीं. तुम्हांला उद्यां संध्याकाळीं कॉलेजांत सप्रयोग व्याख्यान दिलंच पाहिजे."

" हाय रे देवा ! " ती म्हणाली, " आज रात्रीं माझा नृत्याचा कार्यक्रम आहे. आज झोपायला मला पहाटेचे तीन वाजणार. उद्यां सकाळीं नऊ वाजतां उठणार मी. आणि पुन्हा थिएटरवर कार्यक्रम आहे. या धांदलीनं मी वेळ कसा काढूं व्याख्यानाच्या तयारीला ? "

मी तिला म्हटलं, " माझा सल्ला तुम्ही ऐकाल काय ? "

" काय ? "

" तुम्ही व्याख्यानाची बिलकूल तयारी करूं नका. "

" छे छे छे ! मी नाहीं ऐकणार हा सल्ला. माझी फजिती व्हावी अशी

तुमची इच्छा आहे होय ? काय वाटेल तें करून व्याख्यान लिहून काढून व्यवस्थित तयारी केलीच पाहिजे मला. ”

“ जशी तुमची इच्छा ! ” असं म्हणून मी तिचा निरोप घेऊं लागलों.

“ रात्रीं माझ्या थिएटरमधल्या कार्यक्रमाला येणार ना तुम्ही ? ” तिनं विचारलं.

“ येणार तर ! ” असं आश्वासन देऊन मी तिथून निघालों.

रात्रीं तिचा नृत्याचा कार्यक्रम पाहिला तेव्हां माझा थोडासा विरस झाला. तिनं जीं नृत्यं केलीं त्यांना अस्सल हिंदी नृत्याचे प्रकार म्हणणं कठीण वाटलं मला. तिचीं नृत्यं आकर्षक होतीं. अर्थपूर्ण होतीं. त्यांत अभिनयाचं कसब भरपूर होतं. तथापि देशी-परदेशी मालाचं तें एक चमत्कारिक मिश्रण होतं. तिनं साथीला जीं वाद्यं ठेवलीं होतीं तीं पाहिल्याबरोबरच मला त्यांचा चमत्कार वाटला होता. ब्युगल, ट्रम्पेट, मॅंडोलिन असलीं वाद्यं होतीं तीं; आणि एखाद्या सर्कसमधला बॅंड वाजावा तशा प्रकारचं तें वृंदवादन वाटत होतं. भरत–नाट्य–शास्त्रांत सांगितलेलीं नृत्याचीं लक्षणं अथवा त्याचे नियम यांचा तिनं विशेष अभ्यास केलेला मला दिसला नाहीं. अस्सल हिंदी नृत्यांत नर्तकानं अथवा नर्तिकेनं तालाचे विविध प्रकार पदाघातांनीं काढण्याची जी शास्त्रशुद्ध कुशलता आणि तयारी दिसावीच लागते. ती अझुरीच्या नृत्य-प्रकारांत मला दिसली नाहीं. तिचीं नृत्यं पाहतांना मला सारखं वाटत होतं हिनं शिस्तवार शिक्षण घेतलेलं नाहीं. थोड्याशा शिक्षणाच्या सहाय्यानें आपली कल्पकता आणि हुषारी यांवर ही सारी खटपट हिनं बसविली आहे. मात्र तिच्या पदन्यासांत आणि हालचालींत लय होती, लालित्यहि होतं, आणि अर्थपूर्णता तर कमालीची होती. तिचा कार्यक्रम मला आवडला, पण एखाद्या अनौरस संततीसारखा तिच्या नृत्याचा सर्व प्रकार मला वाटला. हिंदी संगीताला अमेरिकन ‘ जॅझ ’ किंवा ‘ रंबा ’ संगीताचा डूब देऊन ज्याप्रमाणें ‘ फिल्मी गाना ’ नांवाची एक चमत्कारिक अवलाद निर्माण होत आहे त्याप्रमाणें आमच्या हिंदी नृत्यावर विलायती नृत्याचं कलम करून धड ना हिंदी धड ना विलायती असलं बाटगं नृत्य आतां जिकडे तिकडे पसरू लागणार म्हणायचं, असा विचार माझ्या मनांत सारखा येऊं लागला.

परंतु थिएटरमधून परततांना मी अझुरीचे आभार मानले. " कसा काय, आवडला माझा कार्यक्रम ? " असा प्रश्न जेव्हां तिनं मला केला तेव्हां मीं म्हटलं, " माझी फार करमणूक झाली. "

दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं तिचं कॉलेजांत व्याख्यान होतं. मी दुपारीं दोन वाजतां तिला जाऊन भेटलों व विचारलं, " व्याख्यानाची तयारी ठीक आहे कीं नाहीं ? " तेव्हां ती म्हणाली, " तयारी करीतच बसलें आहे, बघाना. " तिच्या हातांत दहा-बारा टाईप केलेले कागद होते.

संध्याकाळीं ठरलेल्या वेळेस ती व तिचे साथीदार राजाराम कॉलेजच्या हॉलमध्यें येऊन दाखल झाले. हॉलमध्यें खूप गर्दी झाली होती. डॉ. बाळकृष्ण नेहमींप्रमाणें पुढच्या रांगेंतल्या पहिल्या खुर्चीवर बसले होते. " आतां राजाराम कॉलेजचं पॅलेस थिएटर होणार हं " अशी ज्यांनीं कुत्सित टीका केलेली मला माहीत होती ती प्रोफेसर मंडळीदेखील खुर्च्या पटकावून बसलेली होती. मी माझं प्रास्ताविक भाषण दोन-चार मिनिटांत आटपलं, आणि व्याख्यानाला प्रारंभ करण्याची अझुरीला विनंति केली. ती व्यासपीठावर चढली, आणि हातांतल्या कागदांवरून व्याख्यान वाचण्यास तिनं प्रारंभ केला. परंतु तें वाचणं कांहीं केल्या तिला जमेना. आदल्या दिवशीं रात्रीं ज्या तिनं माझ्याशीं अस्खलित इंग्रजींत किती तरी वेळ संभाषण केलं होतं ती आतां वाचतांना पदोपदीं अडखळूं लागली. टाईप केलेली ती प्रत स्वच्छहि नव्हती आणि शुद्धहि नव्हती, त्यामुळें चार-पांच शब्द वाचावे, पुढचा शब्द लागेनासा झाला कीं अं अं असं करावं, आणि मग पुढचे तीन-चार शब्द वाचून पुन्हां अडावं, अशा प्रकारें तिचं तें व्याख्यान ( ! ) होऊं लागलं. वाचण्याच्या त्या श्रमानं—किंवा त्याहूनहि अधिक अंशानं आपलं हें सारं काम बारगळतं आहे या जाणीवेनं ती घामाघूम झाली. आणि एकीकडे रुमालानं घाम पुसणं, आणि दुसरीकडे हातांतल्या कागदावरचा मजकूर लावून वाचणं ही कसरत तिला फारच कठीण वाटूं लागली. आम्हां प्रेक्षकांकडे बघण्याचं तिनं अजिबात सोडून दिलं. एखाद्या भेदरलेल्या विद्यार्थ्यानं पुस्तकांतला धडा कसाबसा ट ट प प करीत वाचावा तसा तो सारा प्रकार दिसूं लागला. मी मनातल्या मनांत अगदीं शरमून गेलों. हा कार्यक्रम बारगळला तर त्यांत अझुरीपेक्षां माझी

अधिक फजिती होणार होती. मी अगदीं अस्वस्थ झालों; आणि अखेर मला जेव्हां रहावेना तेव्हां युक्तायुक्ततेचा विचार पार झुगारून देऊन मी खुर्चीवरून उठलों व व्यासपीठावर चढलों, अझुरीच्या कानांत मीं म्हटलं, " तुमचं हें सारं चुकतं आहे. हातांतले कागद अजिबात फेकून द्या. आणि काल ज्याप्रमाणें माझ्याशीं बोललांत त्याप्रमाणें जसं सुचेल तसं बोलत सुटा. कृपा करून माझं ऐका. " हें तिला सांगतांना मला मनांतल्या मनांत भीति वाटत होती, कीं हिनं माझं ऐकलं नाहीं तर काय करायचं कलावंत मोठे हट्टी असतात. दुसऱ्याचं शहाणपण घेणं त्यांना कमीपणाचं वाटतं. आमच्या कॉलेजांत या आमच्या मंडळातर्फेंच अबदुल करीम खांसाहेबाचं गाणं झालं तेव्हां त्यांनीं प्रारंभीं ' शुद्ध कल्याण ' गाण्यास आरंभ केला होता, आणि ठाय लयींतली चीज तब्बल तासभर म्हटली तरी द्रुत लयींतली चीज ते सुरू करतील असं लक्षण दिसेना. त्या वेळीं मी हळूच त्यांच्या कानात सांगितलं होतं, " खांसाहेब, आतां दुसरी चीज सुरू करा. हे विद्यार्थी आहेत. यांना अस्सल गाण्याची गोडी कमी आहे. " तेव्हां त्यांनीं धुंद नजरेनं उत्तर दिलं होतं, " हां हां, पण त्यांना तरी सुराची चैन कधीं कळायची " आणि आणखी पंधरा-वीस मिनिटं आपल्याच धुंदीत ते सुरांशीं खेळत राहिले होते. या प्रसंगाची मला आठवण झाली व मी तिला अगदीं काकुळतीनं म्हटलं, " कृपा करूनं माझं ऐका. " ती हंसली, आणि तिनं कागद माझ्या हातीं दिले, तेव्हां मला आनंद झाला.

—आणि तिनं एकदां साऱ्या सभेकडे पाहिलं आणि " हें पहा आपलं सारं जिवित आणि सारी सृष्टि वास्तविक नृत्यानं भरलेली आहे, " अशा प्रकारें आरंभ करून जेव्हां ती बोलूं लागली, तेव्हां सभेचा नूर एकदम बदलला. त्यानंतर अगदीं अस्खलित इंग्रजींत जेव्हां ती आपला सिद्धान्त परोपरीचीं उदाहरण देऊन विशद करूं लागली तेव्हां तर एखादा कसलेला वक्ता काय बोलेल अशा थाटानं आणि आत्मविश्वासानं ती सारखी बोलत राहिली. व्याख्यानाला रंगत चढलेली तिची तिला कळल्याबरोबर तिनं मधून मधून नृत्य करून दाखवायला सुरुवात केली. तिनं आपल्या नृत्यांतल्या साथीदाराला खूण करून समोर उभं रहायला सांगितलं, वादकाला इशारा देऊन संगीत सुरू करविलं, व आमच्याकडे पाहून ती म्हणाली, " मी राधा

आहे, आणि हा समोर माझ्यापुढें कृष्ण उभा आहे! तो मला जवळ बोलावतो आहे. पण मी काय म्हणून जवळ जाईन? मी त्याच्यावर रागावलें आहे." आणि मग तिनं तो सबंध प्रसंग सुंदर नृत्यानं वर्तविला. अशा प्रकारे ती बोलूं लागल्यावर किती बोलूं आणि किती बोलूं नको असं तिला होऊन गेलं, व किती ऐकूं व किती नको असं साऱ्या श्रोत्यांना होऊन गेलं. अखेर मलाच तिला इशारा द्यावा लागला, कीं रात्रीं तुमचा थिएटरवर प्रोग्रॅम आहे, मग तिनं भाषण संपविलं, तेव्हां टाळ्यांचा कडकडाट झाला!

अझुरीचं हें व्याख्यान इतकं गाजलं कीं, दुसरे दिवशीं इथल्या लॉ कॉलेजांतले विद्यार्थी त्या वेळचे त्या कॉलेजचे प्रिन्सिपल केळकर यांची परवानगी घेऊन तिला व्याख्यानाचं आमंत्रण द्यायला आले. तिथलंहि तिचं व्याख्यान उत्कृष्ट वठलं. त्या व्याख्यानानंतर ती मला म्हणाली, "आतां ही नवी चटक तुम्ही मला लावलीत!" मीं म्हटलं, "त्याबद्दल मला मुळींच पश्चात्ताप होत नाही."

: : ५७ : :

आमच्या म्यूझिकल अँड थिएट्रिकल असोसिएशनतर्फें झालेल्या अनेक कार्यक्रमांपैकीं अझुरीच्या समयोग व्याख्यानाची आठवण जशी एका दृष्टीनं सांगण्यासारखी तशीच दुसऱ्या एका दृष्टीनं पण तितकीच सांगण्यासारखी आठवण म्हणजे श्री. बालगंधर्व यांच्या व्याख्यानाची.

१९३४ सालीं नोव्हेंबर महिन्याच्या सुमारास श्री. बालगंधर्व नाट्य-व्यवसायांतून निवृत्त होणार आणि प्रभात फिल्म कंपनींत एका चित्रपटांत काम करण्यासाठीं दाखल होणार ही गोष्ट निश्चित झाली व त्याबद्दलची जाहिरात साहजिकपणेंच फार मोठ्या प्रमाणावर करण्यांत आली. आमच्या संगीत-नाट्य-मंडळातर्फे त्यांचा सत्कार करावा अशी सूचना पुष्कळांनीं केल्यावरून श्री. बालगंधर्व यांना मीं आमंत्रण दिलं व तें तावडतोब त्यांनीं मान्य केलं.

हा सत्कार—समारंभ आमच्या विद्यार्थ्यांनीं फार थाटांत पार पाडला. माझं प्रास्ताविक भाषण मीं थोडक्यांत आटपलं. नंतर विद्यार्थ्यांचीं व इतरांचीं चार-पांच भाषणं झालीं. श्री. बालगंधर्व यांना हार-तुरे अर्पण करण्यांत आले, आणि मग उत्तरादाखल भाषण करण्यासाठीं ते उभे राहिले. एक साधी हाफ पँट, साधा बिन कॉलरचा शर्ट, गुळगुळीत

हजामत केलेल्या डोक्यावर खादीची टोपी, अशा वेषांत त्यांना पाहिल्या-बरोबर ‘ एवढा थोर कलावंत, पण किती हो साधा ’ असा विचार सभेंतल्या सर्व लोकांच्या मनांत आला असल्यास नवल नाहीं. माझ्या मनांत मात्र तो विचार येणं शक्य नव्हतं; कारण जवळ जवळ पंचवीस वर्षं मीं या असामान्य कलावंताला कमी-अधिक जवळून पाहिलेलं होतं, आणि कपड्या-लत्त्यांत आणि वेषभूषेंत जे बदल झाले ते माझ्या डोळ्यांदेखत झाले होते. मला एक काळ असा आठवत होता, कीं जेव्हां बालगंधर्व अगदीं उंची तलम रेशमी किंवा गरम कापडाखेरीज दुसऱ्या कशाचा अंगाला स्पर्श होऊं देत नव्हते, आणि कपड्यालत्त्यांचा षोक पुरविण्यासाठीं किती पैसा खर्च करावा याचा त्यांना हिशोब नव्हता. असाहि एक काळ मला आठवत होता, कीं अतिशय भारी किंमतीच्या सुंदर मऊ ‘ फर ’ची बाजवीपेक्षां जरा अधिकच उंच अशी टोपी ते घालीत असत; ती त्यांना फार शोभून दिसते अशी लोकांची कल्पना झाली, आणि तसल्या ‘ फर ’ कॅप्स सारेच लोक वापरूं लागले. जवाहरलाल नेहरूंचा मुंडेछाप शर्ट आणि जाकीट हा पोशाख ज्याप्रमाणें नेहरू शर्ट-जाकिट म्हणून लोकप्रिय झाला, त्याप्रमाणेंच या ‘ फर ’च्या टोप्या ‘ गंधर्व कॅप्स ’ म्हणून त्या वेळीं बाजारांत ओळखल्या जात असत. स्वतः बालगंधर्वांनींच १९२० च्या चळवळीपासून, काकासाहेब खाडिलकर यांच्या सहवासाच्या परिणामामुळें, परदेशी कपड्यांच्या षोकाचा संन्यास घेतला व ही फर कॅप सोडून दिली. पण या ‘ गंधर्व कॅप ’नं दोन-तीन वर्षं षोकिन लोकांच्या आवडीनिवडीवर अधिराज्य गाजविलं होतं, याबद्दलची माझी आठवण सहज बुजण्यासारखी नाहीं. कारण ही टोपी माझ्याहि डोक्यावर कांहीं दिवस बसली होती ! पण या असल्या आठवणींची केवढीहि गर्दी माझ्या मनांत झाली असली तरी सत्काराला उत्तर देण्या-साठीं व्यासपीठावर उभे राहिलेल्या बालगंधर्वांचा पोशाख कमालीचा साधा होता हें मला कबूल करणं भागच होतं; आणि समारंभाला हजर असलेल्या तरुण विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या दृष्टीस गतकाळांतले झकपक छाकटा पोशाख करणारे बालगंधर्व कधींच पडले नसल्यामुळें त्यांच्या पोशाखाच्या साधेपणाचा त्यांच्यावर फार अनुकूल परिणाम झालेलाहि मला स्पष्ट दिसत होता.

आतां बालगंधर्व काय बोलतात पाहूं म्हणून सारी सभा उत्सुकतेनं स्तब्ध झाली. मीहि लक्ष देऊन ऐकूं लागलों. नाट्यव्यवसायांतून निवृत्त होऊन सिनेमाच्या व्यवसायांत आपण कां शिरत आहोंत, या नव्या क्षेत्रांत पाऊल टाकतांना आपल्या अपेक्षा आणि महत्त्वाकांक्षा काय आहेत इत्यादी गोष्टींची बालगंधर्व चर्चा करतील अशी माझी थोडीशी अपेक्षा होती. थोडीशी अशासाठीं म्हटलं कीं प्रसंगाचं औचित्य न ओळखतां तोंडाला येईल तें बडबडण्याचे विक्रम बालगंधर्वांनीं अनेकदां केलेले मला माहीत आहेत. आणि त्यामुळें आजहि ते असाच कांहीं तरी अप्रासंगिक विषय काढतील कीं काय अशी मला मनांतल्या मनांत भीति वाटत होती; तीच शेवटीं खरी ठरली. आणि गंमत अशी कीं प्रसंगाला न साजेसं बालगंधर्व बोलले. इतकंच नव्हे तर ज्याची वाच्यता त्यांनीं जाहीरपणें कुठेंच करावयास नको होती असा विषय त्यांनीं काढला. सत्काराबद्दल आभार, आपले नाट्यव्यवसायांतले विविध अनुभव, सिनेमाच्या क्षेत्रांत आपण कितपत कर्तबगारी दाखवूं शकूं याबद्दलच्या आपल्या कल्पना हें सारं बाजूलाच राहिलं. आणि प्रभात स्टुडिओचा व त्यांचा जो करार झाला होता त्याचा खाजगी इतिहास सांगायला त्यांनीं सुरुवात केली. एवढ्यावरच भागलं नाहीं तर पुढें त्या करारांतलं एकेक कलम श्रोत्यांना सांगायला त्यांनीं खुशाल प्रारंभ केला. तें ऐकतांना मी अक्षरशः कपाळाला हात लावला!

परंतु सभेवर त्यांच्या भाषणाचा अगदींच निराळा परिणाम झालेला मला आढळला. बालगंधर्वांनीं जो अप्रासंगिकपणा केला होता त्याकडे कुणाचंच लक्ष नव्हतं. उलट प्रभात स्टुडिओशीं झालेला गुप्त करार उघड उघड कलमवार सांगण्यांत बालगंधर्वांच्या मनाचा साधेपणा व मोकळेपणा दिसून आला, अशी साऱ्या श्रोत्यांची भावना झालेली दिसली. कलावंताच्या गुणांवर फिदा झालेली जनता त्याच्या वेडेपणाचं देखील कौतुक करायला कशी तयार असते त्याचा त्या दिवशीं मला अगदीं अविस्मरणीय अनुभव आला!

आमच्या म्यूझिकल अँड थिएट्रिकल असोसिएशनाविषयीं आतां मी फक्तच दोन गोष्टी सांगणार आहें. म्हणून कालाचा अनुक्रम थोडासा सोडून त्या आत्तांच सांगून टाकतों. यांपैकीं पहिली गोष्ट म्हणजे आमच्या या

असोसिएशनतर्फे १९३४ सालच्या नोव्हेंबर महिन्यांत आम्ही केलेला 'खडाष्टक' या नाटकाचा प्रयोग; आणि दुसरी म्हणजे आमच्या या असोसिएशनसाठीं १९३६ सालीं मीं लिहिलेलं 'तोतया नाटककार' हें नाटक आणि आम्हीं त्याचा केलेला प्रयोग. पैकीं ' खडाष्टक ' नाटकाबद्दलची गोष्ट अशी कीं, कांहीं वर्षांपूर्वी आम्हीं कॉलेजच्या गॅदरिंगसाठीं श्री. जोशी ( माधवराव जोशी नव्हेत ! ) यांचं ' मायेचा पूत ' हें नाटक केलं होतं, आणि तें बसवितांना व त्याचा प्रयोग करतांना श्री. जोशी यांच्या लिहिण्याची लकब प्रेक्षकांच्या मनाची पकड घेणारी असते याचा मला अनुभव आला होता, म्हणून त्यांचं ' खडाष्टक ' हें नाटक मीं पसंत केलं. पूर्वी मी आणि माझ्या विद्यार्थ्यांनीं मिळून जे नाट्यप्रयोग केले त्यांत स्त्रियांच्या भूमिका पुरुषविद्यार्थ्यांनीं केल्या होत्या. तो प्रकार मला अगदीं नकोसा वाटूं लागला होता आणि शक्य तर आमच्या नाट्यप्रयोगांत स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांकडून करवून घेण्याची माझी इच्छा होती. ही इच्छा बरीचशी धाडसाची होती. कारण तेरा वर्षांपूर्वी आजच्या परिस्थितीहून फार निराळी परिस्थिति होती. स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनीं कराव्या किंवा करूं नये हा एक मोठ्या कडाक्याच्या वादाचा विषय त्या वेळीं होता. कोल्हापूर तर आणखीच मागासलेलं आणि कॉलेजांत असा संमिश्र नाट्यप्रयोग करावयाचा म्हणजे त्यांत अधिकच अडचणी होत्या. परंतु मी जेव्हां डॉक्टर बाळकृष्ण यांना माझी कल्पना सांगितली. तेव्हा त्यांनीं एकदम पाठिंबा दिला. अशा प्रकारें एक अडथळा दूर झाला. कॉलेजांत संमिश्र नाट्यप्रयोग झाल्यावर माझे कोल्हापुरी शत्रू काय काय टीका करतील याची मला पूर्ण कल्पना होती. परंतु जोंपर्यंत मला डॉक्टर बाळकृष्ण यांचा पाठिंबा होता तोंपर्यंत या संभाव्य टीकेला भीक घालण्याचं मला कांहींच प्रयोजन नव्हतं. परंतु डॉक्टर बाळकृष्ण यांच्या रुकारामुळं एक मोठी अडचण दूर झाली होती खरी; तथापि त्यांचा रुकार मिळविल्यानंतर त्याहूनहि मोठी अशी अडचण आम्हांला आढळून आली ती ही कीं, आमच्या नाट्यप्रयोगांत काम करण्यास कॉलेजांतल्या मुली तयार होईनात. तयार होईनात याचा अर्थ असा कीं पुष्कळ विद्यार्थिनींची नाटकांत भाग घेण्याची इच्छा व हौस होती, परंतु त्यांचे पालक त्या गोष्टीस मुळींच संमति देणार नाहींत अशी त्यांची खात्री होती.

नाट्यप्रयोगासाठीं विद्यार्थिनी मिळत नाहींत मग कसं करायँचं ? हा मोठाच प्रश्न आमच्यापुढें उभा राहिला. विद्यार्थिनी मिळत नसल्या तर घरंदाज कुलीन स्त्रियांचं सहकार्य मिळवून नाटक करावं अशी कल्पना माझ्या मनांत आली. ही कल्पना येण्यास कारण झालं तें असं कीं, श्री. जोशी नांवाचे माझे न्यू पूना कॉलेजांतील माजी विद्यार्थी उंबरगांवला डॉक्टर होते. त्यांचं मला याच सुमारास पत्र आलं होतं कीं, " माझ्या बायकोला नाटकांत अगर सिनेमांत काम करण्याची फार इच्छा आहे. तेव्हां तिच्यासाठीं तुम्ही कोठें खटपट करूं शकाल काय ? " मिसेस् जोशी जर योग्य असतील तर त्यांना बोलावून घेऊन ' खडाष्टका ' च्या प्रयोगांत त्यांना काम द्यावं असा मी विचार केला. हा विचार देखील मी डॉक्टर बाळकृष्ण यांचेपुढें स्पष्ट स्वरूपांत मांडला. त्यांनीं जेव्हां माझ्या या कल्पनेबद्दल पूर्ण पसंती दर्शविली तेव्हां आमची अडचण संपली. मीं मिसेस् जोशी यांना ताबडतोब बोलावून घेतलं, आणि नाटकांत काम करण्याइतपत अभिनयकौशल्य त्यांच्या ठिकाणीं असल्याची खात्री करून घेतल्यावर तालमींना सुरुवात केली. ' खडाष्टक ' नाटकांत ज्यांनीं कित्येक वर्षं भूमिका केली होती असे महाराष्ट्र नाटक मंडळींतील एक जुने नट श्री. वैशंपायन यांची मदत आम्हांला योगायोगानें मिळाली आणि आमचा प्रयोग अगदीं उत्तम बसला. गुरुवार ता. २९ नोव्हेंबर १९३४ रोजीं 'खडाष्टक' नाटकाचा जाहीर प्रयोग पॅलेस थिएटरमध्यें आम्ही केला, तो अतिशय सुंदर वठला. मात्र प्रयोगाची प्रशंसा ज्याप्रमाणें खूप झाली त्याप्रमाणेंच कोल्हापुरी वृत्तपत्रांतून त्यावर टीकाही सपाटून झाली. त्या टीकेला महत्त्व देण्याचं आम्हांला कारण नव्हतं. आणि आम्ही त्याला महत्त्व देत नव्हतों. या विचारानंच टीकाकार अधिक संतप्त झाले होते !

: : ५८ : :

लोणावळ्याच्या थंड हवेचे ठिकाणीं तिथल्या एका बंगल्यांत धीरेंद्र नांवाचा एक प्रसिद्ध नाटककार रहात असतो. रत्नकांत नांवाचा त्याचा मित्र एकदां त्याची सूटकेस घेऊन प्रवासाला जातो. प्रवासांत त्या सूट-केसवरचं नांव पाहून धीरेंद्राच्या नाटकांची पराकाष्ठेची चाहती असलेली एक तरुण मुलगी त्यालाच धीरेंद्र समजून त्याची ओळख करून घेते. सुप्रसिद्ध सिनेमा नटी वीणा ती हीच मुलगी असें वाटल्यामुळें व आपण धीरेंद्र नाहीं असें सांगितल्यावर तिचा आपला होत असलेला परिचय ती वाढूं देणार नाहीं अशा शंकेनं रत्नकांत तिचा तो गैरसमज कायम ठेवतो. रत्नकांत प्रवासांतून परत आल्यावर त्याला धीरेंद्र या नांवानंच आणि धीरेंद्राच्या पत्त्यावरच वीणेचीं पत्रं येत राहतात. या कपट-नाटकांत रत्नकांतानं धीरेंद्राला सामील करून घेतलेलं असतं. अखेर धीरेंद्राकडे दोन दिवस रहावयास म्हणून लोणावळ्यास येण्याचं वीणा ठरविते, व त्याप्रमाणें पत्र धाडते. तें पत्र आल्यावर धीरेंद्र रत्नाकांतास सल्ला देतो कीं, वीणेची फसवणूक यापुढें करूं नकोस, तूं खरा कोण आहेस तें तिला सांगून टाक. परंतु असं केल्यास वीणा हातची निघून जाईल. अशी रत्नकांतास भीति वाटत असते व म्हणून तो धीरेंद्राजवळ आग्रह धरतो कीं, वीणा रहावयास येईल त्या दोन दिवसांत मी नाटककार धीरेंद्र आहे व हा बंगला

माझा आहे असाच तिचा समज राहिला पाहिजे व त्यासाठीं तूं माझा पर्सनल सेक्रेटरी असल्याची बतावणी तूं केली पाहिजेस. धीरेंद्राला हें पटत नाहीं. यांतून नसते घोटाळे निर्माण होतील असं त्याला वाटतं. परंतु रत्नकांत अगदींच हट्टाला पेटतो, तेव्हां त्याच्या योजनेला तो संमति देतो. मग वीणा आपल्या पत्राप्रमाणें येऊन दाखल होते!

अशा तऱ्हेची प्रसंग-योजना कल्पून नाटक लिहिलं तर एक चांगल्या-पैकीं हास्यरसप्रधान कथानक तयार करता येईल असं माझ्या मनांत बरेच दिवस येत होतं. ज्या गोष्टी मला सुचल्या होत्या त्या फक्त नाटकाच्या पहिल्या अंकाला पुरतील अशा होत्या. परंतु सबंध नाटक लिहिण्याची वेळ कधीं आलीच तर मला सुचलेल्या पहिल्या पेचप्रसंगांतून पुरेसे घोटाळ्याचे प्रसंग निर्माण करून, त्या घोटाळ्यांचा कळस दाखवून व अखेर त्या घोटाळ्यांचा आनंदकारक शेवट करून नाटक लिहून काढणं कांहीं फारसं अवघड नाहीं याची मला खात्री होती. वेळ येईल तेव्हां या कथानकाचा अधिक विचार करतां येईल, असं म्हणून मनाच्या एका कप्प्यांत तें मीं ठेवून दिलं होतं. १९३६ सालीं एकदम अशी परिस्थिति उद्भवली कीं मनाच्या एका कोपऱ्यांत बाजूला ठेवून दिलेल्या त्या कथा-नकाचा विचार केला पाहिजे असं मला वाटलं.

१९३४ सालच्या नोव्हेंबर महिन्यांत आम्ही—आमच्या असोसिएशन-मार्फत 'खडाष्टक' नाटक केल्यानंतर वास्तविक १९३५ सालीं आम्ही त्यानंतरचा नाट्यप्रयोग करावयास हवा होता. परंतु एक तर त्या वर्षाच्या उत्तरार्धांतले माझे बरेच दिवस कॉलेज-क्रिकेटच्या धांदलींत गेले; (याबद्दलची हकीगत मी पुढें लिहिणार आहे.) आणि शिवाय या वर्षीच्या डिसेंबर महिन्यांत मला एकाएकीं त्या वेळच्या बडोद्याच्या राणीसाहेब श्रीमंत चिमणाबाईसाहेब यांचं तांतडीचं आमंत्रण आल्यावरून तिकडे जावं लागलं. या व अशाच इतर कारणांनीं मिसेस् जोशी यांना पुन्हा बोलावून घेऊन नव्या नाटकाच्या तालमी सुरू करणं मला अशक्य झालं, आणि असोसिएशनच्या सभासदांना दरवर्षी एक चांगला नाट्यप्रयोग सादर करण्याचा आमचा संकल्प वेळेवर पुरा होऊं शकला नाहीं. मग १९३६ साल उजाडल्याबरोबर आम्ही 'गैरसमज' नाटक पसंत केलं, आणि मिसेस् जोशी यांना बोलावून

घेऊन तालमींना प्रारंभ केला. ता. १६ जानेवारी रोजीं नाटकाचा जाहीर प्रयोग पॅलेस थिएटरमध्यें आम्हीं केला. आमच्या असोसिएशनतर्फे होणारा कोणताही प्रयोग उत्कृष्ट वठावयाचाच, याबद्दल लोकांची आतां पुरती खात्री पटली होती. आमचाही विश्वास वाढत चालला होता. श्रीयुत श्रीखंडे ( हे हल्लीं धारवाड येथें एका हायस्कूलमध्ये शिक्षक आहेत. ), श्रीयुत पेठकर ( हे हल्लीं 'प्रभात'चे डायरेक्टर म्हणून प्रसिद्धीस आलेले आहेत. ), श्रीयुत कुलकर्णी, इत्यादि माझी विद्यार्थी मंडळी तर आतां अभिनयांत, नेपथ्यांत, व्यवस्थित नाट्यप्रयोगाच्या सर्व अंगांत अगदीं धंदेवाइकांइतकीच प्रवीण झाली होती. परंतु शिवाय आम्हांला ज्यांचं सहकार्य मिळालं होतं त्या मिसेस् जोशी यांनींहि अभिनयकौशल्यांत प्रशंसनीय प्रगति दाखविली होती. तारा नांवाची एक मुलगी आमच्या प्रयोगांतून कामं करूं लागली होती स्त्रियांच्या भूमिका करावयास कुशल स्त्रिया आम्हांला आतां मिळाल्या होत्या व त्यामुळें आम्हांला स्त्री-भूमिकांसंबंधींची अडचण कधीं भासणार नाहीं अशी आमची खात्री पटली होती. 'गैरसमज' नाटकाचा प्रयोग केल्यानंतर फार अवधि होऊं न देतां नवीन नाटक बसविण्याचा विचार आम्ही करूं लागलों. पण या विचारांत आम्ही होतों तोंच एक दुर्दैवी घटना घडली. मिसेस् जोशी अपघातानं वारल्या !

या संकटामुळें दुसरं नाटक लगोलग बसविण्याचा बेत तर आम्हांला सोडून द्यावा लागलाच, परंतु स्त्रियांच्या भूमिकांसंबंधींची आमची अडचण चांगल्या प्रकारें सुटली होती ती पुन्हां पुढें उभी राहिली. मिसेस् जोशी यांची जागा भरून काढणं अशक्य होतं. खटपट केली तर एखादी तरुण मुलगी आमच्या असोसिएशनच्या नाट्य-प्रयोगांत काम करावयास तयार होण्याचा संभव अगदींच नव्हता असं नव्हे. परंतु जबाबदारीची भूमिका यशस्वीपणानं पार पाडण्याइतका अभिनय जिच्या अंगीं आहे अशी मुलगी मिळणं जवळ जवळ अशक्य होतं ! मग आतां कसं करायचं ? प्रसिद्ध लेखकांच्या नाटकांपैकीं कोणतंही नाटक निवडलं तरी त्यांत एक-दोन स्त्री–पात्रांना प्राधान्य असणारच. पुरुषविद्यार्थ्यांनीं स्त्री–भूमिका करण्याची प्रथा आम्ही बंद केली होती आणि त्या बाबतींत पुन्हां मागं पाऊल टाकण्याची आमची इच्छा नव्हती. अशा अडचणींतून एकच मार्ग दिसूं लागला.

तो हा कीं, ज्या नाटकांत स्त्री-पात्रांना बेताचंच काम आणि महत्त्व असेल असं एक नवं नाटक मीं लिहावयाचं आणि तें बसवावयाचं.

ही गोष्ट जेव्हां ठरली तेव्हां बाजूस ठेवून दिलेलं कथानक मी पुन्हां हातीं घेतलं, आणि तें पूर्ण करण्याच्या उद्योगाला लागलों. 'तोतया नाटककार' या माझ्या नाटकाच्या मागें हा इतका इतिहास आहे. नाटक लिहून पुरं करण्याचा लकडा माझ्या विद्यार्थ्यांनीं माझ्यामागें लावला तेव्हां १९३६ च्या मार्च महिन्यांत मी तें प्रत्यक्ष लिहावयास बसलों व नाटकाचा पहिला अंक चार दिवसांत लिहून काढला. परंतु त्यानंतर पुन्हां माझ्या इतर लेखनाच्या व्यापांत मी इतका कांहीं सांपडलों कीं तें नाटक तितक्या-वरच राहिलं. अखेर असोसिएशनचा १९३६ सालचा नाट्यप्रयोग करण्याच्या बाबतींत विलंब करून भागणार नाहीं अशी जेव्हां परिस्थिति निर्माण झाली तेव्हां ता. १५ सप्टेंबर रोजीं बाकीचीं सारीं कामं बाजूला टाकून पहिल्या अंकावर थांबलेलं 'तोतया नाटककार' हें नाटक मीं पुढें लिहावयास घेतलं, आणि तीन दिवसांत तें पूर्ण केलं. वीणा धीरेंद्राच्या बंगल्यावर येऊन दाखल होते, एवढीच जी कल्पना मी प्रथम केली होती तिच्या जोडीला मी आणखी एक कल्पना घातली. ती अशी कीं पद्मा नांवाची एक मुलगी असते, तिचा फोटो धीरेंद्रानें पसंत केलेला असतो, प्रत्यक्ष परस्पर परिचय व्हावा यासाठीं तिच्या बापानं तिला घेऊन लोणावळ्यास दोन दिवस येऊन राहावं असं धीरेंद्रानं सुचविलेलं असतं, त्याप्रमाणें वीणा धीरेंद्राच्या बंगल्या-वर आलेली असतांना म्हणजे रत्नकांतानं धीरेंद्राचं सोंग व खऱ्या धीरेंद्रानं त्याच्या सेक्रेटरीचं सोंग घेतलेलं असतांना ! पद्माचे वडील तिच्यासह धीरेंद्राच्या बंगल्यावर येऊन दाखल होतात ! या कल्पनेची भर घातल्यामुळें माझ्या मूळच्या कथानकाला आणखी भरीवपणा आला, व ज्या घोटाळ्यावर मला एकंदर नाटकाची उभारणी करावयाची होती तो एकेरी न राहतां दुहेरी होऊन नाटकाची रंगत खूपच वाढेल याबद्दल मला खात्री वाटूं लागली.

नाटक लिहून पुरं झालं, पण त्याच्या तालमी आम्हांला लवकर सुरू करतां आल्या नाहींत. कारण स्त्री-पात्रांना विशेष महत्त्व न देतां नाटकाचं

कथानक रंगविण्याची दक्षता मी घेतली होती खरी, तथापि नाटकांत दोन स्त्री-भूमिका होत्याच. त्यांपैकीं तारा आमच्या संचांत तयार होती, पण दुसऱ्या भूमिकेसाठीं नटी शोधणं भाग होतं व ती अडचण लवकर दूर होईना. अखेर नोव्हेंबरच्या मध्याला कमलाबाई बडोदेकर या भूमिकेसाठीं मिळतील अशी शक्यता निर्माण झाली. पण त्यांना आणावयाचं तर डॉक्टर बाळकृष्णांची पुन्हां संमति घेणं मला आवश्यक वाटलं. कारण कमलाबाई जोशी यांच्याहून कमलाबाई बडोदेकर यांचा प्रश्न निराळा होता. त्या एक धंदेवाईक नटी होत्या. पण डॉ. बाळकृष्ण यांनीं या वेळेसही बिलकूल आढेवेढे न घेतां माझ्या योजनेस मंजुरी दिली. मग कमलाबाई बडोदेकर यांना आम्हीं आमंत्रण दिलं. त्या आल्या आणि ता. २४ नोव्हेंबर रोजीं "तोतया नाटककार"च्या तालमी सुरू झाल्या. १५ डिसेंबर ही जाहीर प्रयोगाची तारीख आम्ही आधींच ठरविली होती.

प्रयोगाची रंगीत तालीम न करतां किर्लोस्करवाडींत नाटकाचा एक जाहीर प्रयोगच आधीं ता. १२ डिसेंबरला करावयाचा व त्याचा उपयोग रंगीत तालमीप्रमाणें करून घ्यायचा असा बेत ठरला. म्हणजे तालमीच्या कामासाठीं अवघे सतरा दिवस उरले होते.

परंतु या अडचणीची भरपाई दुसऱ्या एका गोष्टीनं झाली. सुप्रसिद्ध नट केशवराव दाते त्या वेळीं बाबुराव पेंटर यांच्या एका चित्रपटांत काम करण्यासाठीं कोल्हापुरास येऊन राहिले होते, त्यांच्या दिग्दर्शनाचा लाभ आम्हांला झाला. सतरा दिवसांच्या अल्पावधींतहि नाटक उत्तम बसवलं. ( आणि विशेष म्हणजे नाटक कसं बसवावं याबद्दलची एक नवी दृष्टि मला व माझ्या विद्यार्थ्यांना मिळाली. ) ता. १२ डिसेंबरला आम्ही किर्लोस्करवाडीस खेळ केला, व ता. १५ रोजीं आमच्या नाटकाचा जाहीर प्रयोग कोल्हापूरच्या पॅलेस थिएटरमध्यें झाला.

मी स्थापन केलेल्या म्यूझिकल अँड थिएट्रिकल असोसिएशनतर्फे झालेला हा शेवटचा नाट्यप्रयोग ! कारण यानंतर माझे विद्यार्थी निरनिराळ्या निमित्तानं पांगले. या असोसिएशनच्या कामात लक्ष घालण्याइतकी फुरसद लेखनाच्या वाढत्या व्यापामुळें मला मिळेनाशी झाली. असोसिएशन पुढें

चालण्याइतका मगदुराचा व हौशीचा दुसरा प्रोफेसर कुणी आढळेना आणि मुख्य म्हणजे ज्यांच्या संपूर्ण सहानुभूतीच्या आणि प्रोत्साहनाच्या जोरावर मी साऱ्या योजना पार पाडूं शकत होतों त्यांचा आधारच पुढें मृत्यूनं हिरावून नेला ! आमची असोसिएशन लवकरच बंद पडली. राजाराम कॉलेजच्या सामाजिक जीवनांत आमच्या असोसिएशननं एक छोटंसं पण संस्मरणीय युग गाजविलं; व प्रांतांतल्या कित्येक कॉलेजांतल्या विद्यार्थ्यांना स्फूर्ति दिली, ही गोष्ट राजाराम कॉलेजांतल्या इतिहासांत प्रामाणिक लेखकाला अवश्य नमूद करावी लागेल. या विचाराचें मला व त्या वेळच्या माझ्या विद्यार्थिमित्रांना मोठें आणि अविनाशी समाधान आहे.

: : ५९ : :

१९३५ च्या जानेवारी महिन्यांतील २ तारखेस माझ्या ‘ संजीवन ’ नाटकाचा मुंबई मुक्कामांतील पहिला प्रयोग झाला. तो प्रयोग लोकांना आवडला, आणि त्या नाटकाचे आणखी प्रयोग होऊं लागले तेव्हां मराठी व इंग्रजी वृत्तपत्रांत प्रशंसापूर्ण अभिप्रायहि येऊं लागले. परंतु लोकांना जरी खेळ आवडला तरी मीं ज्या तऱ्हेनं तें नाटक बसविलं होतं तिची आठवण नाटकांत कामं करणाऱ्या पात्रांनीं ठेवलेली मला दिसत नव्हती; विशेषतः नाटकांतील नायक ‘ मोहन ’ याचं काम करणारे श्री. पंडितराव यांनीं पदांना वन्स मोअर मिळविण्यावर सर्व भिस्त ठेवून गद्य आणि अभिनय या गोष्टींची सर्वस्वीं आबाळ चालविलेली मला दिसली, आणि नायिकेचं काम करणाऱ्या सुलोचनाबाईंनीं असा कांहीं नवीनच अभिनय आपल्या मतानं बसविला होता कीं ‘ संजीवनी ’ चं जें विशिष्ट स्वभावचित्र मीं रंगविलं होतं त्याहून अगदीं वेगळंच छचोर चित्र लोकांना दिसावं. या गोष्टी पाहून मला खेद वाटला होता आणि माझ्या मताप्रमाणें या नाटकाचं रूप या मंडळींकडून लोकांना दिसेल अशी आशा मला करतां येत नव्हती. शिवाय या नाटकासंबंधीं ठरलेला व्यवहार पुरा न करण्याचं सुलोचनाबाई आणि पंडितराव यांनीं ठरविलं असलं पाहिजे हें मीं आतां ओळखलं होतं. या दोन कारणांनीं ‘ संजीवन ’ नाटकाच्या भवितव्याबद्दल

मी उदासीन बनलों होतों. आपल्या नाटकाचे जाहीर प्रयोग मुंबईच्या रंगभूमीवर होत आहेत एवढंच समाधान मला होण्यासारखं होतं.

‘ आधुनिक गीता ’ ही ‘ किर्लोस्कर ’ मध्यें मीं लिहिलेली लेखमाला १९३५ च्या मे महिन्यांत पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाली. ‘ उद्धार ’ कादंबरी ‘ किर्लोस्कर ’मध्यें चालू होती ती मे महिन्याच्या २९ तारखेस मी पूर्ण केली. या सुमारास अशी एक कल्पना निघाली कीं, शंकरराव किर्लोस्कर यांनी ‘ किर्लोस्कर ’ मासिकासाठीं काढलेल्या चित्रांतील जीं विशेष चांगलीं वाटतील तीं निवडून प्रत्येक चित्रावरील माझ्या संक्षिप्त टीकेसह त्यांचा एक संग्रह प्रसिद्ध करावा. शंकरराव किर्लोस्कर व मी या दोघांच्या सह्यांनिशीं एक पुस्तक प्रसिद्ध व्हावं ही कल्पना मला फार आनंददायक वाटावी हें साहजिक होतं. म्हणून चित्रावर टीका लिहिण्याचं काम मीं अगदीं हौसेनं केलं. या संग्रहाला नांव काय द्यावं असा आम्हां दोघांपुढें प्रश्न उभा राहिला. पुष्कळ विचार केल्यानंतर ‘ टाकाच्या फेकी ’ हें नांव आम्हीं पसंत केलं. पुस्तकाच्या मुखपृष्ठासाठीं शंकररावांनीं आम्हां उभयतांचं एक व्यंग-चित्र तयार केलं, आणि त्यांचं आणि माझं एकत्र चित्र काढल्यास तें एक नमुनेदार हास्यचित्र ठरेल ही आपली फार दिवसांची कल्पना त्यांनीं प्रत्यक्षांत आणली. हें पुस्तक जुलाय् महिन्याच्या अखेरीस प्रसिद्ध झालं. मराठी साहित्यांतलं या स्वरूपाचं हें पहिलंच पुस्तक होतं.

मे महिन्याच्या अखेरीस ‘ उद्धार ’ कादंबरी पूर्ण करण्याच्या आधींच कित्येक दिवसांपासून लेखनाहून वेगळ्याच पण मला लेखनाप्रमाणेंच प्रिय वाटणाऱ्या अशा एका उद्योगांत मी फार गढून गेलों होतों. तो उद्योग म्हणजे आमच्या कॉलेजचं क्रिकेट. आमच्या कॉलेजच्या क्रिकेटचीं सूत्रं मीं हातीं घेतल्यापासून कॉलेजमधील क्रिकेटचा दर्जा वाढविण्याची मी सतत खटपट केली होती. १९२९ साली नॉर्थकोट शील्ड जिंकण्याचा विक्रम आमच्या खेळाडूंनीं प्रथम केला होता. नंतर १९३२ सालीं तें शील्ड राजाराम कॉलेजनं पुन्हां जिंकलं होतं; आणि त्या वेळेस तर अजिंक्य समजल्या जाणाऱ्या पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजच्या संघाचा अखेरच्या

सामन्यांत पराजय आमच्या खेळाडूंनीं केला होता, आणि राजाराम कॉलेजच्या टीमविषयीं पुण्याच्या लोकांनाहि दरारा वाटूं लागला होता. आतां १९३५ सालीं नॉर्थकोट शील्ड मध्यंतरींच्या दोन वर्षांत मुंबई प्रांताच्या उत्तर आणि मध्य विभागांत हिंडून पुन्हां आमच्या—म्हणजे पुणें व दक्षिण भागांतील कॉलेजांच्या—वांट्याला आलं होतं. १९३२ सालीं आम्ही अखेरच्या सामन्यांत फर्ग्युसन कॉलेजचा पराभव करून शील्ड जिंकलं त्या वेळेपेक्षांहि अधिक कसून तयारी करणं आम्हांला भाग होतं. कारण त्या वर्षीं राजाराम कॉलेजची टीम ती काय असणार अशा कल्पनेनं पुण्याचीं कॉलेजं घमेंडींत आणि गैरसावध होतीं. परंतु आतां पुण्याचीं कॉलेजं उमजून चुकलीं होतीं, कीं अखेरचा निर्णायक सामना राजाराम कॉलेजशींच होणार व राजाराम कॉलेजची टीम भारी असणार. या हिशोबानं पुण्याच्या कॉलेजांनीं विशेषतः फर्ग्युसन, सर परशुरामभाऊ आणि वाडिया कॉलेजांनीं आपआपले संघ विशेष मजबूत केलेले असणार हें उघड होतं. अर्थात् आम्हांलाहि आमची तयारी या गोष्टी हिशेबांत घेऊन करणं अवश्य होतं.

आनंदाची गोष्ट अशी कीं आमचे प्रिन्सिपल डॉ. बालकृष्ण यांच्या अमर्याद उत्साहाचं भांडवल आम्हांजवळ होतं. मी स्थापन केलेल्या नाट्य संगीत मंडळाला ज्याप्रमाणें त्यांनीं निरपवाद प्रोत्साहन दिलं होतं त्याप्रमाणेंच राजाराम कॉलेजनं क्रिकेटमध्यें १९३५ सालीं मिळविलेलं अजिंक्यपद कायम राखावं अशी ईर्षा माझ्याइतकी व विद्यार्थ्यांइतकीच त्यांना वाटत होती. प्रयत्नांची शिकस्त करून एकदां कॉलेजांत आलेलं नॉर्थकोट शील्ड यंदाहि हातचं जाऊं द्यायचं नाहीं, अशी त्यांनीं कमर बांधली व त्यासाठीं मी पुढें मांडलेल्या सर्व योजना मंजूर केल्या. बोर्डी येथील हायस्कुलांतून एक उत्तम डावरा स्पिन् बोलर पास झाल्याचं मला कळल्याबरोबर तो मुंबईच्या एखाद्या कॉलेजांत न जातां राजाराम कॉलेजांत नांव घालील अशी मी खटपट केली. त्या विद्यार्थ्याला ( याचं नांव आतां या क्षणीं मला आठवत नाहीं ) नादारी वगैरे सवलती डॉ. बालकृष्णांनीं दिल्या व त्याला एप्रिल महिन्यांतच आम्ही इकडे आणला. उन्हाळ्याच्या मोठ्या सुटींत टीमची प्रॅक्टिस आम्ही सुरू केली, आणि खेळाडूंना तयार करण्यासाठीं मुंबईचे

विख्यात बोलर श्री. गोडांबे यांना 'कोच्' म्हणून इकडे आणविण्यांत आलं. इतकी पद्धतशीर जोराची तयारी राजाराम कॉलेजनं पूर्वी कधींच केलेली नव्हती.

सुटी संपली, कॉलेजची टर्म सुरू झाली, आणि शील्डचे सामने जवळ आले तेव्हां आमच्या कॉलेजची टीम अगदीं जय्यत तयार झाली होती. बोलिंग, बॅटिंग, फील्डिंग या सर्व अंगांनीं टीमची ताकद पहिल्या प्रतीची असल्याबद्दल आमची खात्री झाली. आमचा पहिला सामना सप्टेंबरच्या मध्याला कर्नाटक कॉलेजशीं धारवाड येथें झाला. तो आम्ही तीन धांवा व तीन विकेटसनी जिंकला. लगेच आठ दिवसांनीं दुसरा सामना बेळगांव येथें लिंगराज कॉलेजशीं झाला व तो तर आम्ही एक डाव आणि १११ धांवांनीं जिंकला. पुण्याच्या कॉलेजांतील आपआपसांतले सामने आटपून त्यांत फर्ग्युसन विजयी होऊन बसलं होतं. म्हणजे तीन वर्षांपूर्वीं-प्रमाणेंच यंदाहि अखेरच्या सामन्यांत आमची आणि फर्ग्युसन कॉलेजचीच गांठ पडणार होती.

हा अखेरचा सामना या वर्षी पी. वाय्. सी. ह्या मैदानावर न होतां डेक्कन जिमखान्याच्या क्रीडांगणांवर झाला. मागच्या वेळेप्रमाणेंच चौरंगी सामने पहावयाला प्रेक्षकांची गर्दी लोटावी त्याप्रमाणें किंबहुना मागच्यापेक्षांहि अधिकच प्रचंड गर्दी आमचा सामना पाहण्यास लोटली होती. फर्ग्युसन कॉलेजनं मैदानावर एक शामियाना उभा केला होता. परंतु त्यांच्यापेक्षांहि अधिक टोलेजंग शामियाना आम्ही उभा केला होता. पुण्यास अभ्यासाच्या निमित्तानं राहणारे कोल्हापूरचे विद्यार्थी, नोकरीनिमित्त अथवा इतर कारणांनीं पुण्याचे नागरिक बनलेले, परंतु मूळचे कोल्हापुरचे असलेले शेंकडों लोक, मुद्दाम हा सामना पहावयासाठीं म्हणून पुण्यास आलेले कोल्हापूरचे विद्यार्थी व इतर मंडळी अशा हजार-बाराशें प्रेक्षकांनीं आमचा शामियाना फुलून गेला होता. या गर्दीतच ज्यांना फर्ग्युसनचा पराभव व्हावा व राजाराम कॉलेजचा विजय व्हावा असं परोपरीच्या कारणांनीं वाटत होतं असे पुण्याचे विद्यार्थी व नागरिकहि सामील झाले होते. २९ सप्टेंबर रोजीं हा सामना सुरू झाला त्या वेळेस एकंदर वातावरण खरोखरच अटीतटीच्या चौरंगी सामन्याला शोभण्यासारखं होतं. तीन वर्षांपूर्वीं आमच्य

हातून खाल्लेल्या माराचा या वर्षी बदला घेण्याच्या ईर्ष्येनं फर्ग्युसनचे खेळाडू, आणि पूर्वीपेक्षांही अधिक मोठा विजय मिळविण्याच्या हिरीरीनं आमचे खेळाडू क्रीडांगणावर उतरले होते; आणि ही भयंकर चुरशीची लढत पहाण्याच्या अनिवार उत्कंठेनं आलेल्या कित्येक सहस्र प्रेक्षकांची दाटी झाली होती. ओली-सुकी फर्ग्युसननं जिंकली. त्यांनी बॅटिंग करण्याचं ठरवून त्यांची पहिली जोडी पिचवर येऊन दाखल झाली, व आमच्या आघाडीच्या बोलरनं पहिला चेंडू टाकला त्या वेळेस हजारो प्रेक्षकांनीं फुललेल्या त्या मैदानावर इतकी संपूर्ण शांतता पसरली कीं आपला श्वास तर मोठ्यांदा होत नाहींना अशी शंका प्रेक्षकांना यावी.

सामन्याचे पहिले दोन दिवस संपले तेव्हां खेळाचं पारडं आम्हांला सर्वस्वीं अनुकूल होतं. हें लिहितांना माझ्याजवळ त्या सालची माझी रोजनिशी नसल्यामुळें नक्की आंकडे सांगतां येत नाहींत, परंतु मला वाटतं विजय मिळविण्यासाठीं आम्हांला सुमारें शंभर धांवा करायच्या होत्या आणि आमचे अवघे चार गडी बाद झाले होते. म्हणजे आमचे सहा खेळाडू अजून खेळावयाचे होते. आमच्या टीमचे त्या वेळचे कॅप्टन आर. जी. पाटील आणि ( मला वाटतं ) राजे ही आमची जोडी खेळत होती. ही एकच जोडी तिसऱ्या दिवशीं चिकटली तर जरूर त्या शंभर धांवा होऊन जातील व आम्ही सामना सहा विकेट्स्नीं जिंकू अशी आम्हांला सकारण आशा वाटत होती. १९३२ सालीं फर्ग्युसनशीं झालेल्या सामन्यांत खेळाच्या दुसऱ्या दिवशींच्या अखेरीस आम्ही ज्या अवस्थेंत होतों त्याच्या बरोबर उलट यंदाची आमची अवस्था होती. त्या वर्षीं दोन दिवसांच्या खेळानंतर सामना आमच्या हातून जवळ जवळ गेला होता. ( आणि तरी तिसऱ्या दिवशीं आमच्या खेळाडूंनीं तडफदार खेळ खेळून दोन विकेटसनीं तो जिंकला होता. ) यंदा दोन दिवसांच्या खेळानंतर सामना आमच्या हातांत आला होता. राजाराम कॉलेज ही मॅच जिंकणार असं म्हणतच आमचे मित्रच नव्हे तर आमचे शत्रू देखील तिसऱ्या दिवशी सामना पहावयास आले.

—आणि तीन वर्षांपूर्वी जो प्रकार घडला होता त्याच्या बरोबर विरुद्ध प्रकार या वर्षी घडला ! हातांत आलेलं यश आमच्या खेळाडूंच्या हातून निसटलं ! फर्ग्युसन कॉलेजचा सत्तर धांवांनीं विजय झाला ! आमचा

अखेरचा खेळाडू बाद व्हायचा राहिला तेव्हा मॅचचा निकाल लागल्यासारखाच असल्यामुळें सीमेवरचे हजारों प्रेक्षक उभे राहिले होते. फर्ग्युसनचे विद्यार्थी आणि चहाते तर झुंबड करून हलके हलके सीमा ओलांडून क्रीडांगणावर दाखल झाले होते व कोणत्याही विशेष चुरशीचा सामना निकालांत निघाला कीं क्रीडांगणावर जी दंगल उडते तिची तयारी जय्यत झाली होती. आदल्या दिवशी आमच्या आणि फर्ग्युसनच्या विद्यार्थ्यांत कुरबुरीचे बोलाचालीचे व दंगामस्तीचे किरकोळ प्रकार घडले होते. त्यांचें पर्यवसान आतां कदाचित् मोठ्या मारामारींत होईल असा संभव होता. म्हणून आमच्या शामियान्यांतल्या मंडळींनीं शांतता आणि शिस्त यत्किंचितहि सोडतां कामा नये अशी दक्षता घेणं मला भाग होतं. आणि माझे विद्यार्थी-स्वयंसेवक माझा इशारा ओळखून व्यवस्था ठेवीत होते. एकंदर वातावरण विलक्षण तंग झालं होतं, मॅच आतां हातची गेली या दुःखदायक विचारापेक्षां आमचे विद्यार्थी पराजय झाला तरी चेहऱ्यावरील हास्य सोडणार नाहींत, खऱ्या खेळाडूला साजेशा दिलदारपणानं प्रतिपक्षाचं अभिनंदन करतील यासाठीं काय करावं हाच विचार त्या क्षणीं माझ्या मनांत अधिक प्रबल होता. समोर पिचकडे मी वरकरणीं पाहात होतों, परंतु मला तेथें चाललेला खेळ दिसत नव्हता. आतां थोड्याच अवधीनंतर काय होणार त्याचं चित्र मला दिसत होतं.

शेवटीं आमची अखेरची विकेट पडली ! क्रिकेटचा शिरस्ता असा आहे कीं पराजित संघाच्या लोकांनीं विजयी संघाच्या बसण्याच्या जागेकडे जाऊन त्यांना ‘ थ्री चिअर्स ’ द्याव्या. हा शिरस्ता पाळण्यांत आमच्याकडून किंचितहि कसूर होतां कामा नये अशी माझी इच्छा होती. म्हणून आमचे कॅप्टन श्री. पाटील यांना मी म्हटलं, “ साऱ्या खेळाडूंना एकत्र करा. आपणाला फर्ग्युसनच्या शामियान्याकडे जायला हवें.” परंतु फर्ग्युसनच्या खेळाडूंना व विद्यार्थ्यांना आम्ही त्यांच्याकडे जाऊं तोंपर्यंत वाट पाहण्याचा धीर कोठून राहणार. विजयाचा अपूर्व आनंद त्यांना होणं साहजिक होतं, व अशा आनंदाच्या वेळीं त्यांनी धीर धरूं नये हें क्षम्य होतं, त्यामुळें मी आमची टीम घेऊन दहा वीस कदम गेलों तोंच फर्ग्युसनच्या शेंकडों विद्यार्थ्यांनीं आम्हांला गांठलं व आमच्याभोंवतीं कडं पसरून जी परोपरीची

आरडाओरड सुरू केली तिची कल्पना ज्यांनीं असले प्रसंग पाहिले असतील त्यांना सहज करतां येईल. ' राजाराम कॉलेजची हूर्यो ', अशा अस्सल मराठी आरोळ्यांत ' बॅड लक राजारामियन्स ', ' नेव्हर माइंड, राजारामियन्स ', ' बेटर लक नेक्स्ट टाईम ' अशा उपहासगर्भ व मर्मभेदक इंग्रजी आरोळ्या मिसळत होत्या. अशा वेळीं चेहऱ्यावर हास्य ठेवणं किती अवघड असतं ! परंतु कॅप्टन पाटील यांनीं तें ठेवून खणखणीत आवाजांत थ्री चिअर्स दिल्या. फर्ग्युसन कॉलेजचे एकहि प्रोफेसर त्यांच्या खेळाडूंबरोबर नव्हते, या गोष्टीचं मला फार आश्चर्य वाटलं. पाटील यांच्या-नंतर मीहि थ्री चिअर्स दिल्या. आणि फर्ग्युसनच्या खेळाडूंशीं हस्तांदोलन करून त्यांचं अभिनंदन केलं. आमच्या सर्व उत्साहाची, आनंदाची आणि सकारण मनाशीं ठेवलेल्या आशांची एक प्रकारची उत्तरक्रियाच होती ती ! परंतु ती योग्य प्रकारें पार पाडणें आवश्यक होतं. आणि मीच धीर सोडला तर विद्यार्थी कसा ठेवतील हा विचार मनांत ठेवून मी ती पार पाडली !

परंतु ती आटपून क्रीडांगणावरून निवासस्थानीं परत आल्यावर आमच्या सर्वांच्या मनाची प्रतिक्रिया सुरू झाली. सुतक आल्याप्रमाणें आम्हीं सर्वजण एकमेकांशीं चकार शब्दहि न बोलतां कुणी खुर्चींत, कुणी कॉटवर असे पडून राहिलों. आम्ही कोल्हापुरास परत आलों तें याच मनःस्थितींत. पराजय झाला असला तरी सफरीचे हिशोब तयार करणं, बिलं भागविणं, इत्यादि कामं करणं मला भागच होतं. म्हणून आमच्या टीमपैकीं एक खेळाडू श्री. गणपतराव इंदुलकर क्रिकेट खात्याचे चिटणीसहि होते त्यांना मी निरोप धाडला, कीं हिशोब तयार करण्यासाठीं माझ्याकडे या. परंतु हा तरुण विद्यार्थी ( हें आतां कोल्हापूरच्या विधिमंडळाचे अध्यक्ष आहेत ) फारच हळव्या मनाचा होता आणि पराजयाचं दुःख त्यानं फारच लावून घेतलं होतं. त्यानं मला उत्तर धाडलं कीं, " सर, आतां तुम्हींच हिशोब वगैरे सगळं करा. दुःखाचा भयंकर धक्का मला बसलेला आहे. माझा लाडका कुत्रा व बंदुक बरोबर घेऊन डोंगराळ मुलुखांत शिकार करण्यांत चार-सहा दिवस घालविल्याखेरीज माझं मन ताळ्यावर येणार नाहीं ! " मग हिशोबांचं काम मला एकट्यालाच करणं भाग पडलं, परंतु तें उरकल्यावर मलाहि चैन पडण्यासारखं नव्हतं. शील्ड हातचं गेल्याचं दुःख मलाहि

कार झालं होतं ! दूर कुठे तरी आठ–दहा दिवस घालविण्यासाठीं मी कारवारला गेलों.

कारवार येथील आठ–दहा दिवसांच्या मुक्कामांत मी जीं स्थळं पाहिलीं व मला ज्या नमुनेदार व्यक्ती भेटल्या त्यांपैकीं कित्येकांचं चित्र 'मनोहर स्वप्न' आणि 'कारवारची गोष्ट' या दोन लघुकथांत ('लोला आणि इतर गोष्टी' या नांवाच्या माझ्या कथा-संग्रहांत या दोन्ही गोष्टी आहेत.) मी काढलेलं आहे. कारवारचं छोटं शहर, तिथला समुद्रकिनारा, सदाशिवगड, तिथला किल्ला, हळदणकर यांचं छोटसं म्युझियम, शाळा, 'काळी' नदी इत्यादि स्थळं ज्याप्रमाणें त्या भागांत जाणाऱ्या कोणत्याहि मुशाफराला आजदेखील प्रत्यक्ष दिसणारीं आहेत, त्याप्रमाणेंच 'कारवारची गोष्ट' या लघुकथेंतील 'सदाशिवराव' हें पात्र मला भेटलेल्या दोन व्यक्तींचं कलात्मक मिश्रण आहे; आणि 'मनोहर स्वप्न' या लघुकथेंतील छोट्या हॉटेलचा मालक 'साव्या' हें पात्र तर मी माझ्या मुक्कामांत ज्याच्या हातचा खाना रोज खात होतों त्या स्वयंपाक्याच्या नमुन्याबरहुकूम रंगविलेलं आहे. त्याचं नांव देखील खरोखरच साव्या असंच होतं ! कारवारच्या इतर गोष्टी मी कदाचित् विसरेन परंतु माझी 'साव्या'ची आठवण कधीं बुजणार नाहीं !

: : ६० : :

' कलेसाठीं कला ' कीं ' जीवनासाठीं कला ' हा वाद आधुनिक मराठी साहित्यांत केव्हां सुरु झाला त्याची तारीख सांगा म्हटलं तर सांगतां येणार नाहीं. मराठीची गोष्ट सोडून एकंदर साहित्याच्या टीकाशास्त्राच्या दृष्टीनं बोलायचं झालं तर असं म्हणतां येईल कीं हा वाद अनादि आहे. अनंत आहे असंहि म्हणतां येईल. कारण अशा वादांत कोणत्या पक्षाच्या म्हणण्यांत किती सत्य आहे हें जरी स्पष्ट झालं तरी उभय पक्ष पहिल्याच अभिनिवेशानं बोलत राहतात व वाद चालूंच राहातो. आधुनिक मराठी साहित्याच्या इतिहासांत हा वाद कोणत्या निमित्तानं चालू झाला हें मात्र सांगतां येईल. ' प्रतिभासाधन ' या माझ्या ग्रंथांत ' व्यासपीठ नव्हे, मयूर सिंहासन ! ' या मथळ्यावरचं जें प्रकरण आहे त्यांतील प्रतिपादनाच्या निमित्तानं तो वादास प्रारंभ झाला असें म्हणतां येईल.

नंतरच्या दोन-चार वर्षांत हा वाद खूपच रंगला होता. ' कलेसाठीं कला ' ही माझी भूमिका चुकीची आहे हें सिद्ध करण्यासाठीं लहान-मोठे टीकाकार लिहीत होते; आणि कलात्मक लेखन करणारी कांहीं मंडळीहि आपले प्रतिकूल विचार प्रगट करीत होती. एकेका टीकालेखावर लगेच स्वतंत्र उत्तर देण्यापेक्षां साऱ्यांच्या टीका आटपल्या कीं त्यात उपस्थित केले गेलेले सगळे मुद्दे जमवून एकच मोठं उत्तर देण्याचं धोरण मी नेहमीं

पसंत करतों. कला कलेसाठीं कीं जीवनासाठीं याबाबत माझ्या प्रतिपक्षांतल्या लहान्‍-मोठ्या सर्व लोकांना जें कांहीं सांगावयाचं होतं तें सांगून झालं असं जेव्हां मला वाटलं तेव्हां त्या सर्वांच्या मुद्द्यांचा समाचार घेण्यासाठीं, व 'प्रतिभा-साधन' ग्रंथांत जें प्रतिपादन मी केलं होतं तें अधिक विस्तारानं करण्यासाठीं लेखणी हातांत घेण्याचं मी ठरविलं. 'प्रतिभा' या पाक्षिकांत मीं त्या सुमारास बरंच लेखन करीत होतों. मला या वादासंबंधीं पुन्हां एकदां जी सविस्तर चर्चा करायची होती ती या पाक्षिकांतच करण्याचं मी योजिलं. कला जीवनवादी असली पाहिजे असं सांगणाऱ्या लोकांचं प्रतिपादन असं असतं कीं कवि, कादंबरीकार व नाटककार या लोकांनीं प्रचलित, सामाजिक व राजकीय प्रश्नांविषयीं लोकजागृति करण्यासाठींच आपली कला राबविली पाहिजे; तशी त्यांनीं ती राबविली तरच त्यांची कृति प्रशंसनीय ठरेल; व या प्रतिपादनाच्या पुरस्कारांत ते पाश्चात्त्य साहित्याकडे वरचेवर बोट दाखवितात, व साध्या भोळ्या वाचकांची अशी दिशाभूल करतात कीं मोठमोठ्या पाश्चात्त्य लेखकांनीं कला 'जीवनवादी' मानलेली आहे. टीकाकारांचा हा एकंदर पवित्रा किती असमर्थनीय व निराधार आहे तें आतां मीं विस्तारानं दाखविणार होतों. अर्थात् 'प्रतिभा-साधन' ग्रंथांत विवेचनाची जी पद्धति मीं स्वीकारली होती. तिच्यांत थोडी भर घालणं आवश्यक होतं. इंग्रजींत जिला 'डिडक्टिव्ह मेथड' म्हणतात, मराठींत जिला 'सिद्धान्तानुसारी' पद्धत असं म्हणतां येईल ती 'प्रतिभा-साधन' ग्रंथांत मीं स्वीकारली होती. म्हणजे असं कीं सिद्धान्त सांगायचा आणि त्याची फोड करावयाची ही रीति मीं स्वीकारली होती. आतां या पद्धतीनं केलेल्या विवेचनाच्या भरीला दुसऱ्या एका पद्धतीचं विवेचन मला करायचं होतं. या पद्धतीला इंग्रजींत ("इन्डक्टिव्ह मेथड") म्हणतात. मराठींत तिला आपण 'प्रमाणानुसारी' असं नांव देऊं. या पद्धतींत प्रत्यक्ष दाखले एकामागोमाग देऊन त्यांतून अमुक एक सामान्य सिद्धान्त निघतो असं दाखवायचं असतं. या पद्धतीचं विवेचन मला अशासाठीं करायचं होतं कीं ज्या पाश्चात्त्य साहित्याकडे माझे टीकाकार सोइस्कर संदिग्धपणानं वरचेवर बोट दाखवीत होते त्या साहित्यांतल्या ललितकृतींचीं प्रत्यक्ष उदाहरणं देऊन त्यावरून माझाच सिद्धान्त कसा निघतो तें मला दाखवावयाचं होतं.

मी माझ्या एकंदर विवेचनाचे पांच भाग केले, व पांच लेखांक म्हणून ते ' प्रतिभा ' पाक्षिकांत प्रसिद्ध झाले. यांपैकीं पहिल्या लेखांकाचा मथळा ' अक्षर–वाङ्मयाचा गुणविशेष ' असा होता. या लेखांकांत अक्षर-वाङ्मय त्यांतल्या कोणत्या गुणानं अक्षर ठरतं त्याची चर्चा मी केली होती. ' अक्षर ' हा शब्द हें लिखाण करतांना मला कसा सुचला तें सांगतां येत नाहीं. ' विदग्ध वाङ्मय ' असा शब्दप्रयोग पूर्वी हरिभाऊ आपट्यांनीं वापरला होता तो मला नापसंत होता; तो बोजड होता आणि विशेषसा अर्थसूचकहि नव्हता. सुटसुटीत आणि सहज कळण्यासारखा शब्द मी शोधीत होतों, आणि शोधतां शोधता ' अक्षर ' हा शब्द मला सुचला व चांगला वाटला. आतां हा शब्द मराठी साहित्यांत सर्रास रूढ झाला आहे. पहिल्या लेखांकाच्या अखेरीस मी पुढील वाक्यं लिहिलीं होतीं.

"हा सिद्धांत उदाहरणांनीं सिद्ध करणें अवघड नाहीं. ती चर्चा पुढील प्रकरणांत करावयाची आहे. "

अर्थात पुढचे तिन्ही लेखांक पाश्चात्त्य साहित्यांतल्या ललितकृतींच्या उदाहरणांनीं भरलेले होते. ' जर्मन साहित्याची साक्ष ', ' इंग्रजी साहित्याची साक्ष ', ' इंग्रजी नाट्य-साहित्याची साक्ष ', ' इंग्रजी व रशियन कादंबऱ्यांचीं उदाहरणें ' असे त्या लेखांकांचे मथळे होते. या तीन लेखांकांत मीं पाश्चात्त्य साहित्यांतील अक्षर ठरलेल्या शेंकडों ललितकृतींचीं उदाहरणं दिलीं होतीं. प्रत्यक्ष दाखल्यासकट केलेलं हें माझं विवेचन खोडून काढण्याचा प्रयत्न अजून एकाहि टीकाकारानं केलेला नाहीं. या चार लेखांकांनंतर ' समारोप ' अशा मथळ्याचा मी अखेरचा लेखांक तयार केला होता; आणि पहिल्या लेखांकांत मांडलेला सिद्धांत मधल्या तीन लेखांकांत चर्चिलेल्या उदाहरणांवरून कसा प्रस्थापित होतो तें मी या समारोपांत दाखविलं होतं.

मी कारवारला विश्रांतीसाठीं गेलों तेव्हां मला वाटतं या लेखमालेंतला पहिला लेखांक ' प्रतिभा ' पाक्षिकांत प्रसिद्ध झाला होता. पुढच्या लेखांका-बद्दलचे विचार माझ्या मनांत घोळत होते. कारवारची निसर्गशोभा आणि हे विचार या दोन गोष्टींच्या सोबतींत माझे कारवार येथील दिवस मीं घालविले. माझ्या पुढील लेखांकांबद्दलचे विचार शक्य तितक्या लवकर पुरेसे स्पष्ट करण्याबद्दलचा थोडासा तगादा माझ्यामागें होता. कारण नागपूर येथील

मॉरिस कॉलेजच्या 'शारदा मंडळा'चा त्या वर्षी नोव्हेंबरच्या पांच तारखेपासून तीन दिवस जो वार्षिक समारंभ होणार होता, त्याचं अध्यक्षस्थान मीं स्वीकारलं होतं; व त्या अध्यक्षीय भाषणांत माझे हे विचार मांडण्याचं मी ठरविलं होतं. कारवारहून परतल्यावर मी लगेच नागपूरला गेलो. पूर्वी १९२५ सालीं नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजांत मी प्रोफेसर होतों. म्हणजे आतां दहा वर्षांनंतर मी परत नागपूरला जात होतों. अशा पुनर्भेटींत जी एक विशेष मजा असते तिची अपेक्षा करीतच मी गेलों.

'शारदा मंडळा'चा तो वार्षिकोत्सव फारच थाटानं साजरा करण्यांत आला. हल्लीं वर्ध्यास प्रोफेसर असलेले व लेखक म्हणून नांवाजलेले वामन चोरघडे त्या वेळेस मॉरिस कॉलेजमध्यें विद्यार्थी होते व ते 'शारदा मंडळा'चे चिटणीस होते.

वार्षिकोत्सवांतल्या समारंभांतलं माझं मुख्य अध्यक्षीय भाषण नागपूर युनिव्हर्सिटीच्या भव्य सभागृहांत झालं. माझ्या जवळ जवळ दोन तासांच्या भाषणानंतर ज्यांनीं माझ्याजवळ येऊन समक्ष अभिनंदन केलं त्यांत नागपूर युनिव्हर्सिटीचे व्हाइस चॅन्सेलर श्री. नियोगी होते. भाषणाची प्रशंसा करून ते मला म्हणाले, "तुमचं व्याख्यान अत्यंत आधुनिक वाटलं." त्यांच्या प्रशंसेंतील 'आधुनिक' या शब्दानं माझं विशेष समाधान झालं. कारण माझ्या व्याख्यानांना सुंदर हें विशेषण सगळेच श्रोते लावतात. परंतु ते विशेष सुंदर कोणत्या गुणामुळें वाटतं याचा विचार फार थोड्यांना करतां येतो. माझ्या वक्तृत्वाची धाटणी आणि बोलतांना हातांचे हावभाव विशेष न करतां केवळ चर्चेवरील भावांनीं मी जें बोलत असेन तें खुलविण्याची माझी तऱ्हा, आणि इंग्रजी भाषेंत जो 'ॲक्सेंट' आहे व ज्या 'ॲक्सेंट'मुळें इंग्रजी भाषण श्रुतिमनोहर वाटतं तसा 'ॲक्सेंट' मराठी बोलण्यांत आणण्याचा माझा प्रयत्न इत्यादि गोष्टींना 'आधुनिक' असं विशेषण देतां येईल. ही आधुनिकता मीं प्रयत्नपूर्वक कमावलेली आहे. आणि ज्या श्रोत्यांना माझ्या वक्तृत्वांतला हा विशेष गुण कळतो त्यांची प्रशंसा मला विशेष आवडते. मराठीप्रमाणेंच इंग्रजी व्याख्यान देतांना या आधुनिकतेच्या गुणांकडे मी कटाक्षानं लक्ष देतों. नागपूरच्या त्या मुक्कामांत मुख्य समारंभांतल्या अध्यक्षीय भाषणाखेरीज इतर ठिकाणींहि मला आणखी व्याख्यानं द्यावीं

लागलीं. हिस्लॉप कॉलेजमधील मराठी मंडळ मींच १९२५ सालीं स्थापन केलं होतं, त्या मंडळापुढें व्याख्यान देणं माझं कर्तव्य होतं. परंतु नागपूर युनिव्हर्सिटीच्या युनियननं माझं एक इंग्रजी व्याख्यान मुद्दाम आधींपासून मुक्रर केलं होतं. माझं हें इंग्रजी व्याख्यान ऐकल्यानंतरहि श्री. नियोगी यांनीं माझं पुन्हां अभिनंदन केलं आणि ते मला म्हणाले, "अगदीं संपूर्ण आधुनिकता हा तुमच्या वक्तृत्वाचा विशेष आहे."

नागपूरहून मी परत आल्यावर कांहीं दिवसांनी मी 'आशा' ही कादंबरी लिहावयास लागलों. 'उद्धार' कादंबरी संपल्यानंतर 'फडक्यांची आणखी एक कादंबरी पाहिजे' अशी मागणी 'किर्लोस्कर' मासिकाच्या वाचकांनीं केली होती. वास्तविक 'उद्धार' कादंबरी 'किर्लोस्कर' मासिकांत पूर्ण झाल्याबरोबर माझी नवी कादंबरी सुरू व्हावी अशी शंकरराव किर्लोस्कर यांची इच्छा होती. पण मध्यंतरीं बरींच व्यवधानं आल्यामुळें मला नव्या कादंबरीचं लेखन सुरू करता आलं नाहीं. १९३६ साल उजाडल्याबरोबर तरी माझी नवी कादंबरी सुरू झाली पाहिजे असा संपादकांचा तगादा असल्यामुळें १९३५ चा डिसेंबर महिना लागला तेव्हां 'आतां मात्र उशीर करून चालणार नाही' अशा विचारानं मी नवी कादंबरी लिहावयास घेतली, व 'आशा' असं तिचं नांव कायम केलं. ही कादंबरी शक्य तितक्या लवकर हातावेगळी करण्याचा माझा बेत होता.

परंतु एके दिवशीं अकस्मात् बडोद्याच्या त्या वेळच्या राणीसाहेब चिमणाबाई यांच्याकडून एक पत्र मला आलं. त्या पत्रांत त्यांनीं लिहिलं होतं, "आपण शक्यतों ताबडतोब आमची गांठ घ्यावी. आमचं कांहीं महत्त्वाचं काम आहे." या पत्राप्रमाणें नाताळाची सुट्टी सुरू झाल्याबरोबर मी बडोद्यास गेलों व श्रीमंत चिमणाबाईंना भेटलों. त्यांच्या बोलण्याचा आशय असा होता की, मिस् मियोच्या 'मदर इंडिया' या पुस्तकानं हिंदुस्थान देशाची आणि विशेषतः हिंदी स्त्रियांची जी बदनामी जगभर केली होती तिला उत्तर म्हणून झांशीची राणी लक्ष्मीबाई हिच्या चरित्रावर एक इंग्रजी चित्रपट हॉलिवुडमधील कोणत्या तरी नामांकित कंपनीकडून काढून घेण्याचं त्यांच्या मनांत होतं; आणि या चित्रपटासाठी मी कथानक लिहावं अशी त्यांची इच्छा होती.

त्यांची ही इच्छा ऐकून मला अर्थात्च फार आनंद झाला व त्यांची कामगिरी अंगावर घेण्याचं कबूल करून मी परत आलों.

माझं १९३५ साल कसं काय गेलं याचा मी विचार करूं लागलो तेव्हां ' एकंदरींत फार सुखाचं गेलं ' असंच मला वाटलं. या वर्षाच्या अखेरीस चिमणाबाईच्या मुलाखतीची जी घटना झाली होती तिच्यांतून कदाचित् फारच चांगल्या गोष्टी निष्पन्न होतील अशी माझी अपेक्षा होती. त्यामुळें या वर्षाचा शेवट फार चांगला झाला असं मला वाटत होतं. मात्र वर्षाच्या अखेरीस घडलेल्या या घटनेहूनहि मला अधिक आनंद देणारी, आणि जिचा पुढें माझ्या आयुष्यावर फारच मोठा आणि अत्यंत सुखाचा परिणाम होणार होता अशी, एक लहानशी गोष्ट या वर्षाच्या आरंभीच घडली होती. ती गोष्ट अशी कीं, संक्रान्तीच्या दुसऱ्या दिवशीं माझ्या विद्यार्थिनींपैकीं एकीनं एका सुंदर पिशवींत घातलेला तिळगूळ व त्याबरोबरच एका पाकिटांत घातलेली स्वतः तयार केलेली एक कविता मला भेट म्हणून दिली.

मी एक तास आटोपून कॉमन रूममध्यें इतर प्रोफेसरांशीं गप्पा मारीत बसलों होतों. इतक्यांत ती खोलीच्या दारांत आली व तिनं मला खुणेनं बोलावलं. मी तिच्याजवळ गेल्यावर तिळगुळाची पिशवी आणि कवितेचं पाकिट माझ्या हातीं देऊन ती फक्त हंसली. आणि " हें काय आहे ? " असा प्रश्न मी विचारतांच ती हंसत हंसत पळून गेली.

तिनं माझ्या हातीं काय दिलं तें नीट पाहिल्यावर मला फार आनंद झाला. कारण यापूर्वीं बरेच दिवसांपासून मला ती आवडूं लागली होती. ती देखणी होती. तिच्या चर्येवर बुद्धीचं तेज होतं. आणि विशेष म्हणजे तिची वृत्ति फार काव्यलोलुप आणि रसिक असली पाहिजे असं मला वाटत होतं. एकदां लॉजिकच्या तासाला मी विद्यार्थ्यांना कांहीं मजकूर लिहावयास सांगत असतांना मी मध्येंच चमकलों होतों. आमच्या कॉलेजच्या बागेंतल्या झाडावर कोकिळा आपला मधुर स्वर काढीत होती ! मी चमकलों, आणि, कां कोण जाणें, माझी नजर या विद्यार्थिनीकडे गेली. ती वर मान करून माझ्याकडेच पहात होती, आणि ' ऐकलंत ? कोकिळा ! ' असं तिची हंसरी चर्या स्पष्ट म्हणत होती. मीहि नजरेनं उलट जबाब दिला ' कोकिळा !

ऐकलंस ? ' आम्ही दोघेंहि एकमेकांकडे पहात पुन्हां हंसलों. मी विद्यार्थ्यांना मजकूर पुढें सांगूं लागलों. तिची व माझी ती दृष्टादृष्ट क्षण अर्धा क्षणच झाली असेल, परंतु त्या अर्ध्या क्षणांत माझ्या व तिच्या पुढच्या जीवनांतल्या किती तरी घटनांचीं बीजं होतीं !

— आणि आतां तिनं मला मुद्दाम तिळगूळ आणून दिला होता व स्वतः केलेली कविता त्याबरोबर दिली होती !

या विद्यार्थिनीचं नांव कमल दीक्षित !

तिची ती भेट पाहिल्यावर त्या वेळच्या आनंदात मी मनाशीं म्हटलें, तुझा तिळगूळ मिळाला. थँक्स् एवढंच आपण तिला उलट म्हणण्यांत काय भूषण आहे ? तिला जें आभारप्रदर्शक उत्तर द्यायचं तें कवितेच्या स्वरूपांत आपण द्यायला हवं. मी कविता करण्याच्या छंदांत फारसा पडत नाहीं. परंतु असल्या विशेष आनंदाच्या एखाद्या प्रसंगीं मला काव्यरचनेची लहर येते. मी कविता तयार केली, आणि दुसरे दिवशीं कमलला कॉमनरूमकडे बोलावून घेऊन तिच्या हाती दिली. तिनं विचारलं, “ हें काय ? ” मी म्हटलं, “ काल तूं मला भेट दिलीस ना, त्याचं हें उत्तर. ” मी दिलेलं पाकिट तिनं हातीं घेतलं, व ती हंसत हंसत पळून गेली.

माझी कविता पुढीलप्रमाणं होती :

साध्या तिळांत मधु आशय साखरेचा
काव्यांतला विमल आशय भावनेचा
सेवोनिया परम हर्ष मनास झाला
सांगावयास अपुरी शतशब्दमाला ॥ १ ॥

माझ्या अंगीं तिळभर नसे काव्यकौशल्यलीला
नाहीं ठावे चढविती कसे गोड कांटे तिळांना
जें वाटावें मधुर तुजला काय द्यावें कळेना
देतों प्रेमें रुचिर करुनी घेई आशीर्वचांना ॥ २ ॥

## : : ६१ : :

बडोद्याच्या चिमणाबाई राणीसाहेबांच्या विनंतीवरून मी झांशीची राणी लक्ष्मीबाई हिच्या चारित्रावर चित्रपटकथा लिहिण्याचं जेव्हां कबूल केलं, तेव्हां या कामांतून कांहीं तरी विशेष चांगल्या गोष्टी निर्माण होतील अशी मला खात्री वाटत होती. चित्रपटकथा लिहिण्याच्या कामाचा तुम्हांला अमुक मोबदला मिळेल असें चिमणाबाई म्हणाल्या नव्हत्या; अथवा त्यांना मोबदल्याबद्दल विचारणं प्रशस्त ठरेल असं मलाहि वाटलं नव्हतं. त्यांनीं जेव्हां विचारलं, "किती दिवसांत चित्रपटकथा लिहून तयार होईल ?" तेव्हां मी म्हटलं होतं, "मार्चच्या पहिल्या आठवड्यांत होईल."

म्हणून बडोद्याहून परत आल्याबरोबर मी त्या कामाला लागलों. ता. ९ मार्च रोजीं मी चिमणाबाईंना कळविलं कीं चित्रपटकथा लिहून पूर्ण झाली आहे. त्यांनीं लगेच मला बडोद्यास बोलावून घेतलं. त्याप्रमाणें गेल्यावर मी त्यांना चित्रपटकथा (अर्थात् इंग्रजींत लिहिलेली) वाचून दाखविली. ती ऐकून त्या अतिशय खूष झाल्या व पुढें काय व्यवस्था करावयाची याबद्दल गोष्टी बोलूं लागल्या. 'रेन्स् केम' कादंबरीचे नांवाजलेले लेखक लुई ब्रॉमफील्ड यांचा व राणीसाहेबांचा स्नेह होता. हे लुई ब्रॉमफील्ड त्या सुमारास मुंबईत होते. त्यांच्या कांहीं कादंबऱ्यांचं चित्रपटांत रूपांतर झालेलं होतं, व त्यांचा सल्ला आणि मदत मिळाली तर झाशीच्या राणीच्या

चरित्रावरील चित्रपट हॉलीवुडमध्यें तयार करवून घेण्याचा आपला बेत सुकर होईल असं राणीसाहेबांना साहजिकच वाटलं. मी वाचून दाखविलेली चित्रपटकथा जेव्हां त्यांना आवडली तेव्हां आतां पुढें काय काय केलं पाहिजे याबद्दल बोलतां बोलतां एकदम आठवण झाल्याप्रमाणें मुद्रा करून त्या मला म्हणाल्या, " आपण मुंबईस जाऊन लुई ब्रॉमफील्ड यांना भेटाल काय, व त्यांना चित्रपटकथा वाचून दाखवाल काय ? " मीं म्हटलं, " जरूर. " त्यांनी लगेच टेलिफोन करून लुई ब्रॉमफील्ड मुंबईच्या ताजमहाल हॉटेलमध्यें राहात होते त्यांच्याशीं बोलणं केलं, व अमुक अमुक कामासाठीं मी प्रो. फडक्यांना तुमच्याकडे पाठवीत आहे असं सांगितलं. मी लगेच रात्रीं बडोद्याहून निघालों, आणि सकाळीं ताजमहाल हॉटेलमधील लुई ब्रॉमफील्ड यांच्या खोलीवर दाखल झालों.

ब्रॉमफील्ड यांच्या कांहीं कादंबऱ्या मीं वाचल्या होत्या. त्या मला अगदीं सामान्य वाटल्या होत्या. " रेन्स् केम " या त्यांच्या कादंबरीचा बोलबाला झाला होता व तिच्यावरून चित्रपट तयार होणार आहे असं मी ऐकलं होतं. ती कादंबरीदेखील मला विशेष योग्यतेची वाटली नव्हती. तथापि ' दी मोस्ट वाइड्ली रेड ऑर्थर ' ( ज्याच्या कादंबऱ्या सगळ्यांत अधिक वाचकांकडून वाचल्या जातात असा लेखक ) असं ब्रॉमफील्ड यांचं वर्णन मी वृत्तपत्रांत वाचलं होतं. तेव्हां एका आंतरराष्ट्रीय लौकिकाच्या लेखकाला आपण भेटणार आहोंत आणि माझी इंग्रजींत लिहिलेली चित्रपटकथा वाचून दाखविणार आहोंत, ही जाणीव माझ्या मनांत साहजिकच होती. या जाणीवेनंच मी ताजमहाल हॉटेलवरील खोलीच्या दारावर टकटक केलं. ' येस, कम् इन् ' असं आंतून उत्तर आलं. मी दार लोटलं व खोलींत पाय टाकला. समोर जो गृहस्थ दिसला त्याला गुड मॉर्निंग करून मी माझं नांव सांगितलं. त्यानं हंसत हंसत हस्तांदोलन केलं व म्हटलं, " तुमची वाटच पहात होतों. " मी मनाशीं म्हटलं, हा लुई ब्रॉमफील्ड काय ? त्याचा कादंबरीकार या नात्याचा दर्जा मला जरी मोठा वाटला नसला तरी तो मोठा देखणा होता हें माझ्या मनानं तात्काळ कबूल केलं. मध्यम उंचीचा, एखाद्या सर्कसमधला खेळाडू शोभेल इतक्या सुदृढ बांध्याचा, आणि अतिशय नीटस चेहऱ्याचा तो गृहस्थ होता. त्यानं कपडे केलेले नव्हते.

फक्त एक तलम रेशमी गंजिफ्रॉक, आणि जणूं त्याला आतां कुस्तीच्या आखाड्यांतच उतरायचं होतं असं पहाणाराला वाटावं अशा तऱ्हेची अतिशय उंची मखमलीची चड्डी त्याच्या अंगावर होती, व भारी किंमतीचा रंगीत साटिणीचा गाऊन यानं अंगाभोंवतीं पांघरला होता. हा गृहस्थ मोठा विलासी असला पाहिजे असं मला वाटलं. रेशमी कमरपट्ट्याच्या टोकांच्या झुबकेदार झिरमिळ्यांशीं हातांनीं खेळत तो मला म्हणाला, " बसा ना. सिगरेट घ्या. "

इकडच्या तिकडच्या थोड्या गप्पा झाल्यावर मी त्याला म्हटलं, " मी कोणत्या कामासाठीं आलों आहे हें आपणांस माहीत आहे ? "

तो म्हणाला, " होय. "

मीं विचारलं, " मग आपणांला वाचून दाखवायला प्रारंभ करूं काय ? "

तो गृहस्थ म्हणाला, " तुमची हरकत नसेल तर जरा थांबूं या. मिस्टर ब्रॉमफ्रील्ड आतां इतक्यांत येतील, आणि मग— "

तें ऐकून मी चाकितच झालों. मी मनाशीं म्हटलं, म्हणजे हा गृहस्थ ब्रॉमफील्ड नव्हेच तर ? मी शक्य तितका शिष्टाचार संभाळून त्या गृहस्थाला त्याचं नांव विचारलं. तो म्हणाला, " माझं नांव जॉर्ज हॉकिन्स; मी मिस्टर ब्रॉमफील्ड यांचा सेक्रेटरी आहे. "

बापरे ! ब्रॉमफील्ड यांच्या सेक्रेटरीचा जर एवढा थाट होता तर प्रत्यक्ष त्यांचा दिमाख आणि रुबाब केवढा असेल असं मी मनाशीं उद्गारलों; आणि आतां अगदीं भयंकर थाटमाट केलेला कोणी तरी इसम आपल्या दृष्टीस पडणार म्हणून वाट पाहात राहिलों.

दुसऱ्या क्षणीं लुई ब्रॉमफील्ड खोलींत आले व त्यांना पहातांच मला विस्मयाचा आणखी एक धक्का बसला. लुई ब्रॉमफील्ड यांचा वेष कमालीचा साधा होता. हात-सुताच्या व हात-विणीच्या खादीची पँट व तसल्याच खादीचा शर्ट आणि कोट त्यांच्या अंगावर होता, आणि पायांत साध्या पठाणी वहाणा होत्या. त्यांच्या चर्येवरील भावहि अगदीं सात्त्विक व प्रेमळ एखाद्या कळकळीच्या मिशनऱ्याला शोभावा असा होता. मी ज्या कामासाठीं त्यांच्याकडे गेलों होतों तें काम आटपल्यानंतर ते माझ्याशीं पुष्कळच

वेळ बोलत राहिले. हिंदुस्थानाविषयीं आणि हिंदी लोकांविषयीं त्यांच्या मनांत विशेष जिव्हाळा होता असं दिसलं. मी त्यांचा निरोप घेऊं लागलों तेव्हां कधींमधीं पत्र लिहीत जा असं ते मला म्हणाले. " तुम्हांला कोणत्या पत्त्यावर मी पत्र लिहूं ? " असा प्रश्न मी केला तेव्हां त्यांनीं उत्तर दिलं, " मी एके ठिकाणीं स्थिर असा फार थोडा असतो. कधीं इंग्लंडमध्यें, कधीं अमेरिकेंत, कधीं फ्रान्समध्यें असा मी हिंडत असतों. परंतु फ्रान्समध्यें 'सेनालिस नंबर २, ऑइस एंटीनें ' या रस्त्यावर माझा बंगला आहे. या पत्त्यावर मला लिहिलंत कीं मी कुठेंहि असलों तरी तुमचं पत्र मला मिळेल. " जो गृहस्थ सतत त्रिखंड प्रवास करण्याइतका संपन्न होता, जॉर्ज हॉकिन्ससारख्या गृहस्थाला ज्यानं सेक्रेटरी म्हणून नोकरीला ठेवलं होतं, ज्याचा फ्रान्समध्यें एक मोठा बंगला होता, ( अलीकडे तर मीं वाचलं आहे कीं ब्रॉमफील्ड यांनीं कॅलिफोर्नियांत शेंकडों एकर जमीन विकत घेऊन तिथें शेती बागायती केली आहे ! ) त्या गृहस्थाचा पोषाखांतला अतीव साधेपणा आणि निगर्वी स्वभाव पाहून मला त्यांच्याविषयीं आदर वाटला.

माझ्या चित्रपटकथेची त्यांनीं अतिशय प्रशंसा केली, व हा चित्रपट अवश्य काढून घेण्याबद्दल आपण चिमणाबाईजवळ शिफारस करूं असं त्यांनीं मला सांगितलं.

ताजमहाल हॉटेलमधून मी बाहेर पडलों तेव्हां मी लिहिलेल्या कथानका-वरून हॉलिवुडमध्यें तयार झालेल्या चित्रपटाचीं स्वप्नं मला पडत होतीं. या चित्रपटाला लागेल तेवढा पैसा खर्च करण्याच्या गोष्टी चिमणाबाई बोलल्या होत्या. जें कथानक मी तयार केलं तें लुई ब्रॉमफील्डसारख्या अनुभवी लेखकानं एकदम पसंत ठरविलं होतं. मग आतां लवकरच चित्रपट तयार होणार याबद्दल शंका बाळगायला कुठें जागा होती ? साऱ्या गोष्टी जमून आल्याप्रमाणें मला वाटत होत्या.

पण मी एक गोष्ट हिशोबांत घेतली नव्हती ?

ती म्हणजे बड्या लोकांचा लहरीपणा !

चिमणाबाईनीं मला सांगितलं कीं, " आम्ही स्वतःच अमेरिकेला जाण्याचा बेत करीत आहोंत. आम्ही जाऊं त्या वेळेस तुम्हांलाहि आमच्या-

बरोबर यावं लागेल. ( मी मनाशीं म्हटलं, नाहीं कोण लेकाचा म्हणतो ? ) आपण हॉलिवुडला जाऊं आणि मेट्रोशीं कॉन्ट्रॅक्ट करून टाकूं. ''

मी परत आलों व चिमणाबाईंचा अमेरिकेला जाण्याचा बेत केव्हां ठरतो त्याची वाट पाहूं लागलों.

एके दिवशीं मला कळलं की, त्या युरोपच्या सफरीसाठीं गेल्यासुद्धां.

चार महिन्यांनीं त्या परत आल्या व त्यांनीं मला भेटीसाठीं मुंबईस बोलविलं. मला वाटलं, त्या कांहीं तरी पक्कं ठरवून आल्या असल्या पाहिजेत. पण " चित्रपट काढायचा म्हणजे पैसे फार लागतात. इतके पैसे कोठून आणावयाचे ? तुम्हांला नाहीं का हें कथानक कुठें खपवितां येणार ? '' अशाप्रकारचं बोलणं त्यांनीं सुरू केलं.

त्यांची लहर बदलली होती हें मी ओळखलं आणि त्यांची लहर पूर्वस्थळावर आणण्यासाठीं कांहीं करणं शक्य नव्हतं हेंहि मला समजत होतं. मी त्यांचा निरोप घेतला.

तरीदेखील " चित्रपट काढण्याची कल्पना आपण कांहीं अगदींच सोडून दिली नाहीं '' असं त्यांच्याकडून मला वरचेवर कळत असे. परंतु या गोष्टीला विशेष महत्त्व द्यायला मी तयार नव्हतों.

नंतर कांहीं दिवसांनीं तर बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड मृत्यु पावले. चिमणाबाईंना आतां पैशाच्या सबबीच्या भरीला दुखवट्याची आणखी एक सबब मिळाली. हॉलिवुडमधील एखाद्या नामांकित कंपनीकडून झांशीच्या राणीच्या चरित्रावर चित्रपट तयार करून घेण्याची त्यांची कल्पना कायमची विराम पावली ! ' दरिद्री माणसाचे मनोरथ उत्पन्न होतात आणि विलीन पावतात ' असं एक संस्कृत सुभाषित आहे. या सुभाषितांत पक्त अर्धेच सत्य आहे. कारण बड्या श्रीमंतांचे मनोरथ दरिद्री माणसांच्या मनोरथाहूनही अधिक वेगानें उत्पन्न होत असतात आणि विराम पावत असतात.

चित्रपटकथा लिहिण्याचं चिमणाबाईंजवळ कबूल करतांना मी मोबदल्याची भाषा केली नव्हती. परंतु चित्रपट काढून घेण्याचा बेत जरी आता उरला नसला तरी माझा मेहनताना दिला पाहिजे असं त्यांना वाटेल अशी मी

कल्पना केली होती. परंतु त्यांच्याकडून ही भाषा मुळींच होईना. पुष्कळ दिवस वाट पाहिल्यानंतर अखेर मी त्यांना या बाबतींत पत्र लिहिलं. प्रारंभीं नरमपणानं लिहिलं, नंतर निराळ्या भाषेंत लिहिलं. इतकं झाल्यानंतर मात्र चिमणाबाईकडून एके दिवशीं तीन हजारांचा चेक माझ्याकडे आला.

अशा प्रकारें आमच्या झाशीच्या राणीचा इतिहास आटोपला ! मी हॉलीवुडला जाईन असं मला वाटलं होतं, परंतु बडोद्याच्या व मुंबईच्या खेपा एवढाच आमचा प्रवास झाला ! त्यांतल्या त्यांत समाधान एवढंच होतं कीं चित्रपटकथा लिहिण्यासाठीं मी केलेल्या श्रमांचा मोबदला मला मिळाला होता. परंतु ज्या आशा माझ्या मनांत सकारण निर्माण झाल्या होत्या त्यांच्या दृष्टीनं हें समाधान किती थोडं होतं ! पण कांहीं तरी भयंकर चांगलं घडणार आहे अशी अपेक्षा नेहमीं ठेवावी, आणि कांहीं तरी भयंकर वाईट घडलं तर त्याचीहि मनानं तयारी ठेवावी हें या जीवितांतलं सर्वोत्कृष्ट तत्त्वज्ञान असं मीं मनाशीं ठरविलेलं आहे. हें तत्त्वज्ञान माझ्या नेहमीं फार उपयोगी पडलेलं आहे, व या तत्त्वज्ञानामुळेंच माझं मन सदैव स्थिर व वृत्ति सदैव तारुण्याची आणि उत्साहाची मी ठेवू शकलों आहें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ६४३२८ दि. ८/१/८५
दा. क्र. १६३०८

: : ६२ : :

१९३६ सालच्या प्रारंभींची एक हकीगत सांगण्यासारखी आहे. ती म्हणजे 'बाईसाठीं बुवा' ही छोटी नाटिका मी लिहिली व तिची ध्वनिमुद्रिका तयार झाली त्याबद्दलची.

माझ्या 'युगांतर' नाटकांतील पदांचीं हिराबाईंनीं रेकॉर्डस् दिलीं त्याच्या जरा आधीं कांहीं ख्यालाच्या ध्वनिमुद्रिका त्यांनीं दिल्या होत्या. ज्या कंपनीनं या घेतल्या ती हिंदुस्थानांत नुकतीच स्थापन झालेली एक जर्मन कंपनी होती. त्या कंपनींत ध्वनि-मुद्रण करणारा एक जर्मन माणूस होता, व तो आपल्या कामांत अतिशय वाकबगार आणि चतुर होता. त्यानं हिराबाईंच्या चिजांचं रेकॉर्डिंग इतकं उत्कृष्ट केलं होतं कीं हिराबाईंच्या त्या रेकॉर्डसनीं खपाच्या बाबतींत त्या वेळचं रेकॉर्ड निर्माण केलं. त्या कंपनीचं नांव 'ओडियन रेकॉर्डिंग कंपनी' असं होतं. या कंपनीच्या मुंबईच्या व्यवहाराची व्यवस्था मुबईचे श्री. फाटक पाहत असत. श्री. फाटक म्हणजे एक नमुनेदार व्यक्ति होऊन गेली. धंद्यांतलं कसब तर त्यांच्या अंगीं कमालीचं होतंच. परंतु शिवाय अगणित मित्रपरिवार जोडण्याची कला त्यांनीं साध्य केली होती. त्यांच्या संगीताच्या षोकाला मर्यादाच नव्हती आणि त्यांना नुसताच षोक नव्हता तर संगीतांतलं मर्म ओळखणारे ते जाणते रसिक होते. कमालीचा आनंदी मनुष्य कसा असतो त्याचं एक दुर्मिळ उदाहरण होतं ते.

त्यांचा चेहरा सचिंत आणि कष्टी झालेला कुणी पाहिला असेल तर मला स्वतःला ते दिसले नेहमीं हंसत असलेले आणि विनोदी संभाषणाचे भुकेलेले. त्यांचा माझा प्रथम परिचय झाला त्याच्या आधीं ते नुकतेच अपघातांत सांपडले होते व त्यांचा सबंध उजवा हात खांद्यापासून कापून काढलेला होता. परंतु त्या अपघातानं त्यांचा फक्त हात हिरावून नेला होता. त्यांचा रंगेल आनंदी स्वभाव त्या दुर्दैवाला हिरावून घेतां आला नव्हता.

श्री. फाटक एके दिवशीं मला म्हणाले, "आमच्यासाठीं एक छोटी नाटिका लिहा ना. आपण त्या नाटिकेच्या ध्वनिमुद्रिका काढूं. असा उपक्रम अजून कुणी केलेला नाहीं. ही टूम यशस्वी होईल, खात्री आहे. मग, लिहिणार कीं नाहीं आमच्यासाठीं नाटिका?" मी म्हटलं, "पाहूं या." ते म्हणाले, "पाहूंबिहू नाहीं चालायचं. केव्हां लिहितां बोला." मी म्हटलं, "वाटेल तेव्हां." ते म्हणाले, "ठीक आहे. चार दिवसांत नाटिका तयार झाली पाहिजे."

मीं नाटिका लिहून त्यांना वाचून दाखविली तेव्हां ते म्हणाले, "झकास आहे. पण या नाटिकेंत तुम्हीं स्वतः काम केलं पाहिजे." त्यांच्या हौसेच्या आणखी पुढेंच धांवणारी माझी हौस होती. मी त्याचं म्हणणं कबूल केलं, नाटिकेंत मुख्य पात्रं तीनच होतीं, दोन स्त्रिया व एक पुरुष. हिराबाई, त्यांच्या भागिनी कमलाबाई आणि मी अशीं तीन पात्रं ठरलीं. म्हाताऱ्या बापाचं काम होतं तें हिराबाईच्या कंपनीचे मॅनेजर हर्डीकर यांनीं पत्करलं. तालमी सुरू झाल्या. मग लक्षांत आलं कीं, या नाटिकेंत मध्येंच एक तारेचा शिपाई तार घेऊन येतो, त्या शिपायाच्या कामासाठीं कोणी तरी पाहिजे. वसंतराव देसाई ( म्हणजे वसंत शांताराम देसाई ) फाटकांचे दोस्त होते व त्यांना त्या वेळीं सुटी असल्यामुळें ते तालमींच्या वेळीं हजर असत. आमची अडचण ओळखून ते म्हणाले, "हात तिच्या! त्यांत काय, मी करतों तें काम. एक वाक्य बोलायचं एवढंच ना?" मला कळत होतं कीं हें काम जर रंगभूमींवर करण्याचा प्रश्न असतां तर वसंतराव कधींच पुढें आले नसते. ध्वनिमुद्रिका तयार करतांना रंगावं लागत नाहीं कीं स्टेजवर यावं लागत नाहीं. सगळा खेळ फक्त शब्दांचा! शब्द बोलणारी व्यक्ति कोण तें लोकांना

समजण्याचा संभव बिलकूल नव्हता म्हणूनच वसंतराव शौर्यानं पुढें आले होते ! परंतु त्यांच्या रुकारामागची भूमिका कांहीं का असेना, त्यांनीं हौसेनं तत्परता दाखविल्यामुळें आमची अडचण संपली होती एवढं खरं ! आम्हांला तारवाला शिपाई मिळाला होता !

या तारेच्या शिपायाच्या तोंडी " बाबासाहेब, बाबासाहेब ! तुमची तार आहे. " एवढं एकच वाक्य होतं. तालीम सुरू झाली कीं तारवाल्या शिपायाच्या प्रवेशाची वेळ आल्यावर आम्हीं वसंतरावांना इशारा देत असूं, व ते दूर कोठें तरी पान-तंबाकू खात कुणाशीं तरी गप्पा मारीत बसलेले असत ते एकदम आमच्याजवळ येत व आपलं वाक्य म्हणून टाकीत. तंबाकूचा रस तोंडांत सावरीत तें वाक्य ते बोलत त्यामुळें आपोआपच तारवाला शिपाई म्हातारा असल्याचा ' इफेक्ट ' निर्माण होत असे, व आम्हीं भयंकर हंसत सुटत असूं. एकदां तालमीच्या वेळेस विनोदांत भर घालण्यासाठीं, ' बाबासाहेब, तुमची तार आहे. ' असं म्हणण्याऐवजीं वसंतराव म्हणाले, " तारासाहेब, तुमची बाब आहे. " तें ऐकून आमची हंसतां हंसतां मुरकुंडी वळली. श्री. फाटक गांभीर्याचं खोटं अवसान आणून म्हणाले,

" वसंतराव, प्रत्यक्ष रेकॉर्डिंगच्या वेळेस ही गंमत करूं नका हं. रेकॉर्डिंग फुकट जाईल. तुम्हांला कंपनीचे आर्टिस्ट म्हणून या एका वाक्या-बद्दल जी फूल ना फुलाची पाकळी देणार आहोंत ती तुम्हांला मिळायची नाहीं. "

वसंतराव म्हणाले, " छे छे, रेकॉर्डिंगच्या वेळेस मी बरोबर तेंच वाक्य बोलतों कीं नाहीं पहा. "

असं म्हणून प्रत्येक तालमीच्या वेळेस त्यांनीं आपला विनोद चालू ठेवला. मला भीती वाटूं लागली कीं वसंतरावांच्या तोंडांत तेंच वाक्य बसेल व प्रत्यक्ष रेकॉर्डिंगच्या वेळीं ते घोटाळा करतील.

परंतु तसं झालं नाहीं.

रेकॉर्ड घेतल्यावर आम्हीं लगेच ते ऐकलं तेव्हां सबंध नाटिका उत्कृष्ट तऱ्हेनं रेकॉर्ड झालेली दिसली. कुणाचं काम सगळ्यांत चांगलं वठलंय

याबद्दल आमच्यांत चर्चा सुरू झाली तेव्हां वसंतराव म्हणाले, “ अरे, तुमचीं बाकीच्यांचीं कामं राहूं द्या. तारवाल्याचं काम बेमालूम झालंय कीं नाहीं बोला. ” त्यांच्या नेहमींच्या संवयीप्रमाणें त्यांनीं उजवा हात पुढें करून टाळी मागितली, ती मीं त्यांना दिली व म्हटलं, “ वसंत शांताराम देसाई हें नांव केवळ नाटककार म्हणून नव्हे तर नट म्हणूनसुद्धां रंगभूमीच्या इतिहासांत नमूद करणं इतिहासकाराला भाग पडणार खरं ! ”

१९३६ साल माझ्या लेखनाच्या दृष्टीनं विशेष सुगीचं साल होतं. या वर्षांत मी झांशीच्या राणीच्या चारित्राची चित्रपटकथा इंग्रजींत लिहिली, ‘ आशा ’ कादंबरी लिहून पूर्ण केली, ती संपल्यावर ‘ काश्मिरी गुलाब ’ लिहावयास घेतली, ती अवघ्या दीड महिन्यांत संपविली, ‘ तोतया नाटककार ’ हें अपुरं राहिलेलं नाटक पूर्ण केलं, नंतर सप्टेंबर महिन्यांत ‘ प्रवासी ’ कादंबरी लिहूं लागलों, याखेरीज १९३४ सालीं शंकरराव किर्लोस्करांनीं ‘ मनोहर ’ मासिक नव्यानं काढलं त्यांत प्रारंभापासून वारंवार मी लिहीत होतोंच किर्लोस्करमध्यें चालू कादंबरीखेरीज माझ्या गोष्टी व लेख येत होतेच, आणि या सर्वांच्या भरीला ‘ कला ’ नांवाचं नवं मासिक गोमंतकांत सुरू झालं होतं त्यांत मी नियमानं लिहीत होतों, ‘ आशा ’, ‘ काश्मिरी गुलाब ’ व ‘ प्रवासी ’ या कादंबऱ्यांबद्दल मी यथावकाश माझ्या आठवणी सांगणारच आहे. पण त्या सांगण्याच्या आधीं इतर कांहीं गोष्टी आठवतात.

‘ कला ’ मासिक काढणारे श्री. बाबूराव आग्क्षीकर यांची माझी ओळख नव्हती. परंतु त्यांनीं त्यांच्या मासिकांत नियमानं लिहिण्याबद्दल मला विनंति केली व मी मागितला तेवढा मोबदलाहि देऊं केला. माझ्या मनास जें येईल तें मी लिहावें अशी श्री. आग्क्षीकरांनीं संमति दिली होती, परंतु त्यांतल्या त्यांत मी गुजगोष्टी लिहिल्या तर अधिक बरं अशी विनंति केली होती. मी माझ्या ‘ रत्नाकार ’ मासिकांत गुजगोष्टी लिहिल्या त्याला आतां जवळ जवळ दहा वर्षें झालीं होतीं. त्या वाङ्मयप्रकाराकडे माझं मन आपणहून स्वच्छंदानं या दहा वर्षांत वळलं नव्हतं. माझ्या रत्नाकरांतल्या गुजगोष्टी जेव्हां प्रसिद्ध झाल्या तेव्हांच लघुनिबंधाची एक अत्यंत आकर्षक तऱ्हा म्हणून माझ्या त्या लिहिण्याकडे मराठी वाचकांचं विशेष लक्ष वेधलं

होतं, आणि हळूहळू खांडेकर, काणेकर या मंडळींनीं तशा प्रकारचे निबंध लिहावयास प्रारंभ केला होता. निबंधाच्या या प्रकाराला ' गुजगोष्टी ' हें नांव कितपत सार्थ आहे याची चर्चाहि साहित्यशास्त्राच्या भूमिकेवरून चालू झाली होती. मला स्वतःला ' गुजगोष्टी ' हेंच नांव पसंत होतं. कारण ' गुजगोष्टी ' या नांवांत जो अभिप्राय आहे त्या अभिप्रायानेंच रत्नाकरांतले ते निबंध मी लिहिले होते. परंतु नांवाबद्दलचं हें भांडण या ठिकाणीं सोडून दिलं, तर मध्यंतरींच्या दहा वर्षांत मी हा वाङ्मयप्रकार दुर्लक्षित केला याचं जें कारण होतं त्या कारणाचा या वाङ्मयप्रकाराच्या प्रकृतीशीं संबंध होता। असं होतं. माझी लहर लागली नव्हती. गुजगोष्टी व स्फुट कविता या दोहोंची प्रकृति एका दृष्टीनं सारखी आहे. ती लिहिण्याची लहर यावी लागते. एखादी रम्य कल्पना सुचावी, तिचा थोडासा विस्तार आणि परिपोष ज्यायोगें होईल अशा थोड्या कल्पना सुचाव्या, मग ती लिहावयास घ्यावी आणि एका बैठकीत संपूर्ण करावी— अशा रीतीनं स्फुट कविता आणि गुजगोष्टी लिहिल्या जातात. निदान लिहिल्या जाव्यात अशी माझी कल्पना आहे. मध्यंतरींच्या दहा वर्षांत गुजगोष्टीला योग्य अशी एकहि कल्पना माझ्या कधीं मनांत आली नसेल असं नाहीं. परंतु ती मनांत आली असली तरी तिचा पाठलाग मी केला नसला पाहिजे. याचं कारण असं होतं कीं क्वचित कुठें तरी एखादी गुजगोष्ट लिहून माझं समाधान होण्यासारखं नव्हतं. पुन्हां गुजगोष्टी लिहिल्याच तर चांगल्या दहा-बारा लिहावयाच्या असं मला वाटत असे. या कारणानंच बहुधा मी दहा वर्षं जाऊ दिलीं असावींत. पण आतां श्री. आगक्षीकर यांनीं जेव्हां गुजगोष्टीबद्दल मला आग्रहाची सूचना केली तेव्हां मी मनाशीं म्हटलं कां नाहीं ? ' लिहूं या ! ' मग माझं मन गुजगोष्टींना योग्य ठरतील अशा मध्यवर्ती चमत्कृतिपूर्ण कल्पना शोधूं लागलं; आणि सात-आठ कल्पना जेव्हां सुचल्या तेव्हां ' कला ' मासिकांत गुजगोष्टी लिहावयाचं मीं ठरविलं. या गुजगोष्टींना एक सामान्य मथळा मला हवा. ' आणखी गुजगोष्टी ' हें शीर्षक मला सुचलं, परंतु तें मला पसंत पडेना आणि मी दुसरं अधिक चांगलें शीर्षक शोधूं लागलों. अखेर 'नव्या गुजगोष्टी' हा मथळा मला चांगला वाटला. कारण त्यांत असा अभिप्राय सूचित होता कीं मध्यंतरींच्या दहा वर्षांत मला कांहीं नवे अनुभव आले

असतील त्यांना संस्कारानं माझ्या अंतःकरणाची वृत्ती थोडी फार तरी बदलून नवी झाली असेल व मला कांहीं तरी नवं सांगायचं असेल या विचारानं मी तो मथळा नक्की केला आणि ‘ कला ’ मासिकांत मला वाटतं मे महिन्यापासून मी गुजगोष्टी लिहूं लागलों.

या माझ्या ‘ नव्या गुजगोष्टीं ’नींही मराठी वाचकांचं लक्ष ताबडतोब वेधून घेतलं. मी कुठें तरी दुसरीकडे असं लिहिलं आहे कीं लघुनिबंधाच्या या प्रकाराच्या तंत्राचा विचार मी आधीं मुळींच केला नव्हता. लालित्याचे, आकर्षकतेचे, व आटोपशीरपणाचे ढोबळ नियम काय ते माझ्या दृष्टीसमोर मी ठेवले होते. ते ध्यानांत धरून ‘रत्नाकरां’त मी गुजगोष्टी लिहूं लागलों, व जसजसा लिहीत गेलों तसतसं मी एक विशिष्ट तंत्र अजाणतां पाळीत आहें असं मला दिसून आलं. मग त्या वाङ्मयप्रकाराचं तेंच तंत्र ठरलं ‘ कला ’ मासिकासाठीं नव्या गुजगोष्टी लिहितांना हेंच तंत्र मी कायम ठेवलं. परतु भाषेची शैली मी बदलली. किंवा आपण असं म्हणूं कीं गेल्या दहा वर्षांत माझी एकंदर भाषाशैलीच हलके हलके बदलत गेली होती व त्या बदललेल्या भाषाशैलींत नव्या गुजगोष्टी लिहिल्या गेल्या. रत्नाकर मासिकांत आलेल्या पहिल्या गुजगोष्टींची भाषा कांहींशी बोजड होती. भाषेच्या अलंकारांचा छंद त्या वेळीं मला जास्त होता. माझ्या भाषेंत साधेपणा, खेळकरपणा, ओघ, हलकेपणा इत्यादि गुण त्या वेळेस कमी होते. आतां ते गुण माझ्या लेखनांत आले होते. या बदललेल्या भाषाशैलीमुळें नव्या गुजगोष्टी आधिक अधिक सरस वठल्या आहेत असं मला स्वतःला वाटतं.

‘ नव्या गुजगोष्टीं ’पैकीं सर्वांत अधिक सुंदर कोणती याबद्दल निरनिराळीं मतें आढळतात. मला विचाराल तर ‘ पहिला पांढरा केस ’ ही सर्वांत सरस म्हणून मी तिच्यावर बोट ठेवीन. कारण या गुजगोष्टीचा प्रारंभ, परिपोष, आणि शेवट, सगळं कांहीं फार नामी साधलं आहे. जीविताविषयींचा एक विशिष्ट दृष्टिकोण तिच्यांत सूचित केलेला आहे. ती खेळकर असून पोरकट नाहीं, गंभीर असून उदास नाहीं, आणि संयमित असून तिच्यांत उच्छृंखलपणा आहे. गुजगोष्टींत अनेक विचार-विकार-लहरींचें मनोहर मिश्रण होऊन एकच कोणता तरी स्थिर भाव ( मूड ) प्रगट व्हावयास हवा.

हें जें मुख्य लक्षण तें ' पहिला पांढरा केस ' या लघुनिबंधांत प्रकर्षानं आढळून येतं.

मात्र मला ही गुजगोष्टी विशेष आवडते याचं कारण केवळ साहित्य-शास्त्राचा हा विचार नव्हे. आणखी एक कारण आहे. या गुजगोष्टींत अखेरच्या परिच्छेदांत मी असं प्रतिपादलं आहे कीं पांढरा केस ही वृद्धत्वाची खूण समजणं चुकीचं आहे. खरं वृद्धत्व आणि खरं तारुण्य कशांत आहे तें मीं सांगितलं आहे. आणि अखेर असं म्हटलं आहे कीं, पुरुषांचं वय कोणत्या मापानं मोजावं तर जी स्त्री त्याच्या प्रेमांत सांपडली असेल तिचं जें वय तेंच त्या पुरुषाचं वय समजावं.

हें वाक्य मीं लिहिलं तें त्या वेळच्या माझ्या प्रत्यक्ष अनुभवावरून आणि मनोवृत्तीवरून लिहिलं. ज्या मुलीनं मला सुमारें दीड वर्षापूर्वीं तिळगूळ आणि कवितेची भेट दिली होती ती मध्यंतरीं राजाराम कॉलेज सोडून गेली होती व बेळगांवच्या कॉलेजांत बी. ए. च्या वर्गांत दाखल झाली होती. परंतु अशाप्रकारें ती दूर गेली तरी – किंबहुना दूर गेली म्हणूनच तिचा माझा पत्रव्यवहार व सहवास वाढला होता. आम्ही एकमेकांच्या प्रेमांत सांपडलों आहोंत हें आम्हां दोघांनाहि स्पष्ट दिसूं लागलं होतं. तिचं वय या वेळीं पुरतं वीस वर्षांचं देखील नव्हतं, आणि तिचं प्रेम मला मिळाल्यामुळें मलाहि वाटत होतं कीं मी ऐन विशींतच आहे !

: : ६३ : :

रूढ असलेल्या स्त्री-पुरुषांच्या नांवांपैकीं एखादं नांव कधींकधीं मनांत भरतं, किंवा कधींकधीं एखादं नवं काल्पनिक नांव एकदम सुचून इतकं आकर्षक वाटतं कीं आतां पुढच्या कादंबरींत या नांवाचा उपयोग करायचा असं मी मनाशीं ठरवितों. कादंबरीचा विषय आणि कथानक आधीं सुचावं आणि मग योग्य अशा आकर्षक नांवांच्या शोधांत मन रहावं या अनुभवा-प्रमाणेंच आधीं एखाद्या नांवाचा मोह मनाला पडलेला असावा आणि मग तें नांव ज्यांत वापरतां येईल अशा कथानकाच्या रचनेंत मन गुंतावं, असाहि अनुभव मला वारंवार येतो. ‘ आशा ’ हें नांव मला असंच केव्हां तरी सुचलेलं होतं. आणि आपल्या कोठल्या तरी कादंबरींतल्या नायिकेला हें नांव द्यायचं असं मीं मनांतल्या मनांत ठरविलेलं होतं. ‘ किर्लोस्कर ’ मासिकांत क्रमशः प्रसिद्ध होणारी माझी ‘ उद्धार ’ कादंबरी पूर्ण झाल्यावर दुसरी कादंबरी मी लगेच क्रमशः सुरू करावी असा शंकरराव किर्लोस्करांनीं आग्रह केला तेव्हां नव्या कादंबरीसाठीं कथानकाचा विचार करणं मला भाग होतं, परंतु तिच्या नायिकेचं नांव मात्र माझ्याजवळ तयार होतं. हें नांव प्रत्यक्षांत कुणाला दिलेलं मीं ऐकलं नव्हतं. परंतु मला जेव्हां तें प्रथम सुचलं तेव्हां तें ठेवण्यासारखं आहे खास असं मला वाटलं. ‘ आशा ’ हें तें नांव होय. आणि हें नांव नायिकेलाच नव्हे तर कादंबरीचं नांव म्हणूनहि शोभेल असं मला वाटल्यावरून मीं तें नांव कायम केलं.

पुष्कळ वेळां एखादं नांव नुसतं कानीं पडलं कीं तें ऐकल्यावर त्या नांवाची व्यक्ति दिसायला कशी असेल त्याची कल्पना आपण करूं लागतों. "आशा" हें नांव जेव्हां मनाशीं मीं कायम केलं तेव्हां या नांवाची तरुण मुलगी कशी असावी याचा मी विचार करूं लागलों. तिचा गौर वर्ण, कृश बांधा, इत्यादि गोष्टी माझ्या नजरेपुढें आल्या. परंतु स्त्रीच्या मोहकपणाचे हे कांहीं असामान्य विशेष समजतां येत नाहींत. मी 'आशा' कादंबरी लिहिली तोंपर्यंत आणि पुढेंहि कांहीं कादंबऱ्या लिहितांना, मला एक छंद होता तो असा, कीं कादंबरीची नायिका कल्पितांना तिच्या सौंदर्याचा कोणता तरी एखादा विशेष मी ठरवीत असे. 'काश्मिरी गुलाब'मधील नायिकेची असामान्य गुलाबी कांति मी कल्पिली होती. 'कलंकशोभा' कादंबरींतील रजनीच्या बाबतींत 'फुलपाकळ्यांप्रमाणें स्फुरण पावण्याची नासिकाग्रांची मनोहर लकब' मीं कल्पिली होती. 'जादूगार'मधील नायिकेच्या 'धनुष्याकृति भुंवया' हा तिचा विशेष होता. (माझ्या कादंबरी-लेखनाविषयीं नाक मुरडून भुंवया संकुचित करणाऱ्या टीकाकारांकडून या धनुष्याकृति भुंवयांचा उल्लेख न चुकतां होत असतो!) हा छंद पुढें पुढें मी सोडून दिला. याचं कारण कदाचित् असं असेल कीं स्त्रीचे डोळे, भुंवया, नाक, जिवणी इत्यादि अवयवांची संख्या मर्यादित आहे, त्या साऱ्या अवयवांचा उपयोग झाल्यावरहि माझं कादंबरी-लेखन चालूच राहिल्यामुळें अवयवच शिल्लक राहिले नाहींत. पण हें विनोदाचं बोलणं झालं. मी तो छंद सोडला त्याचं खर कारण हें होतं कीं नायक अगर नायिका यांच्या बाह्य रूपाचं विशेष तपशिलानं वर्णन न करतां वाचकाच्या कल्पनाशक्तीवरच तें सोपविणं मला अधिक कलात्मक वाटूं लागलं. चित्र काढण्याच्या दोन तऱ्हा आहेत. सारे तपशील संपूर्णपणें दाखविणं ही एक तऱ्हा, आणि शक्य तितक्या थोड्या रेषा काढून सारं कांहीं पाहिल्याचा भास पाहणाराला होईल असं काढणं ही दुसरी तऱ्हा. या दुसऱ्या प्रकारांत अधिक चातुर्य आहे. असं कांहींचं म्हणणं आहे. कादंबरींतील पात्रांच्या मूर्ती वाचकांपुढें उभ्या करतांना या दुसऱ्या पद्धतीचा अवलंब मी पुढें पुढें करूं लागलों. सृष्टिवर्णनांच्या बाबतींत ज्याप्रमाणें माझी पहिली हौस मी सोडली व नव्या पद्धतीनं तीं करूं लागलों, त्याप्रमाणेंच स्त्री-

पुरुषांच्या बाह्य स्वरूपाचीं वर्णनं मी फक्त सूचकतेनं करूं लागलों. तुरंप ' आशा ' कादंबरी लिहिण्याच्या वेळेस नायिकेच्या ठिकाणीं मोहकपणाचा एखादा विशेष कल्पिण्याचा मला छंद होता. म्हणून मी विचार करूं लागलों. आशा कृश होती, गौरवर्ण होती हें सारं झालं, परंतु ज्या गोष्टीमुळ ती पहाणाराच्या नजरेंत एकदम भरावी असं कोणतं असामान्य सौंदर्य तिच्या ठिकाणीं होतं ? हा विचार करतांना लांब सडक विपुल केशसंभाराची कल्पना मला सुचली. या तिच्या सौंदर्यविशेषाचा उल्लेख ' आशा ' कादंबरींत मी वारंवार केलेला आहे. विशेषतः कादंबरीच्या अखेरीस नायक आणि नायिका यांचं लग्न झाल्यावर समवयस्क मित्रांना त्यांनीं दिलेल्या मेजवानीच्या वेळीं सर्वांच्या आग्रहावरून आशा भाषण करावयास उठते आणि त्या वेळच्या संभ्रमामुळें ती सारखा आपला शेपटा सांवरीत राहते व तिच्या त्या चाळ्यामुळें अखेर तिचे लांबसडक दाट केस सुटून ती पुरतीच गोंधळून खालीं बसते असं जें वर्णन मीं केलं आहे त्यामुळें त्या प्रसंगाचा उल्हास आणि खेळकरपणा मला वाढवितां आला आहे.

आशा हें नव्या कादंबरीच्या नायिकेचं नांव ठरलं, परंतु कादंबरीचा विषय कोणता हा प्रश्न अजून शिल्लकच होता. ' उद्धार ' कादंबरी लिहिण्याच्या वेळेस स्त्री-स्वातंत्र्याबद्दलच्या विवक्षित सिद्धान्ताचा पुरस्कार करायचं मीं ठरवलं होतं व त्या हेतूनं ती कादंबरी मी लिहिली होती. तिच्यानंतरची ही नवी कादंबरी लिहिण्याच्या वेळेस असाच कोणता तरी विषय घेण्याची माझी इच्छा होती आणि शक्य तर सामाजिक सुधारणेचा एखादा विषय न घेतां ज्यांत चालू राजकारणाची थोडीशी चर्चा असेल व खरा इतिहास असेल असा विषय मला हवा होता.

असा विषय शोधीत असतांना १९१९ सालच्या असहकारितेच्या चळवळींत जें ' मुळशी सत्याग्रह ' प्रकरण घडत होतं त्याची मला आठवण झाली. हें प्रकरण घडलं त्या वेळीं मी केसरी व मराठा या दोन्ही पत्रांच्या संपादकवर्गांत काम करीत होतों व त्यामुळें त्या प्रकरणाची समग्र हकीगत मला माहीत होती. या प्रकरणांत दोन शक्ती एकमेकींविरुद्ध उभ्या होत्या. विजेच्या कारखान्यासाठीं धरण बांधूं इच्छिणारे व त्या धरणासाठीं शेतकऱ्यांच्या

जमिनी व्यावयास उद्युक्त झालेले कारखानदार, आणि ज्या जमिनींतून पिढ्यान्‌पिढ्या धान्य काढलं व ज्यांची प्रेमानं जन्मभर जोपासना केली त्या जमिनी कायमच्या हातच्या जाणार म्हणून भ्यालेले आणि भांबावलेले शेतकरी. या झगड्यांत अखेर कारखानदारांचा विजय झाला. सत्याग्रहाचा उपयोग झाला नाहीं. लोकांच्या जमिनी गेल्या. त्या ठिकाणीं बांधलें गेलेलें प्रचंड धरण पुण्या-मुंबईचा प्रवास करतांना आपल्याला लोणावळ्याच्या अलिकडे गाडी आली कीं दिसूं लागतं. या प्रकरणांतला सत्याग्रहाचा पराजय जरी मीं प्रत्यक्ष पाहिलेला होता तरी नव्या कादंबरीचा मुख्य विषय करण्याची माझी इच्छा नव्हती. केवळ कादंबरीची पार्श्वभूमि म्हणून मला तो वापरावयाचा होता. ज्यांत राजकारणाची चर्चा आहे व ज्याला ' कादंबरी ' हें लेबल लावलेलं आहे असं पुस्तक आणि ' राजकीय कादंबरी ' या दोन गोष्टी भिन्न आहेत असं त्या वेळेस देखील माझं मत होतं. देशाच्या राजकारणांतील पेचप्रसंग व व्यक्तीच्या आयुष्यांतील पेचप्रसंग यांची कौशल्यानं सांगड घालून एक आकर्षक आणि एकजिनसी कथा जिच्यांत सांगितलेली असते तिलाच राजकीय कादंबरी हें नांव शोभतं, असं त्या वेळेपासून मी मानीत होतों.

तेव्हां मुळशीच्या सत्याग्रहाची पार्श्वभूमि नव्या कादंबरीसाठीं जरी मीं ठरविली तरी त्या प्रकरणांतील नाट्यप्रसंग ज्या व्यक्तींच्या आयुष्यांतील नाट्यप्रसंग ठरतील अशा व्यक्ती मला हव्या होत्या. कादंबरीची नायिका आशा हिच्याविषयीं वाचकांना एकदम सहानुभूति वाटावी यासाठीं तिचं असामान्य सौंदर्य जसं मीं कल्पिलं त्याप्रमाणेंच ती या सत्याग्रहाच्या चळवळीच नेतृत्व करणारी होती अशी मी कल्पना केली आणि ही केल्याबरोबर आशा कादंबरींतील नायक कसा असावा त्याबद्दलचीहि कल्पना मला सुचली. कादंबरींत पेचप्रसंग चांगले साधावयास हवेत हें धोरण ज्याप्रमाणें मीं नेहमीं ठेवलेलं आहे, त्याप्रमाणें कथानकाच्या आकर्षकतेला आवश्यक असे पेचप्रसंग भिन्नभिन्न स्वभावांच्या पात्रांच्या संघर्षांतून निर्माण होतात. तेव्हां अशा विरोधी स्वभावांचीं माणसं प्रथम कल्पिलीं पाहिजेत हेंहि मीं नेहमीं लक्षांत ठेवलेलं आहे. अशीं हीं धोरणं ठेवणं याला तांत्रिकपणा म्हणून टीकाकार त्याचा उपहास करितात ते करोत बिचारे. या तंत्राकडे लक्ष पुरविल्यामुळेंच

माझ्या कादंबऱ्यांच्या ठिकाणीं विशेष आकर्षकता उत्पन्न होते हें सत्य आहे, व तें टीकाकारांच्या मतलबी उपहासानं खोडलं जात नाहीं.

शिवाय परस्परविरोधी स्वभावविशेषांचीं पात्रं निर्माण करण्याचा दुसरा एक फायदा आहे तो असा कीं, एखाद्या अवघड गणितांतलं एक प्रमाण सुचलं कीं दुसरं त्यावरून सुचावं त्याप्रमाणें पात्रं सुचत जातात व त्यामुळें कथानकाचा आराखडाहि तयार होऊं लागतो. आशेचं स्वभावचित्र मीं मनाशीं बरंचसं स्पष्ट केलं तेव्हां त्यावरूनच नव्या कादंबरीच्या नायकाच्या स्वभावाची कल्पनाहि मला सुचूं लागली. या दोघांच्या विचारसरणींत संपूर्ण भिन्नता प्रारंभीं ठेवतां आली व अखेर ती भिन्नता कशी नाहींशी झाली तें दाखवितां आलं तर त्या उभयतांमधलं प्रेम मला विशेष नाट्यपूर्ण आणि उठावदार करून दाखवितां येणार होतं. आशा लहानपणापासून राजकारणाच्या वातावरणांत वाढलेली, गांधींच्या मतांची जिच्यावर छाप आहे अशी, आणि सत्याग्रहाच्या एका लहानशा प्रकरणाचं नेतृत्व जिच्याकडे होतं अशी मी दाखविणार होतों. या चित्राशीं सर्वस्वीं विरुद्ध असं नायकाचं स्वभावचित्र मला रंगवावयाचं होतं ना? मग अर्थातच ज्याचं आयुष्य बेजबाबदार रंगेलपणांत गेलेलं आहे, अनेक स्त्रिया ज्याच्याकडे आकर्षित झाल्या आहेत, परंतु ज्याचं चित्त कोणत्याहि स्त्रीवर स्थिर झालेलं नाहीं, व देशाच्या परिस्थितीचा व राजकारणाचा विचार ज्यानं चुकूनसुद्धां केलेला नाहीं अशा विलासी तरुणाचं चित्र रेखाटणंच योग्य होतं. आणि हें स्वभावचित्र जेव्हां माझ्या मनाशीं ठरलं तेव्हांच या नायकाचं नांवहि मला सुचलं. तें नांव ' विलास ' हें होय.

' आशा ' कादंबरीचा नायक व नायिका इतक्या स्पष्टतेनं डोळ्यांपुढें आल्यावर पुढचा मार्ग मला स्पष्ट दिसूं लागला. आशा आणि विलास या दोन व्यक्ति केवळ स्वभावानंच भिन्न होत्या असं नव्हे, तर सत्याग्रहाच्या प्रकरणांत या दोन व्यक्ति विरोधी पक्षांत उभ्या होत्या असं दाखविलं पाहिजे असं मला वाटलं. यासाठीं धरण बांधणाऱ्या कंपनीच्या नोकरींतील एक इंजिनियर म्हणून सत्याग्रहाच्या प्रत्यक्ष ठिकाणीं विलास दाखल होतो असं दाखविण्याचं मीं ठरवलं. यांतूनच त्याचं आशेवरील प्रेम उत्पन्न झालेलं

दाखविणं ही एक सहज सुचणारी गोष्ट होती. परंतु प्रत्यक्ष जीवनांतील प्रेमाप्रमाणेंच ललित साहित्यांतील प्रेमालाहि कसला तरी अडथळा उत्पन्न होत असतो, किंवा आपण असं म्हणूं कीं अडथळ्यावांचून सहज सफल होणारं प्रेम प्रत्यक्ष जीवनांत आढळत असेलहि, परंतु अशा प्रेमाची ललित-कथा होऊं शकत नाहीं. 'प्रीतीची वाट कांटेरी' असा कांहीं सगळ्याच प्रेमिकांचा निरपवाद अनुभव नसेल; परंतु कादंबरींत तरी प्रीतीची वाट कांटेरी असावी लागते. प्रेम जडलं, लग्न झालं– एवढी हकीगत चित्ताकर्षक होत नाहीं. अपूर्णता अगर वैगुण्य हाच नाट्य-वाङ्मयाचा आणि कथा-वाङ्मयाचा आत्मा म्हणावा लागतो. अर्थात् सर्वस्वीं भिन्न स्वभावाच्या, विचाराच्या आणि वृत्तीच्या आशेवर विलासचं प्रेम जडलं, असं दाखविल्यानं कादंबरींतला पहिला नाट्यप्रसंग साधत असला तरी मला पुढें असा विचार करणं भाग होतं, कीं येथून कादंबरीला खरी सुरुवात झाली, परंतु वाचकांच्या जिज्ञासेचा ताण कायम रहाण्यासाठीं विलासच्या आशेवरील प्रेमांत कोणती तरी अडचण मला कल्पिली पाहिजे. घरांतल्या वडील माणसांचा विरोध ही नेहमीं उपयोगी पडणारी परंतु वापरानं झिजून बोथट झालेली अडचण आहे. कांहीं तरी निराळ्या तऱ्हेची अडचण मला हवी होती. म्हणून शेवटीं मीं असं दाखवायचं ठरविलं कीं विलासचा शरद नांवाचा एक मित्र होता. त्याच्यावर आशेचं प्रेम आहे अशी विलासची समजूत होती, व म्हणून स्वतःचं प्रेम आशेजवळ बोलून दाखविणं त्याला अशक्य वाटत होतं. वास्तविक आशेचं प्रेम शरदवर नव्हतं, ही गोष्ट वाचकांना पटण्यासारखी वाटावी यासाठीं शरदचं स्वभावचित्र तिसऱ्याच एका निराळ्या तऱ्हेचं दाखविणं अवश्य होतं. म्हणून मी त्याला अत्याचारी मार्गाचा पुरस्कार करणारा दाखविला आहे.

अशा प्रकारें आशा, विलास आणि शरद हीं तीन प्रमुख पात्रं कायम झाल्यावर कादंबरींतले प्रमुख पेचप्रसंग ठरविणं मला अवघड गेलं नाहीं. ते प्रसंग कोणते तें मी येथें सांगत नाहीं. ही कादंबरी वाचणाऱ्या कुणाहीं मर्मज्ञ वाचकाला तें सहज समजण्यासारखं आहे. परंतु वाचकांची जिज्ञासा वाढविण्यासाठीं एक युक्ति मीं केली तिचा उल्लेख करण्यासारखा आहे. आशा हें नांव विलास प्रथम ऐकतो तें कादंबरीच्या दुसऱ्या प्रकरणांत.

नंतर तें नांव निरनिराळ्या माणसांकडून त्याला वरचेवर ऐकायला मिळतं. इतकं कीं चवथ्या प्रकरणाच्या अखेरीस तो स्वतःशीं म्हणतो, " आज तीन दिवस या एका नांवानं काय पाठलाग चालविला आहे? आशा? आहे तरी कोण ही?" पुन्हां पांचव्या प्रकरणांत धरण बांधणाऱ्या कंपनीची नोकरी पत्करून तो प्रत्यक्ष बांधकामाच्या ठिकाणीं दाखल होतो तेव्हां तें नांव तो ऐकतो, व त्याला असं समजतं कीं सत्याग्रह करणाऱ्या शेतकऱ्यांचं नेतृत्व तिनं पत्करलं आहे. इतकं झाल्यावर अखेर सहाव्या प्रकरणांत आशा त्याच्या दृष्टीस पडते! आणि ती देखील कोणत्या परिस्थितींत, तर तो तिच्या घरीं अंथरुणावर पडलेला असतांना व आपण तिच्या घरांत आहोंत हें त्याच्या ध्यानींमनीं नसतांना. " आशा? आहे तरी कोण ही?" असं वाचकांना वाटावं यासाठीं ती जबरदस्त जिज्ञासा मी विलासच्या ठिकाणीं उत्पन्न केली आहे.

आशा गांधींच्या अहिंसात्मक सत्याग्रहाची पुरस्कर्ती खरी, परंतु या तत्त्वावरची तिची श्रद्धा थोडीशी विचलित झाल्याचं मला दाखवायचं होतं. कारण आत्यंतिक अहिंसेवर माझा स्वतःचा विश्वास नाही व इतरांचाहि नसावा, अशी माझी नेहमींची इच्छा आहे. कादंबरींतल्या पात्रांच्या आवडीनिवडी, विचार आणि मतं हीं कादंबरीकाराचीं स्वतःचीं समजावयाचीं नसतात. परंतु हें जसं खरं तसंच कादंबरींतल्या व्यक्तींना लेखक पुष्कळ वेळां स्वतःप्रमाणें बोलायचालायला आणि वागायला लावतो, स्वतःच्या आवडीनिवडी त्यांच्या काल्पती, स्वतःचे विचार त्यांच्या मनांत आलेले दाखवितो, हें देखील खरं आहे. या कारणानंच मनुष्य ज्या कादंबऱ्या लिहितो त्यांत त्याच्या आत्म-चरित्राचा ठसा मधून मधून उठलेला असतो असं लोक मानतात. अर्थात् ही समजूत फार काळजीपूर्वक आणि कादंबरीकाराचं चरित्र ज्याला परिचित आहे अशा व्यक्तींच्या साहाय्यानंच वापरायला हवी, नाहीं तर लेखकाचं भलतंच आत्मचरित्र आपण तयार करूं असा संभव आहे. परंतु हे सारे विचार केल्यावरहि एक गोष्ट कबूल केलीच पाहिजे. ती ही, कीं जी कादंबरी मतप्रचाराच्या थोड्या फार हेतूनं लिहिलेली असते तिच्यांत कोणतं तरी पात्र लेखकाचं प्रतिनिधि म्हणून वावरत असतं. लेखकानं आपले स्वतःचे विचार आणि

मतं या पात्राच्या निमित्तानं सांगितलेलीं असतात. कादंबरींतलं या प्रकारचं पात्र कोणतं ते थोड्याशा तारतम्यानं ओळखणं कठीण नसतं. मात्र हेंही लक्षांत ठेवलं पाहिजे कीं स्वतःचे विचार व मतं सांगण्यासाठीं कादंबरींतील एका कोणत्या तरी विशिष्ट व्यक्तीचा आश्रय लेखकानं केला कीं त्या कामासाठीं तो निष्ठेनं फक्त त्याच एका व्यक्तीला चिकटून रहातो असं नाहीं. कादंबरींतल्या अनेक व्यक्तींचे अनेक ठिकाणचे विचार एकत्र केले तरच लेखकाचीं अनेक विषयांवरचीं मतं आपल्याला आढळतील असाहि संभव असतो. नव्हे असाच संभव जास्त असतो. या एकाच मुद्द्याच्या दृष्टिकोनांतून माझ्या एकेका कादंबरीचं उदाहरण घेऊन मला विवेचन करतां येण्यासारखं आहे. कधीं सवड मिळाली तर तें मी करीन, परंतु ‘ आशा ’ कादंबरीबद्दल लिहीत आहें तेव्हां एक गोष्ट ओघानं आली म्हणून सांगतों. ती अशी कीं, अहिंसेवरची आशेची पहिली निरपवाद श्रद्धा गडबडली असं जें मीं दाखविलं आहे तें माझ्या मनांतला एक सतत विचार स्पष्ट करण्यासाठीं दाखविलं आहे. आणि तें दाखवितांना तिच्या मनाची चलबिचल वाचकाला संभाव्य आणि चित्ताकर्षक वाटावी याबद्दलची दक्षता मी घेतली आहे.

ही दक्षता घेण्याच्या हेतूनं कादंबरीच्या १२ व्या प्रकरणांत भार्गवरामाची पापी दृष्टि आपल्यावर आहे असा दृढ संशय आशेला येतो. या संकटातून मार्ग कसा काढावा याचा विचार करतां करतां आशेला शस्त्र मिळविण्याची कल्पना सुचते, आणि ती सुचल्याबरोबर त्या नव्या कल्पनेचा व अहिंसेवरील तिच्या जुन्या श्रद्धेचा झगडा सुरू होतो असं मीं दाखविलं आहे. तिला वाटतं आपण अनत्याचारी सत्याग्रहाची प्रतिज्ञा केली आहे मग आपण शस्त्राचा उपयोग कसा करावयाचा ? पण तिचं मन म्हणतं, “ ज्या माझ्या शीलावर संकट आलं आहे तें इतकं मोलाचं आहे कीं, त्याचं रक्षण करतांना अमुक मार्ग चांगला कीं वाईट अशा विचाराला अवकाशच उरत नाहीं... ” परंतु यावर तिच्या मनांत येतं, “ हें जर खरं तर देशाला स्वतंत्र करण्याच्या बाबतींत मात्र अहिंसात्मक सत्याग्रहाखेरीज बाकीचे सगळे मार्ग अधर्म्य कां म्हणावयाचे ? जसं माझं शील अत्यंत मोलाचं आहे तसंच देशाचं स्वातंत्र्यहि नाहीं का ? शीलावर संकट आलं

म्हणजे स्त्रीनं सत्याग्रहाचा वेडेपणा करण्यांत कांहीं अर्थ नाहीं हें जसं खरं त्याप्रमाणें केवळ सत्याग्रहाच्या मार्गानें आपल्याला स्वातंत्र्य मिळवितां येईल ही श्रद्धाहि चुकीची नाहीं काय?...

माझ्या स्वतःच्या मनांतील एक महत्त्वाचा विचार वाचकांपुढें मांडण्यासाठीं मी या ठिकाणीं आशेचा उपयोग केलेला आहे. पण तो करतांना कादंबरी ज्या योगें अधिक चित्ताकर्षक होईल असा प्रसंग मी निर्माण केला आहे. राजकारणाची चर्चा कादंबरींत आणावयाची असेल तर कोणत्या कौशल्यानं आणली पाहिजे याविषयींचीं माझीं जीं ठरलेलीं मतं आहेत त्यांचं 'आशा' कादंबरींतील हें स्थळ एक उदाहरण समजतां येईल.

मात्र आशेमधील या प्रसंगाची कल्पना करतांना माझ्या हातून वास्तवतेचा भंग झाला असा आक्षेप कांहीं लोकांनीं माझ्या जवळ बोलून दाखविलेला आहे. त्यांचं म्हणणं असं कीं, "तुरुंगांत प्रत्यक्ष वस्तुस्थिति कशी असते तें तुम्हांला माहीत नाहीं. तुरुंगांत स्त्री-कैद्यांचा जो विभाग असतो तेथें पुरुष मनुष्य फिरकूं शकत नाहीं. नोकर, चाकर, वॉर्डर साऱ्या बायका असतात. मग तुमच्या कादंबरींतला हा भार्गवराम आशेकडे जातो, तिच्याशीं बातचीत करतो आणि त्याच्या बोलण्यावरून त्याच्या पापी दृष्टीचा तिला संशय येतो, हें सारं चुकीचं नाहीं काय? तुम्ही स्वतः कधीं तुरुंगांत गेला नाहीं त्यामुळें तुमच्या हातून ही मोठी भयंकर चूक झालेली आहे." या आक्षेपाला माझं उत्तर असं आहे कीं, मी स्वतः कधीं तुरुंगांत गेलों नाहीं हें एकदम कबूल. परंतु एवढ्यावरून मला तुरुंगांतल्या परिस्थितीची कांहीं माहिती नाहीं, किंवा तुरुंगांतल्या गोष्टीवर मी कांहीं लिहितां कामा नये असा सिद्धान्त निघूं शकत नाहीं. हरिभाऊ आपटे वेश्यांच्या माड्या कधीं चढले नव्हते, परंतु अगदीं तरुणपणीं लिहिलेल्या पहिल्याच कादंबरींत त्यांनीं वेश्येच्या माडीचं समग्र वर्णन केलं. तेव्हां जो लेखक स्वतः तुरुंगांत गेलेला असेल त्यानंच त्याबद्दल लिहावं या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आतां माझ्या वर्णनांत जो अवास्तवतेचा दोष उत्पन्न झालेला आहे तो कितपत भयंकर आहे तें पाहूं. स्त्री-कैद्यांच्या विभागांत नोकर, चाकर, वॉर्डर साऱ्या स्त्रिया असतात हें मला माहीत आहे व मीं माझ्या कादंबरींत तसंच वर्णन केलेलं आहे.

भार्गवराम आशेकडे जातो व तिच्याशीं पांच-दहा मिनिटं पांचटपणानं बोलतो या वर्णनांत आक्षेपकांना वाटतो तसा मोठा गुन्हा नाहीं. भार्गवरामाचं आशेकडे जाणं व तिच्याशीं बोलणं संभाव्य वाटावं यासाठीं तो सी. आय्. डीं. तला अधिकारी होता व जेलरचं आणि त्याचं संगनमत होतं असं मी दाखविलेलं आहे. अशा परिस्थितींत भार्गवराम आशेकडे गेलेला दाखविण्यांत मी वास्तवतेचा अगदीं खून केला असं कांहीं वाटत नाहीं. आक्षेपकांचं असं का म्हणणं आहे कीं स्त्री एकदां तुरुंगांत गेली कीं तिच्या कोठडीजवळपास भार्गवरामसारखा सी. आय्. डीं. तला अधिकारी व जेलरचा दोस्त जाणं अशक्य आहे ? हें म्हणणंच वास्तवतेला सोडून होईल !

: : ६४ : :

१९३६ साली मार्च महिन्याच्या सुमारास क्वेट्टा येथें मोठा धरणीकंप झाल्याच्या बातम्या मी वृत्तपत्रांत वाचल्या. वाचल्याबरोबर माझ्या मनांत पहिली कल्पना आली ती ही, कीं तिकडे जावं, धरणीकंपानं केलेला प्रलय प्रत्यक्ष पहावा, त्या दारुण घटनेवर एखादी कादंबरी लिहितां आल्यास पहावी. ही माझी कल्पना अमलांत आणण्याचाही प्रयत्न मी केला, पण तो साधला नाहीं. तथापि मी जरी प्रत्यक्ष क्वेट्टयास जाऊं शकलों नाहीं तरी तेथील धरणीकंपाची कल्पना माझ्या डोक्यांत घोळत राहिली. मी तिकडे गेलों असतों आणि तिथली परिस्थिति डोळ्यांनीं पाहूं शकलों असतों तर क्वेट्टयास घडलेल्या प्रकारांवर एका कादंबरीचं सबंधच कथानक मीं आधारूं शकलों असतों. ती गोष्ट आतां शक्य नव्हती. परंतु दुसरी एक गोष्ट शक्य होती. क्वेट्टयाच्या धरणीकंपाची कादंबरी आतां मला लिहितां येत नव्हती. परंतु त्या धरणीकंपाच्या दुर्दैवी घटनेंतून ज्या कादंबरींतील पहिला नाट्य-प्रसंग निर्माण झाला अशी कादंबरी लिहिणं शक्य होतं. तेव्हां या दृष्टीनं मी विचार करीत राहिलों, व या विचारांतून ‘ काश्मिरी गुलाब ’ ही कादंबरी निर्माण झाली.

‘ काश्मिरी गुलाब ’ ही माझी दहावी कादंबरी. पूर्वींच्या नऊ कादंबऱ्यां-हून हिचं स्वरूप थोडसं निराळं ठेवण्याचा मी विचार केला होता. नेहमीं-

प्रमाणें तीनशें-साडेतीनशें पानांची कादंबरी न लिहितां दोनशें पानांत बसेल अशी एक लहान कादंबरी मला लिहून पाह्यची होती. मोठी कादंबरी व छोटी कादंबरी हे दोन प्रकार लिहितांना कोणतं भिन्न तंत्र वापरावं लागतं तें प्रत्यक्ष प्रयोग करून ठरविण्याची माझी इच्छा होती.

मी अनेक वेळां असं लिहिलेलं आहे कीं लघुकथा, कादंबरी, नाटक, भावगीत, गुजगोष्ट इत्यादि लेखनप्रकारांचं सौंदर्य वाटतं तसं गूढ अगर गुप्त नसतं. डोळस आणि चौकस दृष्टीनं पाहणाराला त्या सौंदर्याचीं उगम-स्थानं शोधून काढणं अवघड नाहीं. ‘ कलेचें तंत्र ’ या शब्दांचा अर्थ कलाकृतींत सौंदर्य निर्माण करण्याच्या अनुभवानं ठरविलेल्या युक्त्या या पलीकडे दुसरा कांहीं नाहीं. असं असल्यामुळेंच तंत्राचा उपहास करून निराळेपणाची खोटी प्रतिष्ठा मिळवूं पाहणारे कवी आणि लेखकही अखेर तंत्राचा आश्रय करतातच आणि कलाकृती आहे तेथें कांहीं तरी तंत्र आहेच या सिद्धान्ताला ते बळकटीच आणून देतात. “ टर उडवायला आले पण प्रार्थनेंत सामील झाले ” अशा अर्थाचं टवाळ लोकांच्या ज्या फजितीचं वर्णन एका इंग्रज लेखकानं केलं आहे तसली फजिती तंत्राची चेष्टा करणाऱ्या लोकांच्या वांट्याला येते. कलात्मक लेखनाचा कोणताही प्रकार घ्या त्यांत सौंदर्य असायलाच हवं आणि सौंदर्य निर्माण करण्याची युक्ति म्हणजेच जर तंत्र समजायच तर तंत्रहि असणारच. आणि कलाकृतींतल्या सौंदर्याचा उगम तो शोधून पहाणाऱ्याला दिसल्यावांचून रहात नाहीं, हेंच विधान निराळ्या शब्दांत करायचं झालं तर असं म्हणतां येईल कीं कोणत्याहि कलात्मक लेखनप्रकाराचं तंत्र गूढ किंवा गुप्त नसतं, त्या लेखनांतच शोधून पाहिलं तर दिसावं अशा प्रकारें दडलेलं असतं.

छोटी कादंबरी लिहिण्याचं विशिष्ट तंत्र कोणतं तें मला समजून घ्यावयाचं होतं, याचा अर्थ असा नव्हे कीं तें तंत्र सांगणारे ग्रंथ मी उलथेपालथे करूं लागलों. तंत्र आत्मसात् करण्याचा हा मार्ग नव्हे. ललितलेखनाच्या तंत्राची चर्चा करणारं लिखाण आणि प्रत्यक्ष ललितलेखन यांचा संबंध नोटेशन आणि प्रत्यक्ष गाणं यांच्या संबंधासारखा आहे. नोटेशन वाचणं म्हणजे गाणं नव्हे. नोटेशन गाण्याचं शुष्क, थंड कलेवर आहे. त्यांत जिवंतपणाचा गाभा कसा ओतावयाचा तें प्रत्यक्ष गाइल्यानंच कळतं. आणि तंत्राची

गोष्ट अशीच आहे. प्रत्यक्ष लिहिणं हाच तंत्र समजून घेण्याचा खरा मार्ग आहे. म्हणून छोटी कादंबरी लिहिण्याचं विशिष्ट तंत्र समजून घेण्यासाठीं मी त्या तंत्राचीं विवेचनं वाचीत सुटलों नाहीं, तर प्रत्यक्ष कादंबरीलेखनालाच आरंभ केला, आणि लिहिण्याचा प्रयोग प्रथमच केला तेव्हां छोटी कादंबरी लिहितांना कोणतं तंत्र सांभाळावं लागतं तें माझ्या लक्षांत आलं.

मोठ्या कादंबरीच्या रचनेंतही कोणतं तरी एक पात्र मध्यवर्ती कल्पूनच कथानकाची जुळणी करावयाची असते. परंतु छोट्या कादंबरीच्या बाबतींत हें अवधान अधिक कटाक्षानं पाळणं आवश्यक असतं. मोठ्या कादंबरींत मुख्य स्वभावचित्राला उठावदारपणा आणण्याच्या हेतूनं त्याचा संबंध अनेक गौण पात्रांशीं दाखवायचा असतो, अनेक पोषक प्रसंगांची योजना करावयाची असते, आणि मुख्य म्हणजे जें कांहीं सांगायचं तें रमत गमत, रेंगाळत सांगितलं तरी चालतं; नव्हे कधीं कधीं थोडासा मनोरंजक पाल्हाळ करण्यानं कादंबरीची रंगत अधिक वाढण्याचा संभव असतो. छोटी कादंबरी लिहितांना हें तंत्र चालत नाहीं. मुख्य पात्राचं चित्र तर रेखीव झालं पाहिजे, पण त्याच्याभोंवतीं गौण पात्रांचा फार मोठा घोळका जमा होता कामा नये. अशी दुहेरी सावधगिरी ठेवावी लागते. प्रसंगाचा पाल्हाळ टाळावा लागतो. ते मोजके व परिणामकारक असावे लागतात. चित्रकलेची परिभाषा वापरावयाची झाली तर असं म्हणतां येईल कीं मोठ्या कॅनव्हॉसवर काढावयाचं चित्र आणि छोट्या कॅनव्हॉसवरील चित्र यांच्या तंत्रांत जी भिन्नता चित्रकाराला मानावी लागते तीच कादंबरीलेखनांतही मानली पाहिजे. भव्य चित्र काढतांना कॉम्पोझिशनला पुष्कळ वाव असतो. पार्श्वभूमि व पुरोभूमि भरून काढण्यासाठीं चित्रकाराला हात मोकळा सोडतां येतो, पण छोट्या कॅनव्हॉसवर चित्र काढण्याच्या वेळीं हा सढळपणा स्वीकारतां येत नाहीं. याचा अपरिहार्य परिणाम असा होतो कीं मांडणींत एकतानता अधिक येते आणि निवेदनाची गति शीघ्र होते.

हे सगळे विशेष "काश्मिरी गुलाब" मध्यें वाचकांना दिसतील. वाटलं तर असं म्हणूं या कीं हे विशेष त्या कादंबरींत जितक्या प्रमाणांत आढळत असतील तितक्या प्रमाणात ती यशस्वी समजावी लागेल. ही कादंबरी म्हणजे एका तरुण स्त्रीच्या सौंदर्याची, दुर्दैवाची आणि अखेर सफळ झालेल्या

प्रीतीची गोष्ट आहे. म्हणून तिचं लावण्य दुर्दैव आणि दृढ प्रेम या तिहींवर वाचकांचं लक्ष सारखं केंद्रित होऊन रहावं अशी दक्षता मी घेतलेली आहे आणि या हेतूनं जे प्रसंग मी कल्पिले आहेत ते एका मागोमाग वेगानं घडलेले दाखविले आहेत. माझ्या मोठ्या कादंबऱ्यांत जी गति आहे तिच्याहून "काश्मिरी गुलाब" ची गति अधिक वेगाची आहे.

या तिच्या विशेषामुळेंच त्या वेळीं प्रसिद्ध असलेल्या "सागर मुव्हिटोन" नांवाच्या मुंबईतील फिल्म कंपनीचे मालक चिमणभाई देसाई यांचं लक्ष तिच्याकडे गेलं असावं. त्या कादंबरीचा चित्रपट करावयाचं त्यांनीं ठरविलं व मला मुंबईस निघून येण्याबद्दल तार केली. मी गेलों, आणि दोन दिवसांनीं त्यांच्या–माझ्या करारपत्रावर सह्या होऊन मोबदल्याच्या तीन हजारांपैकीं पांचशे रुपये त्यांनीं मला रोख दिले. त्यांचा माझा आधींपासूनचा स्नेह होता. करार झाला तेव्हां त्यांचे माझे दोघांचेहि जे मित्र हजर होते ते मला म्हणाले,

"एका मोठ्या कंपनीनं तुमचं कथानक घेतलं आहे. आम्हांला तुम्ही फीस्ट दिली पाहिजे."

मीं म्हटलं, "जरूर. तुम्हांला पाहिजे त्या हॉटेलांत पाहिजे त्या तऱ्हेच्या पार्टीची तुम्ही व्यवस्था करा. खर्च माझा."

रात्रीं आम्ही आठ-दहा मंडळी ताजमहाल हॉटेलमध्यें गेलों. परत आलों तेव्हां माझ्या खिशांतलं पैशाचं ओझं सवाशें रुपयांनीं कमी झालं होतं. पण मला फिकीर नव्हती. चित्रपट पूर्ण झाल्यावर मिळणाऱ्या अडीच हजार रुपयांचीं स्वप्नं मला पडत होतीं.

त्या स्वप्नांचा चुराडा व्हायला फारसा वेळ लागला नाहीं!

"काश्मिरी गुलाब"चा चित्रपट आपल्या कंपनीच्या पहिल्या प्रतीच्या चित्रपटांपैकीं एक म्हणून काढायचा चिमणभाई देसाई यांचा निश्चय होता. त्यांच्या स्टार्सपैकीं सर्वांत गाजलेले स्टार्स या चित्रपटांत काम करावयासाठीं त्यांनीं निवडले. मोतीलाल – सवितादेवी ही त्या वेळच्या सिनेमा प्रेक्षकांची कमालीची प्यार जोडी नायक-नायिकेच्या भूमिकांसाठीं मुक्रर झाली. त्यांच्या कंपनीचे डायरेक्टर बदामी हे जरा शिळे होऊं लागले होते, आणि मेहबूब नांवाचा तरुण डोकेबाज दिग्दर्शक त्यांच्या कंपनींत चमकूं लागला

होता. त्याच्याकडे दिग्दर्शनाचं काम सोपविण्यांत आलं. सारी तयारी जोरांत होऊं लागलेली मला दिसली. मी परत आलों. बाकीचीं सारीं कामं दूर ठेवून संवादांसह सिनारिओ इंग्रजींत तयार केला, टाईप केला आणि चिमणभाईंकडे पाठवून दिला. आतां चित्रपट तयार झाल्यावर तो पाहाणं व आपल्या स्नेह्यांसोबत्यांना दाखविणं येवढंच काम माझ्याकडे उरलं, असं मी समजत होतों.

पण त्यानंतर चिमणभाईंकडून कांहीं हालचाल कळेनाशी झाली. माझ्या पत्राला त्यांचे जबाबही येईनातसे झाले आणि अखेर एके दिवशीं त्यांच्या-कडून मला पत्र आलं कीं, 'कांहीं अपरिहार्य कारणांसाठीं "काश्मिरी गुलाब" चित्रपट काढण्याची कल्पना तूर्त रहित करावी लागत आहे.' तूर्त या शब्दाचा अर्थ कायमची हें मी ओळखूं शकत होतों. सिनेमावाल्यांच्या कोशांत कोणत्या शब्दांना कोणते अर्थ असतात, तें मला कळूं लागलं होतं. नंतर मुंबईला गेल्यावर मी चिमणभाईंना भेटलों, पण माझ्या कादंबरीचा चित्रपट तयार करण्याच्या आड कोणत्या "अपरिहार्य अडचणी" आल्या होत्या तें मी त्यांना विचारलं नाहीं. तो विषयच मीं एका अक्षरानं देखील काढला नाहीं. मित्रत्वाच्या गप्पा करायला इतर विषय काय थोडे होते.

पण इतर मार्गांनीं माझ्या कानावर कांहीं हकिगती आल्या, आणि 'काश्मिरी गुलाब'चा चित्रपट कां रद्द झाला होता त्याचं खरं कारण मला कळलं. "सागर मुव्हिटोन" ही गुजराथ्यांची कंपनी होती. मुनशींच्या कादंबऱ्यांचे चित्रपट त्या कंपनीनं तयार केले होते. अशा कंपनीनं एका दक्षिणी लेखकाला पूर्वीं कधीं कोणाला दिला नव्हता येवढा मोबदला देऊन पहिल्या दर्जाच्या सरंजामाचा वापर करून त्याचं कथानक पडद्यावर आणावं, ही गोष्ट कंपनींतल्या कांहीं लोकांना शल्यासारखी बोचूं लागली. माझ्या कादंबरीवर चिमणभाई फिदा झाले होते, त्या खुशीच्या भरांतच त्यांनीं मला मुंबईस बोलावून घेतलं होतं, आणि माझ्याशीं करार करून प्रत्यक्ष चित्रपट-निर्मितीच्या योजना आंखल्या होत्या, पण राजापेक्षां त्याच्या भोंवतींच्या दरबारी लोकांच्या हातींच राज्यकार-भाराचीं सूत्रं अधिक असतात. दक्षिणी लेखकाची डाळ शिजूं न देण्याचा व्यूह रचणाऱ्या सल्लागारांची मसलत न ऐकण्याइतका कणखरपणा चिमण-

भाईच्या अंगीं नव्हता ! मी त्यांच्याशीं पूर्वीप्रमाणेंच वागणं ठेवलं. मला समजलेल्या कारस्थानांची ओळखहि मीं त्यांना कधीं दिली नाहीं; किंवा माझी मोठी निराशा झाली असंही कधीं दर्शविलं नाहीं.

मात्र पुढें जो सिद्धान्त माझ्या अनुभवानं वारंवार दृढ झाला तो मी या प्रलापानं प्रथम ओळखला. तो असा कीं, नाटकी जगाप्रमाणेंच सिनेमाच्या जगांतहि ज्याला स्थान मिळवायचं असेल आणि नशीब काढायचं असेल त्यानें मालकांशीं समरस झालं पाहिजे, त्यांच्या बैठकींत सामील झालं पाहिजे, त्यांची खुशामत केली पाहिजे, त्या धंद्याशीं राजकारण खेळलं पाहिजे, ते सर्वज्ञ आहेत असं म्हटलं पाहिजे, त्यांच्या शत्रुमित्रांची निंदास्तुति केली पाहिजे. त्यांच्याशीं फटकून वागणाऱ्याला त्या क्षेत्रांत कधीं नांव काढतां येणार नाहीं !

हा नवा अनुभव आणि ताजमहाल हॉटेलमधल्या पार्टीचा खर्च वजा जातां उरलेले तीनशें पंच्याहत्तर रुपये येवढी रक्कम जमेच्या बाजूला हिशोबात लिहून "काश्मिरी गुलाब"चं हें प्रकरण मी निकालांत काढलं. माझ्या नित्याच्या उद्योगाला लागलों. आणि "काश्मिरी गुलाब" कादंबरी ता. १९ जुलैला पूर्ण केल्यानंतर पुढची नवी कादंबरी लिहावयास मीं ता. २२ सप्टेंबर रोजीं सुरुवात केली होती. या कादंबरीला "प्रवासी" असं नांव मी देणार होतों. या कादंबरीचीं सहा प्रकरणं लिहून झालीं तो १९३७ साल उजाडलं.

'प्रवासी' कादंबरी ही एका तरुणाच्या जीवित-प्रवासाची कहाणी असावी असं मी मनाशीं ठरविलं होतं, आणि त्या मुख्य कहाणीला हिंदी राजकारणाचा १९२० ते १९३० या दहा वर्षांच्या अवधींतला इतिहास पार्श्वभूमी म्हणून योजण्याची माझी इच्छा होती. "आशा" कादंबरींत महाराष्ट्राच्या राजकीय चळवळींतील एक विशिष्ट आंदोलन मी पार्श्वभूमी-दाखल वापरलं होतं. आतां "प्रवासी" लिहितांना राजकारणाचं एक दीर्घ पर्व मी कथानकांत गुंफणार होतों. 'राजकीय कादंबरी' या शब्द-प्रयोगाचा एक विवक्षित अर्थ मी मानतों. कादंबरीचा प्रकार कोणताहि असो ती आधीं कादंबरी असली पाहिजे असं माझं दृढ मत आहे. त्यामुळें ज्या कादंबरींतील पात्रं राजकारणांतील विविध प्रश्नांची उठल्या बसल्या

प्रदीर्घ चर्चा करतात तिला राजकीय कादंबरी म्हणण्यास मी तयार नाहीं. अशा कादंबरीला इंग्रजींतलें " पॉलिटिकल ट्रॅक्ट " हें नांव देतां येईल. मराठींत तिला " बखर " म्हणतां येईल. अप्टन सिंक्लेर याच्या जाडजूड महाभारतस्वरूपी कादंबऱ्यांना मी बखरी म्हणेन. या लेखकाच्या एका चाहत्यानं त्याला असं शिफारसपत्र दिलेलं आहे कीं, ज्यांना गेल्या पन्नास वर्षांतला युरोप-अमेरिकेच्या राजकारणाचा अभ्यास करायचा असेल त्यानं सिंक्लेरच्या कादंबऱ्या वाचल्या म्हणजे त्याचा कार्यभाग होईल. यावर मी असं म्हणेन कीं मला तसा अभ्यास करायचा असेल तर मी सिंक्लेरच्या कादंबऱ्यांकडेच कशाला वळूं ? त्या विषयावर तज्ज्ञांनीं लिहिलेलीं प्रबंधात्मक पुस्तकं पुष्कळच आहेत. तीं सोडून सिंक्लेरच्या कादंबऱ्या मी वाचाव्या असं त्यांत काय आहे ? प्रबंधात्मक ग्रंथांत जो मला मिळावयाचा नाहीं असा कांहीं स्वतंत्र आल्हाद त्या मला देतात काय ? देत नसतील तर त्यांना कादंबरी ही संज्ञा मी देणार नाहीं, अशी माझी विचारसरणी असल्यामुळें राजकीय कादंबरीची एक विशिष्ट प्रकृती मी मानतों. तिचं स्वरूप स्थूल-मानानं असं सांगतां येईल कीं, राजकारणाच्या मुख्य घटना आणि कथानकांतील मुख्य सुखदु:खप्रसंग या दोन गोष्टींची सुंदर गुंफण तिच्यांत झालेली दिसली पाहिजे. माझं हें मत टीकाकारांना पटो अगर न पटो पालटण्याचं कारण मला दिसत नाहीं. या मताला अनुसरूनच " प्रवासी " कादंबरीची आखणी मी करीत होतों.

ज्या काळांत मी " प्रवासी " लिहीत होतों त्या काळांत म्हणजे १९३६-३७ च्या सुमारास एक महत्त्वाची वैचारिक रस्सीखेच मी खेळत होतों, कुणाशी ?—तर श्रीयुत शंकरराव किर्लोस्कर यांच्याशीं. १९३० सालापासून मी त्यांच्या मासिकांत लिहूं लागलों होतों आणि नंतरच्या सहा–सात वर्षांत पांच–सहाशें पृष्ठांचं लेखन मी त्यांत केलं होतं. मराठी साहित्यांत यामुळें काय किमतीची भर पडली अगर किर्लोस्कर मासिकांच्या प्रतिष्ठेंत कोणती भर पडली हें मी ठरवायंच नाहीं, पण एवढं मला म्हणतां येईल कीं, हीं सहा-सात वर्षं म्हणजे माझ्या व शंकररावांच्या सहकार्याचा आणि वैचारिक समरसतेचा वसंत ऋतु होता. परंतु ज्या वेळीं मी प्रवासी लिहीत होतों त्या वेळीं मला दिसून आलं कीं त्यांच्या व माझ्या या

समरसतेला हळूहळू चिरा पडत आहेत, त्यांचे माझे विचार भिन्न भिन्न दिशांनी वहात आहेत. त्यांच्या कुटुंबांतली मिनाक्षी कऱ्हाडकर आणि श्रीनिवास सरदेसाई ही मंडळी कम्युनिस्ट पक्षाच्या निवडक पुढाऱ्यांपैकीं होती. ज्यांना मीही पितृस्थानीं मानीत होतों तें शंकररावांचे वडील बाबाही कम्युनिस्ट पंथाचा उत्साहानें पुरस्कार करूं लागले. निकटवर्तियांच्या या मताचा शंकररावांच्यावर झपाट्यानं परिणाम होऊं लागला होता. आपल्या मासिकांतून कम्युनिझमचा संदेश जनतेपर्यंत पोंचविण्याची इच्छा त्यांना होऊं लागली होती. आणि या बाबतींत आपल्या प्रमुख लेखकांचं साहाय्य मिळविलं पाहिजे असं त्यांना त्यामुळें वाटूं लागलं होतं. कलेसाठीं कला हें माझ तत्त्व त्यांना पटेनासं झालं होतं. प्रचारकी थाटाचं लेखन मी करावं अशी अपेक्षा ते बाळगूं लागले होते. मी तें करीत नाहीं म्हणून ते नाराज होऊं लागले होते. त्यांच्या नव्या विचारसरणीकडे ते मला ओढीत होते. मी माझ्या दृढ भूमिकेला चिकटून ओढ घेत होतों. त्यांच्या माझ्यांत हें नवं अंतर उत्पन्न झाल्याचं पाहून मला काय वाटत होतं त्याची थोडीशी कल्पना त्या वेळच्या माझ्या एका लेखावरून येण्यासारखी आहे.

" किर्लोस्कर " मासिकाचा दोनशेवा खास अंक १९३६ च्या सप्टेंबर महिन्यांत प्रसिद्ध झाला. त्यांत हा लेख मीं लिहिला होता. " पंचेचाळीस हजार प्रतींच्या तीन मासिकांचा गुप्त सूत्रधार " या मथळ्याच्या त्या लेखांत मीं शंकररावांचं शब्दचित्र रेखाटलं होतं. लेखाच्या शेवटीं मीं लिहिलं होतं—

उत्कट महत्त्वाकांक्षेनें आणि ध्येयप्रेरित होऊन अविश्रांत परिश्रम करणाऱ्या, आपलें हें जिवित लोकांच्या सेवेसाठीं आहे असें मानणाऱ्या, चैतन्ययुक्त विचारांनीं आपल्या बांधवांचीं अंतःकरणें भरून जावींत व जागे व्हावें, उठावें, आणि दिग्विजय करावेत असें त्यांस वाटावें म्हणून तळमळणाऱ्या आणि धडपड करणाऱ्या शं. वा. किर्लोस्कर नांवाच्या या नमुनेदार संपादकाचें मला अपरंपार कौतुक वाटतें. पण मला अनेक वेळेस भीति वाटते कीं, या संपादकाच्या पोटांत माझे स्नेही शंकरराव किर्लोस्कर हे हरवणार तर नाहींत ? त्यांच्या हातून व्यक्तित्वाच्या त्यागाचा अतिरेक तर होत नाहीं ? उत्तम चित्रकाराला आवश्यक असलेली चातुरी अंगीं असूनहि

उत्तमोत्तम कलाकृति निर्माण करून लोकांपुढें मांडण्याच्या आपल्या स्वाभाविक इच्छेचा त्यांनीं अंगीकृत कामाच्या एकनिष्ठ सेवेंत केव्हांच होम करून टाकला आहे. कुंचल्याचा उन्मत्त नाद सोडून ज्या चतुर हातांनीं वास्तविक रंगाची मोहिनी खचित निर्माण केली असती त्या आपल्या हातांत त्यांनीं वजनदार आणि धार असलेलीं हत्यारें घेतलीं आहेत. समाजाच्या मनावर उगवलेलें जीर्ण रानगवत कोयत्यानें कापीत आणि समाजाची विचारशक्ति तावूनसुलाखून त्यावर हातोड्याचे घाव मारीत हा माझा स्नेही कायमचा गर्दींत पुढें धांवत असतां माझा हात सुटून मला दिसेनासा तर होणार नाहीं अशी मला अनेक वेळां चिंता वाटूं लागते. कित्येक वेळां माझ्या स्वतःच्या विचारतंद्रीच्या स्वप्नांतून मी जागा होतों. शंकररावांचा स्नेहभरानें उबदार वाटणारा हात माझ्या हातून सुटून चालला आहे असा मला भ्रम होतो. मी बावरतों, गोंधळतों, आणि मनांत त्यांचीं आर्जवें करतों, "प्रिय शंकरराव, अंगीकृत कार्याचा ध्यास माणसानें धरावा, पण त्या कामांतहि माणसानें स्वतःचें वैयक्तिक सौख्य, स्वतःची ललितवृत्ति अगदींच नामशेष करून टाकूं नये. आपली प्रकृति संभाळा. अगदींच संन्यस्त वृत्तीनें राहूं नका." मीं असें लिहिलें कीं तें उलट लिहितात, "कामाचा रगाडा स्वतःभोंवतीं निर्माण करून त्यांत स्वतःचें सुख आणि आनंद विसरावा यांतच गढून जावयास मी शिकलों आहें."

परंतु एखाद्या पत्रांत शंकररावांची मूळची कलासाक्ति उचंबळून येते, व मग ते लिहितात, "प्रिय अप्पासाहेब, माझ्या या कामाच्या धांदलींतून मी आतां अल्प काळांतच स्वतःसाठीं थोडीशी सवड काढणार आहे. माझ्या आयुष्यांतील एक स्वप्न असें आहे कीं, एक मोठी मोटारगाडीच आपलें घर समजून लांब लांब कोठें तरी, निसर्गाच्या अगदीं निवांत सहवासांत जाऊन भटकावयाचें, मनसोक्त चित्रें काढावयाचीं, आणि त्यांत मिळणारा आनंद पोटभर लुटावयाचा. अशा या रम्य मुशाफरींत तुम्हीं मजबरोबर याल ना?"

मीं उलट लिहितों, "बेशक! तुम्हीं म्हणाल त्या वेळीं मी तयार आहें."

—आणि आम्हीं दोघे अशा मुशाफरीवर केव्हां तरी खचित जाणार आहोंत.

## : : ६५ : :

१९३७ सालीं कॉंग्रेसचीं मंत्रिमंडळें अधिकारावर होतीं. त्यांचं धोरण आणि कारभार यांविषयीं लोकांत असंतोष वाढत होता. निवडणुकीच्या वेळीं त्यांनीं मुक्तकंठानं दिलेलीं वचनं खोटीं ठरत होतीं. कामगारांच्या कल्याणाच्या घोषणा मंत्री विसरले होते. भांडवलदारांना दुखविण्याची त्यांची इच्छा नव्हती, आणि त्यांचं प्रियाराधन करण्यासाठीं कामगारांच्या चळवळी दडपून टाकण्यास ते सिद्ध झाल्याचीं चिन्हं दिसूं लागलीं होतीं. कामगार व कॉंग्रेस सरकार यांजमधील लढा अधिकाधिक स्पष्ट व उग्र स्वरूप धारण करूं लागला होता. या लढ्याचीं मुंबई प्रांतांतलीं जीं अनेक केंद्रें होतीं त्यांत सोलापूर शहराचं महत्त्व फार मोठं होतं. कारण या ठिकाणीं गिरणी-कामगारांची संख्या तर पुष्कळ होतीच पण याशिवाय विडी-कामगारांचाहि मोठा वर्ग होता, आणि गुन्हेगार जातींची एक स्वतंत्र वसाहत सरकारी देखरेखीखालीं ठेवलेली होती. कम्युनिस्ट पुढाऱ्यांच्या प्रचारामुळें या तिन्ही वर्गांचा उठाव झाला होता, आणि त्यांचा असंतोष काबूंत आणण्यासाठीं मुख्य मंत्री श्रीयुत खेर यांनीं खुद्द सोलापुरास धांव घ्यावी इतक्या थराला गोष्टी आल्या होत्या.

शंकरराव किर्लोस्करांनीं मला पत्र लिहून विचारलं, कामगारांच्या चळवळीच्या स्वरूपाचं प्रत्यक्ष अवलोकन करावयासाठीं तुम्ही सोलापुराला येतां काय ?

कलेसाठीं कला ही माझी भूमिका सोडण्यास मी कधींच तयार होणार नव्हतों. परंतु व्यक्तीच्या अगर समाजाच्या जीवनांतील सर्व प्रकारचे प्रक्षोभप्रसंग कलेचे विषय होऊं शकतात, आणि त्यांचं अवलोकन हा कलावंतांचा एक महत्त्वाचा उद्योग असावयास हवा, ही माझ्या भूमिकेची दुसरी बाजू होय असंहि मीं नेहमीं मानलेलं होतं. तेव्हां मीं शंकररावांच्या पत्राला उत्तर धाडलं, कीं सोलापुरास यावयास मी तयार आहें. केव्हां येऊं ? बोला. त्यांनीं दिवस ठरविला, व मी गेलों.

सोलापूरच्या मुक्कामांत ज्या गोष्टी मी पाहिल्या त्यांचा माझ्या मनावर खोल परिणाम झाला. मी कॉम्युनिस्ट बनलों असं नव्हे. परंतु कामगारांचा दृष्टिकोन समजून घेतल्याखेरीज व त्या दृष्टिकोनाशीं समेट केल्याखेरीज राज्ययंत्र व्यवस्थित चालूं शकणार नाहीं, व शांतता आणि सुव्यवस्था या गोष्टी टिकणार नाहींत हें मला पूर्वीपेक्षांहि अधिक उघड दिसूं लागल. या भूमिकेवरूनच सोलापूर येथें त्या वेळीं चालू असलेला विडी-कामगारांचा प्रचंड संप पाहिला, आणि गुन्हेगार जातींचा प्रश्न समजून घेतला आणि लवकरच कांहीं दिवसांनीं माझ्या अवलोकनावरून जे निष्कर्ष मी माझ्या मनाशीं काढले ते लघुकथांच्या व एका नाटिकेच्या स्वरूपांत मी वाचकांना सादर केले. " चंद्रा ", " रामरहिम ", " जागृतीचें स्वप्न ", " दादा ! डोळे पुरते उघडा ! " या किर्लोस्कर मासिकांत एका मागोमाग प्रसिद्ध झालेल्या गोष्टी मीं सोलापूर येथील मुक्कामांत जें पाहिलं त्यावर आधारलेल्या होत्या. या सर्व गोष्टींचीं इंग्रजी भाषांतरेंहि यथावकाश प्रसिद्ध झालीं, आणि मूळ मराठीप्रमाणेंच तींहि फार लोकप्रिय ठरलीं. या गोष्टींपैकीं " चंद्रा " ही गुन्हेगार जातींच्या वसाहतींतील एका बाईची कथा आहे; " रामरहिम " हिंदु व मुसलमान कामगारांच्या परस्पर नात्यांत धार्मिक भिन्नतेहून समान आर्थिक हितसंबंधच कसे अधिक प्रभावी ठरतात तें दर्शविणारी गोष्ट आहे; कामगार जागे होतील पण पांढरपेशाचे शिक्षक जागे होणं कठीण आहे या कल्पनेवर " जागृतीचें स्वप्न " ही गोष्ट आधारलेली आहे; बायकांना पळविणारे मुसलमान गुंड असतात तसेंच हिंदु गुंडहि असतात, या गुंडगिरीमागें धार्मिक लढा नसून आर्थिक विषमताच आहे,

असा आपला अनुभव सांगणारी एक तरुण दुर्दैवी मुलगी " दादा ! डोळे पुरते उघडा ! " या कथेची नायिका आहे.

सोलापूर येथील विडी-कामगारांच्या संपाला जी परिस्थिति कारण झाली तिचं चित्र ' किर्लोस्कर 'मध्यें मीं लिहिलेल्या " आगलावी " या एकांकी नाटिकेंत रंगविलेलं आहे. या नाटिकेचं पुढें " चिनगारी " या नांवानं हिंदी भाषांतर झालं, तें सध्यांच्या हिंदीच्या अभ्यासक्रमांत नेमलेल्या " पांच एकांकिका " या पुस्तकांत समाविष्ट झालेलं आहे. विडी-कामगारांच्या प्रत्यक्ष दुःस्थितीच आणि गाऱ्हाण्यांचं जें वर्णन मीं या नाटिकेंत केलेलं आहे तें पुढील उताऱ्यांवरून लक्षांत येईल. विडी-कारखान्याचे एक मालक नरसाप्पा शेट यांच्याविषयीं नाटिकेंतली नायिका मीरा आपल्या वडिलांना म्हणते :—

" यांच्या औदार्याचं, दयेचं, न्यायाचं, माणुसकीचं खरं चित्र पहायचं आहे का भाऊ तुम्हांला ? पहा. आपल्या या दिवाणखान्याहून जरा लहानच अशी एक पत्र्याच्या छपराची जागा आहे. तिथं धड उजेड नाहीं, हवा नाही. उन्हाळ्यांत पत्रे तापले कीं त्या जागेला एखाद्या भट्टीचं स्वरूप येतं. तिथं दोनअडीचशें बायका विड्या बांधीत बसतात. मांडीला मांडी लावून खेटून बसावं लागतं त्यांना. कुणाचीं तान्हीं मुलं असलीं, तर तीं बिचारीं पडलेलीं असतात बाईबाईच्या मधें काय वीतभर जागा मिळेल तेवढ्यावर. काम करतांना बाईला तहान लागली तर प्यायच्या पाण्याची सोय नसते किंवा जरूर लागली तर आडोशाची मोरी नसते. अशा या अपूर्व सुखसोयीच्या जागेंत बसायचं भाडं म्हणून प्रत्येक बाईला चार आणे महिना भाडं द्यावं लागतंच बरं का, जणुं कांहीं त्या बाया त्या जागीं येऊन बसतात त्या आपल्या घरच्या कामासाठींच ! या राजरोस भाड्याखेरीज उशीरां येण्याबद्दल, बेअदबी केल्याबद्दल, अशा अनेक अपराधांबद्दल या बायकांच्या मजुरींतून वेळोवेळीं दंड कापला जातो तो निराळाच ! दहादहा तास मान मोडेपर्यंत विड्या बांधाव्या लागतात या बायकांना. अन् त्याबद्दल मजुरी किती मिळते त्यांना ? तर हजार विडीमागं पांच आणे ! म्हणजे वीस पैसे ! म्हणजे साठ पया ! पण हे पांच आणेहि बाईच्या हातीं कधीं शाबूत पडतील तर शपथ ! तिनं हजार विडी बांधली असली तर त्यांतली

अडीचशें विडी सैल बांधली, घट्ट बांधली, कमी भरली, अशा सबबीवर बाद होते अन् तेवढे पैसे कापले जातात. बायकांना वेळ कळावी म्हणून घड्याळ लावलं, तर त्याच्या किंमतीची भरपाई त्यांच्या मजुरींतनं होणाऱ्या कपातीनंच होते. अन् शिवाय प्रत्येक कामगारबाईनं आपल्या मजुरीचा ठराविक हिस्सा धर्मादायाच्या पेटींत टाकलाच पाहिजे. बरोबर आहे ! धर्मादयाची शिडी लावून कारखानदारांचे पितर स्वर्गांत गेले नाहींत, तर कामगार-बाया नरकांत पडतील ना ! त्या पडूं नयेत म्हणून केवढी ही परोपकारी तरतूद ! अवघ्या चारसहा आण्यांसाठीं घरदार, संसार, कच्चींबच्चीं सोडून प्रसंगीं उपाशी पोटानं, प्रसंगीं अंगावर प्यायसाठीं रडणाऱ्या अर्भकांना केरपोतेऱ्या-सारखं दूर टाकून, दहादहा तास पाठीचा कणा अन् हाताचीं बोटं मोडेपर्यंत दोनअडीचशें बायका ज्या गलिच्छ, कुबट, अंधेऱ्या, उकडहंडीसारख्या जागेंत रक्ताचं पाणी करतात, त्या जागेचं नांव 'नरसाप्पा शेटचा विडीचा कारखाना !' कसाईखानाच तो ! अन् कसाईखान्याचे मालक नरसाप्पा चारसहा लाखांचे धनी आहेत ! त्या सहा लाख रुपयांवर मालकी सांगतांना हजार विडीला पांच आण्यांऐवजीं सात आणे मजुरी द्या म्हणून टाहो फोडणाऱ्या, कारखान्याच्या यंत्रांत बरगड्या मोडेपर्यंत भरडून निघणाऱ्या बायकांची आठवण नाहीं होत तुम्हांला नरसाप्पाशेट ?"

**नरसाप्पा**—अरे बाप रे !

**पोकळे**—बघा, बघा रावबहादुर ! आग लागली म्हणतों मी तें उगीच नाहीं !

**रावबहादुर**—मीरा ! मीरा ! माझी मुलगी मीराच का तूं ? मला कल्पना नव्हती तूं इतकी तयार झाली असशील अशी. मी समजत होतों, तूं आणखी अजनो आपल्या शाळेच्या अभ्यासांत चूर आहांत, अन् कधीं लक्षच दिलं नाहीं मी तुम्ही काय करतां आहांत तिकडं. कुणीं तयार केलं तुला एवढं ?

**मीरा**—काळ आपोआप तयार करीत असतो भाऊ तरुण मुलांमुलींना !

**रावबहादुर**—अस्सं काय ? ठीक आहे ! मी काळाचा काळ लागून राहिलों आहें ! तूं पुष्कळ शेफारशील, पण मीं शेफारूं दिलं पाहिजे ना ? कुठल्या घामट, अडाणी विडी बांधणाऱ्या तेलंगी बायका, अन् त्यांचा

कैवार घेतेस ? त्यांच्यांत खुशाल मिसळतेस ? त्यांच्या मिरवणुकीपुढें नाचतेस ? मूर्ख कारटी ! उनाड ! आगलावी ! आगलावी !

मीरा— आगलावी ! भाऊ, पुन्हां उच्चारा तो शब्द. आगलावी ! भाऊ, तुम्ही मला ही शिवी म्हणून दिलीत, पण मला तो शब्द किती गौरवाचा वाटतो ! आगलावी ! मला वाईट एवढंच वाटतं कीं सुविचाराची जेवढी प्रचंड आग लावायची माझ्या मनांतली तळमळ आहे तेवढी मला लावतां येत नाहीं. घाण्याला जुंपलेल्या जनावरांहूनहि ज्यांची अवस्था अधिक केविलवाणी आहे अशा बायकांच्या उपाशी पोटांतल्या भुकेची आग मला लोकांना नीट दाखवून देतां येत नाहीं ! या बायकांवर होत असलेल्या अन्यायाच्या चिडीनं सारा समाज खडबडून जागा होईल अशी सत्याची चौफेर आग अजून पेटत नाहीं ! भाऊ, आमच्या लहानपणची एक गोष्ट मला या वेळीं आठवते. शेजारीं कुणाच्याशा घरांत लहानलहान मुलं जमून माडीवरच्या माळ्यावर खेळत होतीं. त्यांतल्या एका मुलानं आपल्या बापाच्या चार विड्या चोरून खिशांत घालून आणल्या होत्या, त्या त्या मूर्ख पोरांनीं ओढायला सुरुवात केली. पण तितक्यांत त्यांना कुणाचीशी चाहूल लागली, अन् तोंडांतल्या जळक्या विड्या तशाच टाकून तीं पोरं खालीं पळालीं. माळ्यांत गवतकचरा सांचला होता अन् रॉकेलचे डबेहि होते. माळा पेटला अन् घराला मोठी आग लागली. दुसऱ्या दिवशीं गांवांत जो तो म्हणूं लागला, एका विडीपायीं केवढी आग लागली पहा ! पण ती आग कांहींच नव्हे अशी प्रचंड आग विडा-कारखानदारांनीं गोरगरिबांच्या घराला कायमची लावलेली आहे ती लोकांना दिसत नाहीं. या नरसाप्पाशेटचे टोलेजंग वाडे तुम्हांला दिसतात. पण त्या वाड्यांकडे पाहिलं कीं मला त्या ठिकाणीं अन्यायाच्या, निर्दयतेच्या, धनलोभाच्या ज्वाळा भडकलेल्या दिसतात ! अन् त्या वणव्यांत सांपडलेल्या शेंकडों कामगार बायका भुकेनं व्याकुळ होऊन, अंगभर वस्त्राला मोताद होऊन, आरोग्य गमावून, प्रसंगीं इज्जतीवरचे घाले सहन करून किंकाळ्या फोडताहेत, त्यांचा टाहो मला ऐकूं येतो ! नरसाप्पाशेट, तुम्हांला ही आग कधीं दिसत नाहीं का ? हा टाहो कधीं ऐकूं येत नाहीं का ? कामगार बायकांना पिळून काढण्याचा धंदा पिढ्यान् पिढ्या करून उभारलेल्या आपल्या तीन मजली वाड्यांत तुम्हांला

सुखाची झोंप येते ? आज आठ दिवस झाले, घरांत कवडी शिल्लक नाहीं, नव्या मजुरीची आशा नाहीं, उद्यांच्या भाकरीची शाश्वति नाहीं, अशा भयंकर परिस्थितींत दीड हजार बायका संप लढवताहेत, हा तुम्हांला नुसता पोरखेळ वाटतो ? या बायकांच्या अंगीं धैर्य कुठून आलं, हा निश्चय कुठून आला, याचा विचार तुम्हांला सुचतच नाहीं ? या बाया कांहीं तुमचा टोलेजंग वाडा रहायला मागत नाहींत, तुमच्या बायकोच्या अंगावरचे सोन्यामोत्यांचे दागिने मागत नाहींत, तूपसाखरेच्या पक्वान्नांचं तुमचं ताट मागत नाहींत ! आम्हांला गुलामगिरींतून अन् दारिद्र्यांतून सोडवा एवढीच त्यांची साधी मागणी आहे ! भरपूर मजुरी घेतां–भरपूर मोल द्या, एवढाच त्यांचा आग्रह ! पूर्वीं तुम्ही हजार विडीला सात आणे देत होतां तसे द्या, पांच आण्यांत पोट भरत नाहीं, येवढंच त्यांचं म्हणणं ! तेंहि तुम्हांला मान्य करतां येत नाहीं ? काय नरसाप्पाशेट ? बोला ना !

गिरणी–कामगार व मालक, आणि विड्या बांधणाऱ्या बाया आणि कारखानदार यांच्यांतील संघर्षाला थोडं तरी असं स्वरूप होतं, कीं चुटकी-सरसं कामगारांचं कल्याण आम्हांला कसं करतां येईल, असा प्रश्न सरकारनं विचारला तर तो रास्त म्हणावा लागला असता. उभय पक्षांच्या हिताचं संरक्षण आम्हांला करायचं आहे, केवळ भावनावश होऊन कामगारांचा कैवार आम्हांला घेतां येणार नाहीं, कामगारांचंहि कल्याण आम्हांला करायचं आहे; परंतु त्यासाठीं अनेक व्यावहारिक अडचणी लक्षांत घेतल्या पाहिजेत, जें करायचं त्याला अवधि लागणं अपरिहार्य आहे– अशा तऱ्हेचा जो युक्तिवाद कॉंग्रेसमंत्री करीत होते तो ढोंगीपणाचा आहे अशी कितीहि जबरदस्त शंका वाटली तरी त्या युक्तीवादाला उत्तर नव्हतं. पण गुन्हेगार जातींच्या प्रश्नाला मात्र व्यवहाराचे असे फांटे फुटण्यासारखे नव्हते. हजारों स्त्री–पुरुषांना व मुलांना केवळ तीं सरकारनं गुन्हेगार म्हणून शिक्का मारलेल्या जातींत जन्मलीं यासाठीं कांटेरी कुंपणाआड कैदेंत डांबून ठेवलं जावं ही गोष्ट उघड उघड अन्यायाची होती, सत्याचं कंकण बांधून राज्य चालविणाऱ्या कॉंग्रेसनं हा कलंक किंचित्‌हि अनमान न करतां धुऊन टाकला पाहिजे असं वाटण्यासारखं होतं.

निदान सोलापूरची गुन्हेगार–वसाहत प्रत्यक्ष पाहिल्यावर मला तरी

तीव्रतेनें असं वाटलं. मी व शंकरराव किर्लोस्कर सोलापुरास गेलों तेव्हां प्रधान मंत्री श्री. खेर हेहि तिथें आले होते. किंबहुना ते येणार हा मोका साधण्यासाठींच आम्ही गेलों होतों. श्री. खेर यांच्या महत्त्वाच्या कार्यक्रमांत गुन्हेगार-वसाहतीस भेट देण्याचा कार्यक्रम होताच. त्यांना आम्हीं कळविलं कीं आपली हरकत नसेल तर आम्ही आपल्याबरोबर वसाहतींत येऊं इच्छितों. त्यांचा उलट निरोप आला, 'जरूर या.' आम्ही गेलों. पण खेरांनीं तेथें गेल्यावर अशी इच्छा दर्शविली कीं आधीं मीं एकटाच कुंपणाच्या आंत जाऊन वसाहतींतल्या स्त्री-पुरुषांशीं बोलतों आणि बाहेर आल्यावर मग मी तुमच्याशीं चर्चा करीन. ही त्यांची इच्छा रास्तच होती. ते आंत गेले; आम्ही बाहेर थांबलों. पण तास झाला, दीड तास झाला तरी ते बाहेर आले नाहींत; आणि मला व शंकररावांना रात्रीं विजापुरास जाणं तर भाग होतं. शेवटीं, आम्हांला अधिक थांबतां येत नाहीं याबद्दल दिलगिरी प्रदर्शित करणारं पत्र खेरांसाठीं लिहून ठेवून आम्ही वसाहतीवरून परत गेलों. गुन्हेगार-वसाहतीच्या प्रश्नाबद्दल मला काय वाटतं तें श्री. खेर यांना समक्ष सांगण्याची एक नामी संधि आली होती ती गेली, असं मला साहजिकच वाटलं.

पण श्री. खेर यांच्या सौजन्यामुळें ती संधि निराळ्या स्वरूपानं का होईना पुन्हां मला मिळाली. त्यांनीं मुंबईस परत गेल्याबरोबर मला व शंकररावांना पत्र लिहिलं कीं,

"मी गुन्हेगार वसाहतींतल्या रहिवाशांशीं बोलणीं करून बाहेर आलों तों आपण विजापूरला जाण्यासाठीं निघून गेलांत असं कळलं. समजुतीच्या घोटाळ्यामुळें आपणांस तकलीफ झाली याबद्दल मला वाईट वाटतं. गुन्हेगार वसाहतीच्या प्रश्नामुळें माझं मन बरेच दिवस सचिंत आहे, व आपल्याशीं त्याबद्दल चर्चा करावयास मिळाली असती तर मला फार आनंद झाला असता. आपण कधीं मुंबईस आलांत तर मला जरूर भेटावें. आपले विचार समजून घेण्याची मला फार उत्कंठा आहे."

त्यांच्या या ( इंग्रजी ) पत्राला मी लगेच ( इंग्रजींत ) उत्तर धाडलें तें पुढीलप्रमाणें :—

"...गैरसमज दूर व्हावा अशा इच्छेनं आपण जें अत्यंत सौजन्यपूर्ण

पत्र तत्परतेनें धाडलें त्याबद्दल मी आपला फार अभारी आहें. पण मी आपणांस सांगतों कीं, समजुतीचा घोटाळा झाला नाहीं. आपण बाहेर आल्यावर आपण आम्हांला चर्चेसाठीं बोलावणार हें आम्हांला पूर्ण माहीत होतं. परंतु आपल्या भेटीची व चर्चेची संधि टाकून जाण्याखेरीज आम्हांला गत्यंतर नव्हतं म्हणूनच आम्ही गेलों. आम्हांलाच उलट वाटत होतं कीं आमच्या निघून जाण्याचा विपरीत अर्थ होऊं नये, व म्हणून श्री. छन्नूसिंग व श्री. खडेगीकर यांना आम्हीं बजावून ठेवलं होतं कीं आम्हांला कां जावं लागलं त्याचा खुलासा त्यांनीं आपल्याजवळ करावा.

मात्र आम्हांला जावं लागलं त्यामुळें एक मोठी सुसंधि मी गमावली अशी चुटपुट माझ्या मनाला लागली. आपल्याशीं त्या दिवशीं कितपत मनमोकळी चर्चा करता आली असती कोण जाणे. आपणांस कल्पना नसेल पण आपण सोलापुरास भेट दिली त्याच्या आगोदर मी तेथें कांहीं दिवस गेलों होतों व गुन्हेगार स्त्री-पुरुषांत वावरलों होतों. मीं वसाहतींत जें पाहिलं त्यावरून मला असं वाटतं कीं गुन्हेगार वसाहतींचा प्रश्न "प्रश्न" म्हणतां येतच नाहीं. हा कठीण "प्रश्न" नसून हजारों स्त्री-पुरुषांच्या माणुसकी-वरच्या जन्मसिद्ध हक्काचा हा साधा सवाल आहे. यांच्या स्वातंत्र्याच्या अपहरणाचं समर्थन सामाजिक, आर्थिक, धार्मिक, कोठल्याहि मुद्द्याकरितां करतां येण्यासारखं नाहीं. या "गुलामां"च्या मुक्ततेच्या आड राज्यकारभारां-तील व्यावहारिक गुंतागुंत येत असेल, तर मी असं म्हणेन कीं कारभाराच्या "तांबड्या फिती" चीः प्रतिष्ठा बाळगणाऱ्या पंतप्रधानापेक्षां स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीचं समाधान करणारा पंतप्रधान आम्हांला हवा !"

मला वाटलं होतं माझ्या या पत्राचा श्री. खेरांना राग येईल, व ते उत्तर धाडणार नाहींत. फार तर पत्र पोंचलं, आभारी आहें, एवढं लिहितील. पण तसं झालं नाहीं. यानंतर त्यांचा माझा पत्रव्यवहार चालू राहिला. आज १९४९ सालीं कॉंग्रेसनं गुन्हेगार वसाहती नाहींशा केल्या आहेत. अशा वेळीं १९३७ सालीं मी व श्री. खेर यांजमध्यें झालेल्या उत्तर-प्रत्युत्तरांतील विचार मनोरंजक वाटण्यासारखे आहेत. म्हणून तो पत्रव्यवहार या स्मृतींत द्यावयाची इच्छा मला होते.

♠ ♠

: : ६६ : :

माझ्या पत्राला श्री. बाळासाहेब खेर उत्तर देणार नाहींत अशी माझी कल्पना होती. पण ती खोटी ठरली. त्यांच्याकडून ता. १६ नोव्हेंबर १९३७ या तारखेचं पत्र आलं तें पुढीलप्रमाणें होतं : " तुमचा माझ्याविषयीं कांहीं गैरसमज झालेला नाहीं हें तुमच्या पत्रावरून कळल्यामुळें मला फार आनंद झाला. गुन्हेगार वसाहतीसंबंधीं बोलावयाचं झाल्यास कोणत्याहि एका व्यक्तीला अगर जमातीला केवळ जन्मावरून गुन्हेगार ठरविणं ही गोष्ट शुद्ध अन्यायाची आहे असं मला नेहमींच वाटत आलेलं आहे. आपल्यांतील चातुर्वर्ण्यांतून उगवलेली ही एक विषवल्लीच आहे अशी माझी समजूत आहे. वसाहतींतील लोकांपुढें व्याख्यान देतांना मी हेंच सांगितलं. ज्या लोकांनीं गुन्हेगार जमातींचा हा प्रश्न निर्माण केला त्यांनाहि मी असंच पटविण्याचा प्रयत्न करीत आहें कीं, ही सारी प्रक्रिया आतां उलटविली पाहिजे. माझ्या मनाला ज्या गोष्टी पटल्या आहेत त्या अंमलांत आणण्याची शक्य तितकी कोशीस मी करीत आहें. तुम्ही आपले विचार मला कळविले हें फार चांगलं झालं. तुम्ही जेव्हां मुंबईस याल तेव्हां आपण जरूर एकत्र बसून या विषयाची चर्चा करूं व काय करतां येण्यासारखं आहे तें ठरवूं. कांहीं तरी करायला पाहिजे यांत संशय नाहीं. वसाहतींत जेव्हां मीं व्याख्यान दिलं तेव्हां माझ्या श्रोत्यांपैकीं कित्ती तरी लोक ढळढळा रडूं लागलेले मी

पाहिले. त्यांच्या भावनांच्या नाजूक तारा किती सहज रीतीनें कंपित झालेल्या मला दिसल्या. आणि तरी या लोकांना रानटी मानून आम्हीं बहिष्कृत केलेल आहे! आतां मला असं वाटतं कीं तुम्हांला मी माझ्याबरोबर वसाहतीच्या आंत घेऊन जावयाला हवं होतं. या प्रश्नांत तुम्हीं लक्ष घातलं आहे, या निमित्तानं आपला जो नवा परिचय झाला आहे तो अधिकाधिक वृद्धिंगत होईल अशी मला आशा आहे.''

श्री. बाळासाहेब खेर यांच्या पत्राला मीं पुढीलप्रमाणें उत्तर धाडलं. सध्यां कॉलेजांतील काम अगदीं हातघाईला आलेलं असल्यामुळं मनांत इच्छा असूनहि गुन्हेगार वसाहतींच्या प्रश्नाची तुमच्याशीं चर्चा करण्यासाठीं मला मुंबईस येतां येत नाहीं याबद्दल क्षमा करावी. गुन्हेगार वसाहतींच्या बाबतींत जें चौकशी मंडळ सरकारनं नेमलेलं आहे त्यापुढें माझे विचार मांडण्याची व साक्ष देण्याची माझी इच्छा आहे. मात्र यासाठीं मला सर्व वसाहतींना भेट देतां येईल अशी तजवीज आपणास करावी लागेल.

"गुन्हेगार वसाहतींतील लोकांनाहि भावना आहेत, व त्यांना आपण रानटी मानतों ही शरमेची गोष्ट होय, इत्यादि आपल्या पत्रांतील विचार वाचून मला धीर आला. परंतु एकीकडे साऱ्या वर्तमानपत्रांतून ज्यांची चर्चा होत आहे असे आपल्या सहीशिक्क्यानिशीं निघालेल्या दडपशाहीचे हुकूम यांचा आम्हीं मेळ कसा घालायचा? आपलं सुंदर पत्र आणि १४४ कलमांची अमंलबजावणी हीं एकमेकांशीं खचितच सुसंगत नाहींत. राजकारणाचा प्रत्यक्ष व्यवहार खरोखरच इतका विसंगत आणि मनाचा गोंधळ उडविणारा असलाच पाहिजे काय?''

या माझ्या पत्राला उत्तर म्हणून श्री. बाळासाहेब खेर यांनीं लिहिलं, "तुमच्या ता. १८ च्या पत्राला उत्तर देऊन तुम्हांला मी तसदी दिली नसती; परंतु तुमच्या पत्राच्या अखेर तुम्ही ध्वनित केलं आहे कीं माझ्या उक्तींत आणि कृतींत मेळ नाहीं. तुम्हीं मला हेतूपूर्वक लबाड अथवा ढोंगी म्हणत असाल असं मला वाटत नाहीं. महात्मा गांधींनीं एके ठिकाणीं असं म्हटलं आहे कीं, 'गुन्हेगार वसाहतींतल्या या लोकांना मुक्त केल्यानंतर ते कशा प्रकारें वागतील याचा अदमास घेतल्याखेरीज त्यांच्या बाबतींत

सरकारी धोरण एकदम बदलणं शहाणपणाचं होणार नाहीं. एक सुधारणा मात्र अवश्य करता येईल, ती ही कीं ज्यांची सावलीदेखील अंगावर पडूं देतां कामा नये असे ते पापी लोक आहेत असं आपण मानतां कामा नये. आपण त्यांच्याविषयीं बंधुभाव बाळगला पाहिजे. आणि राष्ट्रसंवर्धनाच्या कामीं त्यांचा उपयोग कसा करून घेतां येईल याचा विचार केला पाहिजे."

"या गोष्टींची सविस्तर चर्चा पत्रांतून करतां येण्यासारखी नाहीं. परंतु माझ्या स्वतःच्या समर्थनासाठीं मला असं लिहिलं पाहिजे कीं खलिफ हरून अल् रशिदच्या काळांत आपण राहत नाहीं. सहानुभूति आणि कल्पनाशक्ति तुमच्याजवळ भरपूर आहेत, आणि या दोन गुणांच्या सहाय्यानं परिस्थितीचं खरं स्वरूप तुम्ही जाणूं शकाल. ही गोष्ट जरी घडली नाहीं तरी निदान मी एवढी आशा करतों, कीं जो केवळ उदात्त शब्दांची पोपटपंची करतो, पण दुष्टपणानं वागतो असा एक इसम मीं आहे असा माझ्याविषयीं ग्रह तुम्ही करून घेणार नाहीं आणि जो आपला स्नेह या निमित्तानं जमून आला तो कलिकावस्थेंत तोडून टाकणार नाहीं."

यावर मी श्री. बाळासाहेब खेर यांना लिहिलं, "तुमच्यावर लबाडीचा अगर ढोंगीपणाचा आरोप करण्याचा माझा मुळींच हेतू नव्हता, आणि तुमच्या माझ्या मतांची एकवाक्यता होत नाहीं एवढ्याच कारणासाठीं तुमचा स्नेह मला नकोसा वाटेल ही तुमची समजूत चुकीची आहे. तुमच्या अंतःकरणांतील गुन्हेगार जातीविषयींच्या भावना आणि तुमचं सरकारी जाहीर धोरण यांत जमीन-अस्मानाचं अंतर मात्र मला स्पष्ट दिसतं. या अंतराचं समर्थन करण्यासाठीं आपण कांहीं हरून अल् रशिदच्या काळांत रहात नाहीं याचं स्मरण तुम्हीं मला करून दिलं आहे, आणि मी माझी सहानुभूति आणि कल्पनाशक्ति यांच्या सहाय्यानं परिस्थितीचं सत्य स्वरूप ओळखावं अशा सूचना केली आहे. 'परिस्थितीचं सत्य स्वरूप' हा शब्द-प्रयोग आतांशा फार ऐकूं येतो. परंतु मला असं वाटतं कीं, 'परिस्थितीचं सरकारला जें स्वरूप दिसतं' या लाजिरवाण्या शब्दप्रयोगाऐवजीं वापरण्यांत येणारा तो एक सोज्ज्वळ गोड शब्दप्रयोग आहे आपण हरून अल् रशिदचा उल्लेख केला. परंतु सोलापुरच्या वसाहतींतल्या तीन लोकांना

झालेली हद्दपारीची शिक्षा, या शिक्षेविरुद्ध वसाहतींतल्या लोकांनीं केलेली चळवळ, आणि ही चळवळ केल्याबद्दल भरण्यांत आलेले खटले, इत्यादि घटनांच्या बातम्या वाचल्या आणि ऐकल्या कीं मनांत येतं, हरून अल् रशिदच्या काळांत आपण असतों तर फार बरं झालं असतं. कारण त्याच्या भलेबुरेपणाच्या साऱ्या गोष्टी लक्षांत घेऊनहि एवढं कबूल करावंच लागेल कीं तो कोणतीहि गोष्ट झटपट निकालांत काढीत असे. न्यायाची असो अगर अन्यायाची असो, पण अमुक एक गोष्ट करण्याचं त्याच्या मनानं ठरविलं कीं मग सबबी सांगत न बसतां ती तो ताबडतोब करून टाकीत असे. ज्या काळांत कालहरण हीच सरकारी धोरणाची गुरुकिल्ली झाली आहे, आणि चौकशी–कमिट्या, मंत्र्यांच्या मसलती, वर्धा परिषदा यांचा सुळसुळाट झालेला आहे, त्या काळांतले आम्ही लोक हरून अल् रशिदच्या प्रजाजनांपेक्षां अधिक सुखी खरोखर आहोंत काय ? आमच्या सुखीपणाची प्रत्यक्ष प्रमाणं दिसल्याखेरीज आहोंत असं कसं म्हणायचं ?

“ माझं हें लिहिणं आपल्याला कटु वाटेल तर आपण मला क्षमा करा. पण आपण आपल्या एका पत्रांत लिहिलं होतं कीं गुन्हेगारांच्या या वसाहती म्हणजे चातुर्वर्ण्याचे उरलेले अवशेष आहेत. महात्मा गांधींनीं नुकतंच या अर्थाचं विधान केलेलं आहे. म्हणजे गुन्हेगार जमातीचा प्रश्न अस्पृश्य लोकांच्या प्रश्नासारखाच आहे ही गोष्ट तुम्हीं मान्य करतां असं दिसतं, आणि म्हणून साहजिकच असा सवाल करावासा वाटतो कीं ज्या तांतडीनं आणि चिडीनं अस्पृश्यतेचा कलंक घालविण्यासाठीं प्रयत्न करण्यांत येतात त्या प्रकारची आस्था, भावनेची तीव्रता आणि घाई या गुन्हेगार जमातींना मुक्त करण्याच्या बाबतींत कॉंग्रेस सरकार कां दाखवीत नाहीं ? अस्पृश्यांच्या कैवारासाठीं महात्मा गांधींनीं आपले प्राण पणाला लावले, आणि डझन दोन डझन गोलमेज परिषदांनीं व शेंकडों व्याख्यानांनीं जें कार्य झालं नसतं तें त्यांच्या जगविख्यात उपवासानं एका दिवसांत साध्य झाल. गुन्हेगार जमातींना मुक्त केल्यास ते नीटपणानं वागतील कीं नाहीं याचा अदमास घेतला पाहिजे असं गांधी म्हणतात, परंतु अशी भाषा अस्पृश्यांच्या बाबतींत आम्ही कधीं ऐकली नाहीं. अस्पृश्यांची अस्पृश्यता दूर झाल्यावर ते लोक सज्जनपणानं वागतील कीं नाहीं याचा आपण

अदमास घेतला पाहिजे असं गांधींनीं कुठं म्हटल्याचं मला आठवत नाहीं. मग गुन्हेगार जमातींच्या संबंधांत मात्र ही भाषा त्यांना आणि तुम्हांला कां सुचावी ? बर, गांधीदेखील गुन्हेगार जातींतल्या लोकांना एक न्याय तावडतोब दिला पाहिजे असं म्हणतातच कीं. तुम्हींच आपल्या एका पत्रांत गांधींचं एक वचन उद्धृत केल्याचं मला आठवतं. तें वचन असं कीं आपण या लोकांशीं बंधुभावानं वागलं पाहिजे आणि राष्ट्राच्यां बल-संवर्धनासाठीं त्यांचा उपयोग कसा करून घेतां येईल तें पाहिलं पाहिजे. गुन्हेगार वसाहतींतल्या लोकांची चळवळ दडपून टाकण्यासाठीं तुमचं सरकार जे उपाय करीत आहे ते बंधुभावाचेच प्रकार म्हणावयाचे काय ?

" मला वाटतं माझ्या लिहिण्याची ही तऱ्हा तुम्हांला प्रिय वाटणार नाहीं व तुम्हीं पुढच्या पत्रांत मला असं लिहाल कीं हा पत्रव्यवहार पुढें चालू ठेवण्यांत कांहीं फायदा नाहीं. म्हणून हें पत्र संपविण्यापूर्वीं तुम्हांला असं सांगावसं वाटतं कीं पत्रद्वारा तुमच्याशीं विचारविनिमय करण्याची जी संधि मला तुम्हीं दिली तीबद्दल मी तुमचा आभारी आहें; आणि मीं मुंबईस येईन तेव्हां तुमची भेट घेण्यांत मला फार आनंद होईल. "

माझ्या या पत्रांत मी जी शंका व्यक्त केली होती ती खरी ठरली. हा पत्रव्यवहार एवढ्यावरच थांबला. गुन्हेगार जमातींना मुक्त करण्याची गोष्ट तर दूरच राहिली, उलट आपल्या हक्कांसाठीं आपण कांहीं तरी चळवळ केली पाहिजे अशी जी जाणीव त्या लोकांत उत्पन्न होऊं लागली होती ती मुळांत खोडून काढण्याचं जुलमी धोरण मात्र मुंबई सरकारनं अधिक जोरानं अंमलांत आणलं. गुन्हेगार वसाहती नष्ट करून टाकण्याचं जें सत्कृत्य कॉंग्रेस सरकारनं १९४९ सालीं केलं तें करण्याची बारा वर्षांपूर्वीं आलेली संधि त्यांनीं कां घालविली या प्रश्नाचा उलगडा मला अजूनहि करतां आलेला नाहीं.

ता. २२ सप्टेंबर १९३६ रोजीं ' प्रवासी ' ही नवी कादंबरी लिहावयास मीं आरंभ केला होता. ती ता. २८ जूलाय १९३७ रोजीं मी लिहून पुरी केली आणि ऑक्टोबरच्या पहिल्या तारखेस ती एकदम पुस्तकरूपानं प्रसिद्ध झाली. ' काश्मिरी गुलाब ' ही त्या वेळेपर्यंतची माझी

सर्वांत लहान कादंबरी होती. तर तिच्या मागोमागच लिहिलेल्या 'प्रवासी' कादंबरीचा विस्तार मोठा होता. या कादंबरींत एका तरुणाचं चरित्र मला मुख्यतः रंगवायचं होतं. त्याच्या या चरित्रांत १९२० आणि १९३० या दोन सालांतलीं मोठीं राजकीय आंदोलनं मला चित्रित करावयाचीं होतीं. परंतु त्या आंदोलनांचं राजकीय स्वरूप हा कांहीं माझ्या कादंबरीचा विषय नव्हता, तर या आंदोलनांची माझ्या कादंबरींतल्या नायकाच्या मनावर जी प्रतिक्रिया झाली त्या प्रतिक्रियेला मी महत्त्व देणार होतों. नायकाच्या मनाची ही प्रतिक्रिया सुसंगत वाटावी यासाठीं त्याच्या स्वभावाचे कांहीं विशेष कल्पून त्या विशेषांचं चित्रण रंगदार रीतीनें करणं ही गोष्ट मी आपल्या नजरेसमोर मुख्यतः ठेवली होती. हें चित्रण आकर्षक करण्यासाठीं कादंबरीचा नायक राजाभाऊ सरंजामे याच्या स्वभावधर्माचीं बीजं त्याच्या बापाच्या स्वभावांत कशीं होतीं आणि राजाभाऊनं मोठेपणीं केलेल्या गोष्टींच्या मुळाशीं ज्या मनःप्रवृत्ती होत्या त्यांचा उगम त्याच्या बापाच्या चरित्रांत कसा होता तें सूचित करण्याचं मीं ठरविलं. मनुष्याला इच्छास्वातंत्र्य खरोखर कितीसं आहे हा वेदान्तांतील.एक ठराविक प्रश्न आहे. त्याचा निश्चित निर्णय लावणं इतकं कठीण आहे कीं, मोठमोठ्या चिकित्सक शास्त्रज्ञांचे व तत्त्ववेत्त्यांचे त्यासंबंधींचे वाद हजारों वर्षं झालीं तरी चालूच आहेत, व चालूच राहतील. या बाबतींत मला असं वाटत आलेलं आहे कीं प्रत्येक व्यक्ति जन्म घेऊन या जगांत येतांना कांहीं एक विवक्षित प्रवृत्ति घेऊन येते, आणि त्या प्रवृत्तीच्या व परिस्थितीच्या संघर्षांतून त्याच्या एकंदर जीवनाचा चित्रपट तयार होतो हा माझा आवडता सिद्धान्त आहे. माझ्या एकंदर ललित लेखनांत या सिद्धान्ताचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष प्रचार मी अनेक ठिकाणीं केलेला आहे. या सिद्धान्ताकडे वाचकांचं लक्ष विशेष रीतीनं वेधावं असा 'प्रवासी' कादंबरी लिहितांना माझा हेतु होता, आणि स्वभाव-दर्शन व प्रसंग–योजना या दोन्ही गोष्टी करतांना या हेतूचं अवधान मीं ठेवलेलं अभ्यासू वाचकांना दिसेल. माझ्या हेतूच्या सिद्धतेसाठींच 'कथानकाचं पूर्वसूत्र' कादंबरीच्या आरंभीं दिलेलं आहे, आणि त्यांत नायकाचा बाप पंजाबराव सरंजामे याच्या स्वभावाचं चित्र मीं रंगविलेलं आहे.

पंजाबराव सरंजामे ही व्यक्ति रंगवितांना एक प्रत्यक्ष होऊन गेलेली व्यक्ति माझ्या डोळ्यांसमोर होती. या व्यक्तीचं कर्तृत्व, धाडस, सरकारचा रोष आणि लोकमत या दोन्ही गोष्टींविषयींची अमर्याद बेपर्वाई, व टिळकां-सारख्या राजकारणी पुढाऱ्यांविषयींचा आदर आणि प्रेमभाव, असे विविध मनोहर रंग कादंबरींतील पंजाबराव या पात्राच्या स्वभावचित्रांत मी वापरले आहेत. प्रत्यक्षांतल्या ज्या व्यक्तीच्या नमुन्यावरून पंजाबराव हें पात्र मीं चित्रित केलं त्या व्यक्तीविषयींच्या अनेक हकीगती सुरस चमत्कारिक कथा म्हणून टिळकांच्या समकालीन पिढींतील पुणेकर मडळींत प्रचलित होत्या. गव्हर्नरांच्या आगमनासाठीं पोलिसांनीं रस्ते रोखलेले असतांना तो बंदोबस्त न जुमानतां खुशाल आपली गाडी राजरस्त्यानं नेण्याचं धाडस करणारी, पुण्यांत सुधारकांनीं मोठी परिषद भरविली तेव्हां त्या परिषदेचा मंडप रातोरात जाळून टाकण्याचा अफाटपणा करणारी ही व्यक्ति म्हणजे सुप्रसिद्ध बंडखोर वासुदेव बळवंत फडके यांची एक लहानशी आवृत्तीच पुण्याच्या लोकांना वाटत असे. माझ्या आईकडून या व्यक्तीचं आणि माझं नातंहि असल्यामुळें आमच्या घरांत वारंवार होणारीं या व्यक्तीच्या कृत्यांचीं रसभरित वर्णनं माझ्या कानांवर आलीं होतीं. श्रीधर विठ्ठल दाते या प्रत्यक्ष होऊन गेलेल्या एका अविस्मरणीय गृहस्थाचं चित्र माझ्या मनांत अशा तऱ्हेनं तयार झालेलं होतं. आणि तेंच मीं 'प्रवासी' कादंबरीच्या पहिल्या चार प्रकरणांत वाचकांपुढं उभं केलं.

स्त्री सहवासाची आतुरता, निर्भयता, राष्ट्रीय वृत्ति, संगीत-लोलुपता आणि करारीपणा हे 'प्रवासी'च्या नायकाचे स्वभाव–विशेष आहेत. नायकाच्या वांट्याला आलेलीं सुखदुःखें अगदीं भिन्न भिन्न प्रकारच्या स्त्रियांविषयीं त्याच्या मनांत उद्‌भवलेली सहानुभूति, ओढ आणि प्रीति, व अखेरचं त्याचं शूराचं मरण या सर्व गोष्टी त्याच्या स्वभावसिद्ध प्रकृतींतून निर्माण झालेल्या मला दाखवायच्या होत्या. हा माझा हेतु जितक्या अंशानं साध्य झाला असं 'प्रवासी'चे वाचक म्हणतील तितक्या अंशानं ती कादंबरी यशस्वी झाली असं मला मानतां येईल.

१९३६–३७ या दोन वर्षांत मीं जितकं लिहिलं त्याच्या दसपटीनं इंग्रजी कादंबऱ्यांचं वाचन मीं केलं. फ्रीमन, ॲन ब्रीज, प्रीस्ट्ले, रॅडक्लिफ

हॉल, वॉलपोल, जीराल्ड टिकेल, सॉमरसेट मॉम, योलांडा फोल्डस, मेरी बॉडन्, रामार्क, अॅप्टन सिंक्लेअर, मायकेल फोर्डी, वॉरिक डीपिंग, एच्. जी. वेल्स, ब्रूनो फ्रँक इत्यादि ललित–लेखकांच्या कादंबऱ्या माझ्या वाचण्यांत आल्या. प्रत्येक कादंबरीचं संक्षिप्त रसग्रहण मी माझ्या डायरींत नोंदून ठेवीत असे. परंतु एवढ्यानं माझं समाधान होईना. माझ्या मनांत असं येऊं लागलं कीं एखाद्या चांगल्या कादंबरीचं रसग्रहण कसं करावं आणि तिचं विश्लेषण करून लेखकानं वापरलेल्या तंत्रविषयक कौशल्याचा शोध कसा करावा, ही गोष्ट आपल्या मराठी वाचकांना सांगण्यासारखी आहे. अशा तऱ्हेचं लिखाण नवशिक्या आणि मुरलेल्या लेखकांनाहि मार्गदर्शक होण्याचा संभव आहे. असं लिखाण मराठींत अजून झालेलं नाहीं. तेव्हां तो प्रयत्न आपण करावा. या माझ्या विचारांतून एका लेखमालेचा जन्म झाला; आणि शंकरराव किर्लोस्कर यांनीं माझ्या कल्पनेचं एकदम आनंदानं स्वागत केल्यामुळें ही माझी नवी लेखमाला ‘ मनोहर ’ मासिकांत १९३८ च्या ऑगस्ट महिन्यापासून येऊं लागली. रेडिओवरून मी वाचकांशीं बोलत आहें, अशी कल्पना करून एका सुंदर कादंबरीची रसग्रहणात्मक चर्चा मी करणार होतों, आणि हे लेख ‘ मनोहर ’ मासिकांत प्रसिद्ध होणार होते, म्हणून ‘ मनोहरची आकाशवाणी ’ असं नांव मीं या लेखमालेला दिलं.

: : ६७ : :

'मनोहरची आकाशवाणी' ही लेखमाला १९३८ सालीं 'मनोहर' मासिकांत सुरू झाली, त्याच्या आधींच माझी बारावी कादंबरी 'समरभूमि' मीं लिहून संपविली होती. कादंबरी-लेखनाच्या बाबतींत माझा वेग विशेष शीघ्र नाहीं. माझ्या कादंबऱ्यांपैकीं जवळजवळ निम्या कादंबऱ्या साप्ताहिकांत अगर मासिकांत क्रमशः प्रसिद्ध झाल्या. अशा कादंबऱ्यांच्या बाबतींत नजीक ठेवलेल्या हप्त्यापुरता कादंबरीचा मजकूर तांतडीनं लिहायचा आणि पुढच्या हप्त्याची वेळ येईपर्यंत कादंबरीचा विचार करण्याऐवजीं मनाचे इतर षोक पुरे करावयाचे अशी माझी वृत्ति असे, आणि त्यामुळें क्रमशः प्रसिद्ध होणारी कादंबरी माझ्या हातून लिहून व्हावयास कित्येक महिने लागत. ज्या माझ्या कादंबऱ्या एकदम पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाल्या त्या लिहितांना अशी दिरंगाई माझ्या हातून झाली नाहीं; तथापि माझ्या लेखनाची गति एकंदरींत मंदच म्हणावी लागेल. 'प्रवासी' कादंबरी मी जवळजवळ दहा महिने लिहीत होतों. 'समरभूमि' मात्र मी फक्त दीड महिन्यांत लिहिली.

नागपूर येथें 'वीणा प्रकाशन' या नांवाची प्रकाशन-संस्था नव्यानं सुरू झाली होती. आणि 'समरभूमि' हें त्या संस्थेचं पहिलं प्रकाशन होतं. 'आशा' कादंबरीपासून माझ्या कादंबऱ्यांत राजकारणाचा अंतर्भाव मी करूं लागलों होतों. 'समरभूमि' या कादंबरींत समाजसत्तावाद्यांचा दृष्टिकोण

स्वीकारून १९३० ते १९३७ या सात वर्षांतील राजकीय घटना, कॉंग्रेसचं राजकारण व गांधींची विचारसरणी यांची चर्चा मीं केलेली आहे. या कादंबरीचा नायक सुरेंद्र याचं हिंदुस्थानांतून नाहींसं होणं, आणि युरोपांतील अनेक देशांचं पर्यटन करून अकस्मात् प्रगट होणं, या दोन चमत्कृतिपूर्ण घटना वापरून मीं कादंबरीची रंगत वाढविली आहे; आणि पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्यें गव्हर्नरवर गोळी झाडली जाण्याचा जो प्रत्यक्ष प्रसंग घडला त्याचाहि उपयोग मीं करून घेतलेला आहे. कादंबरीचा नायक सुरेंद्र आणि नायिका शोभना यांच्यांतील प्रणय मी उत्कटतेनं रंगविला आहे. तथापि ही कादंबरी वाचणाराला १९३० ते १९३७ या काळांतील हिंदी राजकारणाच्या आंदोलनांचं रेखीव व यथातथ्य दर्शन व्हावं, आणि विशेषतः त्या काळांत समाजसत्तावाद्यांचा पक्ष कोणतीं धोरणं ठेवून राजकारणाचे डाव खेळत होता त्याची कल्पना यावी असा स्पष्ट हेतु मनाशीं धरून मीं कथानकाच्या वेगवेगळ्या घटनांची पार्श्वभूमि चित्रित केलेली आहे. कादंबरीची मुख्य प्रणयकथा आणि तिच्या पार्श्वभूमीचं राजकारण या दोन्ही गोष्टी मी तन्मयतेनं रंगविलेल्या आहेत. यांपैकीं कोणत्या गोष्टीचा ठसा वाचकाच्या मनावर अधिक उमटतो तें त्या त्या वाचकाच्या स्वभावधर्मावर अवलंबून राहणार अशी माझी समजूत आहे.

ललित-लेखन करतांना मनुष्य पर्यायानं आत्मचरित्र लिहीत असतो असं म्हणतात तें अगदीं खरं आहे. ‘ अटकेपार ’ या कादंबरींतील नायक सुधीर, ‘ प्रवासी ’चा नायक राजाभाऊ, यांसारख्या माझ्या अनेक नायकांच्या निमित्तानं मी माझे स्वतःचे अनुभव, विचार-विकार सांगितलेले आहेत. आणि माझ्या कादंबऱ्यांतील अनेक नायिकांच्या निमित्तानं मी प्रत्यक्ष पाहिलेल्या स्त्रियांची कमी-अधिक यथातथ्य चित्रं मीं रेखाटलेलीं आहेत. ‘ समरभूमि ’ मीं लिहिली त्या वेळेस उत्कट प्रणयाचा अनुभव मी स्वतः घेत होतों. या कादंबरींतील नायिका शोभना हिचं बोलणं-चालणं, लहान-सहान लकबी, प्रेमाची दृढता आणि आर्तता, आपलं प्रेम आपल्या वडीलधाऱ्या माणसांपासून लपविण्यासाठीं तिनं योजलेल्या युक्त्या व तिच्या मनाचा उडालेला गोंधळ इत्यादि गोष्टींचीं वर्णनं करतांना जिच्यावर मीं स्वतः प्रेम करीत होतों त्या कमलचं चित्र मीं रंगविलं. सुरेंद्र आणि शोभना

यांच्या गांठीभेटी, त्यांचे वाद, काव्य–चर्चा इत्यादि किती तरी गोष्टी माझ्या व कमलच्या आयुष्यांत जशा घडल्या तशाच या कादंबरींत मीं वर्णिलेल्या आहेत. या कादंबरीच्या आठव्या प्रकरणाच्या अखेरीस ( १२४ पानावर ) वॅट कवीची एक कविता शोभना सुरेंद्राला म्हणून दाखविते. हा प्रसंग माझ्या व कमलच्या आयुष्यांत घडलेल्या एका प्रसंगाची हुबेहूब प्रतिमा आहे. इतर कोणत्याहि कारणासाठीं नाहीं तरी या कादंबरींत माझ्या आणि कमलच्या परस्पर प्रेमाच्या अनेक प्रसंगांचीं प्रतिबिंबें उमटलेलीं आहेत एवढ्याचसाठीं ही माझी कादंबरी मला विशेष प्रिय वाटते.

१९३८ सालांत ‘ समरभूमि ’ आणि ‘ मनोहरची आकाशवाणी ’ या-व्यांतिरिक्त इतर फारसं लेखन माझ्या हातून झालं नाहीं. या व इतर लेखनांत ‘ साहित्यसागरावरील लहानमोठीं वादळें ’ हा माझा लेख विशेष महत्त्वाचा होता. हा लिहिण्यास निमित्त असं झालं कीं, मुंबईच्या मराठी ग्रंथ-संग्राहलयाच्या एकोणचाळीसाव्या वाढदिवसाचा समारंभ माझ्या अध्यक्षते-खालीं करण्याचं चालकांनीं ठरविलं, व त्यांचं आग्रहाचं आमंत्रण मीं मान्य केलं. असहकारितेच्या चळवळींतलीं माझीं व्याख्यानं सोडलीं तर मुंबईत मीं अजूनपर्यंत जाहीर व्याख्यान दिलं नव्हतं, व माझं भाषण ऐकण्याची मुंबईच्या लोकांची तीव्र इच्छा होती. ही इच्छा लक्षांत घेऊन माझं हें व्याख्यान मुंबईकरांच्या स्मरणांत दीर्घकाल राहील असं झालं पाहिजे अशा महत्त्वाकांक्षेनं मीं ‘ साहित्यसागरावरील लहान-मोठीं वादळें ’ असा आकर्षक मथळा निवडला आणि परिश्रमपूर्वक समग्र व्याख्यान लिहून काढलं. तेंच लेखाच्या रूपानं ‘ स्त्री ’ मासिकांत प्रसिद्ध झालं. त्यामुळें गंमतीचा प्रकार घडला तो असा कीं, ता. १४ ऑगस्ट १९३८ या व्याख्यानाच्या दिवशीं संध्याकाळी मी जेव्हां व्याख्यानाला उभा राहिलों तेव्हां हा लेख ज्यांत छापला होता तो ‘ स्त्री ’चा ताजा अंकहि प्रसिद्ध झाला होता आणि माझ्या पुढें बसलेल्या एका श्रोत्याच्या हातांत तो अंक मला दिसत होता. सारी सभा माझं व्याख्यान ऐकतां ऐकतां तल्लीन झालेली तर मला दिसत होतीच, परंतु ज्या गृहस्थाच्या हातांत ‘ स्त्री ’ चा ताजा अंक होता तो एकीकडे लेखरूपानं माझं व्याख्यान वाचीत होता व दुसरीकडे माझ्या तोंडातून बाहेर पडणारं व्याख्यान ऐकत होता, आणि जसं लिहिलं तसं

हुबेहूब कानामात्रेचाहि फरक होऊं न देतां मी बोलत असल्याचं पाहून त्याच्या आनंदांत आश्चर्याची भर पडलेली मला दिसली होती. "तुमचं हें समग्र व्याख्यान माझ्या हातांत आहे बघा." अशा अर्थाचा अभिनय करून त्या गृहस्थानं माझ्याकडे चार-पांच वेळां पाहिलं. शेवटीं मला न राहवल्यामुळें व्याख्यान देण्याच्या ओघांतच मीं त्या गृहस्थाकडे पाहून म्हटलं, "आजचं माझं व्याख्यान पार पडण्यापूर्वी 'स्त्री' चा अंक प्रसिद्ध करूं नये अशी विनंति मीं संपादकांना केली होती. परंतु तिचा उपयोग झालेला दिसत नाहीं. बोलून चालून ती किर्लोस्करांची 'स्त्री'! तिनं केव्हां बाहेर पडावं या गोष्टीवर माझा अधिकार कसा चालणार?" ही माझी कोटी ऐकून सभेंत प्रचंड हंशा झाला!

सोलापूरच्या विडी-कामगार बायांचा संप प्रत्यक्ष पाहण्यासाठीं मी गेलों तेव्हांपासून कॉम्युनिस्ट विचारसरणीचा माझ्या मनावर पगडा बसूं लागला. आणि त्याचं प्रतिबिंब माझ्या लेखनांत अधिकाधिक स्पष्टपणानं पडूं लागलं. 'समरभूमि' ही माझी कादंबरी बहुतांशीं कॉम्युनिस्टांच्या राजकारणाचं समर्थन करणारी होती. देशाच्या स्वातंत्र्यासाठीं लढा करणारा एक बलाढ्य पक्ष म्हणून कॉंग्रेसविषयीं मला सतत आदर व प्रेमभाव वाटे. परंतु सत्ताधारी राज्यकर्ते या नात्यानं कॉंग्रेसवाल्या पुढाऱ्यांविषयीं मला आदरभाव वाटेना. गरिबांचं हित साधण्याच्या त्यांच्या घोषणा मला ढोंगीपणाच्या वाटत. या बाबतींत महात्मा गांधींचं धोरणसुद्धां मला संशयातीत वाटत नसे. यामुळेंच गुन्हेगार वसाहतींच्या प्रश्नाबाबत प्रधान मंत्री खेर यांच्याशीं पत्रव्यवहार करतांना मीं सौम्य भाषा वापरण्याचं बंधन पाळूं शकलों नव्हतों. गुन्हेगार जातींविषयीं जें धोरण खेर मंत्रिमंडळानं स्वीकारलं होतं तेंच त्यांचं सामान्यतः एकंदर कामगारवर्गाबद्दल होत. त्यामुळें मुंबई सरकार आणि मजूर यांच्यांत मोठा सामना केव्हां तरी होणार ही गोष्ट मला उघड दिसत होती. आणि असा सामना कधीं झाला तर तो प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहण्याची संधि वायां जाऊं द्यावयाची नाहीं असा निश्चय मी मनाशीं केला होता. मात्र मला हवी असलेली संधि झपाट्यानं येईल अशी माझी कल्पना नव्हती; पण ती आली. मुंबईच्या गिरणी–कामगारांचा सार्वत्रिक संप होणार अशीं स्पष्ट चिन्हं दिसूं लागलीं.

१९३८ सालच्या सप्टेंबर महिन्यांत विधिमंडळापुढें श्री. नंदा यांनीं तयार केलेलें " ट्रेड्स डिस्प्यूट्स बिल " या नांवाचं बिल मांडण्यांत आलं तेव्हां मुंबई सरकारला कामगारांचीं गाऱ्हाणीं तर दूर करायचीं नाहींतच पण उलट कामगारांची चळवळ दडपून टाकायची आहे ही गोष्ट स्पष्ट झाली. या बिलांतील मुख्य कलमान्वयें कामगारांचा संप करण्याचा हक्कच नष्ट करण्यांत येणार होता. कामगारांनीं आपलीं गाऱ्हाणीं लवादापुढें मांडलीं पाहिजेत, आणि लवादाचा निर्णय लागेपर्यंत संप करतां कामा नये, अशा स्वरूपाचा कायदा या बिलामुळें होणार होता. अर्थात् हें बिल म्हणजे कामगारांच्या मूलभूत हक्कांवर उगारलेला घाव होता. आणि त्याविरुद्ध कामगारांची चळवळ उठावी हें अपरिहार्य होतं. मुंबई शहरांत या चळवळीला विशेष जोर चढला. कामगार-पुढाऱ्यांनीं मुंबईच्या गिरणी–कामगारांत प्रचंड जागृति निर्माण केली आणि या काळ्या कायद्याचा निषेध करण्यासाठीं दोन लाख कामगारांचा सार्वत्रिक संप घडवून आणण्याकरितां ता. ७ नोव्हेंबर हा दिवस मुक्रर करण्यांत आला.

हा संप म्हणजे एक अभूतपूर्व घटना घडणार होती. ही घटना प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहण्याची मला इच्छा झाली आणि मी मुंबईस गेलों. मी पाहिलं तों संपाची तयारी विलक्षण जोरानं चाललेली होती. लाऊडस्पीकर लाविलेली लॉरी सतत चोवीस तास गिरणभागांत फिरत होती. रस्त्यारस्त्यांतून, चाळीचाळीतून, दुकानादुकानांतून हस्तपत्रकं वाटलीं जात होतीं आणि रात्रीं जळते पलिते हातांत घेतलेल्या कामगार स्त्री-पुरुषांच्या मिरवणुकी निघत होत्या. या वेळीं कॉंग्रेसचे लोक गप्प बसले असते तर तें सुज्ञपणाचं ठरलं असतं. परंतु सत्तेबरोबर उन्मत्तपणा येतो, अरेरावीच्या पोटीं मूर्खपणा उद्भवतो, आणि मूर्खाचा अधःपात शतमुखांनीं होतो ! आपण जें बिल पास करणार आहोंत तें जनतेच्या पचनीं आपण सहज पाडूं अशी मंत्रिमंडळाची अपेक्षा होती. कामगार फार झालं तर मनांतल्या मनांत चरफडतील आणि गप्प राहतील असा मंत्र्यांचा हिशोब होता. परंतु तो जेव्हां फसला आणि कामगार-चळवळीची प्रचंड लाट उठली तेव्हा ते बावरून गेले. त्यांना सत्याची चाड राहिली नाहीं, आणि कामगारांची एकजूट हाणून

पाडण्यासाठीं कॉंग्रेसच्या गुप्त पाठबळानं जे प्रकार सुरू झाले ते अत्यंत क्षुद्र मनोवृत्तींचे, पोरकटपणाचे आणि कामगारांची चीड वाढविणारे होते.

कायदेमंडळानं पास केलेलं बिल कामगारांच्या हिताचं आहे, त्या बिलाविरुद्ध कामगारांना चिथविणारे पुढारी लबाड आणि मतलबी आहेत, त्यांच्या नादीं लागून कामगारांनीं आपलं नुकसान करून घेऊं नये इत्यादि गोष्टी कामगारांच्या मनावर ठसविण्यासाठीं कॉंग्रेसच्या सभा होत होत्या.

या सभांना कामगार मुद्दाम हजर रहात असत. सत्य, अहिंसा वगैरे शब्दांची पोपटपंची करणाऱ्या वक्त्यांना ते बिनतोड प्रश्न विचारीत असत, आणि मग आपला फजितवाडा टाळण्यासाठीं सभा कशीबशी आटपती घेऊन कॉंग्रेसचे ते पढविलेले वक्ते तेथून पाय काढीत असत. लालबावटा युनियननं काढलेल्या लाल पत्रकांच्या तोडीस तोड म्हणून कॉंग्रेसच्या पित्त्यांनीं काढलेलीं पिवळीं पत्रकं कामगारांच्या सभेंत वाटण्यांत येत. कामगार त्यांवर थू: करून थुंकत किंवा तीं जाळून टाकीत. पुरुष स्वयंसेवकांना कामगारांकडून मारपीट होण्याचा संभव वाटला म्हणून कामगारांच्या चाळींत स्वयंसेविका पाठविण्याची भ्याड युक्ति कॉंग्रेसवाल्यांनीं केली. कामगार त्यांना सरळ विचारीत, "बायांनो, तुम्हीं कशाला या भानगडींत पडतां? आपापल्या घरीं जा आणि सूत काता कीं वाटेल तितकं. आमच्या वाटेनं आम्हांला जाऊं द्या. आमचं हित कशांत आहे तें आम्हांला चांगलं कळतं. तुमच्या उपदेशाची आम्हांला कांहीं जरूरी नाहीं." मग त्या स्वयंसेविकांना मुकाट्यानं परतावं लागे. १९३० सालच्या चळवळींत ज्या केशरी साड्या लोकांच्या आदराचा विषय झाल्या होत्या त्यांची आतां थट्टा होऊं लागली. आणि ही विटंबना कॉंग्रेसनंच आपल्या हट्टानं आणि मूर्खपणानं ओढवून घेतली होती.

अशा तंग वातावरणांत ता. ७ नोव्हेंबर हा दिवस उगवला. गेल्या वीस दिवसांत कामगार-पुढाऱ्यांनीं एखाद्या वावटळीसारखा जो प्रचार केला होता त्याचे परिणाम दिसूं लागले. सूर्याचीं कोवळीं किरणंहि पसरलीं नव्हतीं तेव्हांपासून कामगार-पुढाऱ्यांची लाऊडस्पीकरची लॉरी गिरणभागांत वेगानं फिरूं लागली. माझे मित्र कॉमरेड डांगे यांच्या सूचनेवरून

मी या लॉरींत बसून हिंडलों. लालबाग, परळ, वाडी, शिवडी अशा सर्व केंद्रांकडे फिरून लॉरींतले कामगार कार्यकर्ते संपाची आरोळी मजुरांना देऊ लागले. नाक्यानाक्यावर आणि चाळीचाळीपुढं थांबून ते ओरडत, " भाई हो, आज संप आहे लक्षांत ठेवा. कुणी कामावरें जायचं नाहीं, कुणाला जाऊं द्यायचं नाहीं. सगळ्या गिरण्या बंद पडल्या पाहिजेत. कुणी बेइमानी करून गिरणींत शिरत असेल तर पाळत राखा. संपाचा आदेश जिकडे तिकडे पोंचवा. आजच्या दिवसाचा जो कार्यक्रम जाहीर झाला आहे तो उत्साहानं पार पाडा. मिरवणुकींत सामील व्हा. कामगार-मैदाना-वर संध्याकाळीं सभा होणार आहे. त्या सभेला एकूण एक मजूर आला पाहिजे हें लक्षांत ठेवा. लाल बावट्याची इज्जत राखा. शिस्तीनं वागा. शांत राहा. "

ही लाऊडस्पीकरची लॉरी सतत आठ-दहा तास फिरत होती. लॉरींतील पुढाऱ्यांचे घसे ओरडून ओरडून कोरडे पडले होते. परंतु त्यांना त्याची फिकीर नव्हती. संप शंभर टक्के यशस्वी झाला होता. मुंबईंतील एकूण एक गिरणी बंद पडली होती. गिरणी-मजुरांखेरीज रेल्वे, गोदी, ट्रॅम इत्यादीं-वरचे इतर कामगारहि सहानुभूति दाखविण्यासाठीं संपांत सामील झाले होते. मुंबईच्या ' रामा ' लोकांनींहि स्वयंस्फूर्तीनं संप पुकारला आणि शेठ लोकांच्या घरांतून बाहेर पडून त्यांनीं आपली मिरवणूक काढली. इतका प्रचंड सर्वव्यापी संप मुंबई शहरांत पूर्वीं कधीं झाला नव्हता. अपूर्व यशाचा उन्माद कामगार-पुढारी अनुभवीत होते. त्यांना तहान-भुकेची शुद्ध राहिली नव्हती. मुंबईच्या सर्व भागांत लॉरींतून हिंडून ते सारखे ओरडत होते. " भाई हो, शिस्त राखा. शांत रहा. " कारण त्यांना मनांतल्या मनांत चिंता वाटत होती कीं, कामगारांकडून येवढासाहि अत्याचार झाला कीं पोलिसांना फावेल, आणि त्यांनीं जर लाठीमार केला तर मग भलते परिणाम होतील. या अभूतपूर्व संपाला दंग्याधोप्याचं गालबोट लागतां कामा नये. यासाठीं पराकाष्ठेचा प्रयत्न करणं त्यांना अगत्याचं वाटत होतं. सबंध दिवस शांततेंत गेला. परंतु अखेर संध्याकाळच्या वेळेला नको ते प्रकार झाले. निरनिराळ्या पांच-सहा ठिकाणीं किरकोळ दंगेधोपे झाले, आणि नायगांवच्या रस्त्यावर कामगार व संपफोडे यांची मोठीच मारामारी होऊन

पोलिसांनी अखेर गोळीबार केला. या प्रकारांत बहिरू चव्हाण नांवाच्या कामगारावर एका सार्जंटानं पिस्तुल रोखून त्याच्या छातीला भिडवून तें अक्षरशः रिकामं केलं. कामगार पुढाऱ्यांनीं मोठ्या प्रयासानं ही दंगल शमविली.

संध्याकाळीं कामगार-मैदानावर जी सभा झाली ती अक्षरशः विराट् सभा होती. मैदानांत एक इंचसुद्धां जागा रिकामी राहिली नाहीं. आजूबाजूचे सारे रस्ते माणसांनीं दुथडी भरून गेले. चाळीच्या गॅलरींत, गच्चीवर, छपरावर, झाडांच्या माथ्यांवर जिकडे तिकडे मिळेल तेवढ्या जागेंत माणसं बसलीं होतीं अगर उभीं होती. मैदानाच्या डोक्यावरून एक विमान मधूनच चक्कर घेतांना दिसे. त्यांत नामदार मुनशी बसले आहेत अशी लोकांची समजूत असल्यामुळें त्याची घरघर ऐकल्याबरोबर अडीच लाख लोक वर पाहून एकदम ओरडत 'शेम शेम!' "काळा कायदा हाणून पाडा!" 'लाल बावटे की जय!'

या सभेचं दृश्य कधीं न विसरण्यासारखं होतं, आणि संपाच्या प्रचाराचे जे प्रकार मीं पाहिले त्यांचीहि आठवण दीर्घकाळ लक्षांत राहण्यासारखी होती. कम्यूनिस्ट पक्षाची राजकीय विचारसरणी माझ्या मनानं कितपत स्वीकारावी हा प्रश्न मला महत्त्वाचा वाटत नव्हता. सामाजिक आंदोलनाचा एक असामान्य देखावा मला पाहतां आला या गोष्टीचं मला खरं महत्त्व वाटत होतं. एक विलक्षण सामाजिक प्रक्षोभ प्रत्यक्ष डोळ्यांनीं बघितल्याच्या आनंदांत मी कोल्हापूरला परत आलों. त्या वेळेस दादासाहेब सुर्वे हे गृहस्थ कोल्हापूरचे पंतप्रधान होते. त्यांनीं एका मध्यस्थाकडून मला निरोप धाडला कीं, मुंबईच्या एका राजकीय संपात तुम्ही भाग घेतलांत अशी माहिती मला मिळाली आहे. संस्थानचे एक नोकर या नात्यानं तुम्हीं असल्या गोष्टी करूं शकत नाहीं. तुमच्यावर इलाज कां करूं नये सांगा. मीं सुर्व्यांना उलट निरोप पाठविला कीं असे तोंडी निरोप पाठविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तुम्हांला माझ्यावर काय इलाज करावयाचे असतील ते लेखी हुकूम काढून करूं शकतां. हें माझं उत्तर गेल्यावर सुर्व्यांचा पंतप्रधानी दिमाख उतरला असावा. कारण पुढें बरेच दिवस गेले तरी त्यांच्याकडून मला कांहींच

लिहून आलं नाहीं. मी मनांतल्या मनांत समजलों कीं, माझ्यासारखा एक ब्राह्मण कोल्हापूरच्या नोकरींत राहून स्वाभिमानानं वागतो व कॉलेजांतील सर्व अध्यापकांपेक्षां अधिक लोकप्रियता मिळवितो या गोष्टींचं शल्य ज्या मराठ्यांना कित्येक वर्षं बोचत होतं त्यांच्यापैकीं सुर्वे असल्यामुळें त्यांची माझी प्रत्यक्ष झुंज केव्हां तरी होणार ही माझी कल्पना खरी ठरायला वेळ लागला नाहीं.

: : ६८ : :

कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांत अध्यापक म्हणून मी काम करूं लागलों त्या गोष्टीस आतां बारा वर्षे होऊन गेलीं होतीं. कॉलेजांतील नोकरीवर मी प्रथम रुजू झालों तेव्हां दिवाणबहादूर अण्णासाहेब लठ्ठे कोल्हापूर संस्थानचे पंतप्रधान होते. त्यांच्या आमंत्रणावरून मीं त्यांची प्रथम मुलाखत घेतली तेव्हां मीं त्यांना स्पष्ट विचारिलं होतं, " राजकीय चळवळीशीं एके काळीं माझा निकट संबंध होता आणि आतां जरी माझा प्रत्यक्ष संबंध नसला तरी माझीं वैयक्तिक मतं जहाल राष्ट्रीयवादी आहेत या गोष्टी आपणांस माहीत आहेत ना ? आणि त्या जमेस धरूनच आपण मला नोकरीवर घेत आहांत ना ? " त्यांनीं दृढ स्वरानं उत्तर दिलं होतं, " हें सारं मला ठाऊक आहे, आणि तरीहि मी तुम्हांला बोलावीत आहें." अशा प्रकारें हडसून खडसून परस्पर समजूत झाल्यावरच मी राजाराम कॉलेजमध्यें रुजू झालों होतों. श्रीयुत अण्णासाहेब लठ्ठे, जोंपर्यंत पंतप्रधान होते तोंपर्यंत मला स्वाभिमानानं वागणं अवघड नव्हतं. ते कोल्हापूर सोडून गेल्यानंतर मात्र कोल्हापूर संस्थानांतील परिस्थिति मला अनुकूल राहिली नाहीं.

संस्थानी वातावरण म्हणजे एक अजब चीज असते. जो तो खुशामत करण्यास उत्सुक असतो, आणि अशा खुशामत्यांच्या पार्श्वभूमीवर खुशामत न करणारा आणि निःस्पृहपणानं वागणारा इसम अगदीं निराळा म्हणून

नजरेंत भरतो, व त्याच्याविषयीं चहाडी चुगली करून राजकुटुंबांतील मंडळी आणि अधिकारीवर्ग यांचीं मनं त्याच्याविषयीं कलुषित करणं त्याच्या हितशत्रूंना सोपं असतं. मी तर इतक्या निःस्पृहपणानं वागत होतों कीं राजवाड्यावर मी चुकूनसुद्धां जात नव्हतों. वारंवार होणाऱ्या दरबारांना हजर राहायचं झालं तर 'सौभद्र' नाटकांतील अर्जुनासारखा नाटकी वेष धारण करण्याची सक्ती होती म्हणून दरबाराला कधीं जात नव्हतों. बड्या अधिकाऱ्यांची मर्जी खूष राहावी म्हणून करावयाच्या गोष्टींपैकीं एकहि गोष्ट करीत नव्हतों. या माझ्या वागण्याच्या तऱ्हेमुळें अधिकारी मराठावर्ग मला एक चढेल आणि उद्धट मनुष्य समजत होता. राजाराम कॉलेजांतील बहुतेक अध्यापक मिंध्या सेवकाची भूमिका पत्करून आपली नोकरी टिकविण्याच्या धोरणानं वागत होते. त्यांच्या वर्तनाशीं तुलना केली कीं, माझं वर्तन साहजिकच बेमुर्वतखोरपणाचं वाटण्यासारखं होतं. ज्या कॉलेजांत मराठा विद्यार्थ्यांची बहुसंख्या होती, आणि जें कॉलेज मुख्यतः मराठा जातीच्या कल्याणासाठींच चालविण्याचं धोरण होतं त्या कॉलेजांत माझ्या-सारखा एक ब्राह्मण अध्यापक सर्वांत अधिक लोकप्रिय ठरावा, आणि त्यानं वरिष्ठांची खुशामत न करतां आपला मोठेपणा टिकवावा, ही गोष्ट लहानमोठ्या मराठा अधिकाऱ्यांच्या आणि स्थानिक मराठा पुढाऱ्यांच्या मनांत अनेक वर्षं डाचत होती. परंतु माझ्यावर कधीं कधीं तोंडी अगर लेखी टीका करण्यापलीकडे अधिक कांहीं या मंडळींना करतां येत नसे. मला कॉलेजांतून स्थानभ्रष्ट करण्यास हे लोक उत्सुक होते; परंतु आपली तीव्र उत्सुकता मुकाट्यानें गिळून स्वस्थ बसणं त्यांना भाग होतं. माझ्या-कडून कांहीं तरी मोठी आगळीक होईल आणि मग आपल्याला डाव करतां येईल म्हणून ते योग्य संधीची वाट पहात होते.

१९३८ च्या नोव्हेंबर महिन्याच्या प्रारंभीं कामगारांचा जो प्रचंड संप मुंबईत झाला तो मी प्रत्यक्ष पाहून आलों. या गोष्टीचं निमित्त करून माझ्याविरुद्ध काहूर उठविण्याचा प्रयत्न केला गेला, तो यशस्वी झाला नाहीं. मुंबईचा संप मी पाहून आलों ही गोष्ट नोकरीच्या शिस्तीविरुद्ध घडली अशी भूमिका स्वीकारून मला छळण्याची सुर्व्यांची इच्छा होती, परंतु आपल्या या भूमिकेचं समर्थन करणं अवघड जाईल हें लक्षांत आल्यामुळें

ते स्वस्थ बसले असावेत. तथापि, त्यांना हवी तशी संधि लवकरच मिळाली. मीच माझ्या वागण्यानं त्यांना ती मिळवून दिली. अशी संधि मी त्यांना देत आहें हें मला स्पष्ट दिसत असूनहि !

१९३८ च्या डिसेंबर महिन्याचा काळ कोल्हापुरांतील राजकीय जागृतीच्या दृष्टीनं इतिहासांत नमूद करण्यासारखा झाला. शेतकऱ्यांची संघटना आणि चळवळ यांचा प्रारंभ त्या वेळेस माधवराव बागल यांनीं केला. सबंध संस्थानभर दौरे काढून त्यांनीं शेतकऱ्यांना जागृत केलं, आणि शेतकऱ्यांचा मोर्चा पंतप्रधान सुर्वे यांच्या बंगल्यावर नेण्याचं ठरवून त्यासाठीं रविवार ता. २५ डिसेंबर हा दिवस निश्चित केला. या दिवशीं सकाळीं अकरा वाजतां कोल्हापुरास येणाऱ्या गाडीनं जयसिंगपूर, हातकणंगले व रुकडी या भागांतील शेंकडों शेतकऱ्यांना घेऊन ते येणार होते, आणि शेतकऱ्यांचा मोर्चा घेऊन सरळ सुर्व्यांच्या ताराबाई पार्कमधील नव्या बंगल्यावर जाणार होते. वर्षानुवर्षें झोपेंत राहिलेल्या कोल्हापुरांत बागलांचा हा मोर्चा म्हणजे अपूर्व घटना होती आणि त्यामुळें तिच्याविषयीं अमर्याद कुतूहल लोकांत उत्पन्न झालं होतं. मोर्च्याचा हा प्रसंग प्रत्यक्ष त्या जागेवर हजर राहून पाहण्याची कल्पना राजाराम कॉलेजांतील इतर कोणत्याहि अध्यापकाला सुचणं शक्यच नव्हतं. परंतु मला ती इच्छा झाली, आणि मोर्चा पाहण्यांत कोणताहि अपराध नाहीं ही मनाची खात्री असल्यामुळें मी माझी इच्छा अमलांत आणली.

सकाळीं बाबूराव पेंटर यांच्या मोटारींतून स्टेशनावर जावयास मी निघालों तों काय, शहरांत जिकडे तिकडे कडेकोट पोलीस बंदोबस्त ! सारे रस्ते रोखलेले, नाक्यानाक्यावर लाठीवाले पोलीस आणि हत्यारबंद घोडेस्वार जय्यत तयारीनं उभे ! आजूबाजूच्या खेड्यांतून कोल्हापूर शहरांत येणाऱ्या सर्व मुख्य रस्त्यांवर पोलिसांचा आणि हत्यारी सैनिकांचा कडक पहारा ! बाहेरील शेतकरी शहरांत येऊन मोर्चांत सामील होतील या भीतीनं सारे मार्ग रोखलेले ! तें पाहून मला हंसू आलं. एखादी मोठी राज्यक्रांती निपटून काढण्याची तयारी करण्याचा आव संस्थानी सरकारनं आणलेला होता. शस्त्रसामर्थ्याचं प्रदर्शन करून जनतेला भेवडावण्याच्या या प्रयत्नामुळें लोकांच्या

जागृतीला सरकार किती भितं ही गोष्ट मात्र उघड होत होती. शहरांतून स्टेशनाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यांवर विशेषच बंदोबस्त होता. रस्त्यांच्या दुतर्फा हजारों लोक उभे होते आणि घराघरांतून व दुकानादुकानांतून माणसांची दाटी झालेली होती. रहदारीला सक्त बंदी होती. पण त्याची फिकीर न करतां मी आमची मोटर स्टेशनकडे घेऊन गेलों. स्टेशनाच्या आवाराच्या अलिकडच्या कोपऱ्यावर मोटर थांबवून मी आणि बाबूराव पेंटर खालीं उतरलों. बाबूराव पेंटर यांनीं मला सोडून कुठें पळ काढला तें मला समजत नाहीं. बंदोबस्ताचं उग्र स्वरूप पाहून त्यांनीं विचार केला असावा कीं शौर्यापेक्षां सुज्ञतेचा सद्‌गुण अधिक महत्त्वाचा आहे. कोपऱ्यावर पोलिसांनीं सांखळी धरली होती व ते कुणालाही स्टेशनाच्या आवारांत सोडीत नव्हते. पण मी माझ्या गळ्यांतला कॅमेरा सांवरीत सरळ ती सांखळी तोडून पुढें झालों व आवारांत शिरलों, आणि त्या गोष्टीचा फायदा घेऊन तोंपर्यंत रस्त्यावर थबकलेले चार-पांचशें विद्यार्थी आवारांत घुसले. स्टेशनच्या दक्षिण बाजूस उभ्या असलेल्या शेंकडों लोकांचा लोंढाहि मग आवारांत शिरला. आणि माझ्या मागोमाग ती सारी प्रचंड गर्दी आंत प्लॅटफॉर्मवर आल्यामुळें ज्या प्लॅटफॉर्मवर आतांपर्यंत पोलिसांनीं शुकशुकाट ठेविला होता तो प्लॅटफॉर्म क्षणार्धात माणसांनीं फुलून गेला. या एकंदर प्रकाराला असं स्वरूप आलं कीं जणूं मीच पुढारीपणा पत्करून त्या लोकांना घेऊन गेलों होतों !

बागलांची गाडी स्टेशनांत शिरेल तेव्हां तेथें खूपच दंगल उसळेल, आणि बागलांचा आणि शेतकऱ्यांचा फोटो घेण्याचा माझा हेतू त्या ठिकाणीं साध्य होणार नाहीं असं वाटल्यामुळें मी प्लॅटफॉर्म सोडून बाहेरच्या आवारांत आलों. त्या ठिकाणीं एक लॉरी उभी असलेली मला दिसली. तिच्यावर चढून बसलों तर मला चांगले फोटो काढतां येतील असं वाटल्यामुळें मी तिच्या टपावर चढलों. कांहीं वेळानें बागलांची गाडी आली. लोकांनीं जयघोष केलेले मी ऐकले. बागल स्टेशनबाहेर आले ते ज्या लॉरीवर मी बसलों होतों त्याच लॉरीवर चढून उभे राहिले. हां हां म्हणतां हजारों लोकांचा थवा लॉरीभोंवतीं जमा झाला आणि बागलांनीं भाषण करण्यास आरंभ केला.

त्यांचं भाषण संपलं आणि सुर्व्यांच्या बंगल्यावर मोर्चा जावयाचा म्हणून गर्दी पांगू लागली तेव्हां मी लॉरीवरून खालीं उतरलों आणि घरीं परतलों. कांहीं तासांनीं मला कळलं कीं बागलांना पकडण्यात आलं होतं. परंतु नंतर मला असंहि दिसून आलं कीं सुर्व्यांच्या बंगल्यावर गेलेला शेतकऱ्यांचा मोर्चा आणि बागलांची धरपकड यापेक्षांहि माझं स्टेशनवर जाणं हाच गांवांतल्या लोकांच्या चर्चेचा विषय अधिक झाला होता. जो तो मला विचारूं लागला हें तुम्हीं काय केलं ? जणू एखादी भयंकर गोष्ट मी केल्याप्रमाणें लोकांनीं मला हा प्रश्न कां करावा तें मला कळेना. परंतु ता. २८ रोजीं दुपारीं लोकांच्या त्या प्रश्नाचा अर्थ मला कळला. प्रिन्सिपल डॉ. बाळकृष्ण यांजकडून मला एक " तांतडीचं आणि गुप्त " पत्र आलं. पंतप्रधान सुर्वे यांजकडून त्यांना आलेलं पत्र त्यांनीं माझ्याकडे रवाना केलेलं होतं. सुर्व्यांनीं डॉ. बाळकृष्ण यांना लिहिलेलं पत्र पुढीलप्रमाणं होतं :

> " सी. आय्. डी. च्या अधिकाऱ्यांनीं आणि मॅजिस्ट्रेटनीं असा रिपोर्ट केला आहे कीं, ता. २५ रोजीं बागलांच्या नेतृत्वाखालीं शेतकऱ्यांचा मोर्चा कोल्हापूर स्टेशनवर आला त्यांत प्रो. एन्. एस्. फडके यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला होता. या बाबतींत प्रो. फडके यांजकडून ताबडतोब खुलासा मागवून तो माझ्याकडे धाडून द्यावा. "

या पत्राबरोबर डॉ. बाळकृष्ण यांनीं तोंडी निरोप पाठविला होता कीं, ' मला भेटल्याखेरीज कोणतीहि गोष्ट करूं नका. ' म्हणून मी त्यांच्या बंगल्यावर त्यांच्या भेटीला गेलों. मला पाहतांच त्यांनीं आपल्या नेहमींच्या संवयीप्रमाणें माझ्या दोन्ही खांद्यांवर प्रेमानं हात ठेविले, आणि म्हणाले, " अरे बाबा, हें काय करून बसलास ? आतां तुझी नोकरी जाणार खास. आणि तुझं रक्षण करणं मला कठीण जाणार आहे. " मीं म्हटलं, " डॉक्टर, ज्यामुळें माझी नोकरी जावी असं मीं कांहीं एक केलेलं नाहीं. तुम्ही व्यर्थ घाबरूं नका. माझं रक्षण करण्यासाठीं तुम्हीं कांहीं करूं नका. मी एकटा लढाई करायला समर्थ आहें. " ते म्हणाले, " तुझी इच्छा असेल तर तुझ्याबरोबर मी सुर्व्यांकडे येतों. " मीं म्हटलं, " तुम्ही मुळींच येऊं नका. मी दिलगिरी प्रदर्शित करून मोकळं व्हावं असं तुम्ही कदाचित् सुचवाल,

आणि ती गोष्ट तर मला मुळींच करावयाची नाहीं. मीं एकटाच सुर्व्यांच्या भेटीला जातों." ते म्हणाले, "तूं आपल्या नेहमींच्या स्वभावाप्रमाणें कांहीं तरी कडक बोलशील आणि प्रकरण अधिक चिघळवून टाकशील. मला तुझ्याविषयीं फार चिंता वाटते." मी म्हटलं, "डॉक्टर, तुम्ही चिंता करूं नका." आणि त्यांचा निरोप घेऊन सुर्व्यांकडे निघालों.

स्वारी अगदीं रागांत होती. साधारणपणें माझ्याच उंचीचा आणि बांध्याचा हा गृहस्थ अधिकाराच्या तोऱ्यानं फुगून जाऊन कपाळाला आंठ्या घालून जेव्हां मला म्हणाला, "फडके, तुम्ही आतां माझ्या कचाट्यांत चांगले सांपडला आहांत !" तेव्हां माझ्या मनांत आलं, मॅट्रिकची परीक्षा देखील पास न झालेला केवळ महाराजांच्या खास मर्जीमुळें दिवाणपदावर बसलेला, वयानं देखील माझा विद्यार्थि शोभणारा हा गृहस्थ मारे मान तिरपी करून आपल्या बोलण्यानं मला भेवडवूं पाहात आहे, ही एक प्रकारें संस्थानी वातावरणावर विदारक प्रकाश पाडणारी किती अर्थपूर्ण विनोदी घटना आहे ! मीं त्यांना म्हटलं, "आपण जी भाषा वापरतां ती प्रधानपदाला शोभणारी नाहीं. मला आपण चांगलं कचाट्यांत पकडलंत हा शब्दप्रयोग मला फार चमत्कारिक वाटतो. या शब्दांचा अर्थ असा होतो कीं आपण कांहीं तरी निमित्त काढून मला शासन करण्याची फार दिवस वाट पाहत आहां."

पहिली सलामी जरा आंगलटच आली असें पाहून सुर्वे म्हणाले, "माझ्या पत्राला तुमचं काय उत्तर आहे ?"

मी म्हटलं, "उत्तर देण्यापूर्वीं मला असं विचारावयाचं आहे कीं, एखाद्या व्यक्तीच्या हालचालीचा रिपोर्ट आपल्याकडे करणं ही कोल्हापूर संस्थानांतल्या मॅजिस्ट्रेटची ड्यूटी आहे काय? कारण आपल्या पत्रांत आपण असं म्हटलं आहे कीं, सी. आय्. डी. आणि मॅजिस्ट्रेट यांचे मजविषयींचे रिपोर्ट आपणांकडे आले आहेत. सी. आय्. डी. नें रिपोर्ट करावा ही गोष्ट ठीक आहे, पण मॅजिस्ट्रेटनं रिपोर्ट करावा हा प्रकार अजब आहे."

त्यांच्याच पत्रांतील मूर्खपणाचं माप त्यांच्याच पदरांत घालूं लागल्यामुळें सुर्वे चिडले आणि मिशी कुरतडीत म्हणाले, "माझ्या मॅजिस्ट्रेटनीं काय

काय करावं, काय करू नये तें नका मला सांगू. तुमच्या कृत्याचा तेवढा खुलासा करा. ”

मीं म्हटलं, “ ज्यांनीं माझ्याविषयींचे रिपोर्ट आपणांकडे केले आहेत त्यांना इथें बोलावून घ्या. त्यांचं म्हणणं काय आहे तें मला ऐकूं द्या आणि माझं म्हणणं काय आहे तें आपण ऐका. समक्षच दोन्ही बाजू आपल्यापुढें आल्या तर चांगलं नाहीं का ? ”

सुर्वे म्हणाले, “ तसं करण्याची माझी इच्छा नाहीं. सी. आय्. डी. चं म्हणणं मला माहीत आहे. तुमचं म्हणणं मला सांगा. ”

“ ठीक आहे, ऐका. ” असं म्हणून मी सारी हकीगत जशी घडली होती तशी त्यांना सांगितली.

ती हकीगत ऐकून कुठें खुसपट काढावं तें त्यांना कळेना असं त्यांच्या चर्येवरून मला दिसलं. परंतु खुसपट काढण्याची तर त्यांची तीव्र इच्छा होती, म्हणून त्यांनीं मला विचारलं, “ तुम्ही बागलांचं स्वागत केलंत हें खरं आहे काय ? ”

मीं उत्तर दिलं, “ साफ खोटं आहे. ”

“ बागलांच्या भाषणाच्या वेळेस तुम्ही हातांत निशाण धरलं होतं काय ? ”

“ हेंहि साफ खोटं आहे. परंतु वादासाठीं मीं निशाण हातीं घेतलं होतं हें गृहीत धरलं तरी मी असं विचारतों कीं त्या कृत्याला तुम्ही गुन्हा समजाल काय ? छत्रपतींचं भगवं निशाण होतं तें. तें हातांत घेणं म्हणजे खचित गुन्हा होत नाहीं. ”

या प्रश्नाला उत्तर देणं सुर्व्यांना सोपं नव्हतं म्हणून चर्येवरचा त्रासिकपणा वाढवून त्यांनीं मला विचारिलं, “ पण मोर्चाच्या ठिकाणीं हजर राहण्यांत आपण कांहीं तरी चूक करीत आहोंत असं तुम्हांला मुळींच वाटलं नाहीं ? ”

मीं म्हटलं, “ असं वाटण्याचं काय कारण ? बागलांचा मोर्चा तुम्ही कांहीं कायद्यानं बंद केलेला नव्हता. उलट हा मोर्चा तुमच्या बंगल्यावर गेला तेव्हां तुम्हीं त्याचं स्वागत केलंत. मग असा हा कायदेशीर मोर्चा पहाण्यासाठीं मी गेलों तर बिघडलं कुठं ? ”

याहि प्रश्नाला उत्तर देणं त्यांना अवघड वाटलं. मीं त्यांना अशा प्रकारें निरुत्तर करावं याची त्यांना किती चीड आली होती तें त्यांच्या मुद्रेवरून मला स्पष्ट दिसत होतं, आणि मला मनांतल्या मनांत आनंद होत होता. अधिकच जोरानं मिशी कुरतडीत ते म्हणाले, " फडके, मोर्चा पहावयाला जाण्यावांचून तुमचं कांहीं अडलं होत काय ? "

मीं म्हटलं, " ज्याच्यावांचून आपलं कांहीं अडलेलं नाहीं अशा पुष्कळ गोष्टी आपण करतों. शिवाय कोणत्या गोष्टींवांचून आपलं अडतं अगर अडत नाहीं हें ठरविण्याची व्यक्तिव्यक्तींचीं प्रमाणं निरनिराळीं असूं शकतील, नाहीं काय ? "

यावर ते एकदम उसळून म्हणाले, " मला वाटतं, तुमच्याशीं वाद करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तुमचा काय खुलासा असेल तो लेखी सादर करा. "

" ठीक आहे. " असं म्हणून मी सुर्व्यांचा निरोप घेतला आणि डॉक्टर बाळकृष्ण यांच्याकडे परत येऊन माझं आणि सुर्व्यांचं झालेलं सारं संभाषण त्यांना सांगितलं. तें ऐकून त्यांना बरं वाटलं नाहीं. त्यांच्या मतें मी दिलगिरी प्रदर्शित करावी आणि पुन्हां असं न वागण्याचं आश्वासन द्यावं, हा खरा शहाणपणाचा मार्ग होता. परंतु मला त्या मार्गानं मुळींच जायचं नव्हतं. नागरिक या नात्यानं माझे जे न्याय्य हक्क होते त्यासाठीं मला लढायचं होतं. तसं करतांना नोकरी गेली तरी मला फिकीर नव्हती. म्हणून दुसरे दिवशीं म्हणजे तारीख २९ डिसेंबर रोजीं मी सुर्व्यांना पुढीलप्रमाणे लेखी उत्तर धाडलं—

> " तारीख २५ रोजीं बागलांनीं जो मोर्चा आणला त्यांत मी ' प्रामुख्यानें भाग घेतला होता ' हें वर्णन सपशेल चुकीचं आहे. मराठींतील तीन प्रमुख मासिकांशीं आणि कलकत्ता येथील ' ओरिएंट ' नांवाच्या सचित्र साप्ताहिकाशीं आज कित्येक वर्षं माझा संबंध आहे, आणि लेखक या नात्यानं कोणत्याहि महत्त्वाच्या घडामोडीचं अवलोकन करणं मला आवश्यक वाटतं. राजाराम कॉलेजांतील एक अध्यापक म्हणून कोणत्याहि जहाल राजकीय मतांचा जाहीर पुरस्कार न करण्याची दक्षता मी नेहमीं घेत असतों.

लेखकाच्या दृष्टीनं कुठेंहि कांहीं विशेष गोष्ट घडत असली कीं त्या ठिकाणीं मी प्रत्यक्ष जातों. या क्रमास अनुसरूनच बागलांच्या मोर्चाच्या दिवशीं सकाळीं मी स्टेशनवर गेलों होतों. मला कांहीं फोटो घ्यावेसे वाटले म्हणून स्टेशनच्या आवारांत जी एकच लॉरी उभी असलेली मला दिसली तिच्यावर चढलों. फोटो घेण्याचं माझं काम आटोपून मी खालीं उतरणार होतों. इतक्यांत बागल लॉरीवर चढले आणि भाषण करूं लागले. भोंवतालीं अफाट गर्दी असल्यामुळें खालीं उतरणं मला अशक्य झालं. गर्दी ओसरूं लागल्याबरोबर मी खालीं उतरलों आणि घरीं परतलों. स्टेशनपासून मिरवणूक निघाली तिच्याबरोबर मी गेलों नाहीं. वर ज्या गोष्टी नमूद केल्या आहेत त्यापलीकडे मी कांहीं एक केलं नाहीं; आणि केलं अशा आशयाचे रिपोर्ट केले गेले असतील तर मी स्पष्ट सांगूं इच्छितों कीं ते साफ खोटे आहेत."

ता. १ जानुआरी १९३९ रोजीं सुर्व्यांनीं डॉक्टर बाळकृष्ण यांच्यामार्फत मला पुढील मुद्द्यावर खुलासा विचारला :

"तुम्ही बागल यांना प्लॅटफॉर्मवर भेटलांत आणि त्यांना सन्मानपूर्वक बाहेरच्या आवारांत घेऊन आलांत कीं नाहीं? तुम्ही लॉरीवर चढलांत तें बागलांच्या आधीं कीं नतर? आधीं चढलां असाल तर फोटो घेण्याचं काम झाल्याबरोबर खालीं कां उतरलां नाहींत? बागल लॉरीवर चढून आल्यावरहि त्या ठिकाणीं कां राहिलांत? बागलांच्या अगदीं शेजारीं तुम्ही बसलां होतां काय? एकदां झेंडा हातीं घेतला होता काय? भाषण केलंत काय? भाषण करणं ही देखील लेखक या नात्यानं तुमच्या कर्तव्याच्या कक्षेंत येणारी गोष्ट तुम्ही समजतां काय?"

या पत्राचं इंग्रजी मॅट्रिक नापास झालेल्या गृहस्थाला शोभण्यासारखं होतं. परंतु तिकडे दुर्लक्ष करून मीं या पत्राला पुढीलप्रमाणें उत्तर धाडलं:—

"मीं बागलांना प्लॅटफॉर्मवर भेटलों नाहीं. ते गाडींतून केव्हां उतरले आणि स्टेशनच्या इमारतींतून बाहेर केव्हां आले तेंहि मला कळलं नाहीं. बागलांच्या किती तरी आधीं मी लॉरीवर चढलों होतों. त्या वेळेस लॉरीच्या टपावर अदमासें वीस माणसं असतील.

बागल लॉरीवर चढल्यावर मला खालीं उतरणं अक्षरशः अशक्य होतं. माझं फोटो घेण्याचं काम संपलं होतं. इतक्यांत बागल लॉरीजवळ आले आणि वर चढले. ते लोकांना उद्देशून भाषण करणार आहेत अशी मला यत्किंचितहि कल्पना नव्हती. मी बागलांच्या शेजारीं बसलों नव्हतों. मी झेंडा हातांत घेतला होता अगर भाषण केलं हा रिपोर्ट सर्वस्वीं हास्यास्पद आणि खोटा आहे. त्यामुळे लेखक या नात्यानें माझ्या कर्तव्याच्या कक्षेंत भाषण येतं कीं नाहीं तें सांगण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं."

यावर सुर्व्यांच्या सहीनं 'गुप्त आणि तातडीचं' पुन्हां एक पत्र आलं. या पत्रांत त्यांनीं पुन्हां विचारलं होतं, "लॉरीच्या टपावरून लोकांना उद्देशून तुम्हीं भाषण केलंत कीं नाहीं याचा ताबडतोब खुलासा करा."

या पत्राला मीं ताबडतोब उत्तर धाडलं कीं, "आपण जो प्रश्न उपस्थित केला आहे तो नवा नाहीं. माझ्या ता. १ च्या पत्रांत मीं या प्रश्नाला असंदिग्ध शब्दांत उत्तर दिलेलं आहे. तेव्हां लॉरीच्या टपावरून लोकांना उद्देशून मीं भाषण केलं नाहीं असं पुन्हां एकदां सांगण्यापलीकडे मी आपल्या नव्या पत्राला कांहीं उत्तर देऊं शकत नाहीं."

या माझ्या पत्रानंतर सुर्व्यांची आघाडी थंड झाली! ती अशी कां थंड झाली तें मला त्या वेळेस कळलं नाहीं. परंतु नंतर कांहीं दिवसांनीं मला समजलं कीं बागलांच्या मोर्चाच्या ठिकाणीं मी हजर होतों या गोष्टीचं निमित्त करून मला राजाराम कॉलेजांतील नोकरीवरून दूर करण्याची सुर्व्यांची जबरदस्त इच्छा होती, आणि माझ्या बडतर्फीचा हुकूम त्यांनीं लिहून तयारहि ठेविला होता, परंतु अशा प्रकारें मला अन्यायानं वागविल्यास कॉलेजच्या विद्यार्थ्यांत आणि जनतेंत असंतोष माजेल आणि त्याचे परिणाम चांगले होणार नाहींत असा सल्ला शहाण्या लोकांकडून सुर्व्यांना मिळाल्यामुळें त्यांना आपला आवडता बेत रद्द करावा लागला. अर्थात् या झटापटींत चीतपट झाल्यामुळें सुर्व्यांनीं माझ्यावर कायमचा दंश धरला ही गोष्ट मला सहज समजण्यासारखी होती.

: : ६९ : :

' मनोहरची आकाशवाणी ' या लेखमालेसाठीं ज्या पुस्तकांची निवड मीं केली होती तीं सगळींच फार चांगलीं होतीं; तथापि, त्यांतहि कांहींची विशेष मोहिनी माझ्या मनाला वाटली. जेम्स हिल्टन या ग्रंथकाराची " वुई आर नॉट अलोन " ही कादंबरी त्यांपैकीं होय. हिचा मराठी अनुवाद करावा अशी मला तीव्र इच्छा झाली. मला स्वतःला हें काम करण्याइतकी सवड काढतां येण्यासारखी नव्हती. परंतु त्या वेळेस एम्. ए. च्या परीक्षेची तयारी करीत असणाऱ्या कमलनं हा अनुवाद करण्याची तयारी दर्शविली आणि तें पाहून मला अतिशय आनंद झाला. मीं लगेच ज़ेम्स हिल्टन यांच्या प्रकाशकांना अनुवादाची परवानगी मागण्यासाठीं पत्र लिहिलं. त्यांनीं मला कळविलं कीं या बाबतींत जेम्स हिल्टनचे एजंट " जॉन फार्खरसन, लंडन " यांना लिहा. मीं त्याप्रमाणें त्या एजंटना पत्र धाडलं, व माझ्या पत्राला मोठं सौजन्यपूर्ण आणि अनुकूल उत्तर आलं; आणि ' वुई आर नॉट अलोन ' या कादंबरीच्या भाषांतराला ता. २० नोव्हेंबर १९३८ रोजीं कमलनं सुरुवात केली.

" जॉन फार्खरसन " कंपनीकडून या संबंधांत मला जीं पत्रं येत असत त्या पत्रांवर " इन्नेस रोझ " अशी सही असे. हें नांव स्त्रीचं असाव अशी माझी कल्पना झाली. आणि त्या कल्पनेला अनुसरून मी माझ्या

पत्रावर मायना लिहूं लागलों. शेवटीं इन्नेस रोझ यांनीं मला एक मोठं विनोदी पत्र लिहून कळविलं कीं, " तुमची मला मोठी निराशा करावी लागत आहे, पण मी स्त्री नसून पुरुष आहें. " मग अर्थात् नंतरच्या पत्रांत मला दिलगिरी प्रदर्शित करावी लागली, आणि त्यावर त्यांनीं लिहिलं कीं, " तुम्ही जी चूक केलीत ती माझ्या बाबतींत वारंवार पुष्कळ लोकांकडून घडते. अनेक वेळां माझ्या मनांत येतं कीं आपलं हें दिशाभूल करणारं नांव बदलावं; परंतु तसं करायचं झालं तर ज्यांनीं तें ठेवलं त्यांची परवानगी विचारावयाला हवी ना, आणि ते तर हयात नाहींत ! " यानंतर माझा आणि इन्नेस रोझ यांचा पत्रव्यवहार पुष्कळच वाढला. त्यांनीं एकदां माझा फोटो मागवून घेतला, व उलट म्हणून माझ्याकडे स्वतःचाहि फोटो धाडला. त्याखालीं त्यांनीं लिहिलं होतं, " बघा, मी एक टक्कल पडलेला मध्यम वयाचा पुरुष आहें ! मी स्त्री तर नाहींच, पण स्त्रीसारखा दिसत देखील नाहीं, ही गोष्ट तुम्ही कबूल कराल अशी आशा आहे. " माझ्या विनंतीवरून त्यांनीं जेम्स हिल्टन यांचाहि एक फोटो त्यांच्याकडून मागवून घेऊन मला धाडला. त्या फोटोंत जेम्स हिल्टन आपल्या मोटारीच्या फूटबोर्डवर एक पाय ठेवून उभे आहेत आणि त्यांचा भला दांडगा अल्सेशियन कुत्रा त्यांच्याजवळ आहे.

१९३९ सालीं किर्लोस्करांच्या मासिकांत लिहिलेल्या लेखांव्यतिरिक्त फारसं लेखन माझ्याकडून झालं नाहीं. एका नव्या कादंबरीचं कथानक थोडंफार माझ्या मनांत घोळत होतं. परंतु कादंबरीच्या लेखनास प्रत्यक्ष सुरुवात करण्याइतपत कथानकाच्या आराखड्याला माझ्या मनांत पक्केपणा आला नव्हता. या वर्षीं व्याख्यानं मात्र मीं पुष्कळ दिलीं. दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनाचं मिरज येथें जें अधिवेशन फेब्रुआरीच्या २५–२६ तारखांस झालं त्याच्या अध्यक्षस्थानावरून मीं केलेलं भाषण, एप्रिल महिन्यांत पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेंत मीं दिलेलीं दोन व्याख्यानं, आणि मुंबईस ' साहित्य संघा 'च्या तृतीय संघ दिनानिमित झालेलं माझं व्याख्यान– हीं व्याख्यानं माझ्या विशेष लक्षांत आहेत आणि श्रोत्यांच्याहि स्मरणांत विशेषेंकरून राहिलीं असतील असं वाटतं.

दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनाचं तिसरं अधिवेशन मिरज येथें फार

उत्साहानं साजरं झालं. अशा साहित्य संमेलनांबद्दल माझं मत विशेष अनुकूल नव्हतं. माझे आक्षेप दोन होते. एक असा कीं हीं संमेलनं भरविणारीं माणसं चार दिवसांचा सोहळा करून झोपीं जातात; साहित्याच्या वाढीसाठीं आणि प्रगतीसाठीं एखादी टिकाऊ योजना आंखण्याचा प्रयत्न या संमेलनांतून व्हावयास हवा तो होत नाहीं. दुसरा आक्षेप असा कीं, साहित्य-संमेलनांत मानाच्या जागा मोठ्या साहित्यिकांना मिळाल्या पाहिजेत, परंतु आर्थिक साहाय्याच्या आणि आश्रयाच्या लोभानं त्या राजेमहाराजांना आणि श्रीमंतांना देण्यांत येतात. मला प्रामाणिकपणानं असं वाटत असे कीं, राजेमहाराजांच्या दरबारांत ज्याप्रमाणें आम्ही खालच्या आसनावर बसतों त्याप्रमाणें शारदेच्या दरबारांत राजेरजवाड्यांनीं खालच्या आसनावर बसलं पाहिजे, आणि अस्सल गुणांच्या साहित्यिकांना उच्चासनावर बसवून त्यांना मुजरा केला पाहिजे. माझे हे विचार पक्के असल्यामुळेंच कोल्हापुरास साहित्य संमेलन झालं त्या वेळेस मी कोल्हापुरांत होतों तरी कविवर्य तांबे यांच्या भेटीला त्यांच्या निवासस्थानावर मी चार वेळां गेलों, परंतु संमेलनाच्या मंडपाकडे फिरकलों देखील नाहीं. मिरज येथील संमेलनाचं अध्यक्षस्थान मीं स्वीकारावं अशी मला विनंती करण्यासाठीं मिरजकर मंडळी जेव्हां माझ्याकडे आली तेव्हां माझे हे विचार मी त्यांच्यापुढें ठेविले, आणि त्यांना म्हटलं, " संमेलनासाठीं तुम्ही जो निधि जमा कराल त्याचा कांहीं वांटा मराठी साहित्याच्या वाढीसाठीं काढलेल्या एखाद्या योजनेसाठीं वेगळा ठेवण्याचं तुम्ही कबूल करीत असाल तरच मी संमेलनाचा अध्यक्ष होईन. " त्यांनीं माझं म्हणणं मान्य केलं. संमेलनाच्या वेळीं माझी वैयक्तिक पांचशें रुपयांची देणगी मी जाहीर केली. ही देणगी, आणि संमेलनानं निराळी काढलेली रक्कम, यांतूनच ' दक्षिण महाराष्ट्र साहित्य पुरस्कार समिति ' ही संस्था संमेलनानंतर लगेच स्थापन झाली. त्या त्या वर्षींच्या उत्कृष्ट मराठी ग्रंथास पांचशें रुपयांचं पारितोषिक देण्याचं काम या समितीनं अंगीकारलं. जी महत्त्वाची कामगिरी मोठ्या साहित्य संमेलनानं आजपर्यंत कधीं ओळखली देखील नव्हती ती माझ्या अध्यक्षतेखालीं झालेल्या मिरजच्या छोट्या संमेलनानं प्रत्यक्ष करून दाखविली ही गोष्ट मला मोठं समाधान देणारी होती.

या सुमारास एच्. एम्. व्ही. कंपनींतील माझे स्नेही श्रीयुत जी. एन्. जोशी यांनीं मला विनंति केली कीं, " आमच्या ग्रामोफोन कंपनीनं शैक्षणिक रेकॉर्डस काढण्याची एक योजना आंखली आहे, त्या कामीं तुम्ही साहाय्य करावयास हवं." शाळेंतील मुलांसाठीं थोर थोर लोकांच्या चरित्रांवर एकेक रेकॉर्ड भरेल एवढ्या बेताचं एकेक भाषण मीं करावं, आणि लहान मुलांसाठीं गोष्टींचीहि रेकॉर्डस मीं द्यावी अशी त्यांची मागणी होती. मी ती ताबडतोब मान्य केली. लोकमान्य टिळक, स्वामी श्रद्धानंद, लाला लजपतराय, आणि कोल्हापूरचे शाहू महाराज अशा चौघांच्या चरित्रांवर मीं चार भाषणं तयार केलीं, आणि मुलांसाठीं दोन गोष्टी लिहून तयार केल्या. यांपैकीं लो. टिळक आणि श्रद्धानंद हीं दोन चरित्रं, व ' जामनगरी पोपट ' ही गोष्ट एवढ्यांचं रेकॉर्डिंग एप्रिलच्या २६ तारखेस करण्यांत आलं. उरलेल्या दोन चरित्रांचं आणि गोष्टींचं रेकॉर्डिंग कधीं झालं नाहीं. कारण शैक्षणिक रेकॉर्डस काढण्याचा हा प्रयोग द्रव्यदृष्ट्या किफायतशीर होण्यासारखा नाहीं असं एच्. एम्. व्ही. कंपनीला आढळून आलं, आणि त्या प्रयोगाचा पाठपुरावा त्यांनीं केला नाहीं. तथापि, जीं तीन रेकॉर्डस मीं दिलीं व प्रसिद्ध झालीं त्यांची आठवण मला स्वतःला जरी फारशी राहिली नसली तरी अजूनहि पुष्कळदां अस होतं कीं एखाद्या खूप दूरच्या गांवीं मी गेलों असतांना कुणाकडे तरी मी चहासाठीं जातों आणि घरांतलीं मोठीं माणसं माझ्याकडे बोट दाखवून कुटुंबांतल्या लहान मुलांना म्हणतात, " हे कोण माहीत आहे का ? जामनगरी पोपट हें रेकॉर्ड पुन्हां पुन्हां लावून तुम्हीं ऐकतां ना ती गोष्ट सांगणारे प्रोफेसर फडके ते हेच ! " मग तीं लहान मुलं माझ्याकडे पाहूं लागतात. रेकॉर्डमधल्या सारखाच माझा प्रत्यक्ष आवाज आहे कीं नाहीं पाहण्यासाठीं त्यांच्या वडील माणसांशीं माझं होणारं संभाषण कान टवकारून ऐकतात; आणि त्या छोट्या मुलांच्या आनंदित, उत्सुक मुद्रा पाहून दहा वर्षांपूर्वीं मीं दिलेल्या त्या शैक्षणिक रेकॉर्डचा मला एखाद्या विशेष गाजलेल्या कादंबरीचा वाटावा तसा अभिमान वाटूं लागतो.

❧ ❧

## : : ७० : :

लोकमान्य टिळक आणि स्वामी श्रद्धानंद यांच्या चरित्रावरचीं भाषणं आणि लहान मुलांसाठीं सांगितलेली गोष्ट यांची रेकार्डस देऊन घरीं परत आल्यावर माझं सांचलेलं टपाल मीं पाहिलं. त्यांत पुण्याच्या वसत व्याख्यानमालेतर्फे आलेलं आमंत्रण मला आढळलं. यंदाच्या वसंत व्याख्यान-मालेंत मी लागोपाठ दोन दिवस व्याख्यानं द्यावीं अशी चिटणिसांनीं विनति केली होती. एकाच वक्त्याचीं लागोपाठ दोन दिवस व्याख्यानं करण्याचा वसंत व्याख्यानमालेंतला हा नवा उपक्रम होता, आणि मला धाडलेल्या पत्रांत चिटणिसांनीं लिहिलं होतं, "पुण्याचे श्रोते आपलीं व्याख्यानं ऐकण्यासाठीं इतके आतुर आहेत कीं आपलं एकच व्याख्यान ऐकल्यान त्यांची भूक भागणार नाहीं, म्हणून दोन व्याख्यानं देण्याची विनंति आम्ही आपणांस करीत आहों. आपण सेकंड क्लासचा प्रवासखर्च घेतल्याखेरीज परगावचं व्याख्यानाचं आमंत्रण स्वीकारीत नाहीं हें आम्हांला माहीत आहे, व व्याख्यात्यांना प्रवासखर्च देण्याचा मालेचा अजून शिरस्ता नसला तरी आपले बाबतींत अपवाद करण्यास आम्ही आनंदानं तयार आहोंत. आमची निराशा आपण करणार नाहीं अशी आशा आहे."

पुण्याची वसंत व्याख्यानमाला या संस्थेविषयीं मला मोठा आदर होता. या मालेची परंपरा आणि हिच्यामार्फत होणाऱ्या व्याख्यानांना हजर

राहणारा समाज यांचा विचार करतां वसंत व्याख्यानमालेचं व्यासपीठ म्हणजे एक बहुमानाचं स्थान होय असं मला वाटत होतं. कुस्त्या मारणाऱ्या पहिलवानाला एखाद्या विवक्षित मोठ्या फडाचं महत्त्व वाटावं, आणि त्या फडांतली दंगल जिंकण्याची महत्त्वाकांक्षा त्याला असावी, त्याप्रमाणें वसंत व्याख्यानमालेविषयीं माझ्या भावना होत्या. १९२० च्या असहकारितेच्या चळवळींत पडून केसरी–मराठा पत्रांत मी काम करूं लागल्यानंतर १९२१ च्या मे महिन्यांत 'चक्रवर्ति नेपोलियन' या विषयावर मीं व्याख्यान दिलं होतं. त्या काळांतहि– म्हणजे मी २६-२७ वर्षांचा होतों तेव्हां लोक माझ्या वक्तृत्वाची प्रशंसा करीत. परंतु त्यानंतरच्या अठरा वर्षांत मीं माझ्या मनानं वक्तृत्वकलेंत आणखी पुष्कळ प्रगति केली होती; आणि महत्त्वाकांक्षेनं नित्य अभ्यास करणाऱ्या गायकाला आपल्या अंगची वाढलेली गायनकला तज्ज्ञ रसिक श्रोत्यांच्या एखाद्या मैफलींत रुजूं करण्याची इच्छा असावी त्याप्रमाणें आतां एकदां वसंत व्याख्यानमालेंत बोलावं अशी माझ्या मनाचीहि हौस होती. त्यामुळें मालेच्या चिटणिसांनीं केलेल्या विनंतीला मीं एकदम मान्यता दिली.

त्यांचं पुन्हां पत्र आलं कीं, "आपण रुकार दिलांत याबद्दल आम्ही फार आभारी आहोंत. परंतु एक सूचना नम्रपणानं करतों ती अशी कीं, आपल्या दोन व्याख्यानांसाठीं आपण अगदीं उत्तमांतल्या उत्तम विषयांची निवड करावी. व्याख्यानं आपण देणार आहांत एवढ्या एकाच गोष्टीमुळें खूप गर्दी लोटणार यांत शंकाच नाहीं; परंतु आमची इच्छा अशी आहे कीं, व्याख्यानांचे विषय अगदीं नवीन व आकर्षक असावेत म्हणजे गर्दीला सुमारच राहणार नाहीं." मी त्यांना उत्तर लिहिलं, कीं "तुमची सूचना अगदीं योग्य आहे. पण तुम्ही फिकीर करूं नका. व्याख्यानासाठीं असे विषय निवडतों कीं लोकांना वाटावं, या व्याख्यानांना गेलंच पाहिजे."

'साहित्यांतील वास्तव आणि ध्येय,' व 'संगीतांतील नवमतवाद' या दोन विषयांवरचीं वसंत मालेंतील माझीं व्याख्यानं शनिवार ता. २० मे आणि रविवार ता. २१ मे या दोन दिवशीं झालीं. माझ्या व्याख्यानांसाठीं चालकांनीं स्वतंत्र तिकिटं काढण्याचा नवा उपक्रम केला होता; तो अत्यंत

यशस्वी झाला. माझ्या शनिवारच्या व्याख्यानाला अडीच हजार लोक हजर होते, आणि 'संगीतांतील नवमतवाद' या विषयावरील व्याख्यानाच्या दिवशीं टिळक मंदिराचं सबंध विस्तीर्ण पटांगण तर गच्च भरून गेलं होतंच पण शिवाय शेजारच्या घरांच्या छपरांवर व पत्र्यांवरसुद्धां लोकांची दाटी झाली होती. पहिल्या व्याख्यानाला (कै.) वामन मल्हार जोशी व दुसऱ्या व्याख्यानाला (कै.) तात्यासाहेब केळकर अध्यक्ष होते. संगीताच्या विषयावर जवळजवळ साडे तीन हजार लोकांपुढें अडीच तास मीं दिलेल्या त्या व्याख्यानासारखं व्याख्यान पूर्वीं कधीं झालं नव्हतं. आणि अजूनपर्यंत तरी पुन्हां कधीं झालं नाहीं असं लोक म्हणतात.

'संगीतांतील नवमतवाद' या माझ्या व्याख्यानावर उलट सुलट टीकेचं वादळ उठलं तें पुढें जवळजवळ वर्षभर वृत्तपत्रांत चालूं होतं. माझ्या व्याख्यानांत मीं जीं मतं मांडलीं होतीं त्यांवर मोठमोठ्या नामांकित गायकांचीं मतं घेण्यांत व प्रसिद्ध करण्यांत वृत्तपत्रांच्या संपादकांनीं एकमेकांशीं अहमहमिका केली. या बाबतींत त्या वेळीं एका साप्ताहिकाचं संपादन करणारे श्रीयुत रांगणेकर यांनीं चतुर संपादकाला शोभेल अशी कामगिरी केली. माझ्या व्याख्यानांवर खासगी आणि जाहीर चर्चा झाल्या, आणि या चर्चांत भाग घेण्यासाठीं ठिकाठिकाणचीं आमंत्रणंहि मला आलीं पण मी तीं स्वीकारलीं नाहींत. कारण एक तर संगीतावरील लोकांच्या विचारांना नवी चालना द्यावी हा जो तें व्याख्यान देण्यांतला माझा मुख्य हेतू होता तो साध्य झालेला मला स्पष्ट दिसत होता, व त्यानंतर या प्रकरणांत आणखी वेळ घालविण्याची माझी इच्छा नव्हती. शिवाय विरोधी चर्चा आणि टीका करणारे लोक माझे मुद्दे नीट समजून न घेतां अगर मुद्दाम वेड पांघरून बोलत होते अगर लिहीत होते, आणि अशा लोकांशीं निरर्थक वाद वाढविण्याची माझी इच्छा नव्हती. चौफेर चालू असलेल्या या साधकबाधक चर्चेंत क्वचित् असे मुद्दे उपस्थित होत होते कीं, त्यांचा समाचार घेणं माझ्या विषयाच्या पूर्ततेच्या दृष्टीनं मला आवश्यक वाटत होतं. पण मी मनाशीं असा बेत केला होता, कीं अशा एकेका मुद्द्याला लगोलग उत्तर देण्यापेक्षां एक वर्षभर गप्प बसावं, आणि मगच एकदम साऱ्या मुद्द्यांचा साकल्यानं समाचार घ्यावा. म्हणून माझ्या व्याख्यानाचे

पडसाद नंतर सतत वर्षभर उमटत राहिले तरी मी या विषयावर जाहीरपणें बिल्कूल कांहीं बोललों नाहीं किंवा लिहिलं नाहीं. वसंत व्याख्यानमालेंतलीं माझीं व्याख्यानं गाजावीं अशी मालेच्या चालकांची इच्छा होती व ती कल्पनेपलीकडे पूर्ण झाली होती. एवढं समाधान मला पुरेसं होतं.

या सुमारास प्रभात फिल्म कंपनीचा ' माणूस ' ( आदमी ) हा चित्रपट गाजत होता. कित्येक लोकांच्या म्हणण्यांत असं येतं होतं कीं 'व्हिव्हिअनली' या नटीच्या कामामुळें गाजलेल्या " वॉटर्लू ब्रिज " या इंग्रजी चित्रपटावरून शांताराम बापूंनीं हा चित्रपट तयार केला. मीं तो इंग्रजी चित्रपट मुद्दाम पाहिला, व तो पाहिल्यानंतर माझ्या मनांत इतकंच आलं कीं या चित्रपटाची नक्कल प्रभातनं केली असती तर ' माणूस ' हा चित्रपट किती तरी अधिक सरस वठला असता. ' माणूस ' चित्रपटाच्या कथानकाचं मूळ एका निराळ्याच पुस्तकांत मला दिसलं होतं. ' पिट ' नांवाची वेश्या-जीवनावरील जी मूळ रशिअन लेखकाची दीर्घ कादंबरी आहे तिच्यांतील एका प्रकरणावरून ' माणूस ' चित्रपटाचं कथानक लेखकाला सुचलं असणं मला संभवनीय वाटत होतं. या कादंबरींतील दुसऱ्या एका प्रकरणावरून एक लघुकथा तयार करून ' विलक्षण वेश्या ' या नावानं मीं ती प्रसिद्ध केली होती. ' नमुनेदार गोष्टी ' या माझ्या कथासंग्रहांत ती गोष्ट आहे. परंतु ' माणूस ' चित्रपटाची स्वतंत्रता अगर उसनवारी या गोष्टी मला महत्त्वाच्या वाटत नव्हत्या. व्ही. शांताराम यांनीं तो फार कौशल्यानं घेतला होता आणि या सुंदर चित्रपटाची निर्मिती म्हणजे देशी चित्रपटांच्या धंद्यानं प्रगतीची गाठलेली नवी पायरी समजली पाहिजे, असं माझं प्रामाणिक मत होतं. म्हणून मी श्रीयुत शांताराम यांना मुद्दाम अभिनंदनाचं पत्र लिहिलं. हें माझं अभिनंदनाचं पत्र व शांताराम यांजकडून त्याचं मला आलेल उत्तर हीं दोन्ही बहुतांशीं औपचारिक स्वरूपाचीं होतीं. कारण त्यांचे माझे त्या वेळचे संबंध थोडेसे चमत्कारिक होते. त्यांच्या कर्तृत्वाविषयीं मला आदरमिश्रित कौतुक वाटत होतं आणि माझ्याविषयीं त्यांनाहि वाटत असावं. तथापि ते मूळचे कोल्हापूरचेच असून व माझी गेलीं तेरा वर्षं कोल्हापुरांतच गेलीं असून त्यांचा माझा परस्पर परिचय निःशंक स्नेहाच्या पातळीवर जाऊ शकला नव्हता. असं झालं याचीं कारणं

फार गमतीचीं होतीं; आणि दोष बहुतांशीं माझ्याकडे होता हें मला कबूल केलं पाहिजे. कारण शांतारामशीं स्नेह जोडून तो वाढवायचं मीं ठरविलं असतं तर ती गोष्ट यापूर्वीच अगदीं सहजासहजीं झाली असती. ती झाली नाहीं याला कारण माझ्या स्वभावांतलाच एक दोष म्हटला पाहिजे.

व्ही. शांताराम यांना मीं प्रथम पाहिलं तें मी कोल्हापुरांत आल्यानंतर बाबूराव पेंटर यांच्या महाराष्ट्र फिल्म कंपनींत वारंवार जावूं लागलों तेव्हां त्यांच्याकडे. महाराष्ट्र फिल्म कंपनीच्या आवारांत बाबूराव पेंटर यांच्या बैठकीची जी खोली होती तिथें नेमानें बहुतेक रोज मी जाऊन बसत असे, आणि त्या ठिकाणीं बाबूरावांच्या इतर शिष्यमंडळींबरोबर आणि सह-काऱ्यांबरोबर व्ही. शांताराम हेहि असत. परंतु कामाव्यतिरिक्त कुणाशीं गप्पा झोडण्याचा, लगट करण्याचा माझा स्वभाव नसल्यामुळें, आणि मी बाबूरावांचा स्नेही तेव्हां माझ्याशीं बरोबरीच्या नात्यानं कसं वागायचं हा विवेक शांताराम आणि इतर मंडळी ठेवीत असल्यामुळें त्यांचं माझं प्रत्यक्ष संभाषण कधीं झालेलं नव्हतं. पुढें शांताराम, फत्तेलाल, दामले वगैरे मंडळींनीं महाराष्ट्र फिल्म कंपनी सोडून कोल्हापुरांतच प्रभात फिल्म कंपनी स्थापन केली तेव्हां उभय पक्षांतील मतभेदांचा निकाल करणाऱ्या लवादांत मी होतों. या फाटाफुटींत शांताराम वगैरे मंडळींचीच भूमिका बरोबर होती. आणि फाटाफुटीचा खरा दोष बाबूरावांच्या स्वभावांतील आणि वागण्यांतील कित्येक चमत्कारिक गोष्टींकडे होता. शांताराम वगैरे मंडळींनीं बाबूरावांचं साहचर्य सोडून नवी कंपनी काढायचं ठरविलं यांत त्यांच्याकडे कोणतीहि चूक मला दिसून आली नाहीं. बाबूराव पेंटर यांची वागण्याची व धंदा करण्याची पद्धत बदलल्याखेरीज ही मंडळी त्यांच्या जवळ अधिक काळ टिकणं शक्य नव्हतं. आणि बाबूरावांच्यांत सुधारणा होणं ही गोष्टहि अशक्य होती. तेव्हां शांताराम, फत्तेलाल वगैरे लोक महाराष्ट्र फिल्म कंपनी सोडून दूर झाले हेंच योग्य झालं याबद्दल माझी पक्की खात्री होती. परंतु मनाची अशी खात्री असूनहि मी शांताराम यांच्या पक्षाचा अगर नव्या कंपनीचा कैवार उघडपणें कधीं घेतला नव्हता. महाराष्ट्र फिल्म कंपनीच्या चित्रपटाच्या टायटल्स ( त्या वेळेस चित्रपट मुके असत ) केवळ हौस म्हणून आणि मोबदला न घेतां स्नेहाखातर मी नेहमीं

लिहीत असें; आणि माझ्या या टायटल्सचो विशेष वाहवा होत असे. शांताराम यांनीं आपल्या नव्या प्रभात कंपनीचा पहिला चित्रपट ‘ मुरलीवाला ’ तयार केला तेव्हां त्याच्या टायटल्स मी लिहाव्या अशी इच्छा त्यांनीं व्यक्त केली, आणि मोबदलाहि देऊ केला. ती त्यांची विनंति मी त्या वेळीं मान्य केली असती तर प्रभात कंपनीचे आणि माझे दृढ संबंध पहिल्यापासून निर्माण झाले असते. परंतु शांतारामशीं सहकार्य करणं म्हणजे बाबूराव पेंटर यांच्या मित्रत्वाशीं बेइमान होण्यासारखं होय असं समीकरण मी माझ्या मनानं ठरविल्यामुळें शांताराम यांनीं केलेल्या विनंतीला मी मान्यता दिली नाहीं. नंतरच्या आठ-दहा वर्षांच्या काळांत मला कळून आलं कीं आपल्या मित्रांशीं इमान राखण्याची माझी ही तऱ्हा व्यावहारिक दृष्ट्या वेडेपणाची होती. इमानाची जी कल्पना मी मानीत होतों ती बाबूराव पेंटर मुळींच मानीत नव्हते. इतर कित्येक मित्रांच्या बाबतींतहि मला पुढें हा अनुभव आला. व्यवहाराच्या सोयीसाठीं मैत्रीचं इमान सोडायला कांहीं हरकत नाहीं अशा धोरणानं या दुनियादारींत वागावं लागतं ही भूमिका माझ्या मित्रांनीं स्वीकारलेली मला अनेक वेळां पाहावी लागली आहे.

यां साऱ्या गोष्टी अशासाठीं सांगितल्या कीं, प्रभात कंपनी पुण्यास जाण्यापूर्वीं शांताराम कोल्हापुरांतच होते आणि मीहि कोल्हापुरांत होतों हें जरी खरं असलं तरी त्यांचा माझा परिचय निःशंक मनमोकळ्या स्नेह्याच्या पातळीवर कां आला नव्हता, आणि ‘ माणूस ’ चित्रपटाच्या निमित्तानं त्यांच्या माझ्यांत जो पत्रव्यवहार झाला तो औपचारिक स्वरूपाचा कां होता याचा खुलासा व्हावा. माझ्या अभिनंदनाच्या पत्राला शांताराम यांचं उत्तर आल्यावर माझं एक कर्तव्य केलं असं समजून मी ती गोष्ट विसरूनहि गेलों होतों. परंतु या गोष्टीला फारसे दिवस झाले नाहींत तोच एके दिवशीं शांताराम माझ्या भेटीस आले !

ते आले त्या वेळेस मी एका मोठ्या दुखण्यांतून उठून हवा पालटण्यासाठीं म्हणून किर्लोस्करवाडीस शंकरराव किर्लोस्कर यांच्याकडे रहावयास गेलों होतो. ता. १६ डिसेंबर रोजीं दुपारच्या जेवणानंतर मी निजलों होतों.

कुणी तरी खोलींत आलं आणि मला उठवून म्हणालं, " तुम्हांला भेटायला शांताराम आले आहेत. बाहेरच्या खोलींत बसले आहेत. " मी डोळे चोळीत बाहेर आलों. " काय शांताराम ", " काय अप्पासाहेब " असं उलट सुलट सहास्य अभिवादन झालं. ते म्हणाले, " मुद्दाम तुम्हांला भेटायला म्हणून कोल्हापूरला आलों. तुम्हीं इकडे आलां आहांत असं कळल्याबरोबर तंडक मोटारींतून इकडे आलों. माझं तुमच्याशीं जरूरीचं काम आहे."

मी म्हटलं, " सांगा. "

कोणत्याहि प्रकारें प्रस्तावना न करतां ते म्हणाले, " माझ्या नव्या चित्रपटाची योजना मीं करूं लागलों आहें. या चित्रपटाची गोष्ट तुमच्याकडून लिहून घेण्याचं मीं ठरवलं आहे. "

त्यांची ती आकास्मिक भेट आणि त्यांचं तें अतिशय सरळ बोलणं या दोन्ही गोष्टींचा मला फार आनंद झाला.

## : : ७१ : :

१९३९ सालीं ऑक्टोबर महिन्याच्या ७ तारखेस मुंबईच्या साहित्य संघाच्या तृतीय दिनानिमित्त जें व्याख्यान मीं दिलं त्यासाठीं 'पावित्र्य–विडंबन' असा विषय मी घेतला होता. या व्याख्यानाच्या प्रतिपादनांतील माझा मुख्य सिद्धान्त कांहींसा चमत्कृतिपूर्ण होता. मीं असा मुद्दा पुढें मांडला, कीं परंपरेनं किंवा रूढीनं पवित्र ठरलेल्या एखाद्या देवतेचा, व्यक्तीचा, वस्तूचा किंवा संकेताचा उपहास करून जेव्हां एखादा लेखक विनोद निर्माण करतो त्या वेळेस त्याचा उद्देशच मुळीं परंपरेला आणि रूढीला धक्का देण्याचा असतो; जी गोष्ट पवित्र मानली गेली तिच्या पावित्र्याचा उगाच बडीवार माजविण्यांत अर्थ नाहीं असं सांगण्याच्या हेतूनंच तो लेखनाला प्रवृत्त झालेला असतो; ज्या 'पावित्र्या'चं विडंबन केल्याचा आरोप त्याच्या लेखनावर आपण करतों तें त्याच्या चिकित्सक दृष्टीला 'पावित्र्य' वाटतच नसतं. जें उगीचंच पवित्र मानलं गेलं आहे असं त्याला वाटतं त्यावर तो विडंबनाचं शस्त्र उचलीत असतो, आणि याचा अर्थ असा कीं, 'पावित्र्य–विडंबन' ही क्रिया त्याच्या हातून मुळीं घडतच नाहीं ! मीं असं सांगितलं कीं पवित्र गोष्टींचा उपहास करण्याचे दोन प्रकार आहेत. एकांत केवळ गमतीची थट्टा आणि करमणूक करणं एवढाच हेतू असतो; आणि दुसऱ्यांत मूर्तिभंग करून समाजाला नव्या

दिशेनं विचार करावयास लावण्याची इच्छा असते. यांपैकीं पहिला प्रकार जोंपर्यंत शिष्टतेच्या आणि उच्च वाङ्मयीन अभिरुचीच्या मर्यादा ओलांडीत नाहीं तोंपर्यंत त्याचा निषेध करण्याचं कारण नाहीं, आणि दुसऱ्या प्रकारांत पावित्र्य–विडंबनाची क्रिया मुळीं घडतच नाहीं.

हें माझं प्रदिपादन बरंचसं तात्त्विक स्वरूपाचं होतं. तथापि अनेक दाखले देऊन व सजावट करून माझं एकंदर व्याख्यान मनोरंजक व्हावं अशी मी दक्षता घेतली होती, आणि माझ्या व्याख्यानानं श्रोत्यांना खूष करून टाकण्याचं नेहमींचं समाधान मला मिळवितां आलं.

तथापि या वर्षांतील मला स्वतःला जें सर्वांत प्रिय वाटलं. तें माझं व्याख्यान मी वर्षाच्या अखेरीस दिलं. हें व्याख्यान म्हणजे पुण्याच्या ज्या शाळेंत माझं मॅट्रिकपर्यंतचं शिक्षण झालं त्या शाळेच्या संमेलनाचा अध्यक्ष म्हणून ता. २६ डिसेंबर रोजीं मी जें व्याख्यान दिलं तें होय. माझे स्नेही प्रो. नारळकर शाळेचे मुख्याध्यापक होते. त्यांनीं तीन-चार वर्षांपासून माझ्या मागें आमंत्रणाचा लकडा लावला होता, पण मी जाऊं शकलों नव्हतों. या वर्षीं त्यांनीं मला निक्षून सांगितलं कीं यंदाचं संमेलन केलं तर तुमच्याच अध्यक्षतेखालीं करायचं, नाहीं तर करायचं नाहीं असा विद्यार्थ्यांनीं निश्चय केलेला आहे. माझ्या सोईसाठीं त्यांनीं संमेलनाची तारीखही पुढें ढकलली तेव्हां मी आमंत्रण स्वीकारून गेलों. नूतन मराठी विद्यालय या शाळेविषयीं माझ्या मनांत अत्यंत हळुवार भावना होत्या, आणि आहेत. ज्या फर्ग्युसन कॉलेजांत मी चार वर्षं शिकलों त्या कॉलेजविषयीं विचार करतांना माझं अंतःकरण कधीं उचंबळून येत नाहीं; परंतु नूतन मराठी विद्यालय या संस्थेविषयीं विचार करूं लागलों कीं माझं अंतःकरण एकदम सद्‌गदित होतं. कॉलेज आणि शाळा याबद्दलच्या वृत्तींतल्या भिन्नतेचा अनुभव सर्वांनाच येतो कीं नाहीं मला ठाऊक नाहीं, पण मला तो येतो येवढं खरं; आणि मानसशास्त्राच्या दृष्टीनं हें कसं बरोबर आहे तेंहि मी सांगू शकेन, पण तें सांगण्याचं हें स्थळ नव्हे. सध्यापुरती महत्त्वाची गोष्ट इतकीच कीं, माझ्या शाळेविषयीं माझ्या भावना अत्यंत जिव्हाळ्याच्या आणि नाजूक असल्यामुळें, आणि १९१० सालीं मी या शाळेंतून मॅट्रिक झालों त्यानंतर आतां जवळ

जवळ तीस वर्षांनीं मी माझ्या मातृतुल्य शाळेला जाहीर भेट प्रथम देत असल्यामुळें संमेलनांतलं तें व्याख्यान देतांना प्रारंभीं मला कधीं नव्हे अशा गहिंवराचा अनुभव आला.

मी म्हणालों, “ थोड्या वेळापूर्वीं या पटांगणाच्या दाराशीं मीं गाडींतून उतरलों तेव्हां एक गृहस्थ नमस्कार करून माझ्याजवळ आले व संभाषण करतां करतां मला म्हणाले, ‘ आज आमच्या शाळेचा भाग्याचा दिवस आला असं आम्ही समजतों. ’ मी म्हटलं, ‘ तो कसा ? ’ तेव्हां ते म्हणाले, ‘ तुमच्यासारखे सन्माननीय पाहुणे आज अध्यक्ष लाभले, हें आमचं मोठं भाग्य नव्हे काय ? त्यावर अधिक उत्तर न करतां मी हंसलों व पुढें झालों. परंतु मीं मनांतल्या मनांत म्हटलं, ‘ सन्माननीय पाहुणा ’ असं यांनीं मला कां बरं म्हणावं ? आजच्या या समारंभांत मी जरी अध्यक्ष असलों तरी माझी भूमिका सन्माननीय पाहुण्याची नाहीं. कारण मी सन्माननीय असेन – असेन नव्हे आहेच – परंतु मी पाहुणा खचित नाहीं. मी शाळेचा माजी विद्यार्थी आहे. ही शाळा माझी आहे. तीस वर्षांनीं मी माझ्या या शाळेंत आज परत येत आहें. मी माझ्या आईला भेटण्यासाठीं घरीं परत आलों आहें. अशा वेळीं माझ्या वृत्ती कांहींशा गहिंवरून आल्या तर तें साहजिकच होय. ”

मीं पुढें म्हटलं, “ हा गहिंवर आवरून धरला कीं माझ्या मनांत प्रथम जो एक विचार येतो तो कांहींसा गमतीचा आहे. बाहेर गेलेला मुलगा कित्येक वर्षांनीं जेव्हां घरीं परत येऊन आपल्या आईला भेटतो तेव्हां तो मोठा झालेला असतो, परंतु त्याची आई थकलेली असते. पण माझ्या आणि माझ्या या आईच्या आजच्या भेटीला हा न्याय मुळींच लागू पडत नाहीं. कारण मी मोठा झालों आहें, परंतु माझी आई दुबळी झालेली नाहीं. उलट ती किती तरी मोठी आणि सुदृढ झालेली मला दिसते. तिची कीर्ति दिगंत पसरलेली आहे असं मला आढळतं, आणि ती उत्तरोत्तर अशीच अधिक पसरणार याचीं स्पष्ट चिन्हं मला जिकडे तिकडे दिसतात. माझ्या शाळेचा एक पुत्र म्हणूनच नव्हे तर एक कर्तृत्वशाली सुपुत्र म्हणून तिच्या भेटीला मी आज आलों, आणि पाहतों तों माझ्याहिपेक्षां किती तरी पटींनीं अधिक मोठी माझी ही शाळा झालेली आहे. माझ्या विद्यार्थि-

दशेंतली या शाळेची स्थिती आणि आजचं तिचं भव्य रूप याची तुलना या प्रसंगीं मनांत आल्यावांचून राहत नाहीं; आणि या तुलनेनं अंतःकरणाला विलक्षण आनंद होतो. माझ्या विद्यार्थिदशेंत पेशवाई थाटाच्या एका जुन्या वाड्यांत ही शाळा होती. वर्गांत उजेड बेताचाच असे व त्यामुळें माझ्या-सारख्या खोडकर विद्यार्थ्यांची मोठी सोय होत असे. वर्गाच्या चारी भिंतींना टेकून बाकांची एकच चौफेर रांग मांडलेली असे. वयाच्या बाबतींत तीं बाकं आमच्यापेक्षां किती तरी वृद्ध असत, आणि कितीक बाकांचे पाय शाबूत नसत. वीस फुटांच्या खोलींत सहज बसतील येवढेच सगळे मिळून शाळेंतले शिक्षक असत. आणि विद्यार्थ्यांची संख्या जेमतेम चारशेंपर्यंत असे. आजची स्थिति किती निराळी ! आमच्या वेळीं मॅट्रिकच्या वर्गांत जितके विद्यार्थी असत त्याहून अधिक शिक्षक आज शाळेंत आहेत; आणि तेहि सर्व हंसतमुख, छड्या न मारणारे, मुलांशीं खेळीमेळीनं वागणारे, आणि शिक्षणाच्या आधुनिक कल्पनांनीं भारावलेले आहेत. आज शाळेची इमारत केवढी विस्तीर्ण आहे. आमच्या वेळीं शाळेचं संमेलन एका दिवाणखान्यांत भरत असे. आज हा विस्तीर्ण मंडपहि अपुरा पडत आहे. अशा प्रकारें माझी आई सर्वांगांनीं सुदृढ आणि भव्य झालेली मला दिसते. जिची कीर्ति तिच्या सुपुत्रांनीं भारतांत चहूंकडे पसरविलेली आहे, जी या शहराचं नव्हे तर सबंध इलाख्याचं भूषण झालेली आहे, अशा या शाळेचा मी माजी विद्यार्थी आहे या अभिमानास्पद कल्पनेच्या आनंदानं माझं अंतःकरण या वेळीं भरून येतं ! ”

माझीं जीं व्याख्यानं माझ्या स्वतःच्या लक्षांत चिरकाल राहतील त्यांपैकीं माझं हें व्याख्यान होतं. या व्याख्यानाच्या प्रसंगाचं एके ठिकाणीं वर्णन करतांना श्रीयुत नारळकर म्हणतात, “ रविवार ता. २४ डिसेंबर १९२९ रोजीं नूतन मराठी विद्यालयाच्या संमेलनाच्या वेळीं सारे सुंदर योग कसे जुळून आले. प्रो. ना. सी. फडके आधींच सर्व विद्यार्थ्यांना प्रिय आणि शाळेचे तर माजी विद्यार्थी, शिवाय गेलीं दोन वर्षं आमचे विद्यार्थी ‘ फडके येणार, फडके येणार ’ असं सारखं घोकीत होते. तेव्हां विद्यार्थ्यांचा उत्साह नुसता ओसंडत होता. त्यांत शाळेचं ते विस्तीर्ण आरशासारखं चक्क प्रांगण, तें सोळा आरशांचं शोभिवंत पाणघर, तो डौलदार मंडप वगैरे प्रसन्न

वातावरण पाहून प्रो. फडक्यांना विशेष समाधान वाटलं. त्यांच्या व्याख्याना-पूर्वीचा विद्यार्थ्यांच्या 'विविध गुणदर्शना'चा कार्यक्रम अगदीं टीपबंद व प्रेक्षणीय असा झाला. रेडिओचे सुप्रसिद्ध तल्यारखान यांच्या पंचरंगी सामन्याच्या वृत्ताची एका विद्यार्थ्यानं केलेली हुबेहूब नक्कल ऐकून तर त्यांना अगदीं गुदगुल्या झाल्या. 'व्यासपीठावरील चार भयंकर प्राणी' हा त्यांचा लेख मला चांगला माहीत असल्यामुळे मीहि मुख्याध्यापक या नात्यानें बेतशीर व खेळीमेळीचं असं छोटंसंच भाषण करून बाजूला झालों. मीं फडक्यांचीं सर्व भाषणं वाचलेलीं आहेत. व बरींचशीं ऐकलीं आहेत. परंतु त्यांचं त्या दिवशींचं भाषण अगदीं अपूर्व झालं. आमच्या विद्यार्थ्यांनीं सुद्धां त्यांचा प्रत्येक शब्द झेलून धरला. येवढी दोन हजारांची सभा पण कशी एकचित्त झाली होती. विद्यार्थी चित्रासारखे स्तब्ध बसले नव्हते, तर रसिकपणानं स्मित, हास्य, गांभीर्य वगैरेनीं योग्य वेळीं व योग्य प्रमाणांत साथ देत होते. रसवंती भाषा, अस्खलित वाणी, विद्यार्थ्यांच्या हृदयाचे ठाव घेणारे विचार, ठिकठिकाणीं विखुरलेला विनोद, आणि 'पुढें काय ? पुढें काय ? अशी श्रोत्यांना उत्कंठा लागलेली आहे:तोंच भाषण संपविण्याची लकब जातिवंत वक्त्याचं सर्व कौशल्य एकत्र पाहण्याची ती अपूर्व पर्वणी वाटली."

: : ७२ : :

१९४० सालच्या प्रारंभीं एके दिवशी 'जीना अँड को.' या प्रवासी लोकांच्या खास सफरी काढणाऱ्या सुप्रसिद्ध कंपनीकडून मला पत्र आलं कीं 'मराठी आणि इंग्रजी नियतकालिकांत लेखन करणारे एक नामांकित लेखक तुम्ही आहांत हें आम्हांला माहीत आहे. तुमचें सहकार्य मिळविण्याची कंपनीची इच्छा आहे. तरी मुंबईस येऊन या बाबतींत बोलणें कराल तर मेहेरबानी होईल. तुमच्या जाण्यायेण्याचा आणि मुंबईंत राहण्याचा सर्व खर्च कंपनी आनंदानें देईल.' मी मुंबईस जाऊन कंपनीच्या ऑफिसांत गेलों. कंपनीच्या मॅनेजरनं माझी आणि दुसऱ्या एका माणसाची गांठ घालून दिली आणि म्हटलं, 'हे गृहस्थ तुमच्याशीं चर्चा करतील.' त्या गृहस्थानं किंचित् उठून माझ्याशीं हस्तांदोलन केलं व मला बसायची विनंति करून तो स्वतः बसला.

जीना कंपनीतर्फे आगगाडीच्या आणि विमानाच्या प्रवासाच्या ज्या खास सफरी वरचेवर काढण्यांत येत त्या अधिक लोकप्रिय करण्याच्या हेतूनं जी योजना कंपनीनं आखली होती ती अशी कीं, अशा चार सफरींत मीं भाग घ्यावा, आणि त्या सफरींचीं वर्णनं मराठी आणि इंग्रजी नियतकालिकांत मीं लिहावीं. या लेखनाचा स्वतंत्र मोबदला कंपनी मला देणार नव्हती. त्या त्या नियतकालिकांकडून मला जो मोबदला मिळेल तेवढाच

मी व्यावयाचा होता. माझ्या सफरींचा सर्व खर्च मात्र कंपनी करणार होती. ही योजना माझ्यापुढें ठेवून ते गृहस्थ मीं ती मान्य करावी म्हणून मोठ्या वक्तृत्वपूर्ण शैलीनं व अस्खलित ऐटबाज भाषेंत बोलत राहिले. मी त्यांना पुनः पुन्हा सांगूं लागलों कीं, कंपनीच्या सफरींच्या वर्णनाचे मराठी व इंग्रजी लेख मी तयार करीन व ते कंपनीच्या स्वाधीन करीन. त्याच्या प्रसिद्धीची व्यवस्था कंपनीनं करावी, व ते प्रसिद्ध होवोत न होवोत त्यांचा मोबदला कंपनीनं मला द्यावा. उलट, ते मला म्हणूं लागले कीं, 'तुम्हांला एक पैसा देखील खर्च न करतां दूरदूरच्या सफरी करावयास मिळतील, तुमच्यासारख्या माणसाला हा मोठाच फायदा होईल हें तुम्ही का लक्षात घेत नाहीं, आणि लेखाच्या मोबदल्याचा हट्ट उगीच कां धरतां?' मी त्यांना सांगितलं कीं, तुम्हांला हा हट्ट वाटत असेल, परंतु मला माझं हें म्हणणं बदलतां येणार नाहीं. कंपनीला माझ्या लेखांच्या साहाय्यानं आपल्या सफरींची लोकप्रियता वाढवितां येणार आहे ही गोष्ट कंपनीनं कां लक्षात घेऊं नये तुम्हींच सांगा."

ते गृहस्थ एकदम हंसले आणि म्हणाले, "माफ करा, परंतु खरं म्हणाल तर तुमची अट मान्य करून आपल्या सफरींची प्रसिद्धि वाढविण्याची कंपनीला आवश्यकता नाहीं. कंपनी फार मोठी आहे."

मीं म्हटलं, "मींदेखील फार मोठा आहें. लेखनाचा मोबदला न घेतां केवळ सफरींची गंमत अनुभविण्यासाठीं जाण्याची मलाहि आवश्यकता नाहीं."

माझं हें उत्तर ऐकून ते गृहस्थ मोठमोठ्यांदा हंसले व म्हणाले, "फार चांगला उलट टोला दिलांत तुम्ही. मला फार आवडला."

हें सारं संभाषण चाललेलं असतांना मी त्या गृहस्थाकडे निरखून पाहात होतों. साधारणपणें माझ्याच उंचीचा पण भक्कम बांध्याचा फक्त गंजीफ्रॉक घातलेला असल्यामुळें ज्याचे गोरेपान सुदृढ भरीव हात आणि गळा उघडे दिसत होते असा, काळ्याभोर केसांचा परंतु टक्कल पडलेला, सिनेमांतील नटाप्रमाणें कोरलेल्या मिशांचा, रेखीव, बुद्धिमान चर्येचा, आपल्या पिंगट घाऱ्या डोळ्यांनीं भेदक परंतु प्रेमळ दृष्टीनं पाहणारा, स्वतः सारखी पाईप ओढून माझ्यापुढं सिगरेटचा डबा पुनः पुन्हा करणारा असा तो गृहस्थ

मला विलक्षण आकर्षक वाटला. त्याचे उच्चार आणि वेंचक वेंचक शब्दां-वरील प्रभुत्व, या गोष्टी तर मला फारच विलोभनीय वाटल्या आणि विशेष म्हणजे त्याचं बोलणं ऐकतांना हा आवाज आणि भाषणाची ही लकब मी पूर्वी कुठें तरी ऐकली आहे असं मला सारखं वाटत होतं. आणि ' कुठें ' त्याची मी मनाशीं सारखी आठवण करून पहात होतों.

त्या गृहस्थाचा निरोप घेऊन मीं निघालों. तेव्हां तो म्हणाला, " आमची योजना मान्य करावीशी तुम्हांला वाटत नाहीं याचं मला फार दुःख होतं. आमची योजना तुम्ही कायमची अमान्य केलीत असं मीं मानीत नाहीं. मी आशा करतों कीं तुम्ही पुनः विचार कराल. तुम्ही असा विचार केलात आणि पत्र लिहावंसं वाटलं तर कंपनीच्या नांवानं पत्र न लिहितां माझ्या नावानं लिहा. माझं नांव आणि पत्ता असूं द्या तुमच्याजवळ."

त्यानं एका लहानशा कागदावर मोठमोठ्या वळणदार अक्षरांत एका-खालीं एक चार ओळी लिहिल्या व तो कागद माझ्या हातीं दिला.

तो कागद मी डोळ्यांपुढें धरला आणि त्यांत वरची पहिली ओळ वाचल्याबरोबर मला विलक्षण विस्मय आणि हर्ष वाटला. ' ए. एफ्. एस्. तल्यारखान ' असं डौलदार जाड अक्षरांत लिहिलेलं तें नांव होतं !

मी एकदम हर्षभरानें त्यांच्यापुढें हात केला व म्हटलं, " अरे ! एका नामांकित क्रीडावृत्त-निवेदकांशीं आणि त्यांच्या गुणांविषयीं मला पराकाष्ठेचं कौतुक वाटतं अशा गृहस्थांशीं मी इतका वेळ बोलत होतों म्हणायचा ! तुमचा माझा आज परिचय झाला ही अतिशय आनंदाची गोष्ट झाली. तुमच्या असंख्य चाहत्यांपैकीं मी एक आहें, आणि मला सर्व खेळांचा फार षोक आहे. "

हें ऐकल्यावर त्यांनीं मला बसण्याचा आग्रह केला, चहा मागविला, आणि मग तास दीड तास आमच्या गप्पा चालू राहिल्या. जीना कंपनीच्या सफरीबद्दल नव्हे ! तर नामांकित हिंदी क्रिकेटर्स, आणि क्रिकेटचे मोठमोठे सामने यांबद्दल ! क्रिकेटचा विषय निघाल्याबरोबर तल्यारखान किती तन्मयतेनं बोलूं लागतात व त्यांच्या रसवंतीला कशी भरती येते तें त्या दिवशीं मला प्रथम जवळून पाहतां आलं.

या पहिल्या भेटीनंतर माझा आणि तल्यारखान यांचा परिचय भराभर-वाढत गेला. आमच्या राजाराम कॉलेजच्या जिमखान्याचा वार्षिक बक्षीस-समारंभ जवळ आला होता. तो तल्यारखान यांच्या हस्तें करण्याची माझी सूचना डॉ. बाळकृष्ण यांनीं मान्य केली, आणि कॉलेजतर्फे मीं आमंत्रण धाडलं. तें तल्यारखान यांनीं ताबडतोब मान्यहि केलं. बक्षीस-समारंभ आणि तल्यारखान यांचं व्याख्यान ता. २३ जानुआरी १९४० रोजीं कोल्हापूर-च्या पॅलेस थिएटरमध्यें झालं, त्या वेळेस प्रचंड गर्दी लोटली होती. तल्यारखान यांच्या लोकप्रियतेच्या भरतीच्या सुरुवातीचे ते दिवस होते. आमच्या कॉलेजनं खासबागेंत नवीन तयार केलेलं विस्तीर्ण मैदान पाहून तल्यारखान खूष झाले; आणि कॉलेजच्या टीममधून पूर्वी खेळून बोलर म्हणून प्रसिद्धि पावलेले कॉलेजचे एक माजी विद्यार्थी श्री. मेघनाथ नागेशकर यांच्या देखरेखीखालीं तयार झालेली ‘ विकेट ’ पाहून तर ते उद्‌गारले, “ मुंबई आणि पुणं सोडलं तर अशी पहिल्या प्रतीची विकेट कुठं नाहीं. ” आमच्या कॉलेजांतील विद्यार्थ्यांचा ‘ नेट ’ मधील सराव त्यांनीं मुद्दाम पाहिला. दळवी नांवाच्या एका उंचनिंच विद्यार्थ्याचं फास्ट बोलिंग पाहून ते म्हणाले, ‘ याची बोलिंग टाकण्याची तऱ्हा हुबेहूब लारवुडसारखी आहे. याला व्यवस्थित मार्गदर्शन आणि संधि मिळेल तर एक उत्कृष्ट बोलर म्हणून हिंदु संघांत याचा समावेश झालेला एक दिवशीं दिसेल. ’

तल्यारखान यांच्या या उद्‌गारांत ‘ योग्य मार्गदर्शन आणि संधि मिळेल तर ’ ही महत्त्वाची मेख होती. दळवी नांवाचा तो विद्यार्थी अजूनहि मला कोल्हापूरच्या रस्त्यानं हिंडतांना कधीं कधीं दिसतो. तो काय उद्योग करतो मला माहीत नाहीं. परंतु त्याचा आणि क्रिकेटचा संबंध केव्हांच सुटलेला आहे. एके दिवशीं हिंदु संघांत खेळण्याची योग्यता ज्याच्या अंगीं बीजरूपानं होती त्याचा क्रिकेटचा अभ्यास केव्हांच संपुष्टांत आला होता. कोल्हापुरांतील असे किती तरी गुणी तरुण खेळाडू मार्गदर्शनाच्या आणि संधीच्या अभावीं विस्मृतीच्या पोटांत गडप झालेले मला माहीत आहेत.

: : ७३ : :

माझे स्नेही शिल्पकार फडके गेल्या कित्येक वर्षांपासून धार येथें जाऊन राहिले होते. धार संस्थानचे दिवाण श्रीयुत नाडकर यांनीं त्यांना पितृतुल्य प्रेमानं वागवून प्रतिकूल परिस्थितींतून मार्ग काढण्यास मोटं सहाय्य केलं होतं. त्यांच्या या ऋणाची थोडीशी परतफेड करावी या हेतूनं श्री. नाडकर यांच्या षष्ट्यद्बपूर्ति-समारंभाच्या वेळीं त्यांचं इंग्रजींत लिहिलेलं चरित्र प्रसिद्ध करण्याचं शिल्पकार फडके यांनीं ठरविलं; आणि त्यांनीं मला पत्रांत विनंति केली कीं, हें चरित्र लिहिण्याची कामगिरी तुम्ही पत्करिली पाहिजे. मी त्यांना उत्तर दिलं कीं राजेमहाराजे, त्यांचे दिवाण व राजदरबारीं मान्यता पावलेले लोक चरित्रनायक होण्याच्या योग्यतेचे सहसा नसतात, आणि त्यांचीं चरित्रं लोकांपुढें आल्यानं लोकांचा कांहीं एक फायदा होण्यासारखा नसतो. राजेमहाराजे आणि त्यांचे बडे अधिकारी यांच्याशीं मी नेहमीं किती स्वाभिमानानं आणि ताठपणें वागत आलों आहें हें तुम्हांला माहीत आहे. तेव्हां श्री. नाडकर यांचं चरित्र माझ्याकडून लिहून घेण्याच्या फंदांत तुम्ही पडूं नये. परंतु शिल्पकार फडके यांनीं पत्रांवर पत्रं पाठवून माझ्या-मागं त्या कामाचा लकडाच लावला, आणि अखेर एकदां पत्रांत लिहिलं कीं तुमच्या-माझ्यांतला हा वाद पत्रोपत्रीं निकालांत निघायचा नाहीं. तुम्हांला भेटण्यासाठीं मीच तिकडे आलों असतों, परंतु हातांत फार

तातडीचीं कामं आहेत; शिवाय तुम्ही इकडे आलांत तर नाडकरसाहेबांचा व तुमचा जो थोडा परिचय आहे तो पुष्कळ वाढेल, आणि त्यांची चरित्रविषयक माहितीहि तुमच्यापुढें ठेवितां येईल. तेव्हां तुम्ही ताबडतोब इकडे निघून या. मी त्यांना उलट लिहिलं कीं, मी तिकडं येतों, परंतु माझी एक अट हडसून खडसून तुम्ही मान्य करीत असाल तर येतों. अट अशी कीं, मी तिकडे येऊन नाडकरसाहेबांचं माझ्या मनानं सूक्ष्म अवलोकन करीन व त्यांच्याविषयीं तुम्ही द्याल ती माहिती तर घेईनच, पण तिच्या जोडीला इतर मार्गांनींहि मिळेल ती माहिती मी घेईन. हें सर्व झाल्यावर मला जर वाटलं कीं, नाडकरसाहेब चरित्र लिहिण्याच्या योग्यतेचे आहेत तर असलं लेखन मी कधींहि केलेलं नाहीं, पण केवळ तुमच्यासाठीं मी चरित्र लिहीन. पण उलट माझा जर असा ग्रह झाला कीं, श्री. नाडकर याचं चरित्र लिहिण्यानं कुणाचाहि कसलाहि फायदा होण्यासारखा नाहीं आणि माझ्या लेखणीचा दर्जा मात्र मी कमी करून घेण्यासारखा आहे तर मी तुम्हांला स्पष्ट सांगेन कीं हें चरित्र लिहिणं मला जमणार नाहीं.

माझी ही अट शिल्पकार फडके यांनीं एकदम मान्य केली, आणि मग मी धारला गेलों. दिवाणसाहेब नाडकर यांच्याविषयीं माझं मत अनुकूल झालं. आत्यंतिक न्यायप्रियता, राजनिष्ठेच्या बरोबरीनं राजाला निःस्पृह सल्ला देण्याचा कणखरपणा, आणि राज्यकारभाराचा फायदा श्रीमंतांपेक्षा गरिबांना शक्य तेवढा अधिक देण्याची प्रामाणिक इच्छा आणि सतत खटपट हे गुण श्री. नाडकर यांच्या ठिकाणीं प्रकर्षानं वसत असलेले मला दिसले. धार संस्थानचा राज्यकारभार आधुनिक वळणावर आणण्यासाठीं ते नेहमीं झटले होते, आणि शिक्षण, आरोग्य इत्यादि सर्व बाबतींत आपली राजधानी अद्यावत् करण्याचा त्यांचा अखंड उद्योग चालू होता. त्यांचा साधेपणा, सर्व कलांविषयींची आवड, आणि विशेषतः त्यांची संयमित विनोदप्रीति, हे त्यांचे स्वभावविशेष मला फार आवडले. साधारणतः मध्यम उंचीचे पण भक्कम हाडापेराचे, साधी सुरवार आणि मुंडेछाट सदरा घालणारे हे गृहस्थ संभाषण करूं लागले कीं, आपल्याला ज्या गोष्टींविषयीं माहिती नाहीं त्याबद्दलचं ज्ञान मिळविण्याची केवढी आतुरता त्यांच्या स्वभावांत होती हें स्पष्ट दिसून येईल. संस्थानांतील गेल्या

अर्ध शतकांतील अनेक घडामोडी त्यांनीं पाहिल्या होत्या. कित्येक घडामोडींत त्यांनीं स्वतः भाग घेतला होता. या जुन्या हकिगती ते सांगू लागत तेव्हां फार विलोभनीय असा गोष्टीवेल्हाळपणा त्यांच्या ठिकाणीं असल्याचं स्पष्ट दिसून येई. एकदां बोलतां बोलतां मीं त्यांना विचारलं, " सेवानिवृत्त झाल्यावर कोणता उद्योग करण्याचं आपण ठरविलं आहे ? " त्यांचीं लहान लहान नातवंडं जवळच खेळत होतीं. त्यांच्याकडे बोट दाखवून ते म्हणाले, " अशा लहान लहान बच्चांसाठीं एक आदर्श शाळा काढण्याचं माझ्या फार मनांत आहे. या शाळेंत भाषा, इतिहास, भूगोल इत्यादि विषयांपेक्षां मुलांनीं वागावं कसं त्याचं शिक्षण अधिक कटाक्षानं दिलं जाईल. आजची नवी तरुण पिढी हुशार आहे, पण शालीनता, नम्रता, आदब या गोष्टी तरुणांच्या गांवीं देखील नाहींत. मोठ्या माणसाला प्रणाम कसा करावा व त्याच्याशीं कसं बोलावं ही साधी गोष्ट त्यांना कळत नाहीं. हें शिक्षण देणाऱ्या शाळा आज हव्या आहेत. तसली एक शाळा काढावी म्हणतों. " त्यांचे हे विचार मला फार आवडले. धार येथील आठ दिवसांच्या मुक्कामांत माझी खात्री झाली कीं, श्री. नाडकर हे एक उमद्या मनाचे, निःस्पृह, कर्तबगार, मुत्सद्दी व गरीबांविषयीं जिव्हाळा बाळगणारे, करारी बाण्याचे गृहस्थ आहेत. त्यांचं चरित्र इंग्रजींत लिहिण्याचं मी शिल्पकार फडके यांच्याजवळ कबूल केलं. " दि मेकर ऑफ मॉर्डन धार " या नांवानं तें पुस्तक त्यांच्या एकसष्टाव्या वाढदिवसाच्या समारंभांत त्यांना अर्पण करण्यांत आलं. हें चरित्र इतकं नांवाजलं गेलं कीं धारचे माजी महाराज लेफ्टनंट कर्नल सर उदाजीराव पवार यांचंहि इंग्रजी चरित्र मींच लिहिलं पाहिजे असा आग्रह श्री. नाडकर यांनीं धरला, आणि तो मला मोडतां येण्यासारखा नव्हता. या दोन्ही इंग्रजी पुस्तकांवर लेखक म्हणून माझं नांव मात्र मीं घातलेलं नाहीं.

ज्या एका नव्या कादंबरीच्या कथानकाचे विचार १९३९ च्या प्रारंभापासून माझ्या मनांत थोडेफार घोळत होते ती कादंबरी प्रत्यक्ष लिहावयास १९३९ च्या ऑगस्ट महिन्यांत मी प्रारंभ केला होता. परंतु ती पूर्ण करण्याची निकड नसल्यामुळें तिचं लेखन मी रमतगमत करीत होतों. आबासाहेब जोशी नांवाच्या न्यायाधीशांच्या दोन जुळ्या मुलांचे जीवित-

प्रवाह त्यांच्या भिन्न प्रवृत्तीनुसार वेगवेगळ्या मार्गांनीं कसे वाहत गेले, त्याची चित्तवेधक कहाणी या कादंबरींत सांगण्याचा माझा हेतु होता. या दोन जुळ्या मुलांच्या लहानपणापासून कथानकाला मीं प्रारंभ केला होता; आणि हे दोघे जुळे मुलगे आपापल्यापरी आपापल्या क्षेत्रांत कर्तृत्ववान झाले, सुनीति व चंद्रिका या दोन अगदीं वेगळाल्या नमुन्याच्या तरुण स्त्रियांशीं विवाहबद्ध झाले, व आबासाहेब जोशी मरण पावले, असं कादंबरीच्या अखेरीस मी दाखविणार होतों. मनुष्य कोणत्याहि क्षेतांत कार्य करीत असो, त्याच्या अंगीं त्या त्या क्षेत्रांतील महत्त्वाकांक्षेचा उन्माद असेल तर तो आपल्या मनाच्या समाधानापुरता तरी कृतार्थ ठरतो, हा सिद्धान्त या कादंबरीत मला मांडावयाचा होता. त्यासाठीं कादंबरींतील पांच मुख्य पात्रांपैकीं प्रत्येकाच्या स्वभावांत कोणत्या तरी एका कल्पनेचा उन्माद आहे, व त्या उन्मादामुळेंच या पांचहि व्यक्ती जीवितपथावरून एक प्रकारच्या बेफिकिरीनं जात आहेत असं मला दाखवायचं होतं. म्हणूनच 'उन्माद' असं नांव कादंबरीसाठीं निश्चित केलं होतं.

या कादंबरींत मी एक नवा प्रयोग करणार होतों. तो असा कीं कादंबरीचे एकंदर चार भाग करून पहिल्या भागाला 'शैशव', दुसऱ्याला 'कौमार्य', तिसऱ्याला 'नवतारुण्य', आणि चवथ्याला 'उन्माद' अशीं नांवं देऊन पहिल्या भागांत व अंशतः दुसऱ्या भागांतहि जुळ्या पुत्रांचे वडील आबासाहेब जोशी यांच्या स्वभावचित्रणाला मी प्राधान्य देणार होतों, व पुढचे दोन भाग अधिक विस्तारानं लिहून त्यांत श्रीनिवास व सुनीति आणि श्यामकांत व चंद्रिका यांच्या प्रणयाला व कर्तृत्वाला प्राधान्य देणार होतों. म्हणजे दोन नायकांची आणि दोन नायिकांची ही कादंबरी होणार होती; आणि या चारी आणि आशानिराशेविषयीं व्यक्तींच्या सुखदुःखाविषयीं वाचकांना गाढ सहानुभूति वाटेल अशा धोरणानं त्यांचं स्वभाव रेखाटन मला करावयाचं होतं. ही गोष्ट सोपी नव्हती. पण म्हणूनच कथानकाच्या गुंफणींत माझं मन रमलं होतं.

'उन्माद' ही कादंबरी केवळ एक हृदयंगम कथा म्हणून मीं लिहिणार नव्हतों. त्या त्या कालखंडांतील राजकीय परिस्थिति कादंबरींत प्रतिबिंबित करण्याचा छंद मला 'आशा' कादंबरीपासून लागला होता. प्रचारा-

साठींच ललित लेखन झालं पाहिजे हें मत कधींच मान्य केलेलं नाहीं; परंतु उलट कादंबरींत मतप्रचार असतां कामा नये असंहि मत मीं कधीं पुरस्कारिलेलं नाहीं. तत्कालीन परिस्थितीची नोंद वास्तवपूर्ण सामाजिक कादंबरींत केली जाणं अपरिहार्य व कलासौंदर्याच्या दृष्टीनं आवश्यक आहे असं तर मीं नेहमींच म्हणत आलों आहे. 'कलेसाठीं कला' या सूत्राचं प्रतिपादन हिरीरीनं ज्यांत मीं केलेल आहे त्या माझ्याच कादंबऱ्यांतल्या कमींत कमी एकतृतीयांश अशा दाखवितां येतील कीं त्यांत कोणत्या तरी एका विशिष्ट राजकीय मतप्रणालीची आणि चळवळीची पार्श्वभूमि मीं रंगविलेली आहे. 'प्रवासी' आणि 'समरभूमि' या दोन कादंबऱ्यांत महाराष्ट्रांतील राजकीय चळवळीचा तीस-चाळीस वर्षांचा इतिहास मीं त्या कादंबऱ्यांतील मुख्य पात्रांच्या जीवनकथेंत गुंफिला होता. 'उन्माद' या कादंबरींत मुंबईतील कामगार-चळवळीचा १९३० पासून पुढच्या नऊ वर्षांचा इतिहास सुसंगत, बिनचूक आणि मनोवेधक स्वरूपांत देण्याची माझी इच्छा होती. कामगार-चळवळीचं सहानुभूतिपूर्ण व यथातथ्य वर्णन, आणि कामगारांच्या विचारसरणीचं चित्रण इतक्या चवदार रीतीनं केलेलं दुसऱ्या कोणत्याहि मराठी कादंबरींत आढळणार नाहीं असा अभिप्राय वाचकांकडून मिळविण्याची महत्त्वाकांक्षा मी ठेविली होती.

यासाठीं मुंबई प्रांतांतील कामगार-चळवळीचा उदय, तिची वाढ, आपल्या चळवळीच्या यशासाठीं कामगार-पुढाऱ्यांनीं वेळोवेळीं अंगीकारलेलं राजकीय धोरण, त्यांनीं सोसलेले कष्ट, त्यांचीं संकटं, कॉंग्रेसच्या आणि त्याच्या हितसंबंधांत उत्पन्न झालेले संवाद आणि विसंवाद, या सर्व गोष्टींचा अभ्यास करणं मला भाग होतं. वृत्तपत्रांच्या फायली, कागदपत्रं इत्यादींचा उपयोग करून हा अभ्यास करावयाचं मीं ठरविलं असतं तर अशा अभ्यासाला कित्येक वर्षं पुरलीं नसतीं; व तो करूनहि एका ललित कृतींत वापरण्यासारखा नाट्यप्रसंगांचा मसाला माझ्या हातीं कितीशा सुलभतेनं आला असता याची मला शंका होती. 'उन्माद' कादंबरींत कामगार-चळवळीच्या दहा वर्षांच्या इतिहासाचा पार्श्वभूमीचा उपयोग करण्याचा संकल्प तर मीं सोडून बसलों होतों, आणि त्या चळवळीच्या मुख्य मर्मांचं नवनीत अल्प कालांत कसं हस्तगत होईल तें मला कळत नव्हतं.

या पेंचांतून मला माझी सुटका करून घेतां आली याचं सारं श्रेय मुंबईचे श्रीयुत लालजी पेंडसे यांना आहे. श्री. लालजी पेंडसे त्या वेळच्या प्रमुख कामगार-पुढाऱ्यांपैकीं एक होते आणि कामगार-चळवळीचा समग्र इतिहास त्यांना मुखोद्गत होता. त्यांनीं मला भरपूर माहिती दिली. कामगारांच्या लढाऊ चळवळींतले ठळक ठळक प्रसंग ज्या स्थळीं घडले होते तीं सारीं स्थळं मला आपल्याबरोबर नेऊन प्रत्यक्ष दाखविलीं, आणि विशेष म्हणजे काँग्रेस आणि कामगार-पुढारी यांच्यांत सहकार्य आणि विरोध अशी अवस्था नंतर केव्हां केव्हां आणि कोणत्या कारणांनीं निर्माण झाली त्याची अगदीं स्पष्ट कल्पना त्यांनीं मला दिली. १९३८ च्या नोव्हेंबर महिन्यांतील प्रचंड संप मीं प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिला होता. तथापि या बाबतींतहि श्री. लालजी पेंडसे यांनीं फार उद्‌बोधक माहिती मला दिली, आणि हा संप यशस्वी करतांना एखादा किल्ला लढवावा त्याप्रमाणें मुंबईतील एकंदर गिरणभाग कामगार-पुढाऱ्यांनीं कसा लढविला व इंग्रजींत ज्याला ‘ स्ट्रॅटेजी ’ म्हणतात ती कशी हुशारीनं अवलंबिली याबद्दलची फारच उपयुक्त हकीगत त्यांनीं मला तीं तीं ठिकाणं प्रत्यक्ष दाखवून सांगितली. सारांश, ‘ उन्माद ’ कादंबरींतल्या कथानकचातुर्यावर आणि स्वभाव-रेखाटनांतील सौंदर्यावर जितका माझा हक्क आहे, तितकाच या कादंबरीची पार्श्वभूमि सजविण्याच्या श्रेयाचा वाटा श्री. लालजी पेंडसे यांना देणं माझं कर्तव्य आहे. कादंबरीला प्रस्तावना लिहिण्याची माझी प्रथा असती तर ‘ उन्माद ’च्या प्रस्तावनेतच श्री. लालजी पेंडसे यांचं बहुमोल ऋण मीं मान्य केलं असतं. ‘ उन्माद ’ कादंबरी प्रकाशित झाल्यावर तिच्या प्रती श्री. लालजी पेंडसे यांच्याकडे भेटीला पाठवितांना मीं खाजगी पत्र लिहून त्यांचे आभार मानले होते. परंतु त्यांच्या सहाय्याबद्दल जाहीरपणानं कृतज्ञता व्यक्त करण्याची गोष्ट आज नऊ वर्षं तशीच राहिली होती. ती आज मी मोठ्या आनंदानं करतों.

‘ उन्माद ’ कादंबरीची सगळी जुळवाजुळव पूर्ण झाली तरी तिचं लेखन मात्र मी रमतगमतच करीत होतों. १९३९ च्या ऑगस्टमध्यें सुरू केलेली ही माझी कादंबरी १९४० चा फेब्रुवारी महिना संपला तरी निम्म्याच्यावर लिहून झाली नव्हती. आणि कदाचित आणखी तीन चार

महिने ती मीं पूर्ण केली नसती. परंतु या सुमारास एक अशी घटना झाली कीं तिच्यामुळें ही कादंबरी ताबडतोब पुरी करणं मला भाग पडलं. त्या वर्षी रत्नागिरी येथें भरणाऱ्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानासाठीं माझं आणि अत्र्यांचं अशीं दोन नांवं स्वागत समितीपुढें होतीं. फार मोठ्या मताधिक्यानं स्वागत समितीनं माझी निवड केली. रत्नागिरीचं संमेलन मे महिन्याच्या प्रारंभीं व्हायचं होतं. माझ्या अध्यक्षतेखालीं होणाऱ्या त्या प्रसंगीं ‘ उन्माद ’ कादंबरी प्रकाशित करण्याची इच्छा तिचे प्रकाशक श्री. मनोहर केळकर यांनीं दर्शविली. त्यांची ही इच्छा मला योग्य वाटली व ता. १६ एप्रिल रोजीं ‘ उन्माद ’ चीं अखेरचीं प्रकरणं मीं त्यांच्याकडे धाडून दिलीं.

♠ ♠

## : : ७४ : :

रत्नागिरीचं साहित्य संमेलन म्हणजे माझ्या आयुष्यांत अनेक महत्त्वाच्या घडामोडी घडवून आणणारी एक घटना म्हणावी लागेल. अध्यक्षस्थानावर माझी निवड झाली तेव्हां माझ्यावर खाजगी आणि जाहीर अभिनंदनांचा अक्षरशः वर्षाव झाला. इतकी उचित निवड कधीं झाली नव्हती असा सर्वांनीं एकमुखानं अभिप्राय व्यक्त केला. नेहमींप्रमाणें सत्कार-समारंभ झाले. संमेलन ता. ४ मे रोजीं सुरू झालं त्या सुमारास एकूण एक मराठी साप्ताहिकांनीं खास अंक काढून माझं गुणवर्णन केलं आणि माझे फोटो छापले. म्हापणकरांनीं तर माझ्या पत्रिकेवरून सबंध आयुष्याचं भविष्य वर्तविलं, आणि १९४५ सालीं परदेशगमनाचा नक्की योग माझ्या कुंडलींत असल्याचं लिहून टाकलं. सारांश, माझ्या वांट्याला परोपरीचा इतका सन्मान आला कीं मीं कृतकृत्य झालों असं मला वाटावं. परंतु संमेलनाचे तीन दिवस उलटले नाहींत तों माझ्यावर अशी कांहीं चौफेर टीका सुरू झाली, की कांहीं सोय नाहीं. ज्यांनीं माझ्या गुणवर्णनपर विशेषांक काढले होते, त्यांनींच माझ्यावर यथेच्छ तोंडसुख घेण्यास सुरुवात केली. या मोहिमेचा म्होरकेपणा ‘ नवयुग ’चे संपादक अत्रे यांनीं पत्करला. चित्रा व विविध-वृत्त या साप्ताहिकांनीं अत्र्यांच्या तुणतुण्याला आपल्या डफाची सांथ दिली. त्या वेळीं सामान्य वाचकांना वाटलं असेल कीं, या टीकेच्या वावटळीनं मीं

अगदीं बावरून गेलों असेन. परंतु मी त्या वेळींहि बावरून गेलों नव्हतों, आणि अध्यक्षपदारून केलेल्या माझ्या भाषणांतील ज्या विचारांचा चटका बसल्यामुळें वृत्तपत्रांची उच्च रवांतील कोल्हेकुई सुरू झाली होती ते विचार मी बोलून दाखवायला नको होते असंहि मला तेव्हां अथवा पुढें कधीं वाटलं नाहीं. अभूतपूर्व सन्मान आणि अभूतपूर्व गालिप्रदान या दोहोंचाहि अनुभव अवघ्या चार दिवसांच्या अंतरानं मला आला. परंतु मी त्या सन्मानानं चढूनहि गेलों नव्हतों, अथवा गालिप्रदानानं गोंधळूनहि गेलों नाहीं. उलट माझ्या बाबतींत वृत्तपत्रांनीं हा जो चमत्कृतिपूर्ण ‘ ट्रान्सफर सीन ’ केला त्यामुळें ‘ झंकार ’ साप्ताहिक जन्माला आलं, आणि हें साप्ताहिक मी चालवीत नसतों तर मी जें लेखन केलं असतं त्याच्या शतपट लेखन करून मराठी साहित्याची अखंड सेवा मी करीत राहिलों असतों.

वृत्तपत्रांनीं माझ्यावर जो गहजब केला तो मी अगदींच अपेक्षिला नव्हता असं नव्हे. अध्यक्षीय भाषण तयार करतांना मला थोडीशी कल्पना होतीच कीं, वृत्तपत्रांसाठीं ज्या विचारांची गोळी मी तयार करीत होतों ती कडू होती, आणि वृत्तपत्रांचे संपादक ती सुखासुखी गिळणार नाहींत. परंतु मराठी वृत्तपत्र-व्यवसायांत शिरलेल्या व त्या सुमारास विशेष फोफावलेल्या कांहीं अनिष्ट वृत्तींचा वेळींच निषेध व्हावयास हवा असं मला स्पष्ट दिसत होतं, आणि संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणाच्या संधीचा उपयोग या कामी करणं माझं कर्तव्य होय अशी माझी मनोदेवता मला सांगत होती. हें कटु कर्तव्य केल्याबद्दल वृत्तपत्रं माझ्यावर रुष्ट होतील ही गोष्ट मला कळत होती. परंतु त्यांच्या रोषाला भिऊन माझं कर्तव्य टाळण्यास मी तयार नव्हतों. मात्र वृत्तपत्रांचे दोष चव्हाट्यावर मांडल्याबद्दल त्यांच्या रोषाला मी पात्र होईन हा संभव जरी मी ओळखलेला होता, तरी अगदीं भयंकर काहूर माझ्यावर उठेल, आणि मी व्यक्त केलेल्या विचारांवर टीका व्हावयाची बाजूसच राहून खोट्यानाट्या निराधार वैयक्तिक नालस्तीनं वृत्तपत्रांचे रकाने दुथडी भरूं लागतील असं मात्र मला वाटलं नव्हतं. या विपरीत परिणामाची कल्पना असती तरी देखील मला जें बोलावंसं वाटलं तें मीं बोललों असतोंच, तथापि त्याची कल्पना मला आधीं आली नव्हती एवढं मात्र खरं.

कारण ज्या माझ्या अध्यक्षीय भाषणांत मराठी वृत्तपत्रांत वैपुल्यानं दिसून येणाऱ्या हीन अभिरुचीच्या लिखाणाचा मीं निषेध केला होता त्या माझ्या भाषणांतच आरंभीं त्यापूर्वीच्या कोणत्याहि अध्यक्षानं केलेला नव्हता असा वृत्तपत्रांचा गौरव मीं असंदिग्ध शब्दांत केला होता. वृत्तपत्रीय साहित्य म्हणजे एकंदर साहित्याचं एक अत्यंत प्रभावी आणि मोलाचं अंग आहे असं मीं प्रतिपादिलं होतं. वृत्तपत्रीय लिखाणांत अधिकाधिक रूढ होऊं पाहणाऱ्या अनिष्ट प्रकृतींचा निषेध करतांना मीं असंच म्हटलं होतं कीं, वृत्तपत्रं म्हणजे साहित्यसेवेचीं महत्त्वाचीं साधनं आहेत, व म्हणून त्यांतील लिखाण उच्च पातळीवर ठेवण्याची गरज फार आहे.

माझ्या या विचारसरणींत कोणती चूक होती तें त्या वेळेसहि कुणाला दाखवितां आलं नाहीं, आणि त्यानंतरहि कुणी दाखविलेलं नाहीं. उलट कित्येक समंजस आणि जबाबदार मराठी संपादकांना माझे विचार इतके पटले कीं, वृत्तपत्रांतील असभ्य आणि टवाळखोर लिखाणाला आळा घालण्यासाठीं कांहीं तरी केलं पाहिजे असं त्यांना वाटलं, आणि एखाद्या नियंत्रक मंडळाची स्थापना करतां येईल कीं काय याचा विचार करण्यासाठीं संमेलनानंतर ता. २४ मे रोजीं मुंबईस व २६ मे रोजीं पुण्यास वृत्तपत्रकारांच्या सभा माझ्या अध्यक्षतेखालीं झाल्या. या सभांतून कोणतीच योजना निष्पन्न होऊं शकली नाहीं. ‘ नवयुग ’, ‘ चित्रा ’, ‘ विविध-वृत्त ’ इत्यादि ज्या पत्रांना माझ्या अध्यक्षीय भाषणांतील टीका विशेष बोंचली होती त्यांनीं मुंबई–पुण्याच्या या सभांतून कोणतीहि योजना निष्पन्न झाली नाहीं ही बातमी एक अत्यंत आनंदाची बातमी म्हणून दिली. ‘ स्वयंवर मोडलं ! ’ अशा आनंदाच्या आरोळ्या ठोकून ‘ फडक्यांच्या फजिती ’चीं रसभरित वर्णनं केलीं, आणि माझी वैयक्तिक निंदा करण्याची आपली हौस भागवून घेतली. वृत्तपत्रांतील लिखाण हीन रुचीनं केलं जाऊं नये यासाठीं एखादी व्यवहार्य योजना तयार करण्याचं कार्य मुंबईच्या आणि पुण्याच्या सभांना करतां आलं नाहीं यांत वास्तविक माझा वैयक्तिक पराभव कोठें होता आणि माझी फजिती ती कोणती झाली होती ? परंतु वाटेल त्या गोष्टीचं निमित्त करून मला धोपटण्याचं नवयुग–चित्रा–विविध-वृत्त या

कंपूनं ठरविलं होतं आणि हीं पत्रं आपलं कर्म व्यवस्थितपणें पार पाडीत होतीं !

माझा एक पराभव मात्र मला प्रांजलपणानं कबूल करावाच लागला. तो असा कीं जे विज्ञाविण्यासाठीं आपण इशारा द्यावा असं मला वाटलं होतं तें नीट समंजसपणानं डोळे उघडून पाहण्याची बुद्धि वृत्तपत्र व्यवसायिकांना होण्याऐवजीं, त्यांचा आणखी डोंब मात्र भडकला. असभ्य, खोटं, निंदाप्रचुर लिखाण आम्ही लिहूं नये असं तुम्ही आम्हांला सांगतां काय, ठीक आहे. तसल्याच लिखाणाच्या बादल्या तुमच्या डोक्यावर आम्ही ओतून दाखवितों, कोण आम्हांला कोणतं शासन करतो बघूं या, अशी विलक्षण वृत्ती वृत्तपत्रांनीं स्वीकारली. कोण आम्हांला कोणतं शासन करतो बघूं या, हें त्यांचं आव्हान बिनतोड होतं. माझ्याजवळ अथवा कोणाजवळ या आव्हानाला उत्तर नव्हतं. कारण सदाभिरुचीच्या मर्यादा आपल्या मनानं मानण्याचा हा सारा प्रश्न होता. ज्यांना त्या मानावयाच्या नव्हत्या त्यांना आवरण्याचं सामर्थ्य कोणाच्याहि अंगीं नव्हतं. आणि वृत्तपत्रांना उपदेश करण्याचं धाडस मी केलं या अपराधासाठीं त्यांनीं मला कडक शासन करावं ही गोष्टहि क्रमप्राप्तच होती. त्या वेळीं मला नवल वाटलं तें या गोष्टीचं कीं कै. तात्यासाहेब केळकर व जोशी यांच्यासारखे साहित्यक्षेत्रांतील ज्येष्ठ अधिकारी पुरुष जाहीरपणानं असं म्हणेनात कीं प्रो. फडके यांचे विचार चिंतनीय आहेत व ते व्यक्त केल्याबद्दल त्यांचे धिंडवडे काढणं अनुचित आहे. ते का गप्प बसले तें मला कळत होतं. त्यांना असं वाटलं असलं पाहिजे कीं फडक्यांची बाजू आपण थोडी जरी उचलून धरली तरी त्यांना शिव्या देणाऱ्या वृत्तपत्रांचा मोर्चा आपल्याकडे वळेल, आणि आपले वाभाडे काढण्यांत येतील. ‘ प्रतिभासाधन ’ या माझ्या ग्रंथावरील वादाच्या वेळेस आलेला अनुभव मला आतां पुन्हां आला. विरोधकांच्या टीकेला आपण एकट्यानेंच तोंड दिलं पाहिजे हें मला कळलं, आणि येवढ्यासाठींच स्वतःचं साप्ताहिक काढायचं मीं ठरविलं. या साप्ताहिकाला ‘ युगांतर ’ असं नांव मी देणार होतों, परंतु या गोष्टीचा सुगावा लागल्याबरोबर विविध-वृत्तानं याच नांवाचं पत्र काढण्याचा संकल्प जाहीर करून टाकला. त्यांना नवं वृत्तपत्र मुळींच काढायचं नव्हतं. परंतु केवळ माझी अडवणूक

करण्यासाठीं त्यांनीं हा चावटपणा केला होता. परंतु हा चावटपणा म्हणजे कांहीं दुर्लक्ष्य अडचण नव्हती. ‘ युगांतर ’ हें नांव मला रद्द करावं लागलं. येवढंच. माझ्या नव्या साप्ताहिकाला ‘ झंकार ’ असं नांव मीं दिलं, आणि त्याचा पहिला अंक ता. ४ ऑगस्ट १९४० या दिवशीं प्रसिद्ध झाला. गंमतीचा योगायोग असा कीं, ही तारीख म्हणजे माझ्या स्वतःच्या जन्म-दिवसाची तारीख होती.

मी नवं साप्ताहिक काढलं, आणि त्याचा खप ‘ नवयुग ’च्या बरोबरीनें होऊं लागला तेव्हां अत्र्यांचा संताप खूपच वाढला. हें माझं नवं साप्ताहिक बंद पडावं अशी त्यांची व इतर अनेकांची इच्छा होती. ‘ मी ‘ झंकार ’ काढला नसता तर रत्नागिरीच्या संमेलनालांतील माझ्या अध्यक्षीय भाषणा-वरील वादळ दोन-चार महिन्यांत खलास झालं असतं. परंतु मी साप्ताहिक काढल्यामुळें विरोधकांना मुदतवाढ मिळाल्याप्रमाणें झालं, आणि माझ्यावरील टीकेची त्यांची मोहीम चालू राहिली. माझ्याविषयीं आणि ‘ झंकार ’-विषयीं गलिच्छ लिहिण्याचा अत्र्यांनीं अगदीं उच्चांक गाठला. त्यांची फार इच्छा होती कीं, त्यांच्या लेखनानं चिडून जाऊन मीं त्यांच्यावर अब्रू-नुकसानीची फिर्याद करावी. या धोरणानं माझ्या सहनशीलतेचा अंत करण्यासारखा मजकूर त्यांची लेखणी प्रसवूं लागली. ‘ नवयुग ’ च्या प्रत्येक अंकांत जणू तें मला आव्हानच देत होते कीं चिडा, आणि माझ्यावर फिर्याद करा. परंतु त्यांना वाटलं होतं त्याप्रमाणें मी कांहीं कच्च्या गुरूचा चेला नव्हतों. त्यांच्यावर फिर्याद न करतां त्यांची खोड मोडण्याचं साधन माझ्याजवळ होतं. हें शस्त्र उपसावं कीं नाहीं याबद्दल मी पुष्कळ विचार करून पाहिला आणि नंतर ठरविलं कीं, अत्र्यांना नामोहरम करणारं हें शस्त्र आपण उपसावयाचं.

## : : ७५ : :

सभ्यतेच्या, सौजन्याच्या आणि सत्याच्या सर्व मर्यादा झुगारून देऊन माझ्यावर आणि 'झंकार' साप्ताहिकावर चिखलफेक करण्याची मोहीम चालू ठेवतांना अत्र्यांना मोठा आधार वाटत होता तो अशा कल्पनेचा कीं, आपण ज्या तऱ्हेचं गलिच्छ लिखाण करतों त्या तऱ्हेच्याच उलट लिखाणाचा आहेर करावयास कुणी धजणार नाहीं. इतरांचा सज्जनपणा आणि सत्याची चाड हें अत्र्यांचं मुख्य भांडवल होतं. या भांडवलावरच 'नवयुग' पत्राच्या जन्मापासून मन मानेल त्या व्यक्तीची खोटीनाटी निंदा करण्याचा सपाटा त्यांनीं सुरू केला होता, आणि आपल्याला आपल्यालाच भाषेंत हटकण्याचं धैर्य कुणी करीत नाहीं असा प्रत्यय आल्यामुळें त्यांचा उन्मत्तपणा कळसाला पोचला होता. अत्र्यांच्या हल्ल्याला सभ्य भाषेंत उत्तर देण्यांत कांहीं अर्थ नव्हता आणि त्यांना कांहीं एक उत्तर न देतां स्वस्थ बसण्यानं त्यांची मस्ती वाढतच जाणार होती. अमर्याद गालिप्रदानाचं हें पिशाच्च ताळ्यावर आणण्याचा एकच उपाय होता, तो हा कीं सवाई पिशाच्चाचा अवतार धारण करून अत्र्यांवर तोडीस तोड अशा टीकेची झोड उठवायची. हा मार्ग लोकांना कळत नव्हता असं नव्हे, परंतु या मार्गाचा अवलंब केल्यास अत्र्यांची वाचाळता अधिकच शेफारेल आणि आपल्याला 'न भूतो न भविष्यति' शिव्या खाव्या लागतील हा हिशोब उघड दिसत असल्यामुळें लोक गप्प राहिले होते. अत्र्यांच्या वाटेल

तेवढ्या शिव्या खाव्या लागल्या तरी हरकत नाहीं, परंतु अत्र्यांशीं त्यांच्याच शस्त्रानिशीं लढाई द्यायची असं ठरविणारा एक इसम निघाल्याखेरीज वृत्तपत्रीय सृष्टींतील या भस्मासुराच्या लीला थंडावण्याची शक्यता नव्हती. म्हणून मी पुष्कळ विचार करून ठरविलं कीं, अत्रे ज्या तऱ्हेच्या शिव्या सर्व जगाला द्यावयास तयार आहेत त्या तऱ्हेच्याच शिव्यांची चव एकदां त्यांना चाखावयास लावावी म्हणजे मग त्यांचा तथाकथित बेगडी खिलाडू-पणा कितपत टिकतो तें दिसेल. बेजबाबदारपणानं जो भेटेल त्याच्या अंगावर ओरखडे ओढीत निघालेल्या उनाड कार्ट्याला विवेकाच्या चार गोष्टी सांगण्यात कांहीं अर्थ नसतो, अंगावर चार-सहा सपाटेबंद ओरखडे काढून अंगांतून रक्त निघालं कीं कोणत्या यातना होतात त्याचा अनुभव त्याला व्यवस्थितपणें आणून देणं हीच त्या व्रात्य पोराच्या माकडचेष्टांवर खरी मात्रा होय. हा सर्व विचार करून मी असं ठरवलं कीं अत्र्यांवरील टीकेची मोहीम 'झंकार' मधून सुरू करावयाची.

हें ठरविण्यांत आणि त्याप्रमाणें करण्यांत माझा एक प्रकारचा पराभव होता हें मला प्रांजलपणानं कबूल केलं पाहिजे. ज्या तऱ्हेच्या लिखाणाचा मी रत्नागिरी येथील अध्यक्षीय भाषणांत कडकडून निषेध केला होता त्याच तऱ्हेचं लिखाण करण्यास मींच प्रवृत्त झालों, आणि 'झंकार' सुरू करताना आपल्या नव्या साप्ताहिकाचं धोरण वैयक्तिक टीकेपासून सर्वस्वीं अलिप्त अशा उंच पातळीवर ठेवण्याचं जें ध्येय मी डोळ्यांपुढें ठेविलं होतं त्यापासून मी च्युत झालों. हा माझा अगदीं उघड उघड पराभव होता. परंतु मी तो जाणूनबुजून पत्करिला होता. ज्या अत्र्यांनीं सभ्यतेची आणि सत्याची संपूर्ण रजा घेतली होती त्यांचा नंगा नाच बंद करावयाचा असेल तर ती गोष्ट उंच पातळीवरून करणं शक्य नव्हतं त्यासाठीं खालच्या पातळीवर उतरूनच सामना करावयास हवा होता. मी मनाशीं असा विचार केला कीं 'झंकार' ची एक पातळी ज्यायोगें सिद्ध होईल असं विपुल सुंदर लिखाण 'झंकार' साप्ताहिकांतून सतत करावयाचं. सुज्ञ रसिकांना 'झंकार' ची योग्यता यावरून खचित कळेल. परंतु अत्र्यांशीं झुंज करतांना मात्र कसलीहि मर्यादा ठेवायची नाहीं. एखादं पिसाळलेलं कुत्रं ज्याला त्याला चावूं लागलं कीं त्याचा बंदोबस्त करावयाचा असेल तर

साधनांच्या शुचितेचा विचार करावयाचा नसतो. रामदासांसारख्या व्यवहारी संतांनीं स्पष्ट सल्ला दिला आहे कीं, ' खटाशीं खट व्हावें, उद्धटाशीं उद्धट व्हावें. '

फडके–अत्रे वाद ' झंकार ' आणि ' नवयुग ' या साप्ताहिकांतून कित्येक महिने चालू राहिला. या वादांत मीं जें लिखाण केलं त्याचा मी अभिमान मुळींच बाळगीत नाहीं, परंतु त्याचा मला किंचित्हि खेद कधीं झाला नाहीं. मुंबईच्या साहित्य संघांतल्या लोकांनीं आणि कैलास-वासी तात्यासाहेब जोशी यांनीं जेव्हां भेट घेऊन विनंति केली कीं, अत्र्यांशीं समेट करून हा वाद मी संपवावा. तेव्हां मी त्यांना स्पष्ट सांगितलं कीं, तुम्ही या फंदांत पडूं नका. ते मला सांगू लागले कीं, अत्र्यांनीं तुमच्याशीं समेट करायचं ठरविलं आहे. मी त्यांना म्हटलं, " अत्रे केव्हां तरी दमून भागून समेट करतो म्हणतील हा माझा पहिल्यापासूनचा हिशोब खरा ठरला असं तुमच्या सांगण्यावरून दिसतं आणि आपल्यालाहि जेरीस आणणारे कोणी आहे या गोष्टीचा उमज अत्र्यांना पडला. हें पाहून मला आनंद होतो. परंतु तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें अत्र्यांशीं मला समेट करतां येणार नाहीं. कारण माझा वाद अत्र्यांशीं नसून जीवनांतील आणि साहित्यांतील ज्या एका विशिष्ट निषेधार्ह बेजबाबदार वृत्तीचे ते प्रतिनिधी आहेत त्या वृत्तीशीं आहे. अत्र्यांना समेट हवा असेल, पण मला नको आहे, त्यांच्या शिव्या सतत वर्षभर मी खाल्ल्या. आणखी वाटेल तेवढ्या खाण्याचं सामर्थ्य माझ्या अंगीं आहे. "

कै. तात्यासाहेब जोशी मला म्हणाले, " पण फडके, आतां हा वाद आम्हांला वाचवत नाहीं, सहन करवत नाहीं. "

मी त्यांना म्हटलं, " तात्यासाहेब, तुमच्याविषयीं माझी केवढी पूज्य बुद्धि आहे हें तुम्हांला माहीत आहे. तुमच्या शब्दाखातर तुम्ही म्हणाल ती गोष्ट करावयास मी तयार व्हावं एवढा तुमचा अधिकार मी मानतों हेंहि तुम्हांला ठाऊक आहे. परंतु या वादाच्या बाबतींत मला तुमच्याशीं थोडं कठोर बोलायचं आहे. माफ करा. तुम्ही म्हणतां हा वाद वाचणं तुम्हांला असह्य झालं आहे ही फार आनंदाची गोष्ट आहे. परंतु तुम्हांला

आणि शिष्टाईला आलेल्या या इतर गृहस्थांना मी एक प्रश्न विचारितों त्याचं उत्तर देतां काय ? या वादांतलं लिखाण नक्की कोणत्या तारखेस तुम्हांला असह्य वाटलं हो ? काल, परवां, आठ दिवसांपूर्वीं, महिन्यापूर्वीं, कीं केव्हां ? रत्नागिरीचं संमेलन आटपल्याबरोबर धादांत खोट्या गोष्टी रचून अत्रे, बांदेकर आणि तटणीस इत्यादि मंडळी जेव्हां माझ्यावर तुटून पडली तेव्हां, तें तुम्हांला सहन झालं होय ? तुम्ही सारेजण संमेलनाला हजर होतात ना ? वृत्तपत्रांत माझ्याविषयीं ज्या गोष्टी लिहून येत होत्या त्या सर्वस्वीं असत्य होत्या हें तुम्हांला कळत होतं ना ? मग त्या वेळेसच आपल्या ज्येष्ठपणाची आणि सदभिरुचीची सारी पुण्याई पणाला लावून तुम्हीं त्या लिखाणाचा जाहीर निषेध कां केला नाहीं, आणि हें निरर्गल लिखाण बंद झालं पाहिजे अशी तें लिखाण करणाऱ्यांना छातीठोक विनंति कां केली नाहींत ? ''

या माझ्या प्रश्नाला शिष्टाईसाठीं आलेल्या त्या मंडळींजवळ उत्तर नव्हतं. कै. तात्यासाहेब जोशी आपल्या नेहमीच्या गोड स्वभावाला अनुसरून मला एवढंच पुन्हां म्हणाले, " आमची त्या वेळीं चूक झाली हें मान्य करतों. परंतु चूक कधींच दुरुस्त न करण्यापेक्षां उशीरा का होईना दुरुस्त करणं बरं असं म्हणतात ना ? यासाठीं मीं तुम्हांला सांगतों कीं हा वाद संपवा व समेट करा. ''

मीं उत्तर दिलं, " तुमच्या समाधानासाठीं मीं वाद संपवितों. परंतु तुम्ही हें नीट ओळखलं पाहिजे कीं ही सारी वरवरची सारवासारव आहे. या समेटानंतरहि अत्रे माझ्याविषयीं ओंगळ लिहिल्यावांचून राहणार नाहींत आणि त्यांनीं पुन्हां चावटपणा सुरू केला तर मीहि स्वस्थ बसणार नाहीं. अत्र्यांना समेट हवा असेल, मला नको आहे. ''

माझं हें म्हणणं पुढें खरं ठरलं. ' हा वाद आम्हीं संपवीत आहोंत ' असं ' नवयुग ' मध्यें लिहितांना अत्र्यांनीं माझ्याविषयीं अभद्र आणि गलिच्छ लिहिण्याची हौस भागवून घेतली. त्यामुळें ' गोळीबार बंद ' अशी उभयपक्षीं समजूत झाल्यावरहि किरकोळ चकमकी होतच रहाव्या तशांतला प्रकार झाला. मला शिव्या देण्यासाठीं अत्रे नेहमीं टपलेले असतात त्यांची भोंग चव्हाट्यावर आणण्याची संधी मी वायां जाऊ देत नाहीं.

हें कधीं संपेल असं मला वाटत नाहीं. संपविण्याची माझी इच्छाहि नाहीं. अत्र्यांचा वाङ्मयीन अवतार दहा वर्षांपूर्वींच खलास झाला आहे अशी माझी समजूत आहे. गेल्या दहा वर्षांत त्यांनीं मराठी साहित्यांत कोणतीहि मोलाची भर घातली नाहीं, अथवा एखाद्या महत्त्वाच्या विषयावर परिश्रमपूर्वक तयारी करून सुंदर व्याख्यान दिलेलं नाहीं. केवळ जुन्या लौकिकावर गुजराण करीत राहिलेल्या गृहस्थाविषयीं मला आदर वाटण्याचं कारण नाहीं, अथवा शिवीगाळ करण्याच्या कामांतील या गृहस्थाच्या बेफाटपणाबद्दल मला भय वाटण्याचं कारण नाहीं.

अलिकडे अत्रे वारंवार खाजगी आणि जाहीर रीतीनं उद्गार काढतात कीं, "आम्ही ज्यांच्या ज्यांच्याशीं भांडलों त्या सर्वांशीं आमचे समेट झाले. फक्त प्रो. फडके यांचेशीं समेट होत नाहीं. तो व्हावा अशी आमची इच्छा आहे." अत्र्यांची ही इच्छा प्रामाणिक असेलहि. परंतु माझी तशी इच्छा नाहीं. अत्रे आणि माटे यांच्यांत कमालीचं शाब्दिक रणकंदन झालं. 'नवयुग' पत्रांत अत्र्यांनीं मास्त्यांना इतक्या पराकोटीच्या अभद्र शिव्या दिल्या कीं, पुसतां सोय नाहीं. आणि तरीहि माटेजी 'नवयुग'मध्यें लेख लिहावयास तयार झाले व अत्र्यांच्या खंडाळ्याच्या बंगल्यावर जाऊन हुरडा-शेंगदाणा पार्टींत सामील होण्यांत त्यांना भूषण वाटलं. अर्थात् या गोष्टी त्यांनीं कराव्यात कीं नाहीं हा त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे. परंतु तात्त्विक दृष्ट्या मला या समेटाचा अर्थ कळतो तो इतकाच कीं मास्त्यांचे राग-लोभ फार ढिले आहेत. वृत्तीची ही ढिलाई माझ्या ठिकाणीं नाहीं. अत्रे-माटे यांच्या समेटाला खिलाडूपणा हा शब्द लागूं पडतो असं मला वाटत नाहीं. निगरगट्टपणाखेरीज असले समेट होऊं शकत नाहींत. आईमाईवरून दिल्याप्रमाणें एकमेकाला शिव्या दिल्यानंतर जीं दोन माणसं पुन्हां गळ्यांत गळे घालतात त्यांच्या त्या शिव्यांच्या बुडाशीं तत्त्वनिष्ठा नसते, आणि त्यांच्या परस्पर आलिंगनालाहि अर्थ नसतो. "अहो, आम्ही तुम्हांला शिव्या दिल्या त्या एवढ्या काय मनावर घेतां ?" म्हणून समेट करण्याची उथळ वृत्ति इतरांना साधत असेल, मला साधण्यासारखी नाहीं. त्यामुळेंच माझ्याशीं समेट करण्याची अत्र्यांची उत्सुकता मला कळलेली असूनहि मीं त्या उत्सुकतेला किंमत दिलेली नाहीं.

अत्र्यांच्या या उत्सुकतेचं हास्यास्पद प्रदर्शन एकदां जाहीरपणानं झालेलं आहे. १९४७ सालीं २२ ऑक्टोबर रोजीं मुंबईच्या साहित्य संघातर्फे कै. तात्यासाहेब केळकर यांच्या निधनानिमित्त दुखवट्याची जाहीर सभा झाली, त्या सभेंत मी भाषण करावं अशी विनंती करणारी तार डॉ. भालेराव यांच्याकडून आली म्हणून मी या सभेस हजर राहिलों. सभेच्या अध्यक्षस्थानीं कै. अ. बा. गजेंद्रगडकर होते. त्यांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत असं म्हटलं कीं, " आजची ही सभा म्हणजे एक अविस्मरणीय योग आहे. कारण एकाच व्यासपीठावर आचार्य अत्रे आणि प्रो. फडके हे दोघेही बसलेले आपणांस दिसत आहेत. या दोघांतील वाद आजच्या सभेच्या निमित्तानें मिटलेला आहे ही फार आनंदाची गोष्ट आहे. आतां हे दोघेहि यापुढें वारंवार आपल्याला एकत्र दिसतील याविषयीं मला शंका नाहीं..." अशाच अर्थाचं आणखी बोलणं ते बराच वेळ करीत राहिले.

त्याच्यानंतर अत्रे बोलायला उठले व त्यांनींहि याच सुरांत आरंभ केला. ते म्हणाले, " प्राध्यापक फडके आणि मी एका व्यासपीठावर आलों याचा मला आनंद वाटतो. वास्तविक आमच्यांत भांडण असण्याचं काय कारण आहे ? फडक्यांनीं असं माझं काय घोडं मारलं आहे, किंवा मीं त्यांचं काय गाढव मारलं आहे ? " हें ऐकल्याबरोबर दुखवट्यासाठीं भरलेल्या त्या सभेंत एकदम प्रचंड हंशा झाला. अत्रे आणखी बोलत राहिले. त्यांतला इत्यर्थ एवढाच होता कीं मी आणि ते एकाच सभेंत बोलण्यासाठीं हजर होतों. याचा अर्थ आमचा वाद संपून कायमचा समेट झाला असं ते मानीत होते, आणि या गोष्टीचा त्यांना फार आनंद होत होता. हें त्यांचं प्रास्ताविक बोलणं जवळ जवळ पंधरा-वीस मिनिटं चालू होतं.

गजेंद्रगडकर आणि अत्रे यांचीं तीं भाषणें मला रुचलीं नाहींत. तीं भाषणं ऐकतांना माझ्या मनांत सारखं येत होतं, या सभेचा उद्देश कोणता आणि हे सद्‌गृहस्थ कोणत्या गोष्टी बोलत राहिले आहेत ? तात्यासाहेबांच्या निधनानिमित्त शोकप्रदर्शन बाजूलाच राहिलं, आणि मी व अत्रे एका व्यासपीठावर आलों याबद्दल आनंदप्रदर्शन चालू आहे ! त्या अनौचित्याचा

मला अगदीं किळस आली. अत्रे आपलं भाषण करतांना पुनः पुनः माझ्याकडे वळून पाहात होते. पण मीं व्याख्यानाच्या आवारांतल्या एका झाडाकडे दृष्टि लावून बसलों होतों. अत्र्यांच्या भाषणानंतर मीं बोलण्यासाठीं उभा राहिलों तेव्हां त्यांची आणि सर्व सभेची अपेक्षा अशी होती कीं अत्र्यांच्या सुरांत सूर मिळवून मी बोलेन आणि आमचा वाद संपला, समेट झाला वगैरे मंत्र उच्चारीन; परंतु मी त्या विषयाचा एका अक्षरांनहि उल्लेख केला नाहीं. या सभेचा आणि त्या विषयाचा संबंध कोणता होता? आणि आजच्या सभेंत बोलण्यासाठीं आम्हीं दोघे एकत्र आलों याचा जो अर्थ करून अत्रे आनंदित झाले होते तो अर्थ व्यावयास माझी कुठें तयारी होती? "फडक्यांनीं माझं काय घोडं मारलं आहे, आणि मी त्यांचं काय गाढव मारलं आहे?" असं म्हणून साऱ्या गोष्टी हंसण्यावारी न्यावयास अत्रे तयार असतील, मीं नाहीं. मीं लोकांशीं जे स्नेह करतों अगर शत्रुत्व करतों त्यांत माझं अंतःकरण असतं. स्नेहाला पावित्र्य असावं, आणि शत्रुत्वाला दृढता असावी. या गोष्टी नसतील तर कशालाच कांहीं अर्थ उरणार नाहीं.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक
८४३ ग्रंथांक ... विवध
अनुक्रम ... १०८६ नोंद दि. ११/३८

## : : ७६ : :

‘झंकार’ मधून अत्र्यांच्या शिव्यागाळीला जशास तशीं उत्तरं देण्यासाठीं जें लिखाण मीं केलं तें केल्याबद्दल मला वाईट वाटलं नाहीं. याचं एक कारण असं होतं कीं, तसल्या लिखाणाच्या मात्रेखेरीज अत्र्यांचा बेतालपणाचा रोग बरा होणार नाहीं, आणि व्यवस्थित पाद्यपूजा करून अत्र्यांची मस्ती उतरविणं हें एक महत्त्वाचं सामाजिक सत्कार्य होय, अशी माझ्या मनाची खात्री होती. या खात्रीमुळें अत्र्यांचे दुर्गुण चव्हाट्यावर मांडतांना आपण आपली लेखणी विटाळीत आहोंत असं माझ्या मनांत चुकूनदेखील कधीं आलं नाहीं. माझी सदसद्विवेकबुद्धि स्वस्थ राहिली याचं आणखी एक कारण असं होतं कीं, एकीकडे अत्र्यांच्या प्रत्येक प्रहारागणिक प्रतिप्रहार करण्यासाठीं मी ‘झंकार’ मध्यें लिहीत होतों खरा; परंतु, दुसरीकडे मराठी साहित्याची शोभा व माझी स्वतःची एक अग्रेसर लेखक या नात्याची कीर्ति ज्या योगें वाढावी असंहि लिखाण ‘झंकार’ च्या प्रत्येक अंकांत मी करीत होतों. तें लिखाण हा माझा खरा उद्योग होता, आणि मीं काढिलेल्या साप्ताहिकाची किंमत त्यायोगें ठरावयाची होती. त्या उद्योगांत मीं कधींदेखील खंड पडूं दिला नाहीं. ‘झंकार’ च्या अंकांच्या फायली कायमच्या जपून जवळ ठेवाव्यात असं लोकांना वाटलं पाहिजे अशी माझी मनीषा होती, व ही मनीषा ज्यायोगें पूर्ण होईल असं भरपूर

लेखन जोंपर्यंत ‘ झंकार ’ मध्यें मीं देत होतों तोपर्यंत अत्र्यांची हजेरी घेण्यासाठीं माझ्या लेखणीचे चार फटकारे खर्च झाले तर त्यांत कांहीं बिघडत नाहीं अशी माझ्या मनाची दृढ समजूत होती.

‘ झंकार ’ च्या सुरुवातीपासून त्यांत माझ्या सहीचीं नवीं नवीं आकर्षक सदरं नेहमीं येत राहतील अशी योजना करण्याची जरूरी होती. ‘गुजगोष्टी’ मी प्रथम ‘ रत्नाकर ’ मासिकांत लिहिल्या; नंतर कित्येक वर्षांनीं ‘ कला ’ मासिकांत लिहिल्या. आतां ‘ झंकार ’ चे अंक विशेष आकर्षक करण्यासाठीं कोणतं सदर चालूं ठेवावं याचा मीं विचार करूं लागलों तेव्हां एकदम मनांत आलं कीं, गुजगोष्टीच लिहाव्या. ज्या लघुनिबंध–प्रकाराला ‘ गुजगोष्टी ’ असं नवं नांव मीं दिलं, त्या प्रकाराचा जो मुख्य विशेष तो सूचित करणारा ‘ धूम्रवलयें ’ असा मथळा मला सुचला; व त्या मथळ्याखालीं मीं गुजगोष्टींची तिसरी माला ‘ झंकार ’-मधून लिहूं लागलों. या मालेंत मीं पंधरा गुजगोष्टी लिहिल्या. म्हणजे जवळ जवळ चार महिने प्रत्येक रविवारच्या ‘ झंकार ’ साठीं एक नवी गुजगोष्ट मीं लिहीत होतों. पूर्वीं रत्नाकरांत आणि कला मासिकांत लिहिण्याच्या वेळीं एकेका महिन्याच्या अंतरानं गुजगोष्टी लिहिल्या होत्या. एक गुजगोष्ट लिहून झाली कीं, दुसरीसाठीं योग्य असा विषय सावकाश शोधावा. तो विषय सांपडला कीं, ती गुजगोष्ट रमतगमत लिहावी अशी मला सवड असे. आतां अशी सवड नव्हती. प्रत्येक आठवड्याला नवी गुजगोष्ट तयार ठेवणं मला भाग होतं. परंतु या निकडीचा आणि घाईचा माझ्या लिहिण्यावर वाईट परिणाम झाला नाहीं. माझ्या पहिल्या दोन गुजगोष्टींच्या मालांप्रमाणें ‘ धूम्रवलयें ’ सुद्धां वाचकांना फार आवडलीं. मला स्वतःला असं वाटतं कीं गुजगोष्टी लिहिण्याच्या माझ्या शैलीनं ‘ रत्नाकर ’ च्या वेळेस जो बोजडपणा आणि क्वचित् कल्पनेचा क्लिष्टपणा होता तो ‘ नव्या गुजगोष्टी ’ च्या वेळेस कमी झाला होता, आणि आतां ‘ धूम्रवलयें ’ लिहितांना तो माझ्या लिहिण्यांत मुळींच उरला नव्हता. हें विधान अर्थात् मी स्थूल मानानं करीत आहे अगदीं पहिल्या ‘ गुजगोष्टीं ’तहि कांहीं अशा दाखवितां येतील कीं त्यांतील कल्पना व तिचा आविष्कार या दोहोंतहि सहजपणा आणि खेळकरपणा आहे. उलट ‘ धूम्रवलयां ’ तहि असा एखाददुसरा लघुनिबंध दाखवितां

येईल कीं, ज्यांतील कल्पनाही थोडी क्लिष्ट आहे. आणि ती कल्पना मांडण्याच्या तऱ्हेतहि बोजडपणा आलेला आहे. परंतु एकंदरींत पाहतां गुज-गोष्टीसाठीं निवडलेल्या विषयांच्या स्वरूपांत, आणि तो विषय खुलविण्याच्या माझ्या तऱ्हेंत पुष्कळच फरक होत गेला. चांगली गुजगोष्ट कशी ओळखावी असा प्रश्न मला वारंवार करण्यांत येतो. या प्रश्नाला मी जें उत्तर देतों तें सकृद्दर्शनी चेष्टेखातर दिल्यासारखं वाटतं. परंतु त्यांत महत्त्वाचा खोल अभिप्राय आहे. तें उत्तर असं की, " माझ्या एकंदर चव्वेचाळीस गुजगोष्टी-पैकीं ' ऐन पंचविशी ', ' शाई ', ' हरवली म्हणून सांपडली ', 'सहल, ' ' वाट चुकल्याचा आनंद ', ' पहिला पांढरा केस, ' ' पहांटे उठण्याचा वेडेपणा ', ' ताजा कलम ', ' सिगारेट ', ' नव्या इमारती ', ' छबी ', ' बाजार ', ' पहिलं चुंबन ', या गुजगोष्टी मला विशेष चांगल्या वाटतात. त्या पुन्हां पुन्हां वाचून पहा, आणि त्यांचा सरसपणा कसा काय आहे हें तुम्हींच आपल्या मानानं ठरवा. ' पहिला पांढरा केस ' ही माझी सर्वांत उत्तम गुजगोष्ट आहे अशी माझी समजूत आहे. "

' धूम्रवलयें ' झंकारमध्यें चार महिने येत होतीं. त्यानंतर ही माला संपवून माझं दुसरं एखादं कायमचं सदर सुरू करणं आवश्यक होतं. मी एखादी कादंबरी झंकारमधून सुरू करावी अशी सूचना अनेक वाचकांकडून आल्या होत्या. म्हणून ' इंद्रधनुष्य ' ही नवी कादंबरी मी ' झंकार 'मधून लिहूं लागलों. ही कादंबरी लिहावयास घेण्याच्या आधीं व्हिकी बाऊम यांच्या ' सीक्रेट सेंटेन्स ' या कादंबरीचं भाषान्तर १९४० च्या जून महिन्यांत म्हणजे झंकार काढण्याच्या आधींच दोन महिने मी करावयास घेतलं होतं. ' गुप्त प्रायश्चित्त ' हें नांव मी या भाषान्तरासाठीं ठरविलं होतं. ' सीक्रेट सेंटेन्स ' या कादंबरीचे प्रकाशक ' जॉफ्रे ब्लेस, लंडन ' यांना मी भाषान्तर करण्याची परवानगी मागण्यासाठीं जें पत्र लिहिलं होतं त्या पत्राला त्यांच्याकडून उत्तर आलं होतं कीं, " तुम्ही ' सीक्रेट सेंटेन्स ' या कादंबरीचा मराठींत अनुवाद केला तर व्हिकी बाऊम यांना आनंदच होईल. परंतु भाषान्तराच्या परवानगीसाठीं म्हणून त्या तुमच्याकडून दहा पौण्ड फी अपेक्षितील असें वाटतें. या बाबतींत तुम्हांला त्यांच्याशीं पत्रव्यवहार करायचा असेल तर त्यांचा सध्याचा हॉलिवुड येथील पत्ता

खालीं दिला आहे." या पत्त्यावर मी व्हिकी बाऊम यांना लगेच एक सविस्तर पत्र लिहिलं. त्यांनींहि यत्किंचित् विलंब न करतां माझ्या पत्राला उत्तर पाठविलं : " प्रिय प्रो. फडके " त्यांनीं लिहिलं होतं, 'सीक्रेट सेंटेन्स' या कादंबरीचा तुम्ही आपल्या मातृभाषेंत अनुवाद करण्याची इच्छा करतां हा मी माझा मोठा गौरवच समजतें. तुमच्या मराठी भाषेची कित्येक शतकांची परंपरा आणि आजची प्रगति व संपन्नता याबद्दल तुम्ही आपल्या पत्रांत जी माहिती नमूद केली आहे ती वाचल्यावर मराठीच्या वाचकांपुढें आपल्या ललित कृती मांडल्या जाव्यात अशी इच्छा मला सहजच होते. आणि मराठी वाचकांचा परिचय करून देण्यास तुमच्यासारखा कसलेला नामवंत लेखक मला लाभत आहे हें मी माझं भाग्यच समजतें. तुमच्याकडून कोणत्याहि मोबदल्याची मी अपेक्षा करीत नाहीं. तुम्ही भाषांतर जरूर करा. मराठी पुस्तक प्रकाशित झालं म्हणजे त्यांच्या पांच प्रती मला पाठवा. मला तुमची मराठी भाषा अवगत नाहीं. तथापि तुमच्या माझ्या नव्या परिचयाची खूण आणि तुमच्याकडून आलेली भेट म्हणून तें पुस्तक मी जवळ ठेवीन, आणि येथें हॉलिवुडमध्ये मराठी भाषा जाणणारे कुणी पाहुणे आले तर मी त्यांना अभिमानानं दाखवीन. "

या निमित्तानं व्हिकी बाऊम यांच्याशीं झालेला परिचय वाढत गेला; आणि पुढें १९४३ सालीं त्यांच्या 'मेन नेव्हर नो' या कादंबरीचं भाषांतर करण्याची इच्छा कमलनं व्यक्त केली म्हणून त्यांची परवानगी मागण्यासाठीं पत्र लिहिलं तेव्हां त्यांनीं मला कळविलं कीं, " तुम्ही माझ्याजवळ नव्यानं परवानगी मागण्याची आवश्यकता उरलेली नाहीं. माझ्या वाटेल त्या पुस्तकाचा मराठी अनुवाद करण्याची कायमची परवानगी तुम्हांला आणि तुमच्या सुविद्य पत्नीला मी दिलेली आहे असं समजा. "

या सुमारास दुसरं महायुद्ध सुरू होऊन जवळ जवळ चार वर्षें होत आलीं होतीं. व्हिकी बाऊम आपल्या पितृदेशाला पारख्या झालेल्या होत्या. या काळांत त्यांच्याकडून मला आलेल्या पत्रांतून त्यांच्या त्या वेळच्या मनःस्थितीचं चित्र उमटलं आहे. 'मेन नेव्हर नो' या कादंबरींतील

न्यायाधिशाचं जें प्रमुख पात्र आहे त्याच्या स्वभावरेखाटनामागें त्यांचा कोणता हेतु होता त्याचंहि स्पष्टीकरण मला धाडलेल्या एका पत्रांत त्यांनीं केलेलं आहे. म्हणून त्या अनेक पत्रांतील कांहीं महत्त्वाचे भाग संकलित करून येथें द्यावेसे वाटतात. त्यांनीं लिहिलं होतं,

" आगगाडींतून प्रवास करतां करतां नुकत्याच हातीं आलेल्या तुमच्या पत्राचं हें उत्तर मीं टाईप करीत आहें. पत्र जरासं खराब दिसेल याबद्दल क्षमा करा. नाहीं तरी पत्र लिहिण्याच्या कामीं मी थोडीशी अव्यवस्थित असतें हें तुम्हांला माहीतच आहे. तुमच्या आणि पत्नींच्या मध्यस्थीनं मराठी वाचकांना माझ्या कादंबऱ्यांचा परिचय अधिक प्रमाणावर होण्याचा योग येत आहे ही फार संतोषाची गोष्ट मला वाटते. दोन गोष्टी मात्र कृपा करून लक्षात ठेवा. पहिली ही कीं एक जर्मन लेखिका म्हणून माझी ओळख करून देऊं नका. कारण माझा जन्म ऑस्ट्रियामध्यें व्हिएन्ना येथें झाला. तेव्हां मी जर्मन नाहीं. माझा गरीब देश पादाक्रांत झाला, माझ्या कुटुंबातील एकूण एक माणसं ठार मारलीं गेलीं, मी इकडे येऊन अमेरिकेचं नागरिकत्व स्वीकारिलं, आणि गेलीं कित्येक वर्षं मी माझं लेखन इंग्रजी भाषेंत करीत आहें. दुसरी गोष्ट अशी कीं माझी दुसरी एखादी कादंबरी तुम्ही भाषांतरासाठीं निवडलीत तर मला अधिक बरं वाटेल. ' मेन नेव्हर नो ' ही कादंबरी मी फार वर्षांपूर्वीं लिहिली. ज्या जर्मनीचं चित्र त्यांत रंगविलेलं आहे तो जर्मनी आतां शिल्लक राहिलेला नाहीं. विशेषतः न्याय आणि अम्मल ज्या कांटेकोरपणानं व जबाबदारीनं जुन्या जर्मनींत होत होता तो कांटेकोरपणा आणि जबाबदारी आतां नष्ट झाली असून दहशतवादाचं थैमान चालू आहे. माझ्या अलीकडील कादंबऱ्यांपैकीं एखादी तुम्हांला आवडणार नाहीं काय? उदाहरणार्थ, बाली बेटावर मुद्दाम एक वर्षभर राहून लिहिलेली ' ए टेल ऑफ बाली ' ही माझी कादंबरी, किंवा जपान आणि चीन यांच्यांतील लढ्याचा प्रारंभ जिच्यांत मीं रंगविला आहे ती ' शांघाय ३७ ' ही माझी कादंबरी? किंवा विसाव्या शतकांतील एका स्त्रीच्या मानसिक क्रांतीचं चित्र जिच्यांत मी रेखाटलं आहे ती माझी ' मेरिअन् अलाईव्ह ' ही कादंबरी. या माझ्या कादंबऱ्या पूर्वींच्याहून अधिक चांगल्या आहेत आणि वस्तुस्थितीच्या अधिक निदर्शक आहेत. अर्थात्

माझं कोणतं पुस्तक अनुवादासाठीं घ्यायचं याबाबत तुम्हांला हवा तो निर्णय तुम्ही घ्या, व माझी पूर्ण संमति आहे असं धरून चाला. हिटलरच्या जर्मनीविषयीं मला किंचित्‌हि प्रेम नाहीं; आणि माझ्या जुन्या कादंबऱ्यांबद्दल मला अशी धास्ती वाटते कीं त्यांत नात्सी प्रचार आहे असा एखाद्याला संशय यावयाचा.

"'मेन नेव्हर नो' या कादंबरींतील माझा न्यायाधीश त्याच्यापुढें आलेल्या एका कज्जांतील सत्याचं व न्यायाचं संशोधन करण्यांत इतका गढून गेलेला आहे कीं त्याच्या खाजगी आयुष्यांत कोणता उत्पात घडत आहे तें त्याच्या लक्षांतहि येत नाहीं. ही तीव्र न्यायबुद्धि म्हणजे हिटलर-पूर्वीच्या जर्मनीचा एक मोठा स्वभावविशेष होता. नात्सी राजवट सुरू झाल्यानंतर या राष्ट्रीय सद्‌गुणाचा पूर्ण लोप झालेला आहे. माझ्या कादंबरींतील जर्मन अधिकारी लोक आणि सध्यांच्या जर्मनींतील अधिकारी वर्ग यांच्यांत अर्थाअर्थीं कसलाहि ऋणानुबंध नाहीं ही गोष्ट तुम्ही स्पष्ट केलीत म्हणजे 'मेन नेव्हर नो' या कादंबरीच्या मराठी अनुवादाला माझी मुळींच हरकत नाहीं.

"तुम्ही आणि तुमच्या पत्नी यांच्याशीं माझा दृढ परिचय झाला आहे ही जाणीव मला फार सुखाची वाटते. हें महायुद्ध संपल्यानंतर केव्हां तरी मला तुमची प्रत्यक्ष भेट घेतां येईल अशी आशा आहे. मी त्या बाजूला कित्येकदां आलें, परंतु सिलोनच्या पुढें माझं जाणं घडलं नाहीं. आतां जेव्हां मी दूरच्या सफरीचा बेत करीन तेव्हां ती सफर हिंदुस्थानचीच असेल."

: : ७७ : :

१९४० सालीं वसंत व्याख्यानमाला सुरू झाली तेव्हां रत्नागिरी संमेलनांतील माझ्या अध्यक्षीय भाषणावर उलट सुलट उठलेली टीकेची झोड ऐन भरांत होती. या वर्षीं देखील चालकांच्या विनंतीवरून मीं वसंत व्याख्यानमालेंत ओळीनं दोन दिवस दोन व्याख्यानं दिलीं. ता. २५ मे रोजीं 'नास्तिकाची कैफियत' या विषयावर मी बोललों; आणि रविवार ता. २६ मे रोजीं 'मराठी वृत्तपत्रांचं आजचं स्वरूप' या विषयावर मीं व्याख्यान दिलं. या दुसऱ्या व्याख्यानाला पांच हजार लोक हजर होते. रत्नागिरी संमेलनांतील माझ्या भाषणावर विरोधी वृत्तपत्रांकडून घेण्यांत आलेल्या आक्षेपांना मीं या व्याख्यानांत उत्तर दिल्यामुळें माझ्या भाषणाला, नंतरच्या उपवक्त्यांच्या भाषणांना, व अखेरच्या माझ्या उत्तराला खूपच रंग आला. फडके हे वृत्तपत्रवाले नाहीत तर फक्त साहित्यिक आहेत असा एक श्लेष काढून वृत्तपत्रांचे गुणदोष दाखविण्याचा मला कांहीं एक अधिकार नाहीं अशा तऱ्हेचं प्रतिपादन माझ्या विरोधकांनीं सुरू केलेलं होतं. वसंत व्याख्यानमालेंतील माझ्या भाषणांत या मुद्द्यावर बोलतांना मी असं सांगितलं कीं "मी जे मुद्दे उपस्थित केले आहेत ते बरोबर आहेत कीं चुकीचे आहेत हा मुख्य प्रश्न आहे. मीं धंद्यानं वृत्तपत्रकार आहे कीं नाहीं हा प्रश्न गौण आहे. शिवाय कथा-कादंबऱ्या लिहिणाऱ्यांची जात वेगळी व वृत्तपत्रं

चालविणाऱ्यांची जात वेगळी असा एक नवीनच मूर्खपणाचा जातिभेद निर्माण करून साहित्यिक आणि वृत्तपत्रकार यांच्यांत नसतं वितुष्ट आणण्याचा प्रयत्न अत्यंत घातुक आहे."

या माझ्या व्याख्यानावर ' नवयुग ', ' चित्रा ' आणि ' विविध-वृत्त ' या पत्रांनीं पुन्हा एकदा तोंडसुख घेतलं. विरोधी पत्रांच्या या वृत्तीचं मला आतां आश्चर्य वाटेनासं झालं होतं. कारण एव्हांना माझी खात्री पटली होती कीं, जें वाकडं शेपूट सरळ व्हावं असं मी म्हणत होतों तें सरळ होण्याची आशा बाळगण्यांत कांहीं अर्थ नव्हता. माझं म्हणणं ग्राह्य कीं अग्राह्य याचा विचार करण्याची कुणाची तयारी नव्हती. "आम्हांला शिकविणारे तुम्ही कोण टिकोजी!" अशी विरोधकांची मुख्य भूमिका होती. यावर अर्थातच अशा वृत्तीनं वागणं मला भाग होतं कीं, मला जें प्रामाणिकपणानं वाटलं तें मीं सांगितलं आणि सांगणार. इच्छा असल्यास विचार करा, नसल्यास मला शिव्या द्या.

ही माझी वृत्ति बनली असल्यामुळें त्या वर्षीं मुंबईच्या मराठी साहित्य संघाचं आमंत्रण मला आलं तेव्हां ता. ११ ऑक्टोबर १९४० रोजीं ' वैयक्तिक टीकेबद्दल माझी भूमिका ' याच विषयावर मी वागळे हॉलमध्यें बोललों. माझ्या विरोधकांनीं मला शिव्या देण्याची मोहीम चालविली होती. मी संधि मिळेल त्या त्या ठिकाणीं माझ्या विचारसरणीचा प्रचार करीत होतों.

या सुमारास मला अत्यंत दुःख देणारी एक घटना घडली. राजाराम कॉलेजचे प्रिन्सिपल डॉ. बाळकृष्ण हे कांहीं दिवसांच्या आजारानंतर ता. १२ ऑक्टोबर १९४० रोजीं रात्रीं नऊ वाजतां इहलोक सोडून गेले. माझ्या स्वतःच्या कुटुंबांतील एक वडील मनुष्य निवर्तल्याइतकं मला दुःख झालं. गेल्या चौदा वर्षांत माझ्यांत व डॉ. बाळकृष्ण यांच्यांत फार जिव्हाळ्याचे संबंध उत्पन्न होऊन दृढ झाले होते. त्यांना माझ्या स्वभावांतील आणि मला त्यांच्या स्वभावांतील दोषस्थळं दिसत होतीं. परंतु त्यांनीं अखेरपर्यंत माझ्याविषयीं ममता बाळगिली, आणि त्यांच्याविषयींचा माझा आदर केव्हांहि कमी झाला नाहीं. त्यांची उद्योगशीलता, व्यासंगाची हौस,

राजाराम कॉलेज या संस्थेविषयींचा अमर्याद अभिमान आणि कोल्हापूरचा शैक्षणिक दर्जा वाढावा यासाठीं त्यांनीं चिकाटीनें केलेले प्रयत्न व त्यांत मिळविलेलं यश, हे गुण असे होते कीं, त्यापुढें मान वाकावी. त्यांच्या वक्तृत्वाविषयीं मला आदर होता, आणि माझ्या लेखनाचे व वक्तृत्वाचे ते चाहते होते. विशेष म्हणजे त्यांच्या ठिकाणीं जातीयता यत्किंचितहि नव्हती, व ते संपूर्णतः निर्मत्सर होते. कॉलेजांत कोणीहि पाहुणा आला कीं माधवराव पटवर्धन आणि मी आम्हां दोघांशीं ते आधीं अगत्यानं त्यांची ओळख करून देत व सांगत मराठींतील सर्वांत श्रेष्ठ असे हे दोन सारस्वत आमच्या कॉलेजात आहेत.

डॉ. बाळकृष्ण यांच्या मृत्यूनंतर राजाराम कॉलेजांतील वातावरण पालटूं लागलें. बॅ. खर्डेकर हे अत्यंत सच्छील वृत्तीचे प्रिन्सिपल त्यांच्यानंतर येऊन गेले. परंतु विद्यार्थ्यांना खूष ठेवण्याच्या भरांत त्यांनीं आपल्या कारकीर्दीत विद्यार्थीवर्ग डोईजड करून ठेविला. तथापि प्रामाणिकपणा आणि सत्याची चाड या त्यांच्या दोन अविवाद्य सद्‌गुणांचा उपयोग संस्थेला झाला. त्यांच्यानंतर पवार नांवाचे जे प्रिन्सिपल हजार हिकमती करून केवळ वशिल्याच्या जोरावर प्रिन्सिपल झाले त्यांच्या ठिकाणीं ब्राह्मणद्वेष आणि दुसऱ्याच्या कीर्तीबद्दलची असहिष्णुता हे दोन्ही सद्‌गुण भरपूर प्रमाणांत होते ! डॉ. बाळकृष्ण यांच्या वेळचं राजाराम कॉलेज या पवारांनीं आमूलाग्र पालटून टाकलं. राजाराम कॉलेज म्हणजे जातीयवादाचा एक महत्त्वाचा अड्डा होऊन बसला. गांधीवधानंतर कोल्हापुरांत जातीवाद्यांनीं जो नंगा नाच केला त्यांत या पवारांचं अंग असल्याचा उल्लेख कोयाजी रिपोर्टात केलेला आढळतो. राजाराम कॉलेजविषयीं प्रेम बाळगणाऱ्या माझ्यासारख्या माणसाला आतां या विचाराचं समाधान वाटतं कीं ज्या पवारांनीं कॉलेजांत मराठा विद्यार्थ्यांसाठीं निराळं पिण्याचं पाणी ठेवण्याचं तेवढं बाकी ठेविलं होतं, त्यांची आता योग्य अशा वालुकामय प्रदेशांत रवानगी झाली आहे, आणि राजाराम कॉलेजच्या प्रिन्सिपलच्या जागीं श्री. गोकाक यांच्यासारखे एक जबरदस्त व्यासंगी, विद्याप्रेमी आणि उमद्या शुचिर्भूत वृत्तीचे प्रिन्सिपल आले आहेत. डॉ. बाळकृष्ण यांच्या निधनानंतर राजाराम कॉलेजला जें ग्रहण लागलं व जें पवारांच्या कारकीर्दीत खग्रास झालं होतं तें गोकाक

यांच्या तेजस्वी कारकीर्दींत झपाट्यानं सुटेल आणि या जुन्या शिक्षण-संस्थेची कीर्ति पूर्वीपेक्षांहि उज्ज्वल होईल याबद्दल मला शंका नाहीं.

'झंकार'चा पहिला खास दिवाळी अंक ता. ७ ऑक्टोबर १९४० रोजीं प्रसिद्ध झाला. या अंकांत अगदीं उत्तमोत्तम लेख आणि गोष्टी असल्यामुळें सबंध आवृत्ती हातोहात खपली. या अंकावर जयश्रीच रंगीत चित्र होतं. त्या वर्षी बहुतेक नियतकालिकांच्या दिवाळी अंकांच्या मुखपृष्ठांवर जयश्रीचीं चित्रं होतीं. व्ही. शांताराम यांचा 'शेजारी' हा चित्रपट लवकरच प्रकाशित होणार होता व त्याची जाहिरात फार मोठ्या प्रमाणावर करावयाचं शांताराम बापूंनीं ठरविलेलं दिसत होतं. परंतु नियतकालिकांच्या मुखपृष्ठावरील जयश्रीचीं चित्रं अगदीं कोणतीहि उणीव न राहतां सुंदर दिसलीं पाहिजेत यासाठीं श्री. शांताराम जें कमालीचं अगत्य दाखवीत होते त्याचा खुलासा केवळ जाहिरातबाजीची धंदेवाईक कळकळ एवढ्याच अर्थानें होण्यासारखा नव्हता. त्या अगत्यामागें कोणती तरी नाजूक भावना आहे असा संशय आम्हांला आधींपासूनच आलेला होता. एके दिवशीं व्ही. शांताराम आमच्याकडे आले व मला आणि कमलला सांगू लागले,

"शेजारी, चित्रपटासाठी एक नवीन नटी निवडली."

आम्ही विचारलं, "कोण? सांगा तरी." ते म्हणाले, "जयश्री."

दादा तोरणे यांनीं तयार केलेल्या एका चित्रपटांतलं या नटीचं काम मी नुकतंच पाहिलं होतं, आणि तें मला अगदींच सामान्य वाटलं होतं. वेणीचा सैल खोपा व नऊवारी भल्या जंगी टोपपदरी लुगड्याचा फलकारा अशा वेषांतल्या जयश्रीचा त्या चित्रपटांतील अवतार डोळ्यांपुढें उभा राहिल्यामुळें मीं उद्गार काढले, "काय म्हणतां शांताराम, 'माझी लाडकी' चित्रपटांतली ती बावळट नटी?"

"हो हो, तीच!" शांताराम बापू किंचित् रुष्ट झाल्यासारखे करून म्हणाले, "तिच्या कडून कसं काम करवून घेतों बघा तरी. दादा तोरण्यांच्या चित्रपटांतल्या तिच्या कामावर जाऊं नका. ती बावळट नाहीं,

फार हुशार आहे आणि फार सुंदर आहे. ” जयश्रीच्या हुशारीचं आणि सौंदर्याचं आणखी वर्णन ते करीत राहिले.

त्यांच्या त्या बोलण्यांतील आवेशावरून आम्ही त्या वेळेसच ओळखलं होतं कीं केवळ एका नव्यानं गवसलेल्या नटीच्या गुणांची दिग्दर्शकाच्या तोंडून चाललेली ही साधी धंदेवाईक प्रशंसा नव्हती. तिच्या बुडाशीं कांहीं तरी अधिक खोल आणि नाजुक घटनेचा प्रारंभ होता.

झंकारच्या दिवाळी अंकासाठीं जयश्रीचं मुद्दाम तयार करवून घेतलेलं चित्र घेऊन जेव्हां शांताराम बापू आमच्याकडे स्वतः आले व तें अतिशय सुंदर वठलं पाहिजे यासाठीं कोणती काळजी घ्यावयास हवी तें तपशीलवार सांगूं लागले तेव्हां पूर्वीं आमच्या मनांत आलेली शंका अधिक दृढ झाली. आम्ही त्यांची लपत छपत थोडी चेष्टाहि केली. शांतारामनीं अर्थातच ती हंसण्यावारी नेली. परंतु या गोष्टीला फार दिवस लोटले नाहींत तोंच त्यांच्या आणि जयश्रीच्या विवाहाची बातमी वृत्तपत्रांत फडकली ! या बातमीच्या पाठोपाठ शिव्यांचं सत्र सुरू झालं. या शिव्यागाळीचा पुढाकार अर्थात् अत्र्यांनीं घेतला. ‘ शेजारी ’ चित्रपटावर वाकड्या तिकड्या गलिच्छ वैयक्तिक टीकेनं भरलेले नवयुगचे अंकामागून अंक निघाले. पुढें लवकरच शांतारामनीं प्रभात फिल्म कंपनी सोडली आणि ते पुणें सोडून मुंबईस रहावयास गेले. माझ्या आणि शांताराम यांच्या वैयक्तिक स्नेहामुळें झंकारच्या सुरुवातीपासून झंकारचे व प्रभात फिल्म कंपनीचे मित्रत्वाचे संबंध होते, ते आतां संपले.

झंकारच्या सुरुवातीपासून माझे मित्र तल्यारखान झंकारमध्यें क्रीडाविषयक लेख नियमितपणें लिहीत असत. झंकारच्या लोकप्रियतेंत या लेखांमुळें मोठी भर पडली होती. त्या सुमारास रणजी ट्रॉफी सामन्यांत महाराष्ट्रानं दिग्विजय करून दाखविला होता. प्रो. देवधर, हजारे, रंगा सोहनी, रांगणेकर इत्यादि महाराष्ट्राकडून खेळणाऱ्या खेळाडूंच्या नैपुण्याविषयीं तल्यारखान बोलूं अगर लिहूं लागले कीं विभूतिपूजेचा आवेश त्यांच्या उद्‌गारांत प्रगट होई. महाराष्ट्रीयन खेळाडूंच्याविषयीं तल्यारखान यांच्या मनांतील कौतुकाचं पर्यवसान हळूहळू मराठी परंपरा आणि मराठ्यांचा इतिहास याविषयींच्या

उत्कट भक्तींत झालं होतं. महाराष्ट्राची जमीन आणि झाडंदेखील त्यांना नंदनवनासारखीं वाटूं लागलीं होतीं. ते मुंबईचे असूनहि महाराष्ट्र क्रिकेटचा कैवार त्यांच्या बोलण्यांत व लिहिण्यांत अखंड दिसून येई. क्रिकेटवर बोलणारे आणि लिहिणारे पुष्कळ लोक मी पाहिले आहेत. परंतु त्यांपैकीं एकालाहि तल्यारखान यांची सर येणं शक्य नाहीं. याचं मुख्य कारण मला वाटतं हें आहे कीं, तरल अवलोकनशक्ति, भाषाप्रभुत्व आणि जन्मसिद्ध कवीच्याच अंगीं असणारी भावनांची सुकोमलता इत्यादि जे गुण तल्यारखान यांच्या ठिकाणीं प्रकर्षानं आहेत ते इतर कोणाच्याहि ठिकाणीं त्यांच्या एका सहस्रांशानं देखील नाहींत. झंकारमधील त्यांचे क्रीडाविषयक लेख या गुणविशेषांमुळें अत्यंत वाचनीय व चित्त हेलावून सोडणारे असत. या लेखांत ते वारंवार लिहीत, " या मुंबईच्या धकाधकीच्या जीवनाचा मला कंटाळा आला आहे. मुंबई सोडून महाराष्ट्रांतल्या कुठल्या तरी एका निवांत ठिकाणीं जावं आणि विश्रांति घ्यावी अशी माझ्या हृदयाला ओढ लागलेली आहे. महाराष्ट्राची लाल माती आणि हिरवींगार झाडं हीं मला आपल्याकडे बोलावीत आहेत असा मला भास होतो. " लाल माती आणि हिरवीं झाडं यांचा हा भावनावश उल्लेख तल्यारखान यांच्या लेखांत इतक्या वारंवार होऊं लागला कीं, आम्ही चेष्टेनं त्यांनाच ' लाल माती आणि हिरवीं झाडं ' अशा टोपणनांवानं संबोधूं लागलों.

तल्यारखान यांनीं केवळ मित्रप्रेमासाठीं झंकारला प्रथमपासून जें सहाय्य केलं त्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीं एखादा खाजगी छोटा समारंभ करावा अशी माझ्या मनांत बरेच दिवस इच्छा होती. अशा समारंभासाठीं उचित प्रसंग मी शोधीत होतों. झंकारचा दिवाळी अंक प्रसिद्ध झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं मला हवा तसा प्रसंग मिळाला. त्या वर्षींच्या रणजी ट्रॉफी सामन्यांतील अखेरचा सामना मुंबई आणि महाराष्ट्र या दोन संघांमध्यें पुणें येथें ता. १५ नोव्हेंबर रोजीं सुरू झाला. या सामन्याचं रेडिओवर वर्णन करण्यासाठीं तल्यारखान मुंबईहून पुण्यास आले होते. या गोष्टीचा फायदा घेऊन तल्यारखान आणि माझे शाळे-पासूनचे मित्र प्रो. देवधर या दोघांचा छोटासा सत्कार–समारंभ झंकार

कचेरींत आम्ही केला. या समारंभास भाषण वगैरे कांहीं एक नव्हतं. पण तल्यारखान यांची सारखी बडबड चालू होती. रोज सतत पांच तास बोलत राहिल्यावर स्वारीचा घसा पिंजून निघाला होता. रेडिओवर क्रिडावृत्त सांगतांना औषधी पाण्याच्या गुळण्या करतांकरतां त्यांना पुरेवाट झाली होती. परंतु इतकं असूनहि झंकार कचेरींतल्या त्या छोट्या समारंभांत त्यांची सारखी टकळी चालली होतीच ! खरोखर क्रिकेटबद्दल इतकं अमर्याद प्रेम आणि उत्साह बाळगणारी या गृहस्थासारखी दुसरी व्यक्ति पहावयास मिळणं कठीण आहे.

♠ ♠

: : ७८ : :

१९४० सालच्या नोव्हेंबर महिन्यांतल्या मुंबई व महाराष्ट्र यांजमधील ज्या सामन्याचा प्रसंग साधून तल्यारखान व देवधर यांचा झंकारतर्फे आम्ही सत्कार केला, तो रणजी ट्रॉफी सामना म्हणजे एक विलक्षण अटी-तटीची दीर्घकालीन लढत ठरली. ती मॅच अखेरपर्यंत पाहण्याची माझी इच्छा होती. परंतु सामन्याच्या चवथ्याच दिवशीं दुपारच्या एक्स्प्रेसनं मला पुणं सोडावं लागलं. कारण वर्धा व नागपूर येथें व्याख्यानं देण्याचीं आमंत्रणं मीं आधींच स्वीकारलीं होतीं.

वर्धा येथील वासुदेव आर्ट्स कॉलेजच्या वार्षिक संमेलनाचा मुख्य पाहुणा म्हणून मी गेलों होतों. तेथें दिलेल्या इंग्रजी व्याख्यानांत मी मुख्यत्वेंकरून विचार मांडला तो हा, कीं "हिंदुस्थानांतील लोक धड मध्ययुगीन मागासलेल्या काळांतहि नाहींत, धड त्यांचे पाय आधुनिक काळांतहि नाहींत, ते मधेंच कुठें तरी त्रिशंकूप्रमाणें अंतराळांत लोंबत आहेत; आणि या त्यांच्या अवस्थेचा परिणाम त्यांच्या जीवनाच्या सर्व अंगांवर होत आहे. शिक्षणावर तर विशेषेंकरून होत आहेच. आजचे कॉलेजांत जाणारे विद्यार्थी सुखसोयींचीं, करमणुकीचीं आणि दळणवळणाचीं आधुनिक साधनं वापरतात. ते आपल्या हजामती अगदीं उत्तमांतल्या उत्तम वस्तऱ्यानं करतात, सिनेमा पाहतात, रेडिओ ऐकतात, मोटारींतून प्रवास करितात. परंतु त्यांच्या

मनावरचे संस्कार आधुनिक असतात काय? विज्ञानशास्त्राची आवड, प्रत्येक प्रश्नाची ऐतिहासिक व आर्थिक दृष्टींनीं चिकित्सा करण्याची संवय आणि कुवत, आणि एकंदर मानवजातीचे जे घनिष्ठ संबंध अधिकाधिक जुळून येत आहेत त्यांचं महत्त्व ओळखून आपले आचारविचार ठरविण्याची इच्छा– हीं आधुनिकतेचीं मुख्य लक्षणं मानायला हवींत. तीं आजच्या विद्यार्थ्यांत ज्या प्रमाणांत आढळत असतील त्या प्रमाणांत त्यांचं शिक्षण यशस्वी झालं असं मी म्हणेन."

वर्ध्याला दोन दिवस राहून मी नागपूरला गेलों. तिथल्या फक्त एका दिवसाच्या मुक्कामांत सायन्स कॉलेजांतील मराठी मंडळाच्या उद्घाटनाचं व्याख्यान, मॉरिस कॉलेजांतील शारदामंडळातर्फे एक व्याख्यान आणि मॉरिस कॉलेज युनिअनतर्फे एक इंग्रजी व्याख्यान अशीं तीन व्याख्यानं मला द्यावीं लागलीं.

वर्धा– नागपूरची सफर आटोपून मी पुण्यास परत आलों त्या सुमारास डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत भरणाऱ्या हिंदी साहित्य संमेलनाची तयारी जोरांत चालू होती. त्या संमेलनाच्या साहित्य परिषदेचं स्वागताध्यक्षपद मीं स्वीकारावं अशी विनंति चालकांनीं मला केली. मीं ती आनंदानं मान्य केली. माझं भाषण मीं मराठींत लिहून काढलं. त्याच हिंदी भाषांतर श्री. वैशंपायन यांनीं केलं. आणि उच्चारांची किंचित्‌हि चूक न होऊं देतां मीं तें अखेर संमेलनांत वाचून दाखविलं. त्या भाषणाची प्रस्तावना मी अशी केली होती कीं, 'हिंदी सारस्वतांनो, आपण मराठीच्या घरीं पाहुणे म्हणून आलां आहांत. तेव्हां एखाद्या घराचा मालक पाहुण्यांचं स्वागत करतांना त्यांना ज्याप्रमाणें घराचीं निरनिराळीं दालनं दाखवितो त्याप्रमाणें कित्येक शतकांची परंपरा असलेल्या मराठीच्या मंदिरांत काव्य, नाटक, कथा, प्रबंध, वृत्तपत्र, साहित्य इत्यादि जीं दालनं आहेत त्यांतून आपणाला हिंडवून आणण्याचं काम मी करणार आहें.'

या संमेलनांत कै. तात्यासाहेब केळकरहि बोलले– म्हणजे हिंदींत लिहिलेलं आपलं भाषण त्यांनीं वाचून दाखविलं. तें वाचतांना ते जागजागीं अडखळत होते. त्यांच्या भाषणांत एके ठिकाणीं '१८५० सालापासून १९४० सालापर्यंत' असे एके ठिकाणीं वर्णन होतं. सनांचा हिंदी उच्चार करणं

आपल्याला जमायचं नाहीं असं जेव्हां तात्यासाहेबांच्या लक्षांत आलं तेव्हां तो सबंध शब्दप्रयोग स्वच्छ मराठींत वाचून टाकून ते मोकळे झाले; आणि त्या गोष्टीचं त्यांचं त्यांनाचं इतकं हसूं आलं कीं तें त्यांना आवरेना. सभेंतहि प्रचंड हंशा झाला.

१९४१ साल उजाडलं तेव्हां झंकारमध्यें चालूं असलेली माझी 'इंद्रधनुष्य' कादंबरी मीं लिहून संपवीत आणली होती. 'गुप्त प्रायश्चित्त' मीं ता. १६ जानेवारी रोजीं लिहून पूर्ण केली, व तिचे प्रकाशक श्री. मनोहर केळकर यांच्या स्वाधीन ती केली. झंकारमध्यें 'इंद्रधनुष्य'चीं सर्व प्रकरणं प्रकाशित झाल्यानंतर माझ्या सहीचं एखादं नवं सदर सुरू करण्याची आवश्यकता होती. त्याबद्दलचा विचार आतांपासूनच करणं मला भाग होतं. 'मनोहरची आकाशवाणी' मी लिहिली, त्यानंतरच्या अवधींत माझ्या वाचण्यांत आणखी कित्येक उत्कृष्ट इंग्रजी कादंबऱ्या आल्या होत्या. या कादंबऱ्यांचा रसग्रहणात्मक परिचय झंकारच्या वाचकांना करून देण्याची कल्पना माझ्या मनांत घोळूं लागली होती. या नव्या लेखमालेसाठीं एक सुंदर नांवहि मला सुचलं होतं. 'वेचलेले मोतीं' हें तें नांव होय.

या सुमारास कोल्हापुरांतील राजकीय जागृतीचीं पावलं जरा वेगानं पुढें पडूं लागलीं होतीं. प्रजापरिषद स्थापन झाली होती आणि त्या वर्षींच्या म्युनिसिपल निवडणुका लढविण्याचं परिषदेनं ठरविलं होतं. परिषदे-मार्फत उभ्या राहिलेल्या उमेदवारांच्या प्रचार-सभा होऊं लागल्या होत्या. विद्यापीठ हायस्कूलच्या आवारांत भरणाऱ्या अशा एका प्रचार-सभेचं अध्यक्षस्थान मी स्वीकारावं अशी जेव्हां मला विनंति करण्यांत आली तेव्हां ती मी स्वीकारिली. माझ्या अध्यक्षीय भाषणांत मीं सांगितलं कीं, प्रजापरिषद म्हणजे कोल्हापूरच्या प्रजेच्या हक्कांसाठीं झगडणारी पहिलीच संघटना आहे. तिच्या उमेदवारांना निवडून देऊन म्युनिसिपालिटीचा कारभार लोकहितानुवर्ति होईल असं करणं मतदारांचं कर्तव्य आहे.

लगेच दुसऱ्या दिवशीं म्हणजे ता. २२ फेब्रुआरी १९४१ रोजीं दिवाण सुर्वे यांनीं 'अर्जंट अँड कॉन्फिडेन्शल' अशा शिक्क्याचं एक पत्र मला पाठविलं. त्या पत्रांत त्यांनीं मला लिहिलं होतं, 'विद्यापीठांतल्या सभेचा वृत्तान्त आजच्या 'विद्याविलासां'त आलेला आहे. त्याबाबत मला

तुम्हांला असं विचारावयाचं आहे कीं, एका राजकीय संघटनेशीं संबंध तुम्हीं काय म्हणून ठेविलांत ? आणि तुमचें हें वर्तन शिस्तभंगाच्या सदराखालीं येतें कीं नाहीं ?'

तें पत्र पाहून मला खरोखर हंसू आलं. कांहीं तरी निमित्त काढून माझ्याशीं भांडण करून मला नोकरीवरून दूर करण्याची सुर्वे यांची तीव्र इच्छा होती. मी ब्राह्मण म्हणून त्यांच्या डोळ्यांत सलत होतों. तेव्हां त्यांची ही इच्छा मीं समजू शकत होतों. तथापि असलीं पोरकट प्रकरण उपस्थित करण्यानं त्यांचा हेतु साध्य होण्यासारखा नव्हता हें त्यांना कळूं नये याचं मला हंसू आलं.

त्यांच्या त्या दटावणीच्या पत्राला लगेच दुसऱ्या दिवशीं मीं पुढीलप्रमाणं उत्तर धाडलं—

"आपले 'अर्जंट अँड कॉन्फिडेन्शल' पत्र मिळालें. राजकीय संघटना या शब्दांनी नक्की कोणत्या संघटनेचा उल्लेख आपल्याला करावयाचा आहे त्याचा आपल्या पत्रावरून नीटसा बोध होत नाहीं. तथापि, मीं असं धरून चालतों कीं कोल्हापूर लोकल सेल्फ गव्हर्मेन्ट असोसिएशन या नांवाच्या ज्या संस्थेच्या एका सभेंत मीं अध्यक्ष म्हणून भाग घेतला त्या संस्थेचा उल्लेख आपण केला असावा. हीच संस्था आपल्या डोळ्यांसमोर असेल तर मीं आपल्या निदर्शनास असं आणूं इच्छितों कीं, या संस्थेनं आपले उद्देश आणि कार्यक्रम जाहीर करतांना वारंवार असं सांगितलं आहे कीं, ही संस्था राजकारणापासून सर्वस्वीं आलिप्त आहे. ज्या अर्थी ही संस्था राजकीय नाहीं, आणि ज्या सभेचा मीं अध्यक्ष होतों ती तर पदवीधरांसारख्या जबाबदार मतदारांसाठीं मुद्दाम भरविली होती, त्या अर्थी त्या सभेचं अध्यक्षस्थान स्वीकारणं आणि त्या सभेंत बोलणं या गोष्टी संपूर्णतः माझ्या नागरिक हक्कांच्या कक्षेंत येतात. माझ्याकडून शिस्तीचं उल्लंघन कोणत्याहि प्रकारें झालं आहे असं मला वाटत नाहीं."

माझं हें खणखणीत उत्तर गेल्यावर सुर्व्यांनीं लेखी दमदाटीचा मार्ग सोडून दिला. त्यांनीं मला प्रत्यक्ष भेटीसाठीं बोलाविलं. त्याप्रमाणें मीं गेल्यावर त्यांनीं मला विचारलं, "अहो फडके, तुम्ही बागलांच्या नादीं कशासाठीं लागलां आहांत ?"

मीं उत्तर दिलं, " मी कोणाच्याहि नादीं लागणारा मनुष्य नाहीं, मला कोणाजवळून कांहीं घ्यायचं नाहीं. आज १५ वर्षं मी कोल्हापूरच्या नोकरींत आहे. सतत लेखन करीत आहे, पण माझ्या अमुक पुस्तकाला पुरस्कार द्या. अशी याचना कोल्हापूर दरबाराकडे मी कधीं केली आहे काय? इतर लेखक पुस्तकं घेऊन तुमच्याकडे धावतात. पण मीं कधीं आलों आहे? किंवा इतर प्रोफेसर स्पेशल बढती मिळण्याकरितां प्रयत्न करितात तसा मी केला आहे? माझ्या चोख कामावर आणि गुणावर जगणारा मीं मनुष्य आहे. मला तुमच्याकडूनहि कांहीं घ्यायचं नाहीं, बागलांकडूनहि कांहीं घ्यायचं नाहीं. तेव्हां मीं बागलांच्या नादीं लागलों ही भाषा सोडून द्या. "

एकदम खुर्चीवर मागं रेलून मिशी कुरतडीत सुर्व्यांनीं विचारिलं, " फडके, तुम्हांला येवढा कसला जोर आहे हो? "

मी म्हटलं, " जोर अनेक प्रकारचे असतात. कुणाला आपल्या सत्तेचा जोर असतो, कुणाला निःस्पृहतेचा आणि आपल्या कर्तबगारीचा जोर असतो. "

ते म्हणाले, " तुम्हांला एकदां मीं चांगलं पकडणार आहे आणि कॉलेजांतून जायला लावणार आहे. "

मीं म्हटलं, " मी तुम्हांला मागंच सांगितलं आहे कीं, ही पकडण्याची भाषा दिवाणाच्या तोंडीं शोभत नाहीं. आणि मला कॉलेजांतून काढण्या-बद्दल म्हणाल तर ती गोष्ट तुम्ही केव्हांहि लेखणीच्या एका फटकाऱ्यानं करूं शकतां. "

ते अर्धवट स्वतःशींच गुरगुरले, " होय होय; तें करतां येईल तर फार बरं होईल. "

मी निरोप घेऊन उठतां उठतां म्हटलं, " पण मला विचाराल तर माझा तर्क असा आहे कीं, तुम्ही कोल्हापुरांतून जाल आणि मी मात्र कोल्हापुरांत राहीन! आणि तुम्ही या खुर्चीवरून उतरल्यावर कोल्हापूरच्या स्टेशनावर देखील तुम्हांला कोणी मुजरा करणार नाहीं, आणि मी मात्र जगांत जिकडे जाईन तिकडे लोकांचे मुजरे घेईन! "

: : ७९ : :

१९४१ सालचं साहित्य संमेलन एप्रिल महिन्यांत सोलापूर येथें झालं. अध्यक्षस्थानीं श्री. खांडेकर यांची योजना झाली होती. आदल्या वर्षीच्या रत्नागिरी येथील संमेलनांतल्या माझ्या अध्यक्षीय भाषणावर उठलेलं उलट सुलट चर्चेचं वादळ जरी आतां थंडावलं होतं तरी माझ्या त्या भाषणांत मीं व्यक्त केलेल्या विचारसरणीबद्दल संमेलनाचे यंदाचे अध्यक्ष श्री. खांडेकर कोणती भूमिका घेतात याबद्दल लोकांना कुतूहल होतं. माझ्या भाषणांत मीं असं म्हटलं होतं कीं, वृत्तपत्रीय लिखाण म्हणजे एकंदर साहित्याचा एक महत्त्वाचा घटक आहे, आणि या कारणासाठीं ते लिखाण उच्च पातळीवरून झालं पाहिजे. वैयक्तिक निंदा आणि सभ्यतेच्या मर्यादा ओलांडून केलेली टीका यांपासून तें अलिप्त असलं पाहिजे. श्री. खांडेकरांना आपल्या सोलापूरच्या अध्यक्षीय भाषणांत माझ्या या विचारसरणीचा पुन्हा पुरस्कार करतां आला असतां, किंवा ती विचारसरणी त्यांना चुकीची वाटत असती तर त्यांना तसंहि म्हणतां आलं असतं. वर्षभर गाजलेल्या या वादाविषयीं श्री. खांडेकरांनीं स्वतःचीं मतं अध्यक्षपदावरून बोलून दाखविलीं असतीं तर तीं हवीं होतीं. परंतु खांडेकरांनीं त्या वादाला बगल दिली. कदाचित् त्यांनीं असा विचार केला असेल की ज्या प्रश्नावर सबंध वर्षभर लेख आणि व्याख्यानं झडलीं तो प्रश्न वादासाठीं पुन्हां काढण्यांत कांहीं अर्थ नव्हता.

तथापि, मराठी साहित्याच्या सद्यःस्थितीबद्दल त्यांनीं आपल्या भाषणांत सविस्तर आणि फार मार्मिक असं विवेचन केलं. त्यांच्या या विवेचनाचा सूर एकंदर निराशेचा होता. चित्रपटांच्या व्यवसायाबद्दल जे विचार त्यांनीं प्रदर्शित केले त्यांत तर जळजळीत वैताग भरलेला होता. साहित्यिकांनीं आणि चित्रपट-निर्मात्यांनीं 'आपण जनतेचं खरोखर कल्याण करीत आहोंत काय?' असा प्रश्न स्वतःला विचारून आत्मसंशोधन करण्याची वेळ आलेली आहे – म्हणजे रत्नागिरी संमेलनांतील माझ्या भाषणाप्रमाणें खांडेकरांचं सोलापूर-संमेलनांतलं भाषणहि कडू गोळीसारखं होतं. या कडू गोळीचा उसका ज्यांना लागला त्यांनीं संमेलनानंतर लगोलग खांडेकरांवर टीकेची झोड सुरू केली. या टीकाकारांत अत्रे अर्थातच प्रमुख होते; आणि नेहमींप्रमाणेंच त्यांची टीका अत्यंत अशिष्ट आणि असभ्य होती. खांडेकर स्वतः नेहमीं रोगजर्जर असल्यामुळेंच त्यांना मराठी साहित्यांत आणि चित्रपटांत रोगांचे जंतु दिसतात, असा वाद घालतांना त्यांनीं खांडेकरांच्या अंगावरच्या कोडाचा देखील हलकट उल्लेख करण्याचं बाकी ठेवलं नाहीं. खांडेकरांनीं टीकाकारांना — आणि विशेषेंकरून अत्र्यांना उत्तर द्यावं अशी माझी इच्छा होती. मुद्दाम त्यांच्या घरीं जाऊन त्यांना भेटून मी त्यांना अधिक आग्रह केला नाहीं. अत्र्यांच्या टीकेला त्यांना समजेल अशा भाषेंत उत्तर द्यायचं म्हटल्यास त्यांतून पुढें कोणता छळ निर्माण होईल तें उघड दिसण्यासारखं होतं. स्वतःच्या मतांचा हिरीरीनं पाठपुरावा करण्यासाठीं हा छळ सोसायचा कीं नाहीं हा ज्याच्या त्याच्या ताकदीचा प्रश्न होता. अत्र्यांच्या नादीं न लागण्याचं खांडेकरांनीं ठरविलं याबद्दल मी त्यांना दोष दिला नाहीं.

सोलापूरचं संमेलन यशस्वी झालं असं म्हणत सारे लोक घरोघर गेले. सोलापूरकरांनीं सारीच व्यवस्था उत्तम ठेवली होती. पाहुण्यांची आणि जेवण्याची सोय पूर्ण समाधानकारक होती. सोलापूरचा कडक उन्हाळा पाहुण्यांना भासू देखील नये अशी व्यवस्था त्यांनीं ठेवली होती. संमेलनासाठीं खूप भव्य मंडप उभारला होता, आणि मंडपांत जिकडे-तिकडे लावलेले हातांनीं ओढण्याचे पंखे एकजात हजारों प्रेक्षकांच्या मस्तकांवर मागें-पुढें झुलूं लागले कीं सूर्यतापाचा परिहार होऊन सभेच्या त्या सुंदर दृश्यानं

डोळेदेखील निवून जात असत. या संमेलनाच्या निमित्तानं चालकांनीं जो एक उपक्रम केला तो पूर्वीं कोणत्याहि संमेलनांत झालेला नव्हता, आणि नंतरच्या संमेलनांत झाला कीं नाहीं तें मला ठाऊक नाहीं. बहुधा झाला नसावा.

तो उपक्रम असा कीं, संमेलनाची सुरुवात एप्रिलच्या १२ तारखेस व्हायची होती. पण आदल्या दिवशीं संध्याकाळीं शहरांतील सगळ्या प्राथमिक आणि दुय्यम शाळांतले शिक्षक आणि विद्यार्थी यांची संमेलनांतल्या मंडपांतच एक सभा घेण्यांत आली. या सभेच्या वेळीं संमेलनाचा सबंध मंडप शिक्षकांनीं आणि छोट्या छोट्या बालक-बालिकांनीं अगदीं फुलून गेला होता. संमेलनानिमित्त आलेल्या सर्व साहित्यिकांचा आणि प्रमुख पाहुण्यांचा परिचय शालेय विद्यार्थ्यांना घडावा हा या सभेचा मुख्य उद्देश होता. प्राथमिक आणि दुय्यम शाळेंतील विद्यार्थी संमेलनाच्या मुख्य अधिवेशनाला हजर राहूं शकत नाहींत, आणि आपल्या शहरीं आलेले छोटे-मोठे साहित्यिक पाहण्याची त्यांची इच्छा अपूर्ण रहाते, हें लक्षांत घेऊन व लहान वयांतच नाणावलेले साहित्यिक विद्यार्थ्यांनीं प्रत्यक्ष पाहिले तर त्यांची साहित्यविषयींची आस्था आणि हौस वाढण्यास मदत होईल अशा विचारानं या सभेचा नवा उपक्रम सोलापूरकरांनीं केला होता. आम्ही सारे व्यासपीठावर बसलों होतों, आणि आमच्यापैकीं ऐककजण उठून सभेला स्वतःचा परिचय करून देण्यासाठीं छोटंसं भाषण करीत होता. हा परिचय-समारंभ चांगला तीन साडेतीन तास चालू होता. सोलापूरचे विशीच्या आंत-बाहेरचे जे तरुण स्त्री-पुरुष लेखनाच्या क्षेत्रांत आज चमकूं लागले असतील त्यांच्यापैकीं पुष्कळजण आपल्या आठवणी सांगतांना अगर लिहितांना कदाचित् असं म्हणतील, कीं “ ज्या प्रसंगानं आपणहि लेखन करावं अशी जोराची इच्छा माझ्या मनांत उत्पन्न झाली तो प्रसंग म्हणजे आमच्या सोलापुरांत साहित्यसंमेलन झालं त्या वेळेस आम्हां लहान विद्यार्थ्यांना प्रमुख साहित्यिकांचा परिचय करून देण्यासाठीं संमेलनाच्या मंडपांत जी सभा झाली त्या सभेचा प्रसंग होय.” खरोखर सोलापूरकरांनीं केलेला हा उपक्रम प्रत्येक संमेलनांत झाला पाहिजे.

सोलापूरच्या संमेलनांत खांडेकरांच्या अध्यक्षीय निवडणुकीला दुजोरा देतांना मी दहा मिनिटें बोललों, आणि नंतर अधिवेशनांत ठिकठिकाणचीं वाङ्मयमंडळें परिषदेशीं संलग्न करून घेण्याच्या ठरावावर मीं एक लहानसं भाषण केलं. पण सोलापूरकरांनीं आग्रह धरला कीं तुमचं स्वतंत्र व्याख्यान आम्हांला ऐकायचं आहे. तारीख १४ एप्रिल रोजीं दुपारीं साडेबारा वाजतां संमेलन आटोपल्यावर त्याच दिवशीं संध्याकाळीं संमेलनाच्या मंडपांत माझं व्याख्यान ठेवण्यांत आलं. व्याख्यानाला सुमारें दहा हजार प्रेक्षक जमले, आणि ‘ आपलं साहित्यविषयक ध्येय व आपली जबाबदारी ’ हा विषय घेऊन मीं सुमारें दीड तास भाषण केलं. या भाषणांत मी असा विचार पुढें मांडला कीं, बदललेल्या परिस्थितींत साहित्य उत्तरोत्तर लोकाश्रयावरच अधिकाधिक अवलंबून राहून जगणार असल्यामुळें राजकीय क्षेत्रांत ज्याप्रमाणें लोकशाही अपरिहार्य मानली पाहिजे व ‘ लोकांनीं चालविलेलं, लोकांसाठीं चालविलेलं, लोकांचं राज्य ’ या राजकीय ध्येयाप्रमाणें ‘ लोकांनीं लिहिलेलं, लोकांसाठीं लिहिलेलं, लोकांचं साहित्य ’ हें साहित्य-विषयक नवं ध्येय साहित्यिकांनीं यापुढं नजरेसमोर ठेवलं पाहिजे.

हा विचार यापूर्वीं कोणीहि इतक्या स्पष्टपणानं बोलून दाखविला नव्हता. त्यामुळें माझ्या या भाषणाचा इतका बोलबाला झाला कीं, नंतर पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेंत चालकांच्या विनंतीवरून हेंच व्याख्यान तारीख २० मे रोजीं मीं दिलं. साहित्यक्षेत्रांत लोकशाही स्थापन झाली पाहिजे, बहुजन समाजाचं व बहुजन समाजासाठीं साहित्य निर्माण झालं पाहिजे, या माझ्या प्रतिपादनाचं ज्याप्रमाणें सामान्यतः सगळीकडे स्वागत झालं, त्याप्रमाणें टीकाकारांनीं माझ्यावर अशी टीका केली कीं, समाजजागृतीसाठींच लेखकानं लिहिलं पाहिजे हें बंधन इतके दिवस अमान्य करणारे व कलेसाठीं कला या तत्त्वाचा आग्रह धरणारे फडके आतां पगडी फिरवून लोकशाहीच्या गोष्टी बोलूं लागले बघा ! आणि नंतर इतर अनेक प्रसंगीं लिहितांना अगर बोलतांना मी जेव्हां अट्टाहासानं म्हणूं लागलों कीं राजकीय जागृतीच्या हेतूनें लिहिलेलं जें असेल तेवढंच सरस ललित साहित्य ही कल्पना चुकीची आणि घातक आहे, तेव्हां माझ्या टीकाकारांनीं पुन्हां अशी टीका केली कीं ज्या फडक्यांनीं लोकांसाठीं लिहिलेलं, लोकांचं साहित्य असावं असं

एकदां मोठ्या आवेशानं सांगितलं तेच आतां एकदम उलट बोलूं लागले आहेत.

परंतु खरी गोष्ट अशी होती कीं मी माझी भूमिका बदलली असा टीकाकारांना भ्रम झाला याचं कारण असं होतं कीं, सोलापूरच्या संमेलनानंतर आणि पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेंत मीं केलेल्या भाषणाचे दोन सारख्याच महत्त्वाचे भाग होते, पण त्यांतील फक्त एकच भाग त्यांनीं ध्यानांत घेतला नाहीं. माझ्या भाषणाच्या पूर्वार्धांत ज्याप्रमाणें मीं म्हटलं कीं साहित्यक्षेत्रांत लोकशाहीचा पुरस्कार झाला पाहिजे त्याप्रमाणेंच याच भाषणाच्या उत्तरार्धांत तितकाच ठासून, मी असाहि इशारा दिला होता कीं राजकीय क्षेत्रांत लोकशाहीचे जे दुष्परिणाम आपल्याला दिसतात तेच साहित्याच्या क्षेत्रांतहि घडण्याचा दाट संभव आहे हें आपण विसरतां कामा नये. बहुजन समाजाच्या संतोषासाठीं लिहिण्याच्या नादानं साहित्याचा अभिजातपणा नाहींसा होऊं देतां कामा नये, साहित्यिकांनीं लोकाभिमुख झालं पाहिजे हें खरं, पण लोकांच्या आहारीं जातां कामा नये. राजकारणाचा प्रचार किंवा लोकांची जागृति या गोष्टींनीं कलेची खरी पारख कधीं होत नाहीं. ललित साहित्याची कसोटी स्वतंत्र आहे !

सोलापूर-संमेलनाच्या आधीं माझे हेच विचार होते, सोलापूरच्या व्याख्यानांतहि हेच विचार मीं बोलून दाखविले होते, आणि त्या व्याख्यानानंतरहि अगदीं चालू घटकेपर्यंत याच विचारांचं प्रतिपादन मी सतत करीत आलों आहें.

सोलापूर-संमेलनाच्या सुमारास मीं झंकारमध्यें लिहिलेल्या एका लेखामुळें वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांची माझ्यावर मोठीच इतराजी झाली. दुसऱ्या महायुद्धाच्या ऐन धामधुमीचे ते दिवस होते. लढाईचा फासा दोस्तांच्या विरुद्ध जातो कीं काय अशी शंका येण्यासारखीं दुश्चिन्हं दिसूं लागलीं होतीं. महात्मा गांधींच्या आणि कॉंग्रेसच्या धोरणाचं सरकारला भय वाटत होतं. कोणत्या भलत्या चळवळीचा वणवा ते देशभर उठवितात याकडे सरकार डोळ्यांत तेल घालून बघत होतं. हिंदुस्थानांतून जितक्या अधिक लोकांची सैन्यांत भरती होईल तितकी सरकारला हवी होती.

देशांतलीं सारीं वर्तमानपत्रं, कांहीं सरकारच्या भयामुळें तर कांहीं हिंदी लोकांनीं सैन्यांत शिरावं यांतच त्यांचं कल्याण आहे अशी प्रामाणिक समजूत झाल्यामुळें, सैन्यभरतीचा प्रचार जोरजोरानं करीत होतीं. अशा परिस्थितींत पुण्याच्या ' केसरी ' पत्रानं या प्रश्नावर एक अग्रलेख लिहिला. त्यांत सैन्यांत भरती झाल्यानं हिंदी तरुणांचा किती फायदा होणार होता त्याचं रमणीय चित्र काढलं होतं, आणि एकदां सैन्यांत शिरल्यानंतर मोठमोठ्या बढतीच्या जागा मिळत जाऊन उदरनिर्वाहाचं एक सन्माननीय साधन तरुणांना कायमचं कसं मिळेल याचं वर्णन केलं होतं.

केसरींतील या आग्रलेखावर मी झंकारमध्यें लेख लिहिला. या लेखांत मी केसरीकारांना मुख्यतः अशी विनंति केली होती कीं हिंदी तरुणांनीं सैन्यांत शिरावं असं जर तुम्हांला वाटत असेल तर तसं जरूर लिहा, परंतु सैन्यांतील जीवनक्रमाचीं खोटीं भडक चित्रं रंगवून तरुणांची दिशाभूल करूं नका. तुम्ही लिहितां त्याप्रमाणें सैन्यांतलं आयुष्य सुखाचं आणि सन्मानाचं नाहीं आणि सैन्यांत शिरण्यानं तरुणांपुढचा पोटापाण्याचा प्रश्न कायमचा सुटेल असं तर मुळींच नाहीं. युद्ध संपल्यावर सैनिकांना घरोघर जावं लागणार आहे. त्यांच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी सरकार आपल्या अंगावर मुळींच घेणार नाहीं.

या माझ्या लेखानं सरकारी अधिकाऱ्यांच्या गोटांत मोठीच खळबळ उडाली. माझ्या लेखाचं इंग्रजी भाषांतर सिमला येथील मुख्य लष्करी ठाण्यापर्यंत पोंचविलं गेलं. आणि तिथून उलट वरिष्ठांचा संदेश सुटून खालच्या सरकारी खात्यांतील चक्रं फिरूं लागलीं. एका संस्थानांत कॉलेजांत अध्यापनाचं काम करणारा एक माणूस सैन्यभरतीविरुद्ध ब्र काढतो म्हणजे काय ? विचारा त्याला जाब ! काढा त्याला नोकरीवरून ! शक्य तर करा त्याची उचलबांगडी आणि चौकशीवांचून ठेवा त्याला डांबून तुरुंगांत ! करा बंद त्याचं साप्ताहिक ! मागा हजारों रुपयांचा जातमुचलका !— अशा आवेशानं वरपासून खालपर्यंत हुकूम सुटले.

माझ्यापर्यंत जेव्हां हें लोण पोंचलं आणि माझ्या लेखाबद्दल मी खुलासा करावा अशी मागणी करण्यांत आली तेव्हां मीं उलट उत्तर दिलं तें असं,

कीं माझा लेख सैन्यभरतीच्या विरुद्ध आहे ही सरकारी अधिकाऱ्यांची समजूत चुकीची आहे. हिंदी तरुणांनीं सैन्यांत शिरावं कीं शिरूं नये या प्रश्नावर झंकारमध्यें प्रसिद्ध झालेला माझा लेख नाहीं. माझ्या प्रतिपादनाचा मुख्य रोख असा आहे कीं, या बाबतींत लोकांची दिशाभूल केसरीसारख्या जबाबदार वृत्तपत्रांनीं करूं नये. हिंदी तरुणांनीं सैन्यांत शिरूं नये अशा अर्थाचं एक तरी वाक्य माझ्या लेखांत काढून दाखवावं असं माझं आव्हान आहे.

माझं हें आव्हान स्वीकारण्यांत आलं नाहीं. परंतु सवाल-जबाबांचा पत्र-व्यवहार चालूच राहिला. आणि अखेर पुण्याच्या लष्करी ठाण्यावरील मुख्य अधिकाऱ्यांना भेटण्यासाठीं तारीख १८ एप्रिल रोजीं मीं हजर व्हावं असा हुकूम माझ्यावर बजावण्यांत आला. त्याप्रमाणें मी त्याला भेटलों तेव्हां त्याच्यापुढेंहि मी हाच प्रश्न टाकला, कीं सैन्यभरतीच्या विरुद्ध मीं कोणतं विधान केलं आहे तें दाखवा. सरकारी भाषांतरकर्ता हजर होता; त्यानं अभिप्राय दिला कीं सबंध लेखांत असं एकहि वाक्य नाहीं.

मग त्या वरिष्ठ अंमलदारानं निराळंच खुसपट काढलं. तो म्हणाला, "सैन्यांत भरती होणाऱ्याला इतका पगार मिळतो, पण जेवण-खाण, कपडालत्ता, धोबी, न्हावी इत्यादींचीं बिलं त्यांतनं वजा केल्यावर सैनिकांच्या हातांत कांहींच शिल्लक रहात नाहीं असं तुम्हीं लिहिलं आहे कीं नाहीं?"

मीं म्हटलं, "होय, लिहिलं आहे."

"तांदुळांत खडे असतात, रोट्या खराब असतात, असं लिहिलं आहे ना?"

"होय, लिहिलं आहे."

"वाटेल त्यानं सैन्यांत भरती व्हावं असा वरवरचा देखावा असला तरी ब्राह्मणांना प्रवेश मिळणं कठीण आहे, बढती वाटते तितकी सोपी नाहीं, आणि युद्धसमाप्तीनंतर सैनिक घरोघरीं परततील तेव्हां त्यांना आपला पोटापाण्याचा प्रश्न पुन्हा सोडवावा लागेल, इत्यादि विधानं तुम्हीं केलीं आहेत कीं नाहीं?"

मीं म्हटलं, "होय, केलीं आहेत."

त्यानं रागावून विचारलं, "हे सगळे आंकडे आणि ही माहिती तुम्हांला कोणी पुरविली ?"

मीं म्हटलं, "तें सांगण्यास मी बांधलेला नाहीं. माफ करा."

तो दरडावून म्हणाला, "तुम्हीं हीं सारीं विधानं जाहीरपणें परत घ्यायला हवींत."

मीं म्हटलं, "मी तीं घेणार नाहीं. कारण तीं खरीं आहेत."

"साफ खोटीं आहेत." तो ओरडला, "आणि अशीं खोटीं विधानं केल्याबद्दल तुम्हांला शासन केलं पाहिजे."

"शासन खुशाल करा. पण तें करण्यापूर्वीं तीं खोटीं आहेत असं तुम्हांला ठरवावं लागेल."

"हुंः ! ठरवायचं काय कारण ? तीं खोटीं आहेतच !"

मीं म्हटलं, "खोटीं आहेतच तर ठरविण्याची टाळाटाळ कशासाठीं ? सरकारला ज माझा सबंध लेख धादांत खोटा असल्याची खात्री आहे, तर सरकारनं माझ्यावर खटला भरावा. माझ्या विधानांच्या समर्थनासाठीं मीं ठिकठिकाणच्या कमांडटच्या, मेसवाल्यांच्या, धोब्यांच्या साक्षी काढीन. ब्राह्मणाला अजूनहि सैन्यांत सहज प्रवेश मिळत नाहीं, बढती वाटते तितकी सोपी नाहीं, आणि लढाई संपल्यानंतर सैन्याचं विसर्जन होणार आहे हें सांगणारे साक्षीदारहि मी आणीन. माझे आंकडे आणि माहिती खोटी ठरली तर न्यायालयांत मला शिक्षा होईल. अशा सरळ मार्गानं माझा समाचार घेण्याऐवजीं आडमार्गांनीं मला तुम्ही त्रास देत आहांत तो थांबवा कीं."

"बरं बरं, तुम्ही आतां जाऊं शकतां." तो अंमलदार धुश्श्यांत म्हणाला.

मी त्याला नमस्कार ठोकून उठलों.

सरकार माझ्यावर सरळ खटला भरील ही गोष्ट शक्य नव्हती. कारण तो त्यांच्या आंगचटीस येणार होता. परंतु झंकारकडून मोठ्या रकमेचा जातमुचलका मागण्यांत येईल असं मात्र मला वाटत होतं. परंतु तेंहि घडलं नाहीं. आणि हें प्रकरण इतक्यावरच थांबलं.

## : : ८० : :

" वेंचलेले मोतीं " नांवाचं सदर मीं झंकारमध्यें क्रमशः लिहिलं. त्यांत पुस्तकाचं रसग्रहण मीं विस्तारानें केलं. त्याखेरीज अशीं इतर कित्येक पुस्तकं माझ्या वाचण्यांत येत असत कीं ज्यांच्यावर स्वतंत्रपणें मोठे लेख लिहिण्यासारखे नसत, पण जीं मला कमी-अधिक आवडत असत. उदाहरणार्थ, ॲन ब्रिजच्या ' इलीरियन स्प्रिंग ' या कादंबरींत लेखिकेनं जो प्रश्न उपस्थित केला होता व ज्या तऱ्हेनं त्याचं उत्तर ध्वनित केलं होतं तो प्रश्न आणि ती तऱ्हा मला अतिशय मनोवेधक वाटली. आपलं जीवित यशस्वी झालं कीं अयशस्वी हें ठरविण्याचं खरं प्रमाण कोणतं ?— आणि खरं स्वातंत्र्य कशांत आहे ?— या प्रश्नाविषयीं कादंबरींतील नायिकेच्या मनाचा कांहीं केल्या निर्णय होत नाहीं व स्वतःच्या शंकाकुल मनःस्थितीचा जाच तिला असह्य होतो. शेवटीं आपल्या नवऱ्याला आणि मुलांबाळांना सोडून तीं दूर प्रवासाला जाते आणि या प्रवासांत तिच्या प्रश्नाचं उत्तर तिला मिळतं आणि तिला दुःखी करणाऱ्या साऱ्या शंका फिटून तिचं मन समाधानानं आणि शांतीनं भरून जातं. जीराल्ड टिकलची ' सी हौ दे रन् ', यो लांडा फूल्डस या हंगेरियन लेखिकेची ' दि स्ट्रीट ऑफ दी फिशिंग कॅट ', क्लॉड हाऊटनची ' स्ट्रेंजर्स ', मार्टिन बॉइडची ' दी लेमन फॉर्म आणि ए सिंगल फ्रेम ' मिसेस बिॲट्रिस कीन सेमूरची सुंदर निवेदनशैली

आणि सूक्ष्म कुशल मनोनिदर्शनानं नटलेली ‘ दी फूल ऑफ टाइम ’— या सर्व कादंबऱ्या मला कमी-जास्त प्रमाणांत वाचनीय वाटल्या. ऱ्हीस डेव्हीसच्या ‘ हॅनी अँड ब्रेड ’ या कादंबरीचं साधं सरळ कथानक व नायक ऑवेन आणि त्याची खेडूत प्रेयसी ब्रॉनवेन या दोघांचं स्वभावचित्रण अंतःकरणाची पकड घेणारं वाटलं. या कादंबरींत कामुकतेचीं आणि संभोगाचीं वर्णनं ठिकठिकाणीं आहेत. तथापि, या प्रकारांच्या वर्णनावर तात्त्विक गूढगुंजनाचा मुलामा दिलेला आहे आणि शिष्ट अभिरुचीला कुठेंहि धक्का न बसेल अशा बेतानं हीं वर्णनं केलेलीं आहेत.

ॲलेक वॉची ‘ सो लव्हर्स ड्रीम ’ ही कादंबरी त्याच्या ‘ गोइंग देअर ओन वेज ’ या कादंबरीइतकी चांगली मला वाटली नाहीं, परंतु तिच्यांतला नायक गॉर्डन, ज्या विवाहित स्त्रीच्या प्रेमांत सापडतो, ती अमेरिकन स्त्री फेथ, आणि नटी जोन यांचीं चित्रं मनावर ठसण्यासारखीं वठलीं आहेत. आजच्या अमेरिकन स्त्रिया विवाहाच्या प्रश्नाकडे ज्या किंचित निराशेच्या व तुच्छतेच्या दृष्टिकोनांतून पाहूं लागल्या आहेत तो ही कादंबरी वाचून कळण्यासारखा आहे. आणि स्त्रीच्या ठिकाणच्या अनेक उत्कट वृत्तींपैकीं सर्वांचं समाधान एक पुरुष करूं शकणार नाहीं, किंबहुना कोणत्याही व्यक्तीच्या संपूर्ण समाधानासाठीं कोणतीहि दुसरी एकच व्यक्ती पुरी पडणार नाहीं हा जो मुख्य सिद्धान्त कादंबरींत ध्वनित केलेला आहे तो विचारांत घेण्यासारखा वाटतो. शिवाय या पुस्तकांत ठिकठिकाणीं अशीं अनेक विधानं विखुरलेलीं आहेत कीं, त्याखालीं वाचतांना रेघ ओढावीशी वाटते. उदाहरणार्थ, पुढील विचार पहा :

> “ या महायुद्धानं आपल्याला कांहीं शिकविलं असेल तर तें हें कीं जर्मनी असा आहे, फ्रान्स तसा आहे, रशिया अशा प्रकारचा आहे– असली सरसकट विधानं करणं वेडेपणाचं होय. अमेरिकन स्त्रिया म्हटल्या कीं त्या अशा असल्याच पाहिजेत असं कोणी म्हणूं नये. येवढंच म्हणावं कीं स्त्रियांच्या ठिकाणची एक नवी वृत्ती साऱ्याच देशांत आज घटकेला कमी-अधिक प्रमाणांत पसरत आहे. आमची नायिका फेथ हिचंच उदाहरण घ्या. आपल्याला मिळालेली

रोटी खाऊन टाकतां यावी आणि हातांतहि शिल्लक रहावी येवढंच तिला वाटत नव्हतं, तर ती पोटभर खाल्ल्यावर देखील आपली भूक कायमच रहावी असंहि तिला वाटत होतं. या विचित्र वृत्तीचा फैलाव अमेरिकेंत आज सगळ्यांत अधिक झालेला आढळतो याचं कारण जगांतल्या इतर कोणत्याही देशांत नाहीं इतकं अमेरिकेंत स्त्रियांचं प्राबल्य आहे..."

आणखी एक नमुना वाचा :

"शतकानुशतकं पुरुषांनीं स्त्रियांविषयीं जी वृत्ति ठेवली ती आतां स्त्रिया पुरुषांविषयीं ठेवूं पहात आहेत. पुरुष हा स्वभावतःच एकनिष्ठ नाहीं, त्याला अनेक स्त्रिया पाहिजेतच, असं सरळ सांगून पुरुष आजपर्यंत बायकांना गप्प बसवीत आले आहेत. लग्नाच्या स्त्रीखेरीज इतर अनेकींशीं आपण रममाण झालों तरी बायकांनीं तक्रार न करतां चूप बसावं असं पुरुष म्हणत आले आहेत. पुरुषांनीं जें आजपर्यंत केलं तें आतां बायका करूं लागल्या आहेत. पुरुषांचा डाव त्यांच्या अंगावर त्या उलटवीत आहेत..."

कामातुरांचे आचरट चाळे व लैंगिक अनाचार यांचीं वर्णनं करणाऱ्या लेखकांचा संप्रदाय मराठी साहित्यांत नव्यानं रूढ करण्याचा गलिच्छ प्रयत्न आजचे कांहीं नवे लेखक करीत आहेत. इंग्रजी साहित्यांत हा सप्रदाय शिष्टसंमत मुळींच नाहीं, तथापि जुना मात्र आहे. या संप्रदायांतल्या कांहीं कादंबऱ्या माझ्या वाचण्यांत मधूनमधून येत. उदाहरणार्थ, रॅडक्लिफ हॉलची 'दि सिक्स्थ बिॲटिटयूड' अनैसर्गिक लैंगिक आकर्षण आणि संभोग यांच्या हिडीस वर्णनांखेरीज या कादंबरीत दुसरी बातच नाहीं, जणूं सारे पुरुष माजलेले खोंड आणि साऱ्या स्त्रिया निर्लज्ज कुत्र्या आहेत. या विषयाबद्दल माझी तक्रार नाहीं. परंतु या पुस्तकाला कलात्मकतेचा गंध देखील नाहीं ! आणि साहित्यांत ध्वनि नांवाचा महत्त्वाचा अलंकार असतो याची हें पुस्तक लिहितांना अजिबात आठवण ठेवलेली नाहीं. या कारणासाठीं हें पुस्तक मला अगदीं कनिष्ठ प्रतीचं वाटलं. मायकेल फूल्डीच्या 'दि वर्ल्ड स्ट्राइड्स ऑन' या कादंबरीची हीच गत. हिचा प्रारंभ मला

फार चित्तवेधक वाटला, परंतु पुढें पाहातों तों चार व्यक्तींच्या अत्यंत विकृत अशा लैंगिक अनाचाराच्या भाकडकथेंत कादंबरीचं रूपांतर झालेलं आढळलं. पहिल्या भागांत नायिका इलोना ही किती तरी रमणीय भासते. आणि तिचे विचार किती स्वतंत्र वाटतात. पण कथानकाचा ओघ पुढें सरकत जातो तेव्हां नायिकेचं हे स्वभावचित्र पार बदलतं आणि एखाद्या निर्लज्ज बाजारबसवीची रया तिला येते. यांतली उद्वेग आणणारी गोष्ट ही कीं नायिकेचं हें परिवर्तन सर्वस्वीं अकारण आहे. आणि केवळ गलिच्छ गोष्टींचीं वर्णनं करण्याची आपली हौस भागविण्यासाठीं लेखकानं हें परिवर्तन घडवून आणलं आहे असं स्पष्ट दिसतं. एच्. जी. वेल्स हा येवढा नामांकित लेखक, पण तोसुद्धां आपल्या विद्वत्तेचीं आणि तत्त्वज्ञानाचीं शिंगं मोडून केवळ निर्लज्ज लिंगपूजनासाठीं लिहिणाऱ्या वासरांत शिरलेला मला आढळला. ‘ ब्राइनहिल्ड ’ या त्याच्या कादंबरीचा विषय कोणता म्हणाल तर एका विवाहित संसारी स्त्रीचा व्यभिचार ! ‘ व्यक्तित्वाचा विकास ’ असं मोटं गोंडस नांव वेल्सनं तिच्या दुराचाराला दिलेलं आहे. ( या विषयाचं रवंथ करणाऱ्या लेखकांची सुंदर सोज्वळ शब्दांच्या आवरणासाठीं आपला हलकट वर्ण्य विषय लपविण्याची ही ठरीव युक्ति आहे ! ) पण नांव कोणतंहि दिलं तरी व्यभिचार तो व्यभिचारच ! वेल्सच्या या कादंबरींत कथारचनेचं कौशल्य काडीमात्र नाहीं; अथवा एखाद्या महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नाकडे वाचकांचं लक्ष वेधण्याचा लेखकानं प्रयत्न केला आहे असंहि म्हणतां येत नाहीं. इतकंच नव्हे तर रोलंड, बंटर ब्राइन इत्यादि ज्या व्यक्तींच्या आचरटपणाचं चऱ्हाट वेल्सनं या कादंबरींत वळलेलं आहे तसल्या व्यक्ती या जगांत खरोखर आहेत काय असा प्रश्न मनांत आल्यावांचून रहात नाहीं.

असलीं पुस्तकं वाचनांत आलीं, किंवा व्हिकी बाऊम हिची ‘ ए टेल फ्रॉम बाली ’ किंवा सॉमरसेट मॉमची ‘ थिएटर ’ यांसारख्या नांवाजलेल्या लेखकांच्या अगदीं कनिष्ठ दर्जाच्या कादंबऱ्या वाचल्या कीं मला वाटे ‘ वेंचलेले मोतीं ’ या लेखमालेप्रमाणेंच ‘ खराब मोतीं ’ या मथळ्याची एक लेखमाला लिहावी !

परंतु माझ्या मनांतली ही चीड घालविणारीं चांगलीं पुस्तकं पुन्हां माझ्या हातीं येत, व तीं वाचण्याच्या आनंदांत इतर पुस्तकांनीं निर्माण केलेली कडू चव मी विसरून जात असे. ' आर. एल्. स्टीव्हन्सनचीं कांहीं पत्रं ' हें अशा सुंदर पुस्तकांपैकीं एक होतं. या पत्रांतून ज्या स्टव्हिन्सनचं दर्शन घडतं तो अतिशय तरल बुद्धीचा, प्रत्येक दुःखाची तत्त्वज्ञानाच्या स्थिर बुद्धीनं चिकित्सा करणारा, अंतःकरणाचा प्रेमळ, आणि विशेष म्हणजे अंगीं मोठी माणुसकी असलेला असा भासतो. या पत्रांतील अनेक विचार सुंदर सुभाषितांसारखे आहेत. उदाहरणार्थ, पुढील विचार पहा :

" माणसानं आपलं मन खुलं ठेवावं म्हणतात तें बरोबर आहे. पण मन खुलं ठेवणं हें तोंड उघडं ठेवण्यासारखं आहे. तोंड उघडं ठेवणं हें कांहीं कायमचं ध्येय होऊं शकत नाहीं. कांहीं तरी चांगला पदार्थ पोटांत जावा म्हणून तोंड उघडं ठेवायचं असतं, आणि तो पदार्थ मिळाला कीं तोंड मिटायलाच हवं. म्हणून मन नेहमींच खुलं ठेवून चालायचं नाहीं. सद्विचार गवसला कीं उलट शंका–कुशंका येऊं नयेत म्हणून मनाचे दरवाजे बंदच करून घ्यायला हवेत. "

स्टीव्हन्सनच्या या पत्रसंग्रहाप्रमाणेंच उद्‌बोधक असं दुसरं एक पुस्तक या सुमारास माझ्या वाचण्यांत आलं. तें म्हणजे रॉबर्ट डब्ल्यू. मेक्‌केना या लेखकाचं ' दि ॲडव्हेंचर ऑफ डेथ ' हें होय. माणसांनीं मरणाला भिऊं नये, किंबहुना मरण ही एक वाईट गोष्ट आहे असंहि मानूं नये. हा या पुस्तकांतील मुख्य सिद्धान्त आहे व त्याच्या पुष्टीसाठीं लेखकानं मोठं मार्मिक प्रतिपादन केलेलं आहे. तो एके ठिकाणीं म्हणतो,

" माणसांनीं इतकीं शास्त्रं रचलीं आणि इतके शोध लावले त्याचं कारण एकच कीं मानवी आयुष्य क्षणभंगुर आहे. माणसाला जर असं कोणीं आश्वासन दिलं कीं, तुझ्या आयुष्याला अंत नाहीं, तूं या पृथ्वीतलावर कायमचा रहाणार आहेस तर माणसाच्या ठिकाणीं उद्योगाची इच्छाच उरणार नाहीं. हें जग अधिक समृद्ध करण्यासाठीं आपल्याला कांहीं तरी केलं पाहिजे, आणि जें करायचं तें लवकर केलं पाहिजे, असं माणसाला वाटेनासं होईल. उद्योग,

परिश्रमाची चिकाटी, यश मिळविण्याची घाई, महत्त्वाकांक्षा इत्यादि सारे गुण लुप्त होऊन जातील. आणि या मर्त्य जगाला एखाद्या गतिशून्य सांडपाण्याच्या डबक्याची रया येऊन माणसाचं जिणं कंटाळवाणं आणि असह्य होऊन बसेल."

सॉमरसेट मॉम याच्याइतका जागतिक बोलबाला दुसऱ्या कोणत्याहि इंग्रज लेखकाचा झालेला नसेल. मला त्याचं 'सेक्रेड फ्लेम' हें नाटक अतिशय आवडलं व त्या नाटकावर 'मनोहरची आकाशवाणी' या पुस्तकांत रसग्रहणात्मक विस्तृत लेखहि मीं लिहिलेला आहे. परंतु या लेखकाचं वेड मला कधींच लागलं नाहीं. याचीं कारणं सांगण्याचं हें स्थळ नव्हे. तेव्हां इतकंच म्हणतों कीं, याचं एखादं नवं पुस्तक हातीं आलं कीं हें आपल्याला आवडतं कीं नाहीं कुणास ठाऊक, असं मनाशीं म्हणतच मी तें वाचूं लागत असें (आणि अजूनहि मॉमबद्दलचं माझं मन असंच संशयग्रस्त आहे.) परंतु ज्या वेळच्या आठवणी मी लिहीत आहें त्या वेळेस— १९४१ सालीं मॉमचीं दोन पुस्तकं मला फार आवडलीं. 'कॉस्मॉपॉलिटन्स' हा कथा-संग्रह; आणि 'अप ॲट दि व्हिला' ही कादंबरी. सॉमरसेटची भाषा आणि लेखनशैली मोठी प्रभावी आणि गुणाची मला कधींच वाटली नाहीं. परंतु 'कॉस्मॉपॉलिटन्स' या संग्रहांतल्या आख्याइका तर एकाहून एक रमणीय तर आहेतच, परंतु त्याखेरीज यांतली लिहिण्याची धाटणी देखील ओघवती आणि नखरेबाज आहे आणि 'अप ॲट दी व्हिला' ही कादंबरी तर फारच छान आहे. हें पुस्तक म्हणजे कादंबरी नसून दीर्घ कथा आहे. यांत भाषेचा डौल कोठेंहि नाहीं. व्हिकी बाऊम, क्रोनिन अर्नेस्ट, रेमंड हिल्टन, हॉवर्ड स्पिग यांसारख्या लेखकांना 'अप ॲट दी व्हिला' या पुस्तकाचा विषय सुचला असता तर त्यांनीं हें कथानक भाषेच्या लखलखा-टानं असं सजविलं असतं कीं वाचणारा मंत्रमुग्धच होऊन जावा. या पुस्तकाचा जो विषय आहे त्याच्या तोलाची भाषा सॉमरसेट मॉमनं लिहिलेली नाहीं— लिहिण्याचा हेतु अगर प्रयत्न असावा याचादेखील पुरावा पुस्तकांत कुठेंहि नाहीं. पण या छोट्या कादंबरीच्या कथानकाची कल्पनाच इतकी अपूर्व आणि सुंदर आहे कीं, सॉमरसेट मॉमच्या भाषेंत देखील त्याची गोडी

विटत नाहीं. या छोट्या कादंबरींत आश्चर्याचे धक्के आहेत, जिज्ञासेला ताण आहे. पण हे धक्के वाचकाच्या मनाला बसतात ते प्रसंगाच्या कलाटणीपेक्षां पात्रांच्या स्वभावांना मिळालेल्या एकावर एक अशा कलाटण्यांमुळें बसतात. गोष्टींतल्या पात्रांचे हिशोब चुकतात. त्यांना आश्चर्याचे धक्के बसतात. आणि त्या धक्क्यांची प्रतिक्रिया होऊन एका धक्क्यांतून जरा सावरावं तो दुसरा आश्चर्याचा धक्का बसावा अशी वाचकांची अवस्था होत रहाते. मॉमची ही छोटी कादंबरी खरोखर फार वाचनीय आहे. तिचं भाषांतर मराठींत व्हायला हवं. मॉमच्या लेखणींतून बाहेर पडणारं प्रत्येक पुस्तक आवडीनं वाचणाऱ्या लोकांची गोष्ट सोडा, पण इतरांनीं जर मला विचारलं, मॉमचं निवडक साहित्य वाचायचं आहे, काय वाचूं सांगा; तर ‘ सेक्रेड फ्लेम ’ हें नाटक, त्याच्या सर्व नाटकांच्या प्रस्तावना, ‘ सामिंग अप ’ हें त्याचं आत्मचरित्रात्मक पुस्तक, ‘ कॉस्मॉपॉलिटन्स ’ हा कथासंग्रह– यांची यादी ज्याप्रमाणें मी करूं देईन त्याप्रमाणेंच ‘ अप ॲट दि व्हिला ’ ही त्याची छोटी कादंबरी अवश्य वाचा अशी शिफारस मी करीन.

♠ ♠

: : ८१ : :

१९४१-१९४२ या कालांत माझ्या वाचण्यांत आलेल्या पुस्तकांच्या आठवणी मी सांगत आहें, तेव्हां आणखी कांहीं पुस्तकांबद्दल लिहावयास हवं. ई. आर. पुष्किन या प्रसिद्ध कादंबरीकाराचा 'दि हिबर्ट जर्नल' या मासिकांतील 'दि आर्टिस्ट अँड हिज ऑडिअन्स' हा लेख, एडवर्ड जे. ओब्रायन यांची एका कथासंग्रहाला जोडलेली प्रस्तावना, क्रिस्टोफर मोर्ले यांची 'ह्यूमन बीइंग' या पुस्तकाची प्रस्तावना, एच्. ई. बेट्सचं 'दि मॉर्डन शॉर्ट स्टोरी' हें पुस्तक आणि मायकेल झोश्शेंको याचा 'दि वूमन हू कुड नॉट रीड' हा कथासंग्रह-हें सारं लिखाण मीं अतिशय गोडीनं वाचलं. कारण त्यांत सुंदर ललित साहित्य जसं माझ्या हातीं आलं त्याप्रमाणेंच ललित साहित्याच्या टीकाशास्त्रांतील कित्येक महत्त्वाच्या तत्त्वांचा पडताळाहि मला सांपडला. बेट्सच्या पुस्तकांत चीकॉव्ह आणि मोपासां यांच्या गुणदोषांची तुलना ज्या प्रकरणांत केलेली आहे तें अत्यंत सरस आणि वाचनीय आहे. क्रिस्टोफर मोर्ले यांच्या प्रस्तावनेंतले काही विचार संस्मरणीय आहेत. उदाहरणार्थ, एखादा लेखक जो आशय व्यक्त करण्यासाठीं नाटक, कादंबरी अगर लघुकथा लिहितो तो समग्रच्या समग्र वाचकाला कळणं किती दुर्घट आहे, आणि— संस्कृत व मराठी साहित्याच्या परिभाषेंत बोलायचं झालं तर- लेखक आणि वाचक यांच्या संपूर्ण

एकतानतेंतून निर्माण होणारा रसाविष्कार किती क्वचित् होण्यासारखा आहे, याचं मोठं मार्मिक विवेचन करून क्रिस्टोफर मोर्ले म्हणतो,

" खरं म्हणजे लेखक लिहितो एक आणि वाचक वाचतो निराळं असाच प्रकार बहुधा होतो. जें पुस्तक लेखकानं लिहिलं तेंच वाचणारा वाचक फार विरळा ! "

दुसऱ्या एका ठिकाणीं ललित साहित्याच्या हेतूबद्दल विवेचन करतांना तो म्हणतो,

" माणूस जेव्हां अगदीं माणसासारखा वागतो तेव्हांचा तो क्षण पकडणं, आणि कृत्रिम रासायनिक साधनावांचून तो टिकविणं, जपून ठेवणं व सर्वांना पहातां येईल अशा प्रकारें प्रदर्शित करणं हा ललित लेखनाचा मुख्य हेतु म्हटला पाहिजे. "

एडवर्ड जे. ओब्रायन यांची एका कथासंग्रहाला जोडलेली प्रस्तावना साहित्यशास्त्राच्या दृष्टीनं मोठी वाचनीय आहे. त्या प्रस्तावनेंत ते एके ठिकाणीं म्हणतात,

" जीवितांतील कोणतीहि घटना ललित साहित्याचा विषय होऊं शकते, हें खोटं नाहीं. परंतु या संबंधांत आपण हें कधींहि विसरतां कामा नये कीं जीवितांतील घटनेला साहित्याचं स्वरूप यावं यासाठीं ती घटना जिवंत असावयास हवी. तिच्यांत मानवी जीविताच्या नाडीचे ठोके ऐकूं यायला हवेत. हा जिवंतपणा ज्या घटनांवर ललित लेखक लिहितो त्यामध्यें स्वयंसिद्ध असत नाहीं, लेखकानं स्वतःच्या प्रतिभेनं आणि सहानुभूतीनं तो त्यांत ओतावयाचा असतो. म्हणून लघुकथेच्या सरसपणाची पहिली कसोटी ही कीं, त्या कथेच्या निमित्तानं लेखकानं जें सांगितलं आहे त्यांत त्यानं जिवंतपणा किती आणला आहे आणि दुसरी कसोटी अशी कीं जें सांगायचं त्यावर कलात्मक सौंदर्याचे संस्कार त्यानं किती केले आहेत. "

ई. आर. पुष्किन यांचा ' दि आर्टिस्ट अँड हिज ऑडिअन्स ' हा निबंध मी वाचूं लागलों तेव्हां त्यांतहि असाच सिद्धान्त प्रतिपादिलेला मला आढळला. या निबंधांत पुष्किन एके ठिकाणीं म्हणतो,

" भावनेचा सहजस्फूर्त उद्रेक म्हणजे कला, ही व्याख्या वाटते तितकी बरोबर नाहीं. केवळ भावनेच्या सहज प्रदर्शनाला आपण कला समजूं लागलों तर कोणती अनवस्था प्राप्त होईल तें पहा. समजा एखाद्या माणसाच्या पायावर दगड पडला आणि त्यानं दुःखाचा व संतापाचा उद्‌गार काढला. त्याच्या या उद्‌गाराला आपण साहित्य अशी संज्ञा देऊं काय? खचित देणार नाहीं. कां देणार नाहीं? तर जिचा उद्रेक व्हायचा त्या भावनेला जितकं महत्त्व आहे तितकंच त्या उद्रेकावर कलावंत जे सौंदर्याचे संस्कार करतो त्या संस्कारांना आहे असं आपण मानतों म्हणून. कलेंत सहजता असावी हें कबूल. परंतु या सहजतेप्रमाणेंच मांडणीची कलाकुसर हवी. किती सांगायचं आणि किती फक्त ध्वनित करायचं याचं तारतम्य हवं– म्हणजेच सौंदर्य-दृष्टीचे संस्कार हवेत. भावनेचा सहजपणा– म्हणजे नैसर्गिकपणा अथवा सच्चेपणा— आणि सौंदर्य-दृष्टीचे हेतुपूर्वक केलेले संस्कार या दोहोंचा मिलाफ झाला तरच कलाकृति अथवा कलात्मक साहित्य तयार होतं— "

ललित साहित्याबद्दलच्या माझ्या स्वतःच्या सिद्धान्ताबद्दलचे पडसाद या प्रतिपादनात स्पष्ट उमटलेले पाहून मला समाधान वाटलं.

आमचे कॉम्युनिस्ट टीकाकार मराठी ललित लेखकांच्या कृतींना नाक मुरडूं लागले कीं, रशियन साहित्याबद्दल हव्या त्या बाता झोकून देतात. यांतली त्यांची एक ठरीव थाप अशी आहे कीं मध्यमवर्गीय साहित्यिकांकडून रशियन साहित्याच्या वैभवाला हातभार लागलेला नाहीं, आणि कोणत्याहि देशांत तो लागणं मुळीं शक्यच नाहीं. कॉम्युनिस्टांची ही गरम थाप संपूर्णतः खोटी असल्याची साक्ष रशियन साहित्यिकांच्या लिहिण्यांतच वरचेवर आढळते. मायकेल झोश्शेंकोचा 'दि वुमन हू कुड नॉट रीड' हा कथासंग्रह म्हणजे अशा प्रकारचीच धवधवीत साक्ष आहे. एलिशाव्हेटा फेननं या संग्रहाला जी प्रस्तावना लिहिली आहे तिच्यांत म्हटलं आहे कीं, " मायकेल झोश्शेंको हा कामकरी शेतकरी नव्हे तर मध्यमवर्गीय लेखक आहे, आणि गोगोल, साल्टिकॉफ इत्यादि प्रथम श्रेणींतील रशियन

साहित्यिकांची विनोदी लेखनाची परंपरा यशस्वी रीतीनं चालविणारा एक अभिजात लेखक म्हणून तो मानला जातो. " आणि ही माहिती दिल्यावर प्रस्तावनेंत पुढें असं म्हटलं आहे कीं,

> " क्रांतिपूर्वीच्या काळांतली गोष्ट तर राहूं द्या, परंतु क्रांती-नंतरच्या अगदीं अलिकडच्या काळांत देखील रशियन साहित्याचं वैभव वाढविण्याची कामगिरी खरोखर कुणी केली असेल तर ' मध्यमवर्गीय ' असं ज्या अल्पसंख्य वर्गाचं वर्णन केलं जातं त्यांतील लेखकांनींच ! श्रमजीवी शेतकऱ्यांचा वर्ग आणि अमीर-उमरावांचा वर्ग या दोहोंच्यामध्यें हा तथाकथित मध्यमवर्ग सांपडलेला आहे. परंतु उच्च संस्कृतीची जोपासना याच वर्गाच्या हातून झालेली आहे आणि पुढेंहि होणार आहे "

परंतु मी वाचलेल्या सुंदर सुंदर पुस्तकांच्या आठवणी सांगूं लागलों तर त्या कधींच संपणार नाहींत. तेव्हां १९४२ सालांतील माझ्या साहित्य-विषयक इतर कांहीं उद्योगांबद्दल आपण बोलूं. या वर्षाच्या प्रारंभीं कॉंग्रेसच्या राजकारणाला एक नवाच रंग चढूं लागला. क्रिप्स मुद्दाम इंग्लंडहून हिंदुस्थानांत आले. हिंदी लोकांना कांहीं तरी देऊन टाकण्यासाठीं ते आले अशी हिंदुस्थानांतील सर्व राजकीय पक्षांची समजूत झाली, आणि क्रिप्सच्या आणि पुढाऱ्यांच्या गांठीभेटी आणि मुलाखती यांच्या बातम्यांनीं वातावरण कांहीं दिवस अगदीं भरून गेलं. क्रिप्सच्या हिंदुस्थानांतील हालचालींच्या बातम्या मी वृत्तपत्रांतून वाचीत होतों, परंतु त्यांचा काळजीपूर्वक अभ्यास करण्याची मला कधीं गरज पडेल अशी माझी कल्पना नव्हती. परंतु तारीख २० एप्रिल रोजीं मला श्री. शांताराम यांजकडून एकाएकीं तार आली कीं, " तावडतोब मुंबईस या. क्रिप्सच्या भेटीचा चित्रपट मी तयार करीत आहें त्याची ' कॉमेंटरी ' लिहिण्याचं व बोलण्याचं काम मी तुमच्याकडं सोंपविणार आहें. "

त्या वेळेस वार्ता-चित्रपट-निर्मितीच्या सरकारी खात्यांत प्रमुख सल्लागार व संयोजक म्हणून श्री. शांताराम काम करीत होते. त्यांनीं आतांपर्यंत कांहीं वार्ता—चित्रपट काढलेहि होते, व ते चांगले वठले होते. परंतु क्रिप्सच्या

भेटीच्या या वार्तापटाला विशेष महत्त्व होतं व तो अगदीं उत्कृष्ट ठरला पाहिजे अशी महत्त्वाकांक्षा शांताराम यांनी धरली होती. अशा महत्त्वाच्या चित्रपटाची कॉमेंटरी लिहिण्याची व बोलण्याची कामगिरी श्री. शांताराम यांनीं माझ्याकडे सोपविली हें पाहून मला साहजिकच आनंद झाला. मात्र " आतां माझी परीक्षा आहे " असा जो उद्‌गार ती कामगिरी स्वीकारतांना माझ्या तोंडून बाहेर पडला तो केवळ मला हवी असलेली एक संधि मला मिळाली व माझी पात्रता सिद्ध करण्याची जबाबदारी आतां माझ्यावर आहे येवढ्याच अर्थानं नव्हे. माझ्या त्या उद्‌गारांत आणखी थोडासा खोल अर्थ होता. तो असा कीं, क्रिप्सबद्दलचा हा वार्ता-चित्रपट सरकारी खात्या-मार्फत तयार आणि प्रसिद्ध व्हावयाचा होता. क्रिप्सचं कौतुक व्हावं हा हेतु त्या चित्रपटाच्या निर्मितींत असणार हें उघड होतं. आणि मला व्यक्तिशः तर क्रिप्सनं कांहीं विशेष केलं असं कौतुक मुळींच वाटत नव्हतं. श्री. शांताराम यांना व सरकारी खात्यांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांना पसंत पडेल अशी कॉमेंटरी मला लिहावी लागणार होती; पण ती लिहितांना माझ्या प्रामाणिक मतांना तर मला धक्का लागूं द्यावयाचा नव्हता ! काम कठीण आणि नाजूक होतं. बघूं या आपल्याला कितपत जमतं तें, असं म्हणत मी मुंबईस जाऊन दाखल झालों ! श्री. शांताराम यांचे सहाय्यक एझरामीर दिल्लीहून आणि सिमल्याहून खूप फोटो घेऊन आले होते. ते लक्षपूर्वक पहावयाचे, त्यांतून एक सुसंगत गोष्ट तयार होईल अशा प्रकारें त्यांचा अनुक्रम ठरवायचा, आणि माझं ' भाष्य ' मीं लिहावयाचं असा बेत मुक्रर झाला, आणि एझरामीर यांनीं काढलेल्या फोटोंची फिल्म पाहण्यासाठीं मी श्री. शांताराम यांच्याबरोबर नॅशनल स्टूडिओमध्यें गेलों.

बुधवार तारीख २२ एप्रिल रोजीं संध्याकाळीं ही फिल्म मीं एकदांच नव्हे तर पुन्हा पुन्हा तीन-तीन चार-चार वेळां पाहिली. मी ' भाष्य ' लिहीन त्याच्या अनुरोधानं नवे फोटो घेणं आतां शक्य नव्हतं. कारण क्रिप्स इंग्लंडला परत गेले होते, व त्यांच्या भेटी-मुलाखती घेणारे पुढारी देखील आपापल्या स्थानीं निघून गेले होते. आतां अमुक फोटो हवा म्हटलं तर तो घेण्याची शक्यता उरली नव्हती. एझरामीर यांनीं जेवढ्या व्यक्तींचं आणि प्रसंगांचं चित्रण केलं होतं तेवढ्यावर काम भागवायचं होतं. म्हणजे

एखाद्या गवयाकडून मूळ चीजेची चाल ऐकून त्यावर नाटकांतलं पद तयार करण्यासारखी कामगिरी होती. म्हणून नाटकांतलं पद तयार करावयाचं असलं म्हणजे माझ्या डोक्यांत मूळची चीज पक्की बसून ती मला गुणगुणतां येईपर्यंत चाल देणाऱ्याकडून ती मी जशी पुनः पुन्हा म्हणवून घेतों त्याप्रमाणें एझरामीर यांनीं आणलेली फिल्म माझ्या डोक्यांत पक्की होईपर्यंत ती पुनः पुन्हा पहाणं मला भाग होतं. स्टूडिओंतून परत आलों आणि जेवण आटोपून अंथरुणावर पडलों व डोळे मिटले. पण झोंप घेण्याऐवजीं एझरामीर यांची फिल्मच मी मिटलेल्या डोळ्यांनीं सारखी पाहत होतों, आणि माझ्या कॉमेंटरीचा प्रारंभ कसा करायचा, तिच्या ओघांत कोणकोणत्या मुख्य मुख्य प्रसंगांचा उल्लेख करावयाचा, व तिचा नाट्यपूर्ण शेवट कोणत्या प्रसंगानं कसा करावयाचा याचा मी मनाशीं विचार करीत होतों.

गुरुवारीं मेट्रो सिनेमाच्या इमारतीच्या एका भागांत असलेल्या शांतारामच्या ऑफिसांत मी गेलों, तेव्हां त्यांनीं आपल्या नेहमींच्या पद्धतीनं हंसून विचारलं,

"काय अप्पासाहेब, कॉमेंटरी तयार आहे कीं नाहीं ?"

मीं हंसत म्हटलं, "डोक्यांत तयार आहे. आतां लिहून काढायचंच तेवढं काम उरलं आहे."

ते म्हणाले, "ठीक आहे, मग बसा तर आणि करा सुरुवात लिहायला."

मी तासाभरांत सबंध कॉमेंटरी लिहून काढली. एझरामीर यांच्या सल्ल्यानं तिच्यावर थोडे संस्कार केले. श्री. शांताराम पुन्हा आले तेव्हां आम्ही तिघांनीं मिळून चर्चा केली आणि संध्याकाळीं पांच वाजतां माझ्या कॉमेंटरीची अखेरची प्रत तयार झाली. कॉमेंटरी लिहिण्याचं काम संपलं होतं. आतां पुढचं काम म्हणजे तिचं रेकॉर्डिंग करण्यासाठीं मला ती मोठ्यांदा वाचायची होती.

हा चित्रपट केवळ हिंदुस्थानांतल्या सगळ्या प्रमुख शहरींच नव्हे, तर इंग्लंड-अमेरिकेंतहि दाखवला जाणार होता. कॉमेंटरी लिहितांना ज्याप्रमाणें अगदीं आधुनिक थाटाची वापरण्याची दक्षता मी घेतली होती. त्याप्रमाणें ती बोलतांना त्यांत आधुनिक वक्तृत्वाचे सारे गुण दिसावेत, शब्दांचे उच्चार

अगदीं निर्दोष व सफाईदार व्हावेत याची काळजी घ्यायचं मीं ठरविलं होतं. रात्रीं कितींदा तरी कॉमेंटरी स्वतःशींच मोठ्यांदा वाचण्याची तालीम मी केली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं नॅशनल स्टुडिओमध्यें गेल्यावर ठराविक वेळेंत कॉमेंटरी वाचून पुरी होते कीं नाहीं तें पाहण्यासाठीं श्री. शांताराम यांनीं एकदां माझी तालीम घेतली. मग लगेच रेकॉर्डिंग करण्यांत आलं. ' अगदीं बिनचूक ' असा रेकॉर्डिंग करणारानं अभिप्राय दिला. माझं काम संपलं !

तारीख ८ मे रोजीं प्रमुख वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींना हा वार्ता-चित्रपट माझ्या भाषणासकट दाखविण्यांत आला. शनिवार तारीख ९ मे रोजीं मुंबईच्या सगळ्या चित्रंपटगृहांत तो दाखविला गेला. एक अत्यंत सुंदर वार्ता-चित्रपट काढल्याबद्दल श्री. शांताराम यांचं सगळ्यांनीं अभिनंदन केलं. माझी कॉमेंटरी उत्कृष्ट वठल्याबद्दलचे अभिप्राय सगळीकडे येऊं लागले.

मी माझ्या प्रामाणिक मतांना धक्का लागूं न देतां ही सबंध कॉमेंटरी कशी लिहिली होती त्याचा पत्ता मात्र कुणालाच लागला नाहीं. तो लागू नये अशा चातुर्यानंच ती लिहिण्याचं काम मीं केलं होतं. सरकारची किंवा क्रिप्सची आंधळी प्रशंसा मी एका शब्दानंहि केली नव्हती. क्रिप्सच्या आगमनानं देशांत आशेचं वातावरण कसं पसरलं होतं त्याचं मीं वर्णन केलं होतं आणि या आशेची लाट हलके हलके कशी ओसरत गेली व निराशा कशी वाढत गेली तें वेचक शब्दांत सांगून क्रिप्सची ती भेट एखाद्या शोकांतिकेसारखी कशी ठरली तें दर्शविणारीं निवडक वाक्यं मीं कॉमेंटरीच्या अखेरीस योजिलीं होतीं आणि त्या वार्ता-चित्रपटाला नांवहि मीं असं दिलं होतं कीं त्यांत माझं प्रामाणिक मतच व्यक्त व्हावं— ' ए गॅलंट एफर्ट ' (एक उमदा प्रयत्न) या नांवानं तो वार्ता-चित्रपट प्रकाशित झाला होता.

मी स्वतः हा चित्रपट कोणत्याहि थिएटरांत कधीं पाहिला नाहीं. पण तो पाहणारे लोक मला प्रशंसेचीं पत्रं धाडीत, अथवा प्रत्यक्ष भेटींत माझ्या कॉमेंटरीची तारीफ करीत. कित्येकजण मला म्हणत, " सर स्टॅफर्ड क्रिप्स यांचं व्हिक्टोरिया रोडवरील नंबर ३ च्या बंगल्यांत प्रथम आगमन झालं

त्या वेळच्या तिथल्या उत्साहपूर्ण गडबडीचं आणि बोलणीं फिसकटल्यानंतर त्या बंगल्याला जी उदासीन अवकळा आली तिचं, हीं तुमचीं दोन्ही वर्णनं अगदीं अनुरूप अशा चित्रामुळें उठावदार झालीं आहेत. पहिल्या वर्णनांत तुमच्या एकेका शब्दागणिक त्या स्थळांतील उल्हास दृष्टीला स्पष्ट दिसतो आणि तुमच्या दुसऱ्या वर्णनांतला तुमचा बदललेला स्वर आणि तुमच्या तोंडचीं वाक्यं ऐकतांना पडद्यावर दिसणाऱ्या त्या स्थळांच्या चित्रांतहि निराशा आणि औदासीन्य भरल्याचा स्पष्ट प्रत्यय येतो."

ही प्रशंसा ऐकली कीं मला साहजिकच समाधान होत असे, परंतु मला मनांतल्या मनांत हंसूं आल्यावांचून रहात नसे. कारण जो प्रत्यय आल्याची कबुली लोक देत असत तो एक आभास होता !

मीं जेव्हां कॉमेंटरी लिहिली तेव्हां एझरामीर यांना मीं म्हटलं, "क्रिप्स ज्या बंगल्यांत राहिले त्याचे दोन निरनिराळे फोटो मला हवेत. एकांत उत्साह, धांवपळ, गडबड दिसली पाहिजे. दुसऱ्यांत स्तब्धता, निराशा दिसली पाहिजे."

एझरामीर मला म्हणाले, "आतां दोन निरनिराळे फोटो मी कुठून आणूं ? मीं तर बंगल्याचा हा एकच फोटो घेऊन आलों आहें. आणि तो देखील मी केव्हां घेतला सांगूं ? क्रिप्स त्या बंगल्यांत येऊन दाखल व्हायच्या आधीं !"

मीं कपाळाला हात लावला आणि शांताराम यांच्याकडे बघून म्हटलं, "आतां कसं करायचं ? दोन वेगवेगळे फोटो अवश्य हवे होते !"

मोठा घोटाळा झाला अशा अर्थाच्या चर्या करून आम्ही तिघेहि गप्प बसलों. महत्त्वाचा विचार करावयाचा म्हणजे सिगरेट ओढायला हवी म्हणून मीं व एझरामीर यांनीं सिगारेट्स पेटविल्या. शांतारामना असल्या कृत्रिम साधनांची आवश्यकता नव्हती. आणि आम्हां दोघांच्या आधीं त्यांनींच या पेच-प्रसंगांतून मार्ग काढला. ते म्हणाले,

"आप्पासाहेब, दोन फोटो नसले तरी फिकीर नाहीं. पहिल्या उल्हासाचं आणि अखेरच्या निराशेचं वर्णन करतांना तुम्ही आपल्या भाषेचं सारं कौशल्य, आणि तीं वर्णनं वाचतांना आवाजांतला सारं अभिनय-

कौशल्य खर्ची घाला. तुमच्या दोन्ही वर्णनांच्या वेळेस त्या बंगल्याचा एकच फोटो आपण पडद्यावर दाखवूं. परंतु तुम्ही जर खरी करामत केलीत तर एकच फोटो दोन्ही वेळ दाखविला आहे हें कुणाच्या लक्षांतहि येणार नाहीं !"

—आणि काय आश्चर्य, शांताराम यांचा तो हिशोब खरा ठरला ! एडिटिंगच्या कामांतल्या शांताराम यांच्या अद्वितीय चातुर्याची प्रशंसा करावी, कीं एकाच चित्रांत दोन वेगवेगळे अभिप्राय दिसावेत इतका भाषेचा व शब्दाभिनयाचा प्रभाव मीं दाखविला याबद्दल मीं स्वतःची पाठ थोपटून घ्यावी, याबद्दलचा निर्णय करणं कठीण आहे. शब्दाच्या सामर्थ्यांत केवढी जादू आहे त्याचं उदाहरण म्हणून मात्र या कॉमेंटरीच्या संबंधांत मला आलेला हा अनुभव माझ्या नेहमीं लक्षांत राहील.

♠ ♠

:: ८२ ::

१९४२ सालीं झंकारमध्यें ' वादळ ' ही कादंबरी मी क्रमशः लिहिली. जॅन व्हॅल्टिनच्या ' आऊट ऑफ दि नाइट ' या आत्मचरित्रात्मक पुस्तकाचा हा अनुवाद होता. परंतु पुस्तकांतील पाल्हाळ गाळून टाकून तें संक्षिप्त करून त्याला कादंबरीचं स्वरूप मीं दिलं होतं. जॅन व्हॅल्टिनचं हें पुस्तक वाचल्याबरोबर मला वाटलं कीं याचं मराठींत भाषांतर केलंच पाहिजे. एका विलक्षण निष्ठावंत आणि साहसी पुरुषाच्या ऐन जवानींतल्या वीस वर्षांची ही एक अत्यंत चित्तवेधक अशी एक कथा आहे. आपण मराठी भाषा बोलणारे व वाचणारे लोक कांहीं झालं तरी एका संकुचित जगांत वावरत आहोंत. स्वदेश, स्वातंत्र्य इत्यादि शब्द आपण सहज तोंडावाटें काढतों, परंतु एका खंडाएवढ्या विस्तीर्ण अशा आपल्या या मायदेशांत ठिकठिकाणी स्वातंत्र्याच्या प्रयत्नाला पोषक व घातक असे कोणकोणते प्रकार घडत आहेत याची आपल्याला किती तुटपुंजी माहिती असते ! बाहेर जपान, चीन, स्पेन, जर्मनी, रशिया इत्यादि राष्ट्रांत ज्या घटना गेल्या पंधरा-वीस वर्षांत घडल्या व आज घडत आहेत, त्यांचा आपल्या या मातृभूमीच्या भवितव्यावर कमी-अधिक बरा-वाइट परिणाम खचित घडणार आहे हें नाकारतां येण्यासारखं नसूनहि त्यांचं ज्ञान आपल्याला कितीसं आहे ? जर्मनी व रशिया हे दोनच देश घेतले तरी ज्यायोगें अखिल

मानवजातीच्या हिताहिताची दिशा ठरणार आहे असे एवढाले उत्पात त्या देशांत होऊन राहिले आहेत! परस्परविरोधी राजकीय तत्त्वज्ञानाचे केवढाले संग्राम तिकडे चालू आहेत! एक जुलमी सत्ता निपटून निघावी, स्वातंत्र्याचा घोष करीत दुसरी उदयास यावी, तिनंहि कालांतरानं उग्र जुलमी स्वरूप धारण करावं असे विलक्षण रोमांचकारी अंक त्या देशाच्या रंगभूमीवर होतांना दिसत आहेत.

या विलक्षण रणधुमाळींत ज्यानं प्रत्यक्ष भाग घेतला, अशा एका जर्मन क्रांतिकारकानं लिहिलेलं आत्मचरित्र मराठी वाचकांस खचित अत्यंत उद्‍बोधक वाटेल असं मला वाटलं. ‘आऊट ऑफ दि नाइट’ हें मूळ पुस्तक साडेसहाशें पृष्ठांचं आहे. त्याचा विस्तार मी पुष्कळच कमी केला. त्याचप्रमाणें या आत्मचरित्राची एकंदर मांडणी मराठी वाचकांना एखाद्या रम्य कादंबरीसारखी वाटेल अशा प्रकरणांची सुसूत्र रचना मी केली. राजकीय कादंबरी म्हणायची ती कशी असावी याबद्दल माझी स्वतःची एक आवडती कल्पना आहे ती अशी कीं, सबंध राष्ट्राच्या मर्यादा व्यापून राहिलेल्या चळवळींतील पेचप्रसंग आणि कादंबरींतील मुख्य पात्रांच्या वैयक्तिक जीवनांतील पेचप्रसंग यांची बेमालूम सांगड तिच्यांत घातलेली असावी. ‘आऊट ऑफ दि नाइट’ या पुस्तकाचं मराठींत संक्षिप्त भाषांतर करतांना मूळ मजकुराला यत्किंचितही धक्का न लावतां फक्त कथासूत्राचे मुख्य दुवे लालित्यपूर्ण रीतीनं जोडून त्या पुस्तकाला अत्यंत उद्‍बोधक व चटकदार अशा कादंबरीचं स्वरूप देण्याचं मीं मनाशीं योजिलं. मी कोणत्या हेतूनं ‘वादळ’ कादंबरी लिहिली तें यावरून पुरेसं स्पष्ट होण्यासारखं आहे.

परंतु ‘वादळ’ कादंबरी ‘झंकार’ मध्यें क्रमशः येऊं लागली व तिच्या उत्तरार्धांत रशियामधील अधिकारारूढ पक्षाचं आणि विशेषतः स्टालीन व त्याच्या हस्तकांचं गलिच्छ अंतरंग अधिकाधिक स्पष्ट होऊं लागलं तेव्हां इकडल्या कॉम्युनिस्टांना व कॉम्युनिस्ट तत्त्वाच्या चाहत्यांना व अभिमान्यांना मोठा धक्का बसला. मला येणाऱ्या खाजगी पत्रांत प्रश्न विचारला जाऊं लागला कीं कॉम्युनिस्ट लोकांची बदनामी करण्यासाठीं तुम्ही

मुद्दाम दुष्ट हेतूनं ही कादंबरी लिहावयाला घेतली काय? ठिकठिकाणचे कॉम्युनिस्ट कार्यकर्ते लोकांना असेंहि सांगू लागले कीं, “ अहो, ‘ वादळ ’ ही बोलूनचालून कादंबरी म्हणजे कल्पित कथा आहे. कॉम्युनिझमचा धिक्कार करावासा वाटावा अशा ज्या गोष्टी या पुस्तकांत लिहिलेल्या आहेत त्या खऱ्या नाहींत. केवळ कल्पित आणि अतिरंजित आहेत. ”

यांपैकीं दुसऱ्या गोष्टीबद्दल प्रथम खुलासा करतों. ‘ वादळ ’ ही कादंबरी आहे हें खरं; परंतु ती केवळ एक कल्पित कथा आहे असा त्याचा मुळींच अर्थ नव्हे. जॅन व्हॅल्टिनचं मूळ पुस्तक सुटसुटीत आणि अधिक आकर्षक करण्याच्या उद्देशानंच केवळ मीं त्याला कादंबरीचं स्वरूप दिलेलं आहे. मूळ पुस्तक आत्मचरित्र आहे हें विसरतां येणार नाहीं. त्या पुस्तकाच्या लेखकाचं जॅन व्हॅल्टिन हें नांव जरी टोपणनांव असलं तरी तो लेखक आज घटकेला हयात असून अमेरिकेंत रहात आहे. त्याचं खरं नांव रिचर्ड जे. क्रेब्स असं आहे. आपल्या आत्मचरित्रांत नमूद केलेले सारे बरेवाईट प्रसंग या गृहस्थानं प्रत्यक्ष अनुभविलेले आहेत. हिटलरचा नात्सी पक्ष आणि स्टालीनचं सत्तारूढ सरकार यांचीं जीं पाशवी, दुष्ट आणि मानवी स्वातंत्र्याचा सरळ होम करणारीं कृत्यं त्यानं आपल्या आत्मचरित्रांत नांव, गांव, तारखा देऊन चव्हाट्यावर मांडलीं तीं खोटीं ठरविण्याचा प्रयत्न करण्याची छाती अजून हिटलरला अगर स्टालीनला झालेली नाहीं. अर्थात् ‘ वादळ ’ ही एक केवळ कादंबरी आहे असा उद्‌गार काढून मूळ पुस्तकाचं महत्त्व कमी करण्याचा यत्न इकडले कॉम्युनिस्ट करीत असतील तर तो शुद्ध वेडेपणा आहे. असल्या प्रचारानं फसण्याइतके मराठी वाचक अप्रबुद्ध नाहींत अशी मला खात्री आहे.

आतां मला आलेल्या पत्रांतील प्रश्नांबाबत चार शब्द लिहिले पाहिजेत. तो प्रश्न असा, कीं इकडल्या कॉम्युनिस्ट लोकांची बदनामी करण्यासाठीं जॅन व्हॅल्टिनचं पुस्तक मीं अनुवादासाठीं निवडलं कीं काय? याचं उत्तर म्हणून एवढंच सांगतों, कीं हिंदी कॉम्युनिस्ट पक्षाशीं माझा कोणताहि हेवादावा नाहीं. इतकंच नव्हे तर हिंदुस्थानांतील अनेक राजकीय मत-प्रणालींपैकीं जर कोणती मला अधिकांत अधिक पटत असेल तर ती कॉम्युनिस्ट विचारसरणीच होय. हिंदुस्थानांतील कॉम्युनिस्ट लोकांच्या

कार्याबद्दल, साहसाबद्दल, स्वार्थत्यागाबद्दल मला आदर आहे. त्यांच्या कार्याचं वर्णन आणि गौरव करण्यासाठींच ‘ उन्माद ’ ही माझी कादंबरी मी लिहिली. परंतु कोणत्याहि पक्षाला मतलबीपणाचं आणि ढोंगाचं दुष्ट स्वरूप येऊन मूलभूत मानवी स्वातंत्र्याचीच गळचेपी त्यांच्याकडून होऊं लागेल, तर मानवी जीवितांतलं तें मोठ्यांतलं मोठं अरिष्ट होय अशी माझी ठाम समजूत आहे. देशांतील कोणत्याहि राजकीय पक्षाच्या सत्कार्यांची प्रशंसा करायला मी सदा जितका उत्सुक असेन, तितकाच त्या पक्षाला बुवाबाजीचं आणि गुंडगिरीचं स्वरूप आलेलं दिसतांच त्याचा धिक्कार करावयासहि असेन. हिंदुमहासभेच्या विचारसरणींतील ग्राह्यांशाचा पुरस्कार करण्यासाठीं मी ‘ प्रतिज्ञा ’ कादंबरी लिहिली; पण महासभेच्या पुढाऱ्यांचा मतलबीपणा व भेकडपणा तितक्याच तीव्रतेनं एखाद्या कादंबरींत चित्रित करण्यास मी कचरणार नाहीं. देशांतील सर्वांत प्रभावी राजकीय पक्ष म्हणून मला काँग्रेसविषयीं नेहमीं आदर वाटलेला आहे. परंतु “ आशा ”, ‘ प्रवासी ’, ‘ समरभूमि ’, ‘ उन्माद ’ व ‘ प्रतिज्ञा ’ या माझ्या कादंबऱ्यांत काँग्रेसच्या राजकीय तत्त्वज्ञानाबद्दल व कार्यक्रमाबद्दल मी ठिकठिकाणीं तीव्र नापसंती व्यक्त केलेली आहे.

पक्षाभिनिवेशापेक्षां देशाचं आणि देशांतल्या प्रत्येक व्यक्तीचं स्वातंत्र्य अधिक मोलाचं आहे. कोणालाहि पक्षापेक्षां सत्य अधिक श्रेष्ठ आहे. तें लपविल्यानं कोणाचंच कल्याण होत नसतं. मनुष्याच्या अनिर्बंध विकासासाठीं, समतेसाठीं आणि स्वातंत्र्यासाठीं करण्यांत आलेला रशियन क्रांतीचा आणि सोव्हिएट सरकारचा अभूतपूर्व आणि प्रचंड प्रयोग एखाद्या उद्‌बोधक ध्येयाप्रमाणें आपण डोळ्यांपुढें ठेवावा असं मला वाटत होतं. परंतु माझं असंहि मत होतं कीं, रशियांतल्या त्या प्रयोगाला स्वातंत्र्यविघातक हुकूमशाहीचं स्वरूप आणणाऱ्या घटना तिकडे घडत असतील तर त्यांचीहि माहिती आपणाला असली पाहिजे, म्हणजे तशा घटना इकडे आपल्या देशांत घडणार नाहींत अशी सावधगिरी आपल्याला बाळगतां येईल. ‘ आऊट ऑफ दि नाइट ’ या पुस्तकावर अवश्य ते संस्कार करून त्याला कादंबरीचं रूप देऊन ती ‘ वादळ ’ या नांवानं मीं झंकारमध्यें क्रमशः प्रसिद्ध केली, त्यामागची माझी भूमिका ही अशी होती.

'वादळ' कादंबरीचा बोलबाला कल्पनेपलीकडे झाला. त्या वेळेस महायुद्धाला अनुकूल आणि काँग्रेसला विरोधी असं धोरण स्वीकारायला हिंदुस्थानांतील कॉम्युनिस्ट पक्षानं आरंभ केल्यामुळें त्या पक्षाविषयीं जी अप्रीति सामान्य जनतेला वाटूं लागली होती तिच्यामुळें 'वादळ' ही कादंबरी एकदम लोकप्रिय झाली, हें थोडंसं खरं आहे. तथापि, मूळ पुस्तकाचं कादंबरींत रूपांतर करतांना त्यावर मी फार कौशल्यानं संस्कार केले होते ही गोष्ट दोन्ही पुस्तकांची तुलना करून पाहणाऱ्यांना नाकारतां येणार नाहीं. पण माझ्या श्रेयाचा वांटा केवढाहि असो, एवढं खरं कीं ही कादंबरी कल्पनेपलीकडे यशस्वी झाली. तिच्या आजपर्यंत चार आवृत्त्या निघाल्या आहेत, आणि कन्नड, गुजराथी इत्यादि भाषांत तिचीं भाषांतर झालीं आहेत.

परंतु या कादंबरीच्या यशस्वितेपेक्षां दुसऱ्याच एका कारणासाठीं तिची आठवण माझ्या मनांत कायमची राहिली आहे. तें कारण असं कीं, ही 'वादळ' कादंबरी झंकारमध्यें पूर्ण झाली न झाली तोंच देशांत १९४२ चं राजकीय वादळ उठलं आणि माझ्या ध्यानींमनींहि नसतांना त्या वादळांत मी सांपडलों !

तारीख ७ ऑगस्ट १९४२ रोजीं मुंबईस गवालिया टँकच्या मैदानावर ए. आय्. सी. सी. ची सभा झाली आणि इतिहासप्रसिद्ध 'करेंगे या मरेंगे' हा गांधीजींचा ठराव पास झाला. त्या ठरावाची बातमी हां हां म्हणतां जिकडे तिकडे पसरली आणि देशांत एक नवीनच चैतन्य स्फुरूं लागलं. तारीख ९ ऑगस्ट रोजीं पहांटे चार वाजतां मुंबईस गांधीजी आणि काँग्रेसच्या कार्यकारी मंडाळांचे सभासद पकडले गेले आणि धरपकडीचं सत्र देशांतल्या लहान-मोठ्या सर्व गांवीं सुरू झालं. काँग्रेसच्या ठरावाचा आदेश ध्यानांत घेऊन जिकडे तिकडे लोकांनींहि प्रतिकार सुरू केला. विद्यार्थी शाळा-कॉलेजांतून बाहेर पडले. प्रभातफेऱ्या व मिरवणुकी निघूं लागल्या. निषेधाच्या सभा भरूं लागल्या. हें लोण साहजिकपणेंच कोल्हापूरपर्यंत येऊन थडकलं. कॉलेज नांवालाच भरूं लागलं. कॉलेजच्या आवारांत मोठ्या जमावानं जमून आम्हां प्रोफेसरांना उद्देशून विद्यार्थी घोषणा करूं लागले, 'कॉलेजां-

तून बाहेर पडा '. कोल्हापूरच्या पंतप्रधानाच्या जागेवर आतां सुर्वे नव्हते. त्यांची उचलबांगडी केव्हांच झाली होती. खालसा मुलखांतील एक अधिकारी मिस्टर पेरी कोल्हापूरचे पंतप्रधान होते, व शिक्षणाचं खातं पूर्वीचे कोल्हापूरच्या लॉ कॉलेजचे प्रिन्सिपल केळवकर यांच्याकडे होतं. विद्यार्थ्यांना आवरा, त्यांना शिस्तीवर धरा, अशीं तातडीचीं गुप्त सर्क्युलरं आमच्या कॉलेजचे प्रिन्सिपल बॅ. खर्डेकर यांच्याकडे रोज येत होतीं. वर्गांत गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांचा रिपोर्ट प्रोफेसर्सनीं केला पाहिजे असा हुकूम सुटला होता. ' एकूण एक विद्यार्थी गैरहजर ' अशा स्लिपा भरून आम्ही रोज पाठवीत होतों. शाळा-कॉलेजांतून बाहेर पडलेले विद्यार्थी रोज नेमानं कॉलेजच्या मालकीच्या विस्तीर्ण खासबाग मैदानावर जमत होते. प्रचंड सभा होत होत्या. विद्यार्थी-वक्ते तोंडाला येईल तें बोलत होते. त्यांचीं तीं रांणा भीमदेवी थाटाचीं व्याख्यानं ऐकलीं कीं, वाटे हे सारे तरुण हातावर शिरकमल घेऊन प्रचंड पराक्रमासाठीं सिद्ध झाले आहेत. त्यांच्या तोंडच्या वाफेंत प्रत्यक्ष कार्याच्या दृष्टीनं किती अल्प शक्ति आहे तें मला पूर्वीच्या अनुभवानं माहीत झालं होतं. परंतु त्या वेळीं सबंध देशभर उडालेल्या प्रक्षोभाचा नमुना म्हणून त्यांच्या त्या रोज झडणाऱ्या सभा पाहण्यासारख्या होत्या.

तारीख १४ ऑगस्ट रोजीं सभा-बंदीचा कायदा सरकारनं पुकारला. तारीख १५ ऑगस्ट रोजीं कोल्हापुरांतहि छप्पन्नावं कलम पुकारलं गेलं. सभा भरविणं बेकायदेशीर ठरलं. प्रभातफेऱ्या, मिरवणुकी इत्यादींवर बंदी घालण्यांत आली. यानंतर कोल्हापुरांत सामसूम व्हायला हवं होतं, आणि झालंहि असतं. परंतु तें होऊं नये अशी कोणाची तरी इच्छा होती. गेले सहा दिवस खासबागेंत रोज भरणाऱ्या सभेंत विद्यार्थी-वक्त्यांनीं मन मानेल तशा शिव्या ज्यांना दिल्या होत्या त्यांचं केवळ खासबागेंतील सभा बंद झाल्यानं समाधान होण्यासारखं नव्हतं असं दिसलं. रोजच्याप्रमाणें रविवार तारीख १६ ऑगस्ट रोजीं प्रचंड सभा भरावी आणि सभेवर लाठीहल्ला करून लोकांना यथेच्छ चोपतां यावं, साधल्यास गोळीबारहि करतां यावा, अशी कोणाची तरी इच्छा होती. या इच्छेच्या पूर्ततेसाठीं त्यांनीं एक धूर्त डाव रचला !

प्रोफेसर फडके कॉलेजांतून बाहेर पडून चळवळींत दाखल झाले आहेत व रविवारीं दुपारीं खासबाग मैदानावर त्यांचं व्याख्यान होणार आहे, अशी दाट बातमी कोल्हापूरभर पसरविण्यांत आली. या सभेबद्दलचे बोर्डसहि प्रमुख ठिकाणीं ठेवलेले लोकांना दिसले. ही बेकायदेशीर सभा भरू नये अशी सभेच्या आधींच व्यवस्था सहज करतां आली असती. परंतु त्या दिशेनं हालचाल झाली नाहीं. कारण अगदीं टोलेजंग सभा भरावी अशी कुणाची तरी इच्छा होती. लोकांना पिटून काढण्यासाठीं पद्धतशीर डाव रचण्यांत येत होता.

लोक सकाळपासून माझ्याकडे येऊन विचारूं लागले कीं, तुम्हीं कॉलेज सोडलं हें खरं काय? तुम्ही आज दुपारीं भाषण करणार आहांत हें खरं काय? मीं त्यांना बजावून सांगितलं कीं, हें सारं खोटं आहे, आणि तुम्हांला जो जो भेटेल त्याला सांगा कीं हें सारं खोटं आहे. पण त्याचा उपयोग झाला नाहीं. दुपारी खासबागेंत सभा होणार आणि मी बोलणार, ही बातमी जिकडे तिकडे पसरली होती. दुपारीं विद्यार्थी आणि सामान्य लोक यांची एक प्रचंड मिरवणूक रेल्वे स्टेशनपासून निघाली व खासबागेंपर्यंत आली. बागेंत मुख्य पोलीस ठाणं होतं. परंतु मिरवणूक अडविली गेली नाहीं. शहराच्या इतर भागांतूनहि अशाच लहान मिरवणुकी खासबागेंत आल्या. या मैदानाच्या वरच्या बाजूस पश्चिम दिशेकडे जवळच पॅलेस थिएटर आहे. त्या पुढच्या मोकळ्या पटांगणांत लाठीबंद पोलिसांच्या तुकड्या आणि घोडेस्वार जय्यत तयारीनं उभे असलेले लोकांना दिसले. परंतु लोक अशा चेवलेल्या मनःस्थितींत होते कीं, या दृश्याची त्यांना फिकीर वाटण्यासारखी नव्हती.

या प्रकाराची मला मात्र कांहींच कल्पना नव्हती. सभेच्या कंड्या कितीहि पिकविल्या गेल्या असल्या तरी लोक खासबागेंत जमतील असं मला वाटलं नव्हत. पण दुपारची वामकुक्षी संपून चूळ भरण्यासाठीं मी गॅलरींत गेलों, आणि पाहतों तों काय? —

रोजच्याप्रमाणें प्रचंड सभा भरली होती !

माझ्या मनांत आलं, हें लक्षण कांहीं ठीक नाहीं !

परंतु मनांतली चिंता कमी करणारी गोष्ट लगेच घडली. जो कोणी तरुण वक्ता बोलत होता त्यानं आपलं भाषण संपविलं. आतां राष्ट्रगीत झालं कीं सभा संपणार होती. कांहीं विपरीत प्रकार न होतां सभेचं विसर्जन होणार होतं.

परंतु या विचारांनीं मी समाधानाचा निःश्वास पुरता सोडला नाहीं तोंच घोडेस्वार भरवेगांत दौडत आलेले व मैदानाबाहेर पडण्याच्या साऱ्या वाटा रोखून उभे राहूं लागलेले मला दिसले ! दुसऱ्याच क्षणीं लाठीवाल्या पोलिसांच्या तुकड्या थिएटरकडून धांवत येऊन मैदानांत घुसूं लागलेल्या मी पाहिल्या. त्यांच्या आघाडीवर कमरेला रिव्हॉल्वर लावलेले मुख्य पोलीस अंमलदार " मारो, मारो " अशा आरोळ्या ठोकीत धांवत होते, व त्यांच्याबरोबर डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटचीहि स्वारी धापा टाकीत दौड करीत होती.

' वंदे मातरम् ' संपतं न संपतं तोंच सभेवर लाठीहल्ला झाला. लोक सैरावैरा धांवूं लागले. पण घोडेस्वारांनीं आधींच वाटा रोखल्या होत्या. लाठी खावी, धूम ठोकावी, घोडेस्वारांनीं वाट अडविलेली दिसल्यावर परत पळावं, आणि पुन्हां लाठीचे तडाखे खावे, असा भोग लोकांच्या वांट्याला आला. माझ्या अंगाचा भडका उडाला. काय करावं तें सुचेना. रोज लाठीच्या कवायती करणारीं रा. स्व. संघाचीं किती तरी मुलं त्या मोहोल्ल्यांत होतीं. पण त्यांपैकीं एकहि पुढें आला नाहीं. त्यांची ' कृती 'ची वेळ केव्हां येणार होती कोण जाणे. मला जागच्या जागीं उभं रहाणं अशक्य होऊं लागलं.

तितक्यांत मीं पाहिलं तों पांच-सहा विद्यार्थिनी कॉलेज जिमखान्याच्या इमारतीच्या पश्चिमेकडच्या भिंतीच्या आसऱ्यानं उभ्या राहिल्या आहेत व दोघे पोलीस आपल्या लाठ्यांचे तडाखे त्यांच्या नडग्यांवर मारीत आहेत असं दृश्य मला दिसलं ! मग मात्र मला रहावेना. अंगावर कोट न चढवितां पायांत कांहीं न घालतां, जसा होतों तसाच धांवलों. तेवढ्यांत त्या मोहोल्ल्यांतील घराघरांत घुसून मारपीट करण्याचं पोलिसांनीं ठरविलं होतं. मैदानाच्या दक्षिणेकडल्या मैदानावरून मीं खालीं उतरत जायला

आणि घोडेस्वारांची तुकडी वर चढून यायला एकच गांठ पडली. पण खरं म्हणजे मला धड कांहीं दिसत नव्हतं. मी संतापानं बेभान झालों होतों. मला येवढंच दिसलं कीं कमरेचा रिव्हॉल्वर उपसून हातांत घेऊन मुख्य पोलीस अंमलदार चढून वर येत होते. ते आणि मी एकमेकांना परके नव्हतों. आम्ही दोघांनीं कित्येकदां कोल्हापूर–पुणं, पुणं-कोल्हापूर असा प्रवास एकाच डब्यांतून केला होता. मीं एकदम त्यांच्या छातीजवळ त्यांचा शर्ट धरला आणि ओरडलों,

" तुम्ही हें काय चालविलं आहे ? "

त्यांनीं एक शिवी हांसडून मला दूर ढकललं.

यावर मी काय करणार होतों कुणास ठाऊक. पण कुणी तरी मला दूर ओढलं आणि " सर, तुम्ही आधीं इथून दूर व्हा पाहूं ! " असं म्हणून दोन्ही हातांनीं धरून मला खालीं जिमखान्यापुढच्या पटांगणाकडे नेलं !

## : : ८३ : :

जिमखान्याच्या मोकळ्या जागीं जाऊन पोंचलों आणि पहातों तों लाठीच्या तडाख्यांनीं घायाळ झालेले कित्येक लोक मातींत आणि उन्हांत आडवे तिडवे पडले होते आणि विवळत होते. कुणाच्या हातांपायांतून रक्त वाहत होतं. पोलिस अंमलदार त्यांच्याकडे ढुंकूनहि लक्ष न देतां 'मानापमान' नाटकांतल्या धैर्यधर–शीलधरांप्रमाणें येरझारा घालीत होते. ते माझ्या ओळखीचे होते. मी त्यांच्यावर ओरडलों,

" अहो, त्यांच्याकडे जरा बघाल कीं नाहीं ? "

परंतु माझी त्यांची यत्किंचितही ओळख नसल्याप्रमाणें एक अवाक्षर देखील तोंडावाटें न काढतां त्यांनीं आपल्या येरझाऱ्या चालू ठेवल्या.

मीं पुन्हां ओरडून विचारलं, " मीं या लोकांना पाणी दिलं तर तुमची कांहीं हरकत आहे का ? "

त्यांना माझं बोलणं ऐकूं जाईना.

मग त्यांच्या परवानगीची पर्वा न करतां मीं जिमखान्यांत गेलों, लपून जीव धरून बसलेल्या शिपायांना उठविलं, त्यांच्या हातीं पाणी घेऊन आलों, जखमी लोकांच्या डोक्यांवर, तोंडांवर शिंपडलं आणि त्यांना प्यायलाहि दिलं.

इतकं मी करीत आहें तों मुख्य पोलिस अंमलदार माझ्याजवळ आले.

मॅजिस्ट्रेटचीहि स्वारी त्यांच्याबरोबर होती. ते मला म्हणाले, " तुम्हांला अटक केलेली आहे. "

मीं विचारलं, " वॉरंट कुठं आहे ? "

मॅजिस्ट्रेटसाहेब चष्म्यांतून आपल्या पिचपिच्या डोळ्यांनीं माझ्याकडे पहात म्हणाले, " या वेळेस तुम्ही हा प्रश्न विचारावयाचा नाहीं आणि आम्ही त्याचं उत्तर द्यावयाचं नाहीं. "

मीं म्हटलं, " पुढें वेळ आलीं तर तुमचे शब्द मी सांगेन. चालेल ? "

ते म्हणाले, " खुशाल सांगा. "

" ठीक आहे. " असं म्हणून मी पोलिसाबरोबर चालूं लागलों.

मला पोलिस व्हॅनमध्यें बसविण्यांत आलं. लाठीच्या तडाख्यांनीं घायाळ झालेल्या दहा-बारा लोकांना आधींच अटक करून व्हॅनमध्यें बसविलेलं होतं. मी आंत चढून बसल्याबरोबर व्हॅन चालूं झाली. पांच मिनिटांत ती मुख्य पोलीस ठाण्यावर पोंचली. आम्ही सारे खालीं उतरलों. इतरांना एका खोलींत नेण्यांत आलं. मला पुढच्या प्रशस्त खोलींत नेऊन खुर्ची देण्यांत आली.

कांहीं वेळ त्या ठिकाणीं मी एकटाच होतों. माझ्या समोरच्या भिंतीवर एक मोठा फलक होता. रोजच्या दिवसांत अटक झालेल्या लोकांची नोंद करण्यासाठीं त्या फलकावर कॉलम पाडलेले होते. प्रत्येक कॉलमच्या माथ्यावर गुन्हेगाराचा प्रकार लिहिलेला होता. ' खुनी ', ' दरोडेखोर ', ' खिसेकापू ', ' उडाणटप्पू '– अशी ती वर्गवारी होती ! ... तितक्यांत दोघे पोलीस अंमलदार चहाचा ट्रे घेऊन ;आले, व माझ्यापुढें तो टेबलावर मांडून ते म्हणाले, " घ्या, थोडा चहा घ्या. "

मीं त्यांना सांगितलं, " त्या जखमी मुलांना चहाची गरज आहे. त्यांना पाजा, मला नको. "

" घ्याहो, " असं हंसत म्हणून मला खुलविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला.

मीं त्यांना म्हटलं, " हें पहा, तुम्ही आम्ही पुष्कळदां क्रिकेटचे सामने एकत्र खेळलों आहोंत व गंमतीनं चहा घेतला आहे. पण हा प्रसंग फार निराळा आहे. तुमच्याबरोबर चहा पिण्याची माझी बिलकूल इच्छा नाहीं. मला कोणत्या गुन्ह्यासाठीं पकडलं आहे तेवढं सांगा. "

ते कांहींच न बोलतां निघून गेले. मी इकडे पोलीस ठाण्यावर बसलों होतों. त्या वेळीं तिकडे गांवांत विलक्षण प्रकार घडत होते. कॉलेजच्या मैदानावर गोळीबार झाला व त्यांत मी जखमी झालों अशी बातमी उठली व ती सगळ्या शहरांत वेगानं पसरली. राजवाड्यापर्यंत देखील ती पोंचून खुद्द ताराबाई राणीसाहेबांच्या कानांवर गेली. त्यांनीं पॅलेस थिएटर-वर फोन करून चवकशी केली, तेव्हां त्यांना कळलं कीं गोळीबार झालेला नव्हता, फक्त मला आणि कांहीं विद्यार्थ्यांना पकडून पोलीस ठाण्यावर नेण्यांत आलं होतं. सामान्य लोकांना मात्र खरा प्रकार कळणं कठीण होतं. त्यांची समजूत अशीच झाली कीं गोळीबार करण्यांत आला व मी जखमी झालों. नव्या बुधवार पेठेंतून तालमींतले लोक व इतर लोक मोठ्या जमावानं खासबाग मैदानाकडे येऊं लागले. हा जमाव कुस्तीच्या मैदानाच्या कोपऱ्यावर आला तेव्हां अडविण्यांत येऊन त्यावर लाठीहल्ला करण्यांत आला. ही बातमी कळल्यामुळें शहरांतील इतर भागांतहि प्रक्षुब्ध जमाव ठिकठिकाणीं गोळा होऊं लागले. पोलिसांनीं ज्या त्या ठिकाणीं लाठी चालविण्यास सुरुवात केली. रविवार पेठेंतील बुरुजापुढच्या मोठ्या चौकांत या लाठीहल्ल्याला विशेष उग्र स्वरूप आलं. जो पुढें दिसेल त्याला पोलीस बडवूं लागले. बिंदू कुलकर्णी नांवाचा एक तरुण दूर एका दुकानाच्या पायरीवर उभा होता. त्याला खालीं ओढून पोलिसांनीं इतकं मारलं कीं त्याला हॉस्पिटलमध्यें पोंचवावं लागलं. तेथें त्याचं देहावसान झालं. या तरुणाच्या नांवानंच रविवार पेठेंतला हा विस्तीर्ण चौक ‘ बिंदु चौक ’ म्हणून आतां ओळखला जातो.

माझी अटक, पोलिसांनीं ठिकठिकाणीं केलेले लाठीहल्ले, व बिंदु कुलकर्णी याचा मृत्यु, इत्यादि प्रकारांमुळें गांवांत सगळीकडे विलक्षण खळबळ उडाली. विद्यार्थ्यांचा आणि इतर लोकांचा प्रचंड जमाव पोलीस ठाण्याच्या चौकांत जमला आणि ‘प्रोफेसर फडके यांना ताबडतोब मुक्त करा ’ अशी घोषणा करूं लागला. मी ज्या ठिकाणीं बसलों होतों तेथून बाहेरचा हा प्रकार मला दिसत होता. पण स्वस्थ बसून पाहण्यापलीकडे मला कांहींच करतां येण्यासारखं नव्हतं. बाहेरच्या जमावाच्या हातून कांहीं विपरीत प्रकार घडला तर पोलीस गोळीबार करतील अशी भीति मला

वाटली होती. कित्येक वर्षांपूर्वी सोलापूर शहरीं पोलिसांनीं अमानुष अत्याचार केले, त्या वेळेस तिथे जे मुख्य अंमलदार होत तेच आतां कोल्हापुरास होते व 'कोल्हापूरचं सोलापूर करून दाखवतों' अशी प्रतिज्ञा त्यांनीं केल्याचं मला कळलं होतं.

माझ्या समाचारासाठीं गांवांतले प्रतिष्ठित लोक पोलिसांची परवानगी काढून येऊं लागले. त्यांत जी वकील मंडळी होती ती मला विचारूं लागली, "तुमच्यावर वॉरंट बजावलं आहे काय ?" मीं सांगितलं, "नाहीं." त्यांनीं विचारलं, "कोणत्या गुन्ह्याबद्दल तुम्हांला अटक केलेली आहे ?" मीं म्हटलं, "तेंहि मला माहीत नाहीं." मग त्यांतले एक वकीलसाहेब मुख्य पोलीस अंमलदारांना भेटले व माझ्या वॉरंटाबद्दल विचारूं लागले. त्यांना उत्तर मिळालं कीं फडक्यांच्या अटकेचा हुकूम तयार होत आहे. तो झाला कीं त्यांना दाखविण्यांत येईल. वकीलसाहेबांनीं परत येऊन हें संभाषण आम्हांला सांगितलं तेव्हां आम्ही सारे मोठमोठ्यानं हंसूं लागलों.

आम्ही सारे गप्पा मारीत बसलों होतों तों ताराबाई राणीसाहेब माझ्या समाचारासाठीं आल्या. त्यांनीं देखील ही चौकशी केली कीं फडक्यांना कोणत्या गुन्ह्यासाठीं अटक केली आहे ? पोलीस अंमलदारांनीं त्यांची काय समजूत घालून त्यांना परत पाठविलं तें आम्हांला कळलं नाहीं. कांहीं वेळानं पेरीसाहेब माझ्याकडे आले. ते म्हणाले,

"प्रोफेसर फडके, झाल्या प्रकाराबद्दल मला खेद होतो."

मीं त्यांना विचारलं, "मला अटक झाली म्हणून तुम्हांला खेद होतो आहे कीं अटक करण्याजोगा कांहीं गुन्हा मीं केला नाहीं म्हणून तुम्हांला खेद होतो आहे ?"

माझ्या प्रश्नाचं उत्तर देण्याऐवजीं ते माझ्याकडे पाहून म्हणाले, "आतां यांतून मार्ग कसा काढायचा ?"

मीं म्हटलं, "तें मीं काय सांगूं ? तुम्हीं मला अटक केली आहे. पुढे काय करायचं तें तुम्हीच ठरवा. वाटल्यास मला पन्हाळ्याला नेऊन ठेवा, वाटल्यास माझ्यावर खटला भरून मला शिक्षा द्या."

ते चटकन म्हणाले, " छे छे छे ! तसलं कांहीं आम्हांला करायचं नाहीं. तुम्हांला सोडून देण्याची आमची इच्छा आहे. "

मीं हंसून म्हटलं, " मग सोडा तर. "

माझ्याकडे निरखून पहात ते म्हणाले, " पण आम्हांला तुमची सुटका करतां यावी यासाठीं तुम्ही अशी हमी द्यावी कीं चालू घातपाती चळवळींत राजाराम कॉलेजचे विद्यार्थी सामील होणार नाहींत अशी तुम्ही खटपट कराल. तुमचं विद्यार्थ्यांवर फार वजन आहे. ते दुसऱ्या कुणाचंच नाहीं पण तुमचं ऐकतील. "

मीं म्हटलं, " मिस्टर पेरी, विद्यार्थ्यांवर माझं वजन आहे या गोष्टीची तुम्हांला आज एकदम आठवण झाली होय? माझ्या अध्यापनांतील कौशल्याचा व लौकिकाचा विचार करून त्याबद्दल मला कांहीं विशेष बक्षीस देण्याची इच्छा कोल्हापूर सरकारला आजपर्यंत कधीं झाली नाहीं. उलट मी ब्राह्मण म्हणून माझ्यावर सरकारची नेहमीं वक्र दृष्टिच राहिली व मला झगडावं लागलं. ही झाली एक गोष्ट. दुसरी गोष्ट अशी कीं, या चळवळीपासून मीं विद्यार्थ्यांना दूर ठेवावं असं तुम्ही म्हणतां पण तें मीं काय म्हणून करावं ? कॉलेजांतील एक प्रोफेसर या नात्यानं विद्यार्थ्यांना चळवळीसाठीं प्रोत्साहन देणं हें माझं काम नाहीं, किंवा त्यांना परावृत्त करणंही माझं काम नाहीं. माझे विषय मी उत्तम प्रकारें शिकविले कीं माझं कर्तव्य मी केलं असं मी समजतों. सारांश, तुम्ही सुचवितां त्याप्रमाणें कोणतीहि हमी मी देऊं इच्छीत नाहीं. अशा हमीवांचून मला सोडणार असाल तर सोडा. नाहीं तर होतील त्या परिणामांना माझी तयारी आहे. "

पेरीसाहेब उठून निघून गेले. नंतर शिक्षण-मंत्री श्री. केळवकर मला भेटावयासाठीं आले. त्यांच्या बोलण्याचा आशय असा होता कीं पोलिसांनीं मला अटक केली ती अविचारानं केलेली होती व नियमबाह्य होती, तेव्हां हें प्रकरण अधिक वाढवूं न देण्याची सरकारची इच्छा होती व सरकारच्या इभ्रतीला धक्का न लागतां माझी मुक्तता व्हावी याकरितां मी लेखी नाहीं तर तोंडी तरी पेरी म्हणत होते तसलं आश्वासन द्यावं.

मीं उत्तर दिलं, कीं " सरकारला जशी आपली इभ्रत पहावयाची आहे तशी मलाहि माझी इभ्रत पहायला पाहिजे. मीं कोणताही गुन्हा न

करतां तुम्ही मला पकडलंत, आणि मलाच म्हणतां अमुक हमी द्या आणि अमुक आश्वासन द्या ? मीं या गोष्टीला कधींच कबूल होणार नाहीं."

हें माझं बोलणं ऐकून ते गप्प झाले.

परंतु मीं त्यांना पुढें म्हटलं, " तुम्ही म्हणतां तसली हमी तर मी देणारच नाहीं, पण माझी मुक्तता करण्याच्या गोष्टी बोलतां म्हणून एक गोष्ट तुम्हांला सांगतों. माझी सुटका करण्याचा तुमचा जर विचार असेल तर ती तुम्ही ताबडतोब करावी हें बरं. न केलीत तर कॉलेजांतले विद्यार्थी आज कोणते प्रकार करतील तें मला सांगतां येत नाहीं. आणि त्यांच्या-कडून जर कांहीं अनुचित प्रकार घडले तर त्या प्रकारांची जबाबदारी तुमच्यावर राहील असं मी आत्तांच तुम्हांला सांगतों. "

ते म्हणाले, " तुमची ताबडतोब सुटका करण्याचं ठरलं आहे. पण मी एक सूचना तुम्हांला करूं काय ? "

मीं विचारलं, " कोणती ? "

ते म्हणाले, " आज जरी तुमची सुटका झाली तरी तुम्ही कॉलेजांत जाऊं नये. किंबहुना एक आठवडाभर तुम्ही कॉलेजांत न जातां घरीं राहिलांत तर बरं होईल. "

मीं हंसून म्हटलं, " तुम्हांला कोणतं भय वाटतं तें मी ओळखूं शकतों. तुमची कल्पना अशी असेल कीं मी कॉलेजांत जाईन, विद्यार्थी माझ्या अभिनंदनाची सभा भरवितील, मी भाषण करीन, आणि विद्यार्थ्यांचा प्रक्षोभ अधिकच वाढेल. परंतु ही भीति तुम्ही अगदीं बाळगूं नका. माझ्या अभिनंदनासाठीं विद्यार्थी सभा भरवितों म्हणाले तरी मी त्या गोष्टीला मुळींच रुकार देणार नाहीं. असल्या सत्कारांची हौस मीं कधींच बाळग-लेली नाहीं. कॉलेजांत विद्यार्थ्यांची सभा भरेल आणि माझी अटक करण्यांत सरकारनं जी पोरकट सूडबुद्धि दाखविली आहे तिचा मी निषेध करीन अशी शंका तुम्ही मनाशीं अगदीं ठेवूं नका. या गैरप्रकाराबद्दल दाद मागण्याचे दुसरे मार्ग आहेत व त्या मार्गांचा मी अवलंब करीन. सारांश, मी तुम्हांला आश्वासन देतों कीं, कॉलेजांत सभा, भाषण, निषेध असले कांहीं प्रकार होणार नाहींत. मात्र तितकंच हेंहि निक्षून सांगतों कीं

क्र. क्र. १६३०८

तुम्ही मला आज सोडलं तर मीं सरळ नेहमींप्रमाणें कॉलेजांत जाणार, आणि विद्यार्थी जास्त खवळूं नयेत म्हणून मी आज कॉलेजांत गेलेला त्यांना दिसावा ही गोष्ट आवश्यक आहे. ”

“ ठीक आहे. ” असं म्हणून ते गेले.

थोड्याच वेळानं मुख्य पोलीस अंमलदार माझ्याकडे आले, व एक कागद माझ्यापुढें धरून म्हणाले, “ हें तुमचं वॉरंट. ” मीं तें वाचून पाहिलं आणि मनाशीं हंसलों.

“ सशस्त्र बंड करून कायदेशीर सरकार उलथून पाडण्याचा ” गुन्हा केल्याबद्दल मला अटक झाली होती !

पेरी आणि केळवकर यांचीं बोलणीं आणि हें वॉरंट यांचा मेळ कसा घालावयाचा तें मला कळेना !

परंतु थोड्या वेळानं श्रीयुत भालजी पेंढारकर मला भेटावयास आले आणि म्हणाले, “ मी गाडी घेऊन आलों आहें. तुम्ही माझ्याबरोबर चला. ”

मीं विचारलं, “ कुठें ? ”

ते म्हणाले, “ कुठें काय विचारतां ? तुमची सुटका झालेली आहे. ”

वॉरंटाचा कागद त्यांना दाखवून मीं म्हटलं, “ अहो, हें वॉरंट माझ्यावर बजावण्यांत आलं त्याला एक घटकाही झाली नाहीं. आणि तुम्ही सांगतां माझी सुटका झालेली आहे ? ”

ते म्हणाले, “ होय, मीं तुमच्यासाठीं पांचशें रुपयांचा जामीन भरला आहे आणि तो मान्य होऊन तुम्हांला सोडून देण्यांत आलेलं आहे. ”

तें ऐकून हंसावं कीं रडावं तें मला कळेना. सशस्त्र बंडावा करून राज्य उलथून पाडण्याच्या गुन्ह्याचं वॉरंट माझ्या अटकेनंतर अठरा तासांनीं बजावणं अधिक हास्यास्पद होतं, कीं ज्या गुन्ह्याला जामीन चालत नाहीं त्या गुन्ह्याच्या आरोपावर मला पकडल्यानंतर अवघ्या पांचशें रुपयांच्या जामिनावर मला मुक्त करणं अधिक हास्यास्पद होतं ?

♠ ♠

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
नोंदणी क्र. ५४३७८ दि: १-११-१९६६

REFBK-0017308
REFBK-0017308

मूल्य आठ रुपये


## काही नवीन प्रकाशने

- पूर्व गोलार्धातील भूकेंद्र : भारत
  मेजर जनरल य. श्री. परांजपे
- जेट युगातला मराठी माणूस
  शंतनुराव किर्लोस्कर
- नक्षलवाडी : लाल सलाम
  राजाभाऊ कुलकर्णी
- प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास
  खंड १ ला-उत्तरार्ध
  अ. ना. देशपांडे
- आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास
  भाग २ रा : १९२० – १९५०
  अ. ना. देशपांडे



व्हीनस प्रकाशन
'तपश्चर्या'
३८१ क, शनिवार पेठ : पुणे ३०